# काव्यामोद.

संपादक,

कृष्णाजी गोविंद किनरे,

मराठी भाषेचे शिक्षक, न्यू इंग्लिश स्कूल, पुणे.

---

प्रकाशक,

भट आणि मंडळी, बुधवार पेठ, पुणें.

---

सन १९१४.

---

किंमत दहा आणे.

# काव्यामोद.

संपादक,
कृष्णाजी गोविंद किनरे,
मराठी भाषेचे शिक्षक, न्यू इंग्लिश स्कूल, पुणें.

आवृत्ति पहिली.

[ सर्व हक्क संपादकाचे स्वाधीन. ]

सन १९१४.

किंमत दहा आणे.

हें पुस्तक पुणें येथें अच्युत चिंतामण भट यांनीं आपल्या यशवंत छापखान्यांत ( शनिवार पेठ ) छापून प्रकाशित केलें.

# अनुक्रमणिका.


| प्रकरण | पृष्ठ. |
|---|---|
| **तुकाराम:** | |
| १ स्फुट अभंग. | १ |
| **मुक्तेश्वर:** | |
| १ जरासंधवध. | १० |
| २ दमयंतीचा त्याग. | १४ |
| ३ मैत्रेयांचा दुर्योधनास शाप. | १८ |
| **वामनपंडित:** | |
| १ भक्तिमाहात्म्य. | २० |
| २ करुणाष्टक. | २० |
| ३ गंगामाहात्म्य. | २१ |
| ४ नामसुधा. | २२ |
| ५ मृत्तिकाभक्षण. | २४ |
| ६ हरिविलास, भाग १ ला. | २६ |
| ७ हरिविलास, भाग २ रा. | २७ |
| ८ भक्तप्रतिज्ञारक्षण. | २८ |
| ९ नीतिपर श्लोक. | ३० |
| १० वैराग्यपर श्लोक. | ३२ |
| **मोरोपंत:** | |
| १ नाममाहात्म्य. | ३३ |
| २ धर्मसंग्रह. | ३४ |
| ३ सन्मनोरथराजि. | ३६ |
| ४ सत्संगमहिमा. | ३६ |
| ५ कविस्तव. | ३७ |
| ६ केकावलि. | ३८ |
| ७ एक बाल्यप्रसंग. | ४० |
| ८ रामप्रत्यागमन. | ४२ |
| ९ कैकेयीची निर्भर्त्सना. | ४४ |
| १० धेनुहरणप्रयत्न. | ४५ |
| ११ सेतुबंधावर उत्प्रेक्षा. | ४७ |
| १२ गांधारीचा दुर्योधनास बोध. | ४८ |
| १३ कुंतीकर्णसंवाद. | ४९ |
| १४ भीष्मपरशुरामसंवाद. | ५१ |
| १५ भीष्मकर्णसंवाद. | ५४ |
| १६ हंसकाकीयाख्यान. | ५८ |
| १७ अर्जुनप्रबोध. | ६४ |
| १८ कर्णाचे दांत कर्णाचे घशांत ! | ६९ |
| १९ सुंभ जळालें तरी पीळ राहतोच | ७१ |
| **कृष्णशास्त्री चिपळूणकर:** | |
| १ अन्योक्तिकलाप. | ७४ |
| २ कैलास. | ७७ |
| **भास्कर दामोदर पाळंदे:** | |
| १ ईशस्तवन. | ७८ |
| **परशुरामतात्या गोडबोले:** | |
| १ वर्षावर्णन. | ७९ |
| २ दारिद्र्यप्रभाव. | ८२ |
| **विष्णु मोरेश्वर महाजनी:** | |
| १ मातृविलाप. | ८४ |
| **गणेशशास्त्री लेले:** | |
| १ दक्षिणमहासागर. | ८६ |
| **गोविंद वासुदेव कानिटकर:** | |
| १ संमोहलहरी. | ८८ |
| **मोरो गणेश लोंढे:** | |
| १ तारुण्यांतील उमेदी. | ९० |
| **विठ्ठल भगवंत लेंभे:** | |
| १ मातेचें प्रेम. | ९१ |

| प्रकरण | पृष्ठ. |
| --- | --- |
| २ सत्त्वपरीक्षा. | ९३ |
| **विद्याधर वामन भिडे:** | |
| १ सुखदु:खांचा अनुभव. | ९५ |
| **गंगाधर रामचंद्र मोगरे:** | |
| १ जीवितसार. | ९५ |
| **महादेव हरि मोडक:** | |
| १ अद्भुत किमयागार. | ९८ |
| **नारायण वामन टिळक:** | |
| १ नाममहिमा. | १०२ |
| २ मोहाची दुस्तरता. | १०३ |
| ३ स्वदेशप्रेम. | १०४ |
| ४ वृक्षान्योक्ति. | १०४ |
| ५ माझीं फुलें काय झालीं ? | १०५ |
| ६ काय क्रौर्य हें ! | १०६ |
| **कृष्णाजी केशव दामले:** | |
| १ रांगोळी घालतांना पाहून. | १०७ |
| २ कचाप्रत देवयानी. | १०९ |
| **काशिनाथ हरि मोडक:** | |
| १ दीपविसर्जन. | ११३ |
| २ मूर्तिकार. | ११४ |
| **बाळकृष्ण अनंत भिडे:** | |
| १ ईशस्तुति. | ११५ |
| २ गर्व व काळ. | ११७ |
| ३ मुलाचें कौतुक. | ११८ |
| ४ दुर्योधनास अर्जुनाचा जबाब. | १२० |
| ५ भीम व युधिष्ठिर. | १२४ |
| **गणेश जनार्दन आगाशे:** | |
| १ बाष्परथ. | १२७ |
| **लक्ष्मण रामचंद्र पांगारकर:** | |
| १ जन्मसाफल्य. | १२९ |
| २ व्यवहारबोध. | १३१ |
| ३ सद्वर्तन. | १३२ |
| **श्रीपाद नारायण मुजुमदार:** | |
| १ मार्गांतील सरोवर. | १३३ |
| २ चंद्रावतीचें प्रोत्साहन. | १३५ |
| ३ चंद्रावतीचा विलाप. | १३६ |
| ४ वीरमती द्रौपदी. | १३८ |
| **विनायक जनार्दन करंदीकर:** | |
| १ नदी व कवि. | १४६ |
| २ वीरमती. | १४७ |
| **गणेशसुत गुणे:** | |
| १ सुदाम व कृष्ण. | १४९ |
| **लक्ष्मण पांडुरंग भोसेकर:** | |
| १ मातेची थोरवी. | १५३ |
| **रा. दातार:** | |
| १ बागेंतील फुलपांखरास. | १५४ |
| **लक्ष्मण गणेशशास्त्री लेले:** | |
| १ दमयंती. | १५६ |
| २ बोधामृत. | १५९ |
| **कृष्णाजी पांडुरंग लिमये:** | |
| १ सायंकाळ. | १६० |
| २ विजयश्री कां परतली ? | १६२ |
| **एकनाथ पांडुरंग रेंदाळकर:** | |
| १ अन्योक्तिमुक्तांजलि. | १६३ |
| २ नीतिमंडन. | १६६ |
| **दत्तात्रेय अनंत आपटे:** | |
| १ तूंही भिकारीच ! | १६९ |
| २ युधिष्ठिरद्रौपदीसंवाद. | १७१ |
| ३ माधवतेजस्विता. | १७३ |
| **राम गणेश गडकरी:** | |
| १ एखाद्याचें नशीब ! | १७६ |

# काव्यामोद.

## तुकाराम.

### स्फुट अभंग.

(१)

नीचपण बरवें देवा । न चले कोणाचाही हेवा ॥१॥ महापुरें झाडें जाती । तेथें लव्हाळे राहाती ॥२॥ येतां सिंधूच्या लहरी । नम्र होतां जाती वरी ॥३॥ तुका म्हणे कळ । पाय धरिल्या न चले बळ ॥ ४ ॥

(२)

लोह चुंबकाच्या बळें । उभें राहिलें निराळें ॥ १ ॥ तैसा तूंचि आम्हांठायीं। खेळतोसी अंतर्बाहीं ॥ २ ॥ भक्ष अग्नीचा तो दोरा । त्यासि वांचवी मोहरा ॥ ३ ॥ तुका म्हणे अधीलपणें । नेलिं लांकडें चंदनें ॥ ४ ॥

(३)

हेंचि दान दे गा देवा । तुझा विसर न व्हावा ॥ १ ॥ गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ॥ २ ॥ नलगे मुक्ति धन संपदा । संत-संग देईं सदा॥ ॥ ३ ॥ तुका म्हणे गर्भवासीं । सुखें घालावें आम्हांसी ॥ ४ ॥

(४)

काय वाणूं आतां न पुरे हे वाणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥ थोरींव सांडिली आपुली परिसें । नेणे शिवों कैसें लोखंडासी ॥ २ ॥ जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती उपकारें ॥ ३ ॥ भूतांची दया हें भांडवल संतां । आपुल्या ममता नाहीं देहीं ॥ ४ ॥ तुका म्हणे सुख पराविया सुखें । अमृत हें मुखें स्रवतसे ॥ ५ ॥

( ५ )

जे कां रंजले गांजले । त्यांसि म्हणे जो आपुले ॥ १ ॥ तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥ २ ॥ मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनांचें चित्त ॥ ३ ॥ ज्यासि आपंगिता नाहीं । त्यासि धरी जो हृदयीं ॥ ४ ॥ दया करणें जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥ ५ ॥ तुका म्हणे सांगूं किती । तोचि भगवंताची मूर्ती ॥ ६ ॥

( ६ )

शुद्धबीजापोटीं । फळें रसाळ गोमटीं ॥ १ ॥ मुखीं अमृताची वाणी । देह देवाचे कारणीं ॥ २ ॥ सर्वांग निर्मळ । चित्त जैसें गंगाजळ ॥ ३ ॥ तुका म्हणे जाती । ताप दर्शनें विश्रांती ॥ ४ ॥

( ७ )

जाणे भक्तीचा जिव्हाळा । तोचि दैवाचा पुतळा ॥ १ ॥ आणिक नये माझ्या मना । हो कां पंडित शाहाणा ॥ २ ॥ नामरूपीं जडलें चित्त । त्याचा दास मी अंकित ॥ ३ ॥ तुका म्हणे नवविध । भक्ति जाणे तोचि शुद्ध ॥ ४ ॥

( ८ )

दया क्षमा शांति । तेथें देवाची वसती ॥ १ ॥ पावे धांवोनिया घरा । राहे धरोनिया थारा ॥ २ ॥ कीर्तनाचे वाटे । बराडिया ऐसा लोटे ॥ ३ ॥ तुका म्हणे घडे । पूजा नामें देव जोडे ॥ ४ ॥

( ९ )

कां रे नाठविसी कृपाळू देवासी । पोसितो जनासी एकला तो ॥ १ ॥ बाळा दुधा कोण करितें उत्पत्ति । वाढवी श्रीपति सवें दोन्ही ॥ २ ॥ फुटती तरुवर उष्णकाळमासीं । जीवन तयांसी कोण घाली ॥ ३ ॥ तेणें तुझी काय नाहीं केली चिंता । राहें त्या अनंता आठवूनि ॥ ४ ॥ तुका म्हणे ज्याचें नाम विश्वंभर । त्याचें निरंतर ध्यान करीं ॥ ५ ॥

( १० )

आतां तरी पुढें हाचि उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ॥ १ ॥ सकळांच्या पायां माझे दंडवत । आपुलालें चित्त शुद्ध करा ॥ २ ॥ हित तें करावें देवाचें चिंतन । करूनिया मन शुद्ध भावें ॥ ३ ॥ तुका म्हणे हित होय तो व्यापार । करा काय फार शिकवावें ॥ ४ ॥

( ११ )

आशा हे समूळ खाणोनि काढावी । तेव्हांचि गोसावी व्हावें तेणें ॥ १ ॥ नाहीं तरि सुखें असावें संसारीं । फजिती दुसरी करूं नये ॥ २ ॥ आशा मारुनिया जयवंत व्हावें । तेव्हांचि निघावें सर्वांतूनि ॥ ३ ॥ तुका म्हणे जरी योगाची तांतडी । आशेची बीबुडी करीं आधीं ॥ ४ ॥

( १२ )

साहोनिया टांकीघाये । पाषाण देवचि जाला पाहें ॥ १ ॥ तया रीति दृढ मन । करीं साधाया कारण ॥ २ ॥ बाण शस्त्र लाहे गोळी । शूरा ठाव उंच स्थळीं ॥ ३ ॥ तुका म्हणे सती । अग्नि न देखे ज्या रीती ॥ ४ ॥

( १३ )

खरें बोले तरी । फुकासाठीं जोडे हरी ॥ १ ॥ ऐसे फुकाचे उपाय । सांडुंनिया वायां जाय ॥ २ ॥ पर उपकार । एका वचनाचा फार ॥ ३ ॥ तुका म्हणे मळ । मनें सांडितां शीतळ ॥ ४ ॥

( १४ )

पुण्य परउपकार पाप ते परपीडा । आणिक नाहीं जोडा दुजा यासी ॥ १ ॥ सत्य तोचि धर्म असत्य तें कर्म । आणिक हें वर्म नाहीं दुजें ॥ २ ॥ गति तेचि मुखीं नामाचें स्मरण । अधोगति जाण विन्मुखता ॥ ३ ॥ संतांचा संग तोचि स्वर्गवास । नर्क तो उदास अनर्गळ ॥ ४ ॥ तुका म्हणे उघडें आहे हित घात । जयाचें उचित करा तैसें ॥ ५ ॥

( १५ )

जेणें वाढे अपकीर्ति । सर्वार्थी तें त्यजावें ॥ १ ॥ सत्य रुचे भलेपण । वचन तें जगासी ॥ २ ॥ होइजे तें शुद्ध त्यागें । वाउगें तें सारावें ॥ ३ ॥ तुका म्हणे खाटें वर्म । निंद्य कर्म काळिमा ॥ ४ ॥

( १६ )

मुखें बोले ब्रह्मज्ञान । मनीं धन अभिमान ॥ १ ॥ ऐशियाची करितां सेवा । काय सुख होय जीवा ॥ २ ॥ पोटासाठीं संत । झाले कलींत बहुत ॥ ३ ॥ विरळा ऐसा कोणी । तुका त्यासी लोटांगणीं ॥ ४ ॥

( १७ )

जीव तोचि देव भोजन ते भक्ति । मरण ते मुक्ति पाषांड्यांची ॥ १ ॥ पिंडाच्या पोषकीं नागविलें जन । लटिकें पुराण केले वेद ॥ २ ॥ मना आला तैसा करिती विचार । म्हणती संसार नाहीं पुन्हा ॥ ३ ॥ तुका म्हणे पाठीं उडती यमदंड । पापपुण्य लंड न विचारिती ॥ ४ ॥

( १८ )

दुधाचे घागरीं मद्याचा हा बुंद । पडिलिया शुद्ध नव्हे मग ॥ १ ॥ तैसें खळांमुखें न करावें श्रवण । अहंकारें मन विटाळलें ॥ २ ॥ काय करावीं तीं बत्तीस लक्षणें । नाक नाहीं तेणें वायां गेलीं ॥ ३ ॥ तुका म्हणे अन्न जिरों नेदी माशी । आपुलिया जैसी संसर्गें ॥ ४ ॥

( १९ )

मोलें घातलें रडाया । नाहीं असूं आणि माया ॥ १ ॥ तैसा भक्तिवाद काय । रंगबेगडीचा न्याय ॥ २ ॥ वेठी धरिल्या दावी भाव । मागें पळायाचा पाव ॥ ॥ ३ ॥ काजव्याच्या ज्योती । तुका म्हणे नलगे वाती ॥ ४ ॥

( २० )

जैसें दावी तैसा राहे । तरि का देव दुरी आहे ॥ १ ॥ दुःख पावायाचें मूळ । रहणी ठाव नाहीं ताळ ॥ २ ॥ माळामुद्रांवरी । कैंचा सोंगें जोडे हरी ॥ ३ ॥ तुका म्हणे देखें । ऐसे परीचीं बहुतेकें ॥ ४ ॥

## ( २१ )

जाऊनिया तीर्था काय तुवां केलें । चर्म प्रक्षाळिलें वरीवरी ॥ १ ॥ अंतरींचें शुद्ध कासयानें झालें । भूषण त्वां केलें आपणया ॥ २ ॥ वृंदावन फळ घोळिलें साकरा । भीतरील थारा मोडेचिना ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं शांति क्षमा दया । तोंवरी कासया फुंदा तुम्ही ॥ ४ ॥

## ( २२ )

आंधळयासि जन अवघेचि आंधळे । आपणासि डोळे दृष्टी नाहीं ॥ १ ॥ रोग्या विषतुल्य लागे हें मिष्टान्न । तोंडासि कारण चवी नाहीं ॥ २ ॥ तुका म्हणे शुद्ध नाहीं जो आपण । तया त्रिभुवन अवघें खोटें ॥ ३ ॥

## ( २३ )

सोनियाचें ताट क्षीरीनें भरिलें । भक्षावया दिलें श्वानालागीं ॥ १ ॥ मुक्ताफळहार खरासी घातला । कस्तुरी सुकराला चोजविली ॥ २ ॥ वेदपारायण बधिरा सांगे ज्ञान । तयाची ते खूण काय जाणे ॥ ३ ॥ तुका म्हणे ज्याचें तोचि एक जाणे । भक्तीचें महिमान साधु जाणे ॥ ४ ॥

## ( २४ )

कावळयाच्या गळीं मुक्ताफळमाळा । तरी काय त्याला भूषण शोभे ॥ १ ॥ गजालागीं केला कस्तूरीचा लेप । तिचें तो स्वरूप काय जाणे ॥ २ ॥ बकापुढें सांगे भावार्थवचन । वाउगाची शीण होय त्यासी ॥ ३ ॥ तुका म्हणे तैसे अभाविक जन । त्यांसी वायां शीण करूं नये ॥ ४ ॥

## ( २५ )

अंगीकार ज्याचा केला नारायणें । निंद्य तेंहि त्यानें वंद्य केलें ॥ १ ॥ अजामेळ भिल्ली तारिली कुंटणी । प्रत्यक्ष पुराणीं वंद्य केली ॥ २ ॥ ब्रह्महत्याराशी पातकें अपार । वाल्मीक किंकर वंद्य केला ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें भजन प्रमाण । काय थोरपण जाळावें तें ॥ ४ ॥

## ( २६ )

आपुलिया बळें नाहीं मी बोलत । सखा कृपावंत वाचा त्याची ॥ १ ॥ साळुंकी मंजुळ बोलतसे वाणी । शिकविता धनी वेगळाची ॥ २ ॥ काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें । परि त्या विश्वंभरें बोलविलें ॥ ३ ॥ तुका म्हणे त्याची कोण जाणे कळा । वागवी पांगुळा पायांविण ॥ ४ ॥

## ( २७ )

जिव्हा जाणे फिकें मधुर कीं क्षार । येर मास पर हाता न कळे ॥ १ ॥ देखावें नेत्रीं बोलावें मुखें । चित्ता सुखदुःखें कळों येती ॥ २ ॥ परिमळासि घ्राण ऐकती श्रवण । एकाचें कारण एका नये ॥ ३ ॥ एक देहीं भिन्न दावियेल्या कळा । नाचवी पुतळा सूत्रधारी ॥ ४ ॥ तुका म्हणे ऐशी जयाची सत्ता । कां तया अनंता विसरलेती ॥ ५ ॥

## ( २८ )

त्रैलोक्य पाळितां उबगला नाहीं । आमचें त्या काई असे ओझें ॥ १ ॥ पाषाणाचे पोटीं बैसला दर्दुर । तया मुखीं चार कोण घाली ॥ २ ॥ पक्षी अजगर न करी संचित । तयासी अनंत प्रतिपाळी ॥ ३ ॥ तुका म्हणे तया भार घातलिया । उपेक्षीना दयासिंधु माझा ॥ ४ ॥

## ( २९ )

येऊनि नरदेहा विचारावें सार । धरावा पैं धीर भजन-मार्गीं ॥ १ ॥ चंचळ चित्तासी ठेवूनिया ठायीं । संताचिये पायीं लीन व्हावें ॥ २ ॥ भावाचा पैं हाव धरावा निश्चयें । तेणें भवभय देशधडी ॥ ३ ॥ नामापरतें जगीं साधन सोपें नाहीं । आवडीनें गाई सर्वकाळ ॥ ४ ॥ तुका म्हणे धन्य वंश त्या नराचा । ऐसा निश्चयाचा मेरु झाला ॥ ५ ॥

## ( ३० )

शांतिपरतें नाहीं सुख । येर अवघेंची दुःख ॥ १ ॥ म्हणउनी शांती धरा । उतराल पैल तीरा ॥ २ ॥ खवळलिया कामक्रोधीं । अंगीं भरती आधिव्याधी । ॥ ३ ॥ तुका म्हणे त्रिविध ताप । जाती मग आपेंआप ॥ ४ ॥

( ३१ )

आलिया भोगासी असावें सादर । देवावरी भार घालूनिया ॥ १ ॥ मग तो कृपासिंधू निवारी सांकडें । येर तें बापुडें काय रंक ॥ २ ॥ भयाचिया पोटीं दुःखाचिया राशी । शरण देवांसी जातां भलें ॥ ३ ॥ तुका म्हणे नव्हे काय त्या करितां । चिंतावा तो आतां विश्वंभर ॥ ४ ॥

( ३२ )

थोर ती पाहिजे गळाली अहंता । उपदेश घेतां सुख वाटे ॥ १ ॥ व्यर्थ भराभर केलें पाठांतर । जोंवरि अंतर शुद्ध नाहीं ॥ २ ॥ घोडें काय थोडें वागवितें ओझें । भावाविण वांझें पाठांतर ॥ ३ ॥ तुका म्हणे धरा निष्ठावंत भाव । जरी पंढरीराव पाहिजे तो ॥ ४ ॥

( ३३ )

ब्राह्मण तो याती अंत्यज असतां । मानावा तत्वतां निश्चयेंसी ॥ १ ॥ रामकृष्ण नामें उच्चारी सरळें । आठवी सांवळें रूप मनीं ॥ २ ॥ शांति क्षमा दया अलंकार अंगीं । अभंग प्रसंगीं धैर्यवंत ॥ ३ ॥ तुका म्हणे गेल्या षडउर्मी अंगें । सांडुनियां मग ब्रह्मचि तो ॥ ४ ॥

( ३४ )

कांहीं न मागे कोणासी । तोचि आवडे देवासी ॥ १ ॥ देव तयासी म्हणावें । त्याचे चरणीं लीन व्हावें ॥ २ ॥ भूतदया ज्याचे मनीं । त्याचे घरीं चक्रपाणी ॥ ३ ॥ नाहीं नाहीं त्या समान । तुका म्हणे मी जमान ॥ ४ ॥

( ३५ )

साधूनी बचनाग खाती तोळा तोळा । आणिकांतें डोळां न पाहावे ॥ १ ॥ साधूनी भुजंग धरितील हातीं । आणिकें कांपती देखोनिया ॥ २ ॥ असाध्य तें साध्य करितां सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ॥ ३ ॥

( ३६ )

नका दंतकथा येथें सांगों कोणी । कोरडे ते मानी बोल कोण ॥ १ ॥ अनुभव येथें पाहिजे साचार । न चलती चार आम्हांपुढें ॥ २ ॥ निवडी वेगळें क्षीर

आणि पाणी । राजहंस दोन्ही वेगळालीं ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें पाहिजे जातीचें। येरा गाबाळाचें नाहीं काम ॥ ४ ॥

( ३७ )

ढेंकणाचे संगें हिरा जो भंगला । कुसंगें नाडला तैसा साधु ॥ १ ॥ ओढाळाच्या संगें सात्विक नासलीं । क्षण एक नाडलीं समागमें ॥ २ ॥ डाकाचे संगतीं सोनें हीन झालें । मोल तें तुटलें लक्षकोडी ॥ ३ ॥ विषानें पक्वान्नें गोड कडू झालीं । कुसंगानें केली तैशी परी ॥ ४ ॥ भावें तुका म्हणे सत्संग हा बरा । कुसंग हा फेरा चौऱ्यायशींचा ॥ ५ ॥

( ३८ )

दया तिचें नांव भूतांचें पाळण । आणिक निर्दळण कंटकांचें ॥ १ ॥ पाप त्याचें नांव न विचारी नीत । भलतेंचि उन्मत्त करी सदा ॥ २ ॥ धर्मनीतीचा हा ऐक वेव्हार । निवडिलें सार असार तें ॥ ३ ॥ तुका म्हणे धर्म रक्षावयासाठीं । देवासही आटी जन्म घेणें ॥ ४ ॥

( ३९ )

क्षमाशस्त्र जया नराचिया हातीं । दुष्ट तयाप्रती काय करी ॥ १ ॥ तृण नाहीं तेथें पडिला दावाग्नि । जाय तो विझोनी आपसया ॥ २ ॥ तुका म्हणे क्षमा सर्वांचें स्वहित । धरा अखंडीत सुखरूप ॥ ३ ॥

( ४० )

पापाचिप्रामुळें । झालें सत्याचें वाटोळें ॥ १ ॥ दोष झाले बळिवंत । नाहीं ऐसी जाली नीत ॥ २ ॥ मेघ पडों भीती । पिकें सांडियेलीं क्षिती ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं । वेदा वीर्य शक्ति नाहीं ॥ ४ ॥

( ४१ )

ओलें मूळ भेदी खडकाचें अंग । अभ्यासासी सांग कार्यसिद्धि ॥ १ ॥ नव्हे ऐसें कांहीं नाहीं अवघड । नाहीं कईवाड तोंचवरि ॥ २ ॥ दोरें चिरा कापे पडिला कांचणीं । अभ्यासें सेवनीं विष पडे ॥ ३ ॥ तुका म्हणे कैसा बैसयासी ठाव । जठरीं बाळा वाव एकाएकीं ॥ ४ ॥

( ४२ )

भुंकती तीं द्यावीं भुंकों । आपण त्यांचें नये शिकों ॥ १ ॥ भाविकांनीं दुर्जनांचें । मानूं नये कांहीं साचें ॥ २ ॥ होइल तैसें बळ । फजीत करावे ते खळ ॥ ३ ॥ तुका म्हणे त्यांचें । पाप नाहीं ताडणाचें ॥ ४ ॥

( ४३ )

जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती । चालविसी हातीं धरूनियां ॥ १ ॥ चालों वाटे आम्ही तुझाचि आधार । चालविसी भार सवें माझा ॥ २ ॥ बोलों जातां बरळ करिसी तें नीट । नेली लाज धीट केलों देवा ॥ ३ ॥ अवघे जन मज झाले लोकपाळ । सोइरे सकळ प्राणसखे ॥ ४ ॥ तुका म्हणे आतां खेळतों कौतुकें । जालें तुझें सुख अंतर्बाहीं ॥ ५ ॥

( ४४ )

चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्रही न खाती सर्प तया ॥ १ ॥ विष तें अमृत आघात तें हित । अकर्तव्य नीत होय त्यासी ॥ २ ॥ दुःख तें देईल सर्व सुखफळ । होतील शीतळ अग्निज्वाळा ॥ ३ ॥ आवडेल जीवां जीवाचिये परी । सकळां अंतरीं एक भाव ॥ ४ ॥ तुका म्हणे कृपा केली नारायणें । जाणिजेते येणें अनुभवें ॥ ५ ॥

( ४५ )

बोले तैसा चाले । त्याचीं वंदीन पाउलें ॥ १ ॥ अंगें झाडीन अंगण । त्याचें दासत्व करीन ॥ २ ॥ त्याचा होईन किंकर । उभा ठाकेन जोडोनि कर ॥ ३ ॥ तुका म्हणे देव । त्याचे चरणीं माझा भाव ॥ ४ ॥

( ४६ )

ओले मातीचा भरंवसा । कां रे धरिशी मानसा ॥ १ ॥ डोळे चिरींव चांगले । वृद्धपणीं सरक्या जाले ॥ २ ॥ नाक सरळ चांगलें । येउन हनुवटी लागलें ॥ ३ ॥ तुका म्हणे आलें नाहीं । तंव हरिला भज रे कांहीं ॥ ४ ॥

( ४७ )

मुखें सांगे ब्रह्मज्ञान । जनलोकाची कापितो मान ॥ १ ॥ ज्ञान सांगतो जनासी । नाहीं अनुभव आपणासी ॥ २ ॥ कथा करितो देवाची । अंतरीं आशा बहु लोभाची ॥ ३ ॥ तुका म्हणे तोचि वेडा । त्याचें हाणूनि थोबाड फोडा ॥ ४ ॥

( ४८ )

मायबापें केवळ काशी । तेणें नव जावें तीर्थासी ॥ १ ॥ पुंडलीकें काय केलें । परब्रह्म उभें ठेलें ॥ २ ॥ तैसा होईं सावधान । हृदयीं धरीं नारायण ॥ ३ ॥ तुका म्हणे मायबापें । अवघीं देवाचीं स्वरूपें ॥ ४ ॥

( ४९ )

अर्थेंविण पाठांतर कासया करावें । व्यर्थचि मरावें घोकूनिया ॥ १ ॥ घोकूनिया काय वेगीं अर्थ पाहें । अर्थरूप राहें होऊनिया ॥ २ ॥ तुका म्हणे ज्याला अर्थीं आहे भेटी । नाहीं तरी गोष्टी बोलों नका ॥ ३ ॥

( ५० )

केलें पाप जेणें दिलें अनुमोदन । दोघांसी पतन सारिखेंचि ॥ १ ॥ विष नवनीता विष करी संगें । दुर्जनाच्या त्यागें सर्व हित ॥ २ ॥ देखिलें ओढाळ निघालिया शेता । टाळावें निमित्ता थैक म्हूण ॥ ३ ॥ तुका म्हणे जोडे केल्याविण कर्म । देखतां तो श्रम न मानितां ॥ ४ ॥

---

# मुक्तेश्वर.

## १ जरासंधवध.

जरासंध हा मगध देशाचा राजा. हा मोठा पराक्रमी पण निर्दय, क्रूर, दुष्ट व पापी होता. त्यानें शायशीं राजांना बंदींत टाकलें होतें, व असे शंभर कैदी राजे झाले, म्हणजे एक यज्ञ करून त्या सर्वांना बळी द्यावें, असा

याचा विचार होता. युधिष्ठिरानें जेव्हां ' राजसूय ' यज्ञ करण्याचें योजिलें, तेव्हां श्रीकृष्णानें असें सुचविलें कीं, जरासंधाला मारल्यावांचून यज्ञ निर्विघ्न सिद्धीस जाणार नाहीं. मग युधिष्ठिराचे संमतीनें श्रीकृष्ण, भीम व अर्जुन ब्राह्मणवेषानें मगध देशाला गेले, व तेथें बाहुयुद्धांत भीमानें त्याला ठार केलें, हा कथा भाग यांत आहे.

### ओंव्या.

**मागध-राजा आपले प्रौढी । सप्त-द्वीप-समुद्र-थडी । जिंकोनि राजे लक्ष कोडी । कारा-गृहीं सूदिले ॥ १ ॥ तो हा जरा-संध राणा । बळें दळें नावरे कोणा । हा काळ-वरी कुरु-नंदना । म्यां उपेक्षिलें तयातें ॥ २ ॥ यश आयुष्य झालें पूर्ण । बाहु-युद्धें शस्त्रावीण । करावें मागधाचें कदन । इच्छा मातें उद्देली ॥ ३ ॥ असो आतां शब्द-रचना । जाणें असे मागध-हनना । आज्ञा देईं भीमार्जुना । दोघां जावया मज-सवें ॥ ४ ॥ जातां बळिष्ठ शत्रूच्या कदना । यशअपयश नेणवे कोणा । परि कुशळ असो भीमसेना । ऐसें मनीं चिंतीं तूं ॥ ५ ॥ आम्ही दोघे साक्षि-भूत । भीम-हस्तें शत्रूचा निःपात । होईल ऐसा निश्चितार्थ । धर्मराजा जाण पां ॥ ६ ॥ धर्म म्हणे गा पुरुषोत्तमा । तुझी कृपा कवच आम्हां । पांडव-रक्षिता हा महिमा । लोक-त्रयीं प्रसिद्ध ॥ ७ ॥ करावया मागध-कदन । सवें निघाले तिघेजण । भीमा-आंगीं आवेश दारुण । बाहु-स्फुरण होतसे ॥ ८ ॥ असो हे तिघे पुरुष-व्याघ्र । तया नगरा पातले शीघ्र । राज-गृहीं जावया व्यग्र । द्वार-माथां वळघले ॥ ९ ॥ स्नान करोनि श्वेत-वसनी । चंदन चर्चूनि माळा घालुनी । मार्ग सोडोनी राज-सदनीं । अ-मार्गेंचि प्रवेशले ॥ १० ॥ कुंजर-वना-माजिं केसरी । कीं गोठणीं प्रवेशिजे व्याघ्रीं । तैसे तिघे हो-मागारीं । जरा-संधें देखिले ॥ ११ ॥ न बोलतां आशी-र्वचनीं । स्तंभ-प्राय उभे मौनी । रायें देखोनि सन्मानीं । प्रत्युत्थानीं गौरविलें ॥ १२ ॥ कोठोनि येणें कोठवरी । इच्छा केउती असे पुढारीं । मानसीं असेल ती उत्तरीं । प्रकट केली पाहिजे ॥ १३ ॥ न पाहतां तुमचे गुणागुण । मागाल तें देईन**

दान । या निश्चयें स्वस्थ मन । करूनि बोला याचक हो ॥ १४॥ कृष्ण म्हणे ऐक वचन । वैरासि करणें न लगे यत्न । दुष्ट जयाचें आचरण । तोचि वैरी आमुचा ॥ १५ ॥ राजे धरूनि लक्षावधी । बद्ध करूनि सूदिले बंदीं । त्यांचा होम-मारण-विधी । करूं पाहासी काय तूं ॥ १६ ॥ आतां राजे करीं मुक्त । हेंच मागणें आमचें येथ । नाहीं म्हणसी तरी अनर्थ । येचि काळीं पाहशिल ॥ १७ ॥ राजे सोडविलियाविणें । आम्हांसि सहसा नाहीं जाणें । पैंजेनें प्राण देणें घेणें । द्यूत खेळणें हें येथें ॥ १८ ॥ हाव न धरिशी संग्रामीं । तरि बळात्कारें उठवूं आम्ही । ऐसें बोलतां पराक्रमी । जरा-संध क्षोभला ॥ ॥ १९ ॥ पुसोनिया उभय-नेत्र । न्याहाळूनि पाहे तयांचें वक्त्र । म्हणे हा पांडवांचा मित्र । होय सत्य कीं विचारें ॥ २० ॥ जो अटींव जेठिया ऐसा । चढत तेज मुख-प्रकाशा । भीमा ऐसा आंगठसा । माझे दृष्टी दिसतसे ॥ २१ ॥ तिसरा जो कां आ-जानु-बाहो । तो द्रौपदीचा तिसरा नाहो । जेणें करूनि खांडव-दाहो । तोषविलें त्रि-पादातें ॥ २२ ॥ जरा-संध असतां जीत । नरेंद्र-मोचनाची मात । करी ऐसा वीर-श्री-कांत । भुवन-त्रयीं असेना ॥ २३ ॥ खद्योत उजाळी रवि-मंडळा । मुंगी उचली ब्रह्मांड-गोळा । तेविं तुझें बोलणें बरळा । शक्तीहूनि अचाट ॥ २४ ॥ अवलोकूनि आपणाकडे । शक्तीसारखें बोलिजे थोडें । याचक-जीविकेचेनि पाडें । मागूं येतां मागावें ॥ २५ ॥ कंसारी संसार-गज-केसरी । हांसोनि बोले कृष्ण शौरी । पांडु-कुमार हे निर्धारीं । भीमार्जुन जाण पां ॥ २६ ॥ मागां अपराध केले क्षमा । ते कार्याकारणें पुरुषाधमा । लोटली मर्यादेची सीमा । शेवटील फळ भोगिजे ॥ ॥ २७ ॥ सरला सुकृताचा तंतू । आयुष्य-तैला झाला अंतू । माझिये हस्तीं व्यजन-वातू । भीम-रूपें उदेला ॥ २८ ॥ तो झडपतां स-त्वर-गती । प्राण-दीपपंच-ज्योती । मालवोनि पडेल क्षिती । गात्र-पात्रपालथें ॥ २९ ॥ असेल वांचावयाची आर्ती । तरी करीं बंध-मुक्ती । मग आम्हां तुम्हां अर्थाअर्थीं । वैर-संबंध असेना ॥ ३० ॥ करीं राजयांचें मोचन । कीं उठीं युद्धा न लगतां क्षण । या वेगळा विचार आन । करणें आतां घडेना ॥ ३१ ॥ आतां बोलिलासि वचन । मागाल तें देईन दान । न करितां नृपांचें मोचन ।

ऊठ वेगीं संग्रामा ॥ ३२ ॥ तिघांमाजीं जो आवडे । त्यासीं भिडें वाडें-कोडें । मागध म्हणे मृषा तोंडें । जल्पना करिसी वाजटा ॥ ३३ ॥ तूं बहु-रूपें दाविशी सोंगें । कोणतें युद्ध जिंकिलें आंगें । वेडीं बागडीं भाविकें भणंगें । तुझें शूरत्व त्यांमाजीं ॥ ३४ ॥ पार्थ पृथेचें सु-कुमार-बाळ । शस्त्राभ्यासें क्रमीत काळ । मजसीं अयोग्य परी अळुमाळ । भीम कांहीं दिसतसे ॥ ॥ ३५ ॥ तोही मंद जड आळशी । आहार निद्रा बहुत याशी । आयुष्य पुरलें म्हणूनि ऐशी । बुद्धि उपजली तुम्हांतें ॥ ३६ ॥ तिघांतें हाणोनि चड-कणा । क्षणांत मेळवीन मरणा । बळें सर्पाचिया सदना । मंडूक वस्ती पावलां ॥ ३७ ॥ कृष्ण म्हणे बोलसी निधड । मंडूक किंवा तिघे गरुड । आतांचि होईल हा निवाड । समय प्राप्त झालिया ॥ ३८ ॥ ऐसें बोलोनि वीर-मणि । उभे ठेले समरांगणीं । जरा-संधें राज्यासनीं । अभिषेकिलें पुत्रासि ॥ ३९ ॥ सरसावूनि वीरगुंठी । भीम लक्षिला दारुण-दृष्टी । जैसा मदोन्मत्त करटी । मृगेश्वरें लक्षावा ॥ ४० ॥ भीमा-अंगीं वीर-श्री-लोट्ट । धरितां न धरवे अति-उद्भट्ट । अगस्ती धावे समुद्र घोटूं । तैसा तगटे पुढारां ॥ ४१ ॥ दोघांनीं पिटिलीं पाणि-तळें । जानु-मूळें बाहु-मूळें । मही ताडितां पाद-तळें । शैल-मौळी थरकती ॥ ४२ ॥ धावोनि भीमाची वीर-गुंठी । मागधें कवळोनिया मुष्टी । दक्षिण-हस्त सूदला कंठीं । काळ-पाशा-सारिखा ॥ ४३ ॥ दांत चावोनि करकराटी । गुडघा ताडिला हृदय-पुटीं । सावध म्हणती कृष्णकिरीटी । बापा भीमा बळिष्ठा ॥ ४४ ॥ भीमें भैरवा-कार दृष्टी । हृदयीं हाणोनि वज्र-मुष्टी । सोडवोनि मगर-मिठी । झिंजा-डोनि लोटिला ॥ ४५ ॥ तेणें मागुती विकळ । पाडिला जैसा विशाळ ताळ । पुढती उठोनि उतावेळ । भीम-मध्य कवळिला ॥ ४६ ॥ दोन्ही कोंपर दोन्ही मुष्टी । चारी आघात ओपिले पृष्ठीं । मागधें क्षोभोनि उल्हाटी । हुमणी हाणितली मस्तकीं ॥ ४७ ॥ झोंबी सोडवोनि तवकें । मस्तकें मस्तका देती थडके । सहस्र-संख्या होतां भडके । अ-शुद्धाचे लोटती ॥ ४८ ॥ हस्त ओढिती तोडावया । पाय कवळिती मोडावया । डोळे पाहती फोडावया । पाडावया दशनांतें ॥ ४९ ॥ कूर्पर-प्रहार लत्ता-प्रहार । मुष्टि-प्रहार मस्तक-

प्रहार । मोजोनि मारिती शत, सहस्र । उसणें घे घे म्हणोनि ॥ ५० ॥ बाहुगदा, बाहुमुसळें । बाहुकांतिया करवाळें । बाहुमुद्गर, बाहु-त्रिशूळें । भावोनिया मारिती ॥ ५१ ॥ नगर-नारी-नागरिक । पाहती दोघांचें युद्ध-कवतुक । विमान-यानीं वृंदारक । जय इच्छिती भीमाचा ॥ ५२ ॥ निराहार निरुदक । विसांवा न घेतां पळ एक । तेरा दिवसपर्यंत देख । युद्ध चाललें दोघांचें ॥ ५३ ॥ चवदावे दिवसाचे अंतीं । मूर्च्छा पावला मागध नृपती । तैं संकेत दावी हातीं । पांडवातें माधव ॥ ५४ ॥ पाय कवळोनि कर-तळीं । चिरोनि करावा दोहीफाळीं । जरेनें सांधिला तो उखळीं । सांधा वेगें बलिष्ठा ॥ ५५ ॥ यावेगळा उपाय आन । करितां मागध न पावे मरण । आतांचि होऊनि सावधान । युद्ध करील मागुती ॥ ५६ ॥ भीमें रगडोनि दाढा । मध्य-भागीं कर्षिला गाढा । माथां वाहोनिया भवंडा । चक्राकार दीधला ॥ ५७ ॥ तेथूति टाकिला भू-तळीं । लात वोपिली वक्ष-स्थळीं । वज्रें तोडोनिया मौळी । शक्र जेवीं पर्वता ॥ ५८ ॥ तेवीं पाडोनिया उताणा । वाम-पायें दक्षिण-चरणा । रगडोनि सव्य-पाय जाणा । उभय-हस्तें कवाळिला ॥ ५९ ॥ आंसडोनि काळोखटें । मध्यें उतटिला तटाटें । अ-शुद्ध-नदी खळखळाटें । रंग-भूमिके लोटली ॥ ६० ॥ भीमसेनें आपुल्या हातीं । करोनि शकलें सांडिलीं क्षिती । जरा-संधा दीधली मुक्ती । कुंती-कुमारें यापरी ॥ ६१ ॥

---

## २ दमयंतीचा त्याग.

निषध देशाचा राजा नळ हा गुणांनीं व रूपानें फारच सुंदर होता. स्वयंवराचे वेळीं दमयन्तीनें देवांना सोडून त्याला वरिलें. देवांना त्याचें कांहीं वाटलें नाहीं. पण कलीनें त्याचा सूड घेण्याचें ठरविलें. त्यानें वेळ पाहून त्याच्या मनांत प्रवेश केला. त्याला द्यूत खेळायला लाविलें. त्यांत नळाचें राज्य जाऊन त्याला दीनाप्रमाणें दमयन्तीसह रानांत भटकावें लागलें. तेथें त्या दोघांचे फार हाल होऊं लागले. नळाचें नेसतें वस्त्रही

कांहीं प्रसंगानें गेलें. मग तो व दमयन्ती एकच वस्त्र नेसून हिंडत होतीं. दमयन्तीचे हाल त्याच्यानें पाहावतना. हिला आपण सोडून गेलों, तर ही आपल्या बापाकडे परत जाईल, व हिचे हाल चुकतील, असा विचार करून अर्धवस्त्र कापून घेऊन तो तिला एका रात्रीं सोडून गेला. तोच हा प्रसंग आहे.

ओंव्या.

निराहार निरुदक । दोघां मिळून वस्त्र एक । नळा हृदयीं नावरे शोक । पुढती धैर्य सांवरी ॥ १ ॥ निशा प्रवर्तली प्रबळ । निद्रेलागीं न दिसे स्थळ । शीतनिवारण अळुमाळ । आश्रयो पाहे काननीं ॥ २ ॥ जीर्ण पर्णकुटी तेथ । देखता झाला नळ वनांत । तृणशय्ये भार्येसहित । खेदभूत बैसला ॥ ३ ॥ दोघीं वेढिलें एक वसन । तळीं शय्या ना प्रावर्ण । पंचरात्र उपोषण । तेणें प्राण जाकळती ॥४॥ राजा विचारी मानसीं । "गुह्य न वदावें स्त्रियेसी । खरतर दुःखाच्या हुताशीं । देह भस्मेल दोघांचा ॥५॥ सुंदर सुकुमार पवित्र गुणीं । चरणचाली चाले वनीं । आहाराबीण उपोषणीं । प्राण त्यागील तत्वतां ॥ ६ ॥ दृष्टीवेगळे होत कां कष्ट । यालागीं वाटे वियोग श्रेष्ठ । इतें देखोनी हृदयस्फोट । क्षणक्षणीं होतसे ॥ ७ ॥ मज वेगळें हो कां भलतें । यालागीं त्यागूनि जाईन इतें" । ऐसा निश्चय करूनी चित्तें । सखेद चित्तें शांतवी ॥८॥ म्हणे "प्राणवल्लभे एथें । घालुनी हृदयकवचातें । तुतें रक्षावें हा हेत । वातस्पर्श तोही न द्यावा ॥९॥ पाहें माझी क्लेशावस्था । सहज बोलणें तुझिया हिता । देश अवलोकीं सभोंवता । सर्व येथुनी दिसताहे ॥ १० ॥ हा सुपंथ विदर्भाप्रती । जेथें जनका तुझिया वस्ती । येणें मार्गें अयोध्यापती । कोसलदेशीं देखिजे" ॥ ११ ॥ ऐकोनी प्राणेश्वराची मात । वल्लभेहृदयीं शस्त्रघात । म्हणे "हा कासया संकेत । दावीतसां साक्षेपें ॥ १२ ॥ मनीं धरूनि माझा त्याग । ज्ञान कारिसी नाना मार्ग । हा संकल्प अति अयोग्य । पुण्यश्लोका तुजलागीं ॥ १३ ॥ सांडूनिया देवांच्या मूर्ती । त्यागुनी पृथ्वीचे भूपती । तुतें वरिलें परम आर्ती । एक भक्तिभावार्थें ॥ १४ ॥ काया वाचा आणि मन । त्वांही ठेविला मजवरी प्राण । ऐशियाचें हृदय

कठिण । केवीं झालें कळेना ॥ १५॥ पतिव्रता मी निर्धूत । तुजही एकपत्नीव्रत । माझा त्याग करितां एथ । काय ईश्वर संतुष्टे ॥ १६॥ गेलें असतां सर्व राज्य । क्षुधेतृषेनें पीडिली भाज । अर्धवस्त्रा एकटी मज । त्यागूं म्हणसी काननीं ॥ १७ ॥ तापत्रयनिवारणाचें छत्र । भार्येपरता नाहीं मित्र । पतिव्रता मी सुपवित्र । केवीं त्यागूं आविशी ॥ १८॥ तुजही प्रबळ क्षुधा बाधी । राज्यहानिची सखेद व्याधी । संगीं भार्या दिव्यौषधी । उपचारीन दासीत्वें ॥ १९॥ भार्या सकळ श्रमातें हर्ती । भार्या सकळ सुखातें कर्ती । भार्या पवित्र वंशधर्ती । यशकीर्ती स्त्रीसंगें ॥ २०॥ स्त्रीसंगें धर्म निर्दोष। पुरुष कुमार्गीं न पवे भ्रंश । भार्या नसतां महादोष । कामादिक पीडिती ॥ ॥ २१ ॥ यालागीं पवित्र पतिव्रता । वनीं येकली त्यागी भर्ता । तैं दोष अपयश मूर्खता । लोक माथां स्थापिती ॥ २२ ॥ मातें घेउनी राजेश्वरा । चालिजे वैदर्भाचिया नगरा । दुष्ट काळ क्रमुनी चतुरा । पुढें वर्तों प्रारब्धें ॥ ॥ २३ ॥ भीम दयावंत सहसा । परिहारील आपल्या क्लेशा । संशय सांडुनी मानसा । शीघ्र गेलें पाहिजे" ॥ २४ ॥ नळ म्हणे "विचारनिष्टे । आपत्तिकाळीं न वसीजे कोठें । विशेष सन्मानहानी मोठें । परम दुःख अंतरीं ॥ २५ ॥ राज्य हारवुनिया पणीं । भार्येसहित एकवसनीं । श्वशुरगृहीं जातां व्यसनीं । विश्व ठेवील मूर्खता ॥ २६ ॥ दारिद्र्यकाळामाजीं देख । नीच श्रेष्ठातें म्हणती मूर्ख । उपहासिती सकळ लोक । आप्तवर्ग विशेषें ॥ २७ ॥ यालागीं धरुनिया धीर । प्रारब्धावरी घालूं भार । भोग सरल्िया ईश्वर । कृपा करील निर्धारें ॥ २८ ॥ आतां ऐकें गुणवेल्हाळी । चिंता सांडुनी हृदयकमळीं । चालतां श्रमलीस भूतळीं । निद्रा करीं नावेक" ॥ २९ ॥ दमयंतीस लागली निद्रा । तळमळ नावरे नरेंद्रा । ग्रहणीं राहू गिळी चंद्रा । तेवीं चिंते ग्राशिलें ॥ ३० ॥ भार्येसी क्षुधेतृषेची झोंप । राजया मनीं उद्वेग ताप । धुधुःकारे जैसा सर्प । 'हा! हा! कष्ट' म्हणोनी ॥ ३१ ॥ कली संचरला आंगीं । यालागीं निश्चय केला त्यागीं । अर्धवस्त्र छेदनालागीं । उपाय चित्तीं करितसे ॥ ३२ ॥ अर्धवस्त्र नेणतां इतें । खंडोनी गेलें पाहिजे परतें । ऐसा विचार करुनी चित्तें । विलो-

कित काननीं ॥ ३३ ॥ कोशरहित पडलें शस्त्र । तेणें छेदिलें अर्ध वस्त्र । निद्रिस्त पतिव्रता पवित्र । निर्जन वनीं एकली ॥ ३४ ॥ त्यागुनि चालिला तो राया । परतोनि पातला त्याचि ठाया । निद्राभूत देखोनि जाया । जाता झाला मागुता ॥ ३५ ॥ शिणली पायीं चालतां वाट । उपोषणीं आगळे कष्ट । चेतनारहित पडे काष्ट । तेविं निद्रिस्त भूतळीं ॥ ३६ ॥ म्हणे " हे पतिव्रता निर्दोष । स्पर्शों न शके परका पुरुष । इचे नेत्रींचा हुताश । भस्म करील दुष्टातें ॥ ३७ ॥ माझिये आशीर्वचनीं । क्षेमकल्याण वांचो विजनीं । दुःख न देखवे नयनीं । यालागीं त्यागूनि जातसें ॥ ३८ ॥ निकट असतां आपदा । माझेनी न देखवे कदा । त्यागीलिया पवित्र प्रमदा । ईश्वर ईतें रक्षील ॥ ३९ ॥ आदित्य रुद्र आणि वसव । आश्विन मरुत नागदेव । सप्तऋषी सिद्ध सर्व । धर्मशीले रक्षतु ॥ ४० ॥ ग्रह-नक्षत्रपंचभूतां । श्वापदें पक्षी वनदेवतां । वृक्षवल्लीगुल्मलतां । नमन माझें साष्टांगीं ॥ ४१ ॥ धरा देवी तुज नमन । तुजवरी कंटक बहु पाषाण । दमयंतीचे सुकुमार चरण । छिन्न भिन्न न करावे ॥ ४२ ॥ तुम्हीं समस्तीं स्नेहें भावें । लावण्यलतिके सांभाळावें । तुम्हांसी निरवूनि स्वस्थ जीवें । मी जातसें वनपंथीं ॥ ४३ ॥ सर्वां वसतिया आत्मारामा । तुवां वांचवावी अंगनोत्तमा । पंच-प्राण नमन तुम्हां । त्यागूं नका इयेतें ॥ ४४ ॥ आपा तुवां जीवना । इच्छिलिया करीं जलपाना । सूर्यासी म्हणे उष्ण किरणा । लागों इतें न द्यावें ॥ ४५ ॥ ईश्वर रक्षील सर्वथा । माझ्यानें न देखवे व्यथा । यालागीं त्यागुनी जातों आतां । क्षेमकल्याण हे असो ॥४६॥ मी सत्यवादी पुण्यश्लोक । हें सत्य असेल निष्टंक । तरी लोटुनी कोटि दुःख । स्वस्थ जाईल माहेरा " ॥ ४७ ॥ ऐसा देऊनि आशीर्वाद । जाता झाला नळ नैषध । पुढती पश्चात्तापें खेद । अत्यद्भुत उदेला ॥ ४८ ॥ त्यागुनी जाय परता । परत ये मागुता । सात पांच वेळा चित्ता । संशयचक्रीं सूदलें ॥ ४९ ॥ मग कठिणता घालुनी मनीं । कलीनें लोटिला दुरी वनीं । खेचरभूचरांचे नयनीं । अश्रुपात डळमळती ॥ ५० ॥

---

## ३ मैत्रेयांचा दुर्योधनास शाप.

मैत्रेय तीर्थें करीत करीत काम्यक वनांत आले. तेथें पांडव वनवासाचें दुःख भोगीत होते. त्यांची हकीकत ऐकून मैत्रेयांचें काळीज तुटलें. मग तसेच ते धृतराष्ट्राकडे आले, व त्यांनीं धृतराष्ट्राला व दुर्योधनाला पांडवांसंबंधानें पुष्कळ उपदेश केला. पण तो दुर्योधनाला रुचला नाहीं. त्यानें कांहींच उत्तर न करितां आपले मांडीवर नुसती थाप मारली. हा त्याचा उद्दामपणा पाहून त्यांनीं त्याला शाप दिला. हीच हकीकत यांत आहे.

### ओंव्या.

**अदृश्य होतां व्यास मुनी । मैत्रेय आला तेचि क्षणीं । नमस्कारिला सभास्थानीं । भीष्मद्रोणें धृतराष्ट्रें ॥ १ ॥ कौरव नरेंद्र आदरें म्हणे । " पवित्र तीर्थें पुण्यारण्यें । अवलोकुनी येथें येणें । कृपेनें जालें स्वामिया " ॥ २ ॥ मैत्रेय म्हणे धृतराष्ट्रातें । " अवलोकुनी बहुत तीर्थें । काम्यक वना पातलों तेथें । पांडव दृष्टी देखिले ॥ ३ ॥ जटावल्कलें अजिनांबरीं । शीतोष्णपीडा फळाहारीं । कष्टतां देखोनि अंतरीं । खेद अद्भुत उदेला ॥ ॥ ४ ॥ तुझिया पुत्रांचा अविवेक । ऐकोनि वाटलें परम दुःख । तिहीं लोकांमाजीं एक । बरवें कोणी न म्हणती ॥ ५ ॥ पुरुषें तंव जगावें जगीं । जंव अपकीर्ति न शिवे अंगीं । आयुष्य तंव तो कुमार्गी । जितची प्रेतासमान ॥ ६ ॥ बरवें न करितां न पवे बरवें । अधर्म केल्यानें केवीं पावे । विष भक्षुनी अमर व्हावें । हें अघटित व्यापारी ॥ ७ ॥ तूं आणि पितामहो । वर्तत असतां पाहा हो । पुत्रीं करावया कलहो । कारण कांहीं असेना ॥ ८ ॥ भीड सोडुनी निजवचनीं । तरी भीष्म अपजयो पावेल रणीं । पुत्रशोकाचा वडवाग्नी । तुज ग्रासील निर्धारें ॥ ९ ॥ तेवींच म्हणे दुर्योधना । चित्त द्यावें माझिया वचना । स्वल्पासाठीं महा प्राज्ञा । पाप अद्भुत जोडिलें ॥ १० ॥ नश्वर राज्य जोडिलें वेगीं । परि अपकीर्ति जोडिली युगानुयुगीं । कुबुद्धि विषयकुसंगीं । कवण्या दृष्टी गोंविली ॥ ११ ॥ यावरी विरोधव्याधि विषम । संगियासंगीं व्यापला परम । झडले**

भ्रूलतेचे रोम । सारासार विचारीं ॥१२॥ गेले प्रतिष्ठेचे प्राण । उभय लोकीं न दाखवीं वदन । कुश्चित दुर्गुणांचें दर्शन । उघड दिसतें जनदृष्टी ॥ ॥ १३ ॥ यास औषध देतसें एक । करावें पांडवांशीं सख्य । तेणें आरोग्य तात्कालिक । हें निश्चयें जाण पां ॥ १४ ॥ जें वर्तलें नाहीं सृष्टीं । ऐशी ऐकों तुझी रहाटी । मी साक्षेपें पावलों भेटी । याचिलागीं या ठाया ॥ १५ ॥ बुद्धिभ्रंश झाला तुम्हां । कोण्या कर्में पाडिलें भ्रमा । मर मर सौबळा! अधमा! । महा अनर्थीं गोंविलें ॥ १६ ॥ रक्षुनीया तुझें चित्त । गोड बोलोनी होशी आप्त । तेवीं वैरी तुझा घात । करावया उदेले ॥ १७ ॥ ओखद कडवट लागे जाण । परी तें अमृतापरी वांचवी प्राण । माझेंही उपदेशवचन । निष्ठुर नव्हे जाण पां ॥ १८ ॥ न करीं बलवंतांशीं स्पर्धा । सांडीं अविचार आग्रहो क्रोधा । देईं धर्माची संपदा । जे अन्यायें हारितली ॥ १९ ॥ नागायुतबलसंपन्न । परम योद्धा भीमसेन । धनुर्धरांमाजीं अर्जुन । जामदग्न्यासारिखा ॥ २० ॥ असंख्य ऋषिगणांचा मेळू । पातला धर्मातें सांभाळूं । त्यातें कृपेनें कुंतीबाळू । प्रतिपाळिती काननीं ॥ २१ ॥ बलिष्ठ आप्त परम साधू । त्यांशीं करिशी व्यर्थ विरोधू । मरोनी जोडावा कुशब्दू । अपयशाचा त्रिजगीं ॥ २२ ॥ आतां निर्वैर निजमानसीं । सख्यत्व करावें सुहृदांशीं । त्यांचा विभाग देऊनि त्यांसी । सुखसंतोषें असावें ॥ २३ ॥ ऐसें न करितां भूपाळा । क्षयो पातला जाण कुळा । अन्यथा असे तरी रविमंडळा । पतन हो कां भूमंडळीं" ॥ २४ ॥ ऐकोनी मैत्रेयाच्या वचना । क्रोध नावरे दुर्योधना । आरक्तता पातली नयना । खदिरांगार ज्यापरी ॥ २५ ॥ दुःखें सोडी दीर्घ हुंकार । जेवीं फूत्कारे महा विखार । गजशुंडाकार कर । तेणें जानु ताडिली ॥ ॥ २६ ॥ पादांगुष्ठें रेखीत धरणी । सरोष मौन्यें अधोवदनीं । हें देखोनी मैत्रेय मुनी । प्रळयानळ क्षोभला ॥ २७ ॥ म्हणे "दुर्जना पापरूपा । हित सांगतां आलासि कोपा । आतां घेईं माझ्या शापा । भस्म होशी स्वकुळेशीं ॥ २८ ॥ हेचि मांडी गदाप्रहारीं । चूर्ण होईल रणचत्वरीं । पादलत्ता बसतील शिरीं । वज्रप्राय भीमाच्या" ॥ २९ ॥

# वामनपंडित.

## १ भक्तिमाहात्म्य.

### श्लोक.

चरणदास्य सदा करि इंदिरा । न गणि थोर हृदंबुजमंदिरा ।
तुजहुनी तव दास्यचि सुंदरा । बहु सुखप्रद, कौस्तुभकंधरा ॥ १ ॥
उदासीं स्वदासीं न मोक्षादिकांहीं । बहू मानिलें भक्तिवांचूनि कांहीं ।
असें दास्य ज्याचें तया तूज देवा । स्वदास्यास मी मागतों वासुदेवा ॥ २ ॥
मुक्तिही बरि न यास्तव लोकीं । भक्ति गोड बहु मानवलोकीं ।
जो स्वयें रस तया रस नाहीं । भक्तिमाजिं रसही रसनाही ॥ ३ ॥
सुधा जरी गोडचि फार साची । जिभेविणें आपुलिया रसाची ।
गोडी न जाणे, रसना तिला हो । असे असाची तरि भक्तिलाहो ॥ ४ ॥
अमृत आणि तया रसना असे । स्वरस नित्य नवे सुजना असे ।
रसचि मुक्ति, परंतु न जीभली । म्हणुनि तीहुनि भक्ति अजी! भली ॥ ५ ॥

---

## २ करुणाष्टक.

### श्लोक.

लोपोनि भास्कर, जयद्रथ मारियेला । लज्जानळांतुनि धनंजय वांचवीला ।
लाक्षागृहीं विवरिं पांडव रक्षियेले । माझेविशींच मन निष्ठुर केविं केलें ॥ १ ॥
दुग्धामिषें द्विजसुतें स्तविला मुरारी । दुग्धार्णवीं अचल ठेविसि पूतनारी ।
कुब्जेचि भक्ति तरि देखुनि क्षेम दीलें । माझेविशींच मन निष्ठुर केविं केलें ॥ २ ॥
आणोनि राजतनया अधमें सभेला । दुष्टोत्तरें करवि नग्न जरी सतीला ।
तीकारणें स्वकरिं अंबर नेसवीलें । माझेविशींच मन निष्ठुर केविं केलें ॥ ३ ॥
उत्तानपाद नृप केवळ पुण्यराशी । तत्सूत तो ध्रुव तपोधन योगराशी ।
त्याकारणें अचळ धाम करोनि दीलें । माझेविशींच मन निष्ठुर केविं केलें ॥ ४ ॥

नक्रें जळांत चरणीं धरिलें गजेंद्रा। म्लानोत्तरें करुनिया स्तवि देवइंद्रा।
तैं दीनबंधु ब्रिद सत्वर रक्षियेलें। माझेविशींच मन निष्ठुर केविं केलें॥ ५॥
वृत्रारि कोपुनि शिळाघन वर्षवीला। तेव्हां भयप्रळयकंप गमे जनाला।
घेवोनिया गिरि करीं व्रज रक्षियेलें। माझेविशींच मन निष्ठुर केविं केलें॥ ६॥
सिंधूजळांत कनकापुर दूर गांवें। तेथोनि शीघ्रगति मोक्षपुरीस यावें।
काष्ठाग्नि घे भरत, दर्शन त्यासि दीलें। माझेविशींच मन निष्ठुर केविं केलें॥७॥
जे शापदग्ध पडली बहुतां दिसांची। लावूनि पाय हरिली जडता तयेची।
त्या भक्तवत्सलपणाप्रति काय झालें। माझेविशींच मन निष्ठुर केविं केलें॥८॥
दुर्योधनें ऋषिस धाडियलें वनातें। धर्मा छळूनि मुनि मागत भोजनातें।
त्याकारणें परम अन्न निशींत दीलें। माझेविशींच मन निष्ठुर केविं केलें॥९॥
दारिद्रतेकरुनि पीडित जो सुदामा। मुष्टी भरूनि पृथु आणित कृष्णधामा।
देऊनि कांचनपुरी द्विजराज केलें। माझेविशींच मन निष्ठुर केविं केलें॥१०॥
त्रिकाळीं करा घोष या अष्टकाचा। मनींचा पुरे अर्थ तेव्हांच साचा।
विनंती असे भक्त हो! वामनाची। उपेक्षा न कीजे यया अष्टकाची॥ ११॥

---

## ३ गंगामाहात्म्य.

### श्लोक.

विलोकीतां जीतें भवभय जनाचें परिहरी।
तया त्वन्मूर्तीचा अतुलमहिमा कोण विवरी।
अतिक्रोधें खिन्नें करि हट उमा, तो न गणुनी।
प्रयत्नें श्रीशंभू तुज निजशिरीं ठेवि जननी॥ १॥
अलीसी स्वर्लोकाहुनि अवनिच्या शोकहरणीं।
अशा तूतें बांधी शिव निजकपर्दीं निशिदिनीं।
अयी! निर्लोभाला उपजविति लोभा, गुण असे।
तुझे, त्यांचा प्रादुर्भव जननि! ऐसा फळतसे॥ २॥
स्वभावें जीं स्वच्छें, सहज अतिशीतें, तव जळें।
तयांच्या उत्कर्षें यश सकळ लोकांत उजळे।

जयां गाती तोषें सगरसुत रोमांच धरुनी ।
गती स्वर्लोकीं त्यां तव विभवयोगेंचि जननी ॥ ३ ॥
घडे दैवें किंचित् कलुष परि संतापति मनीं ।
अशांतें ताराया असति बहु तीर्थें त्रिभुवनीं ।
जयां प्रायश्चित्तें नसति कुनरां, दे गति अशी ।
समर्था या लोकीं तुजसम अयी! तूंचि असशी ॥ ४ ॥
वरी उत्पत्ति श्रीरमणचरणांच्या नखिंहुनी ।
असावें शंभूच्या निशिदिनिं जटाजूटभवनीं ।
जपावें सर्वस्वें सतत पतितोद्धारकरणीं ।
नसावें कां माते! तरि मग तुझें गौरव जनीं ॥ ५ ॥

---

## ४ नामसुधा.

### श्लोक.

हरिचरणसरोजीं चित्सुधासारपानें ।
भ्रमर परमयोगी गुंजती नामगानें ।
हरति सकळ दुःखां, हीं सुखाचीं निधानें ।
वद वद वद जिव्हे! वासुदेवाभिधानें ॥ १ ॥
हरितनु हरिनामें लेखिली सर्वभक्तीं ।
सहजसुखनिधानीं देखिलीही विरक्तीं ।
शुकसनकमुखीं जीं गाइलीं जीतमुक्तीं ।
वद वद वद जिव्हे! टाकुनी लौकिकोक्ती ॥ २ ॥
नकळतहि पडे हा विष्णुनामाग्नि जेथें ।
दुरिततृणगृहाचें भस्म होणार तेथें ।
मग समकरुणेची आयती कृष्णदृष्टी ।
भिजविल, करिते जे सर्वसृष्ट्यर्थ वृष्टी ॥ ३ ॥
अलंकार तो मागतां हेम आला ।
नव्हे हेम हें बोलवेना तयाला ।

अशीं रामकृष्णादि पुत्रादिनामें ।
तरी सर्वेही माधवाचींच धामें ॥ ४ ॥
सुवर्ण म्हणतां जसें कनककुंडलीं तें दिसे ।
मुकुंद म्हणतां तसा जनसुतादिकीं तो असे ।
सुतादि सकळांसही करुनि वर्ततो तो हरी ।
अशेष जनपातकें करुण तो स्वनामें हरी ॥ ५ ॥
हें तों खरें, परि न जोंवरि चित्तशुद्धी ।
तों प्राणियांसि न घडे निजबोधसिद्धी ।
ते शुद्धि तों भगवदर्पणकर्मयोगें ।
पापें स्वयें जळति सर्वहि त्या प्रसंगें ॥ ६ ॥
कर्में दासपणें करूनि निपुणें नारायणीं अर्पणें ।
पापातें क्षपणें, रमापतिगुणें प्रेमामृता सेवणें ।
सत्संगीं वसणें, स्मृतींत असणें, एकांतिचें बैसणें ।
सर्वां हें करणें, भवाब्धि तरणें, दुर्वासना मारणें ॥ ७ ॥
ऐसी केवळ भक्तिमात्र करितां कैवल्यही पावती ।
भक्तीवांचुन अन्यथा न चुकती तेव्हां तरी दुर्गती ।
मद्याच्या कलशासि शुद्ध करितां व्यर्थेंचि तीर्थें जसीं ।
श्रीगोविंदपदारविंदविमुखां कर्में समस्तें तसीं ॥ ८ ॥
कृष्णार्पणें करिति जे निज सर्व कर्में ।
सिद्धी अनेक घडती हरिदास्यधर्में ।
पापें समस्त जळती, उठती विरक्ती ।
वाढे जसी जसि मुकुंदपदाब्जभक्ती ॥ ९ ॥
हरिभजनिं असे तो शीघ्र कैवल्य लाधे ।
नरक चुकति हें तों थोडियामाजि साधे ।
म्हणवुनि शुक बोले श्लोक ते व्यासवाणी ।
सुजन धरुत चित्तीं हेचि गीर्वाणवाणी ॥ १० ॥

---

# ५ मृत्तिकाभक्षण.

## श्लोक.

एकदां कृष्णानें माती खाल्ली, तेव्हां यशोदा त्यास रागें भरली. तेव्हां आपण मृत्तिका भक्षण केली नाहीं, असें दाखविण्याच्या मिषानें तोंड उघडून त्यानें आपले तोंडांत चराचर विश्व दाखविलें; अशी कथा या आख्यानांत वर्णिली आहे:—

स्वउदरांत चराचर मृत्तिका । पसरुनी मुख दावित कौतुका ।
प्रकट जो करि बाल्यकथारसा । नमिन त्या हरिच्या पदसारसा ॥ १ ॥
गोपबालक गडी बळिराम । क्रीडतां हरिसवें अभिराम ।
'मृत्तिका सुत तुझा घननीळा । भक्षितो' वदति हें जननीला ॥ २ ॥
न रागेजणारी कधीं नंदराणी । करी कृष्ण खोडी तिला हे शिराणी ।
तरी मृत्तिका भक्षितां कृष्णजीतें । दटावी, चढे क्रोध अत्यंत जीतें ॥ ३ ॥

कर श्रीकांताचा करकरुनि माता धरि करें ।
दुजा हस्त क्रोधें हरिवरि उगारूनि निकरें ।
दटावी; ते वेळीं भयचकित डोळे करि हरी ।
करी अंडत्रासें वारि कर दुजा, जो भय हरी ॥ ४ ॥

असीं कोटि अंडें जयामाजिं माती । तया 'खादली कां,' म्हणे 'आजि माती'।
मुखश्री करूनी हरी दीनवाणी । असत्यांतही बोलतो सत्यवाणी ॥ ५ ॥
'माती नाहीं खादली म्यां, यशोदे । यां सर्वांची गोष्टि मिथ्या असों दे ।
मिथ्या तूतें जेष्ठही बंधु सांगे । जो, तो, याचा शब्द मिथ्या असा गे ॥ ६ ॥
जाण हे अनृत सर्व वैखरी । मानिसी जरि तथापि ही खरी ।
माझिया निजमुखाकडे तरी । दृष्टि दे बरवि बाह्य अंतरीं' ॥ ७ ॥
मृषा लोकवाणी मृषा अर्थ तीचा । खरा अर्थ तो वेदवाणीश्रुतीचा ।
असे ती मुखीं आपुल्या वेदवाचा । पहा तीस; भावार्थ तो माधवाचा ॥ ८ ॥
असत्य हें बोलति सर्व वाचा । साचा असा शब्दहि माधवाचा ।
असत्य हें यास्तव बोलिलों कीं । सत्यत्वही सर्व असत्य लोकीं ॥ ९ ॥

मृषा तरी हा व्यवहार साचा । यालागिं या वाक्यसुधारसाचा ।
मिथ्या दिसे भाव, म्हणूनि दावी । पोटींच माती, गति हे वदावी ॥ १० ॥
' नसे खादली, खाउनी मृत्तिकाही ' । म्हणे, या स्ववाक्यासि मिथ्यत्व कांहीं ।
दिसे, तें हरायास पोटांत सारे । तिला दाखवी मृत्तिकेचे पसारे ॥ ११ ॥
पोटांत बाहेरुनि हें रिघेना । तें भक्षणप्राय म्हणूनि घेना ।
म्हणोनि हे मृण्मय लोक सारे । पोटांत हे दाखविले पसारे ॥ १२ ॥
हरीची असी वेदवाणी पुराणी । न जाणोनि, मानी मृषा नंदराणी ।
अहो! विश्व जो दाखवी पांडवासी । म्हणे त्यासि, ' साचा तरी तोंड वासीं ' १३
' कीं मृत्तिका हे अवघीच, माते! । आधींच माझ्या उदरांत माते ।
ते भक्षिली कां म्हणसील मातें । नेणोनि ऐशा पुरुषोत्तमातें ' ॥ १४ ॥
असा आपुला शब्द तो देव साचा । करूं पाहतो, त्या कथेच्या रसाचा ।
पहा भाव तो मातृशब्दीं हरी तो । असत्यत्व हे आवरूनी हरीतो ॥ १५ ॥
एवं, पहातां अजि कोटि अब्दीं । नयेचि मिथ्यत्व मुकुंदशब्दीं ।
तें आयका, यावरि माय काय । बोलों शके दाखवि विश्वकाय ॥ १६ ॥
घटाकार आकार मातींत माती । असी मातसे सर्वही ज्यांत माती ।
अशा विश्वरूपा मुकुंदा उदारा । दटावी धरूनी करीं गोपदारा ॥ १७ ॥
म्हणे पूससी ओष्ठ चाटूनि चाटा । पुन्हा बोलसी धीट गोष्टी अचाटा ।
घडीही घरीं पाय तूझा न थारे । न आटोपसी तूं मला सर्वथा रे ॥ १८ ॥
पसरुनी मुख दाखविसी मला । तरि खरा मज वाटसि रे मुला ।
म्हणवुनी जननीवचनें हरी । पसरुनी मुख संशय संहरी ॥ १९ ॥
वदनिं जों अवलोकुनि पाहते । जननि विस्मित होउनि राहते ।
स्थिरचरात्मक हें जग देखिलें । स्वसुत ईश्वर हें मनिं रेखिलें ॥ २० ॥
यशोदेसि हें तत्त्व दावूनि देवें । पुन्हा घातला मोह त्या वासुदेवें ।
कडे घेतला मागुती पुत्रभावें । यथापूर्व पाहे तयातें स्वभावें ॥ २१ ॥
असीं कौतुकें शेषशायी हरी तो । करीतो, कथेनें अविद्या हरीतो ।
कथेच्या रसें शुद्ध केलें मनाला । कलीमाजि या तारिलें वामनाला ॥ २२ ॥

———

# ६ हरिविलास.

## भाग १ ला.

### श्लोक.

एके दिनीं गोप वसंततापें । तृषार्त मार्तंडकरप्रतापें ।
पुढें वनीं धुंडिति सर्व पाणी । मागूनि ये दूरुनि चक्रपाणी ॥ १ ॥
ते पावले नदिस तो ऱ्हद कालयाचा । जेथें निवास भुजगा अतिकाल याचा ।
ज्याच्या विषें विषम तें ऱ्हदनीर भारी । प्याले समीप नसतां मधुकैटभारी ॥
धेनु गोपहि तया जलपानें । ज्या विषानळ कढे जल त्यानें ।
पावले सकलही मरणातें । अंतरोनि हरिच्या चरणातें ॥ ३ ॥
पावला इतुकियांत हरी तो । जो स्वकीयजनमृत्यु हरीतो ॥
त्याचिया करिति जे स्मरणातें । होति ते वश कसे मरणातें ॥ ४ ॥
आपणाविण अनाथ असे जे । काळनिद्रित धरातळसेजे ।
त्या कृपेकरुनिया अवलोकी । जन्ममृत्यु हरि जो तिहिं लोकीं ॥ ५ ॥
काळसर्पविषपानमृतांतें । जीववी स्वनयनें अमृतातें ।
वर्षतां, पशुप धेनु अशेषें । ऊठती खडबडूनि विशेषें ॥ ६ ॥
मग उठूनि परस्पर पाहती । पशुप विस्मित होउनि राहती ।
विष पिऊनि मरोनि कसे रिती । म्हणति जीवन हेंचि विचारिती ॥ ७ ॥
जो जगीं स्वजनमृत्यु हरीतो । आठवे अवघियांसि हरी तो ।
जीववी निजकृपा-अवलोकीं । कोण त्याविण दुजा तिहिं लोकीं ॥ ८ ॥
पशुप आणि पशू विषजीवनें । मरति त्यांसहि दे हरि जीवनें ।
दवडि तेथुनि दुष्टभुजंगमा । परम बाधक जो स्थिरजंगमा ॥ ९ ॥
छाया जियेच्या उदकास काळी । केलें तिये शुद्ध, तयाचि काळीं ।
श्रीइंद्रनीलद्युति कालियानें । कृष्णेंचि जे दूषित कालियानें ॥ १० ॥
श्रीकृष्ण काळा, यमुनाहि काळी । दंडूनि काळा फणि तेचि काळीं ।
कालिंदिचें जीवन शुद्ध केलें । कथामृताला जग हें भुकेलें ॥ ११ ॥

# ७ हरिविलास.

## भाग २ रा.

### श्लोक.

क्रुद्ध तो ऱ्हदजळीं परमेशा । लक्षितो दुरुनि साप रमेशा ।
त्या खळा फणिसही हरि पाहे । ते कथा परिस दिव्य नृपा, हे ॥ १ ॥

थोर वेग वदनीं रसनांचे । दुर्विषें प्रतिमुखें रस नाचे ।
दंत आंत शिशु भूमिधरांचे । प्रांत चाटित असे अधरांचे ॥ २ ॥

ज्याच्या विषाचे उदकीं चपेटे । वनाग्नि ज्याच्या नयनेंच पेटे ।
देखे असा गर्व भुजंगमाचा । निर्माणकर्ता स्थिरजंगमाचा ॥ ३ ॥

जवळि खेळत खेळत पातला । झडप घालुनिया कर घातला ।
गरगरां धरुनी भ्रमवी नभीं । गरुड सर्प जसा धरितां न भी ॥ ४ ॥

अही तोही पाहे अवसर डसायास हरिला ।
परंतु श्रीकृष्णें भ्रमण करितां गर्व हरिला ॥
शरीरीं फांसोळ्या बहु खुळखुळया होउनि ढिल्या ।
गती तत्प्राणांच्या सकळहि गळयामाजिं चढल्या ॥ ५ ॥

नासिलें भ्रमवितांचि बळातें । क्षीण देखुनि खळा प्रबळातें ।
शेपुटी धरि अधोमुख हातीं । कौतुकें स्वजन सर्व पहाती ॥ ६ ॥

समग्रही सत्व अलक्ष यातें । नेलें तरी देहबळ क्षयातें ।
निःसत्व मानी फणि आपणातें । तरी बळें तो उचली फणांतें ॥ ७ ॥

अधोमुख श्रीहरि साप हातीं । धरी जसा, गोपस्त्रिया पहाती ।
डसावया जों मुख सांवरीतो । वेगें हरी तों सहसा वरी तो ॥ ८ ॥

मुरडुनि नरडी करें दुजानें । धरुनि असें धरिलेंच पुच्छ ज्यानें ।
रगडुनि फणिकंठ कैटभारी । उपरि चढे करि नाट्य नीट भारी ॥ ९ ॥

फणांवरी सारथि पांडवाचा । आरंभ मांडी मग तांडवाचा ।
पादांबुजीं देवशिखामणीचा । फणीचिया दीप्तिशिखा मणीचा ॥ १० ॥
उदक चंचळ, चंचळ त्या फणा । फिरवितो फणि, जे रिति गोफणा ।
चपळ नृत्य करी वनिं मोकळा । सफळ ज्याकरितां सकळा कळा ॥ ११ ॥
जो प्रवर्तक विलासकळांचा । जो कलाप्रद कला सकलांचा ।
जे शिवादिक गुरू नटनाचे । त्यांसि आदिगुरु तो नट नाचे ॥ १२ ॥
जो रची अघटिता घटनांतें । तो करी फणिवरी नटनातें ।
काय विस्मय विलासमयाचा । हा कथारस तया समयाचा ॥ १३ ॥
चपळ तो पळतो उदकावरी । उखळतो खळ तो हरि आवरी ।
कुलपती लपती फणि ते किती । भुजग ती जगतीतळ टाकिती ॥ १४ ॥
आरंभिल्याऊपरि नृत्य काय । तेथें करी कौतुक विश्वकाय ।
देवीं कसा श्रीहरि पूजिला, हो । श्रोत्यांसही ऊपरि तोचि लाहो ॥ १५ ॥
विमानींहुनी वृंद वृंदारकांचे । नभीं मल्लिकाकुंदमंदारकांचे ।
फुलांचे समूह स्वनाथावरी ते । बहू वर्षती, ज्यासि लक्ष्मी वरीते ॥ १६ ॥

---

## ८ भक्तप्रतिज्ञारक्षण.

### श्लोक.

श्रोत्रयुग्म परिपूत कराया । सावधान जनमेजयराया ।
जो परेशरत धन्य अहो ! तो । गोष्पदोपम तया भव होतो ॥ १ ॥
"प्रतिज्ञा जे केली यदुकुळवरें 'युद्ध न करीं ।
धरीना शस्त्रातें कदनसमयीं मी निजकरीं' ।
घडेना हे मिथ्या जरि, तरि न मी भागवत रे ।"
प्रतिज्ञेतें भीष्में मनिं अवथिलें या दृढतरे ॥ २ ॥
पिता शंतनू, माय ज्याची नदी जे । स्वयें शुद्ध ऐशास सन्मान दीजे ।
असा गर्व तोही हरावा मनाचा । मनाचा असा भाव त्या वामनाचा ॥ ३ ॥
नृपा, ऐकिजे युद्ध देवव्रताचें । गमे हेंचि साफल्य तूझ्या व्रताचें ।
रथीं देखिले कृष्ण कौंतेय दोघे । म्हणे भीष्म, 'माझ्या शरातें यदो घे' ॥ ४ ॥

भीष्माकडे रव भयानक दुंदुभीचा । होतां वदे तनय आनकदुंदुभीचा ।
'दुश्चिन्ह आजि गमतें मज सव्यसाची । जाती शिवा अशिव हे अपसव्य साची'।
गर्वोक्ति फाल्गुन वदे, 'जगदेकराया । आहे असा कवण तो झगडा कराया ।
म्यां काळखंज वधिले अतुलप्रतापी । पौलोमही असुर गोसुरविप्रतापी' ॥ ६ ॥

पितामह वदे तया, 'प्रबळ तूं पृथानंदना ।
रमेश रथिं सारथी चतुर वागवी स्यंदना ।
स्वयें गतवयस्क मी, सरस वीर तूं रे नवा ।
भिडें रणधुरंधरा ! जय घडो सुखें वा न वा' ॥ ७ ॥

पारीक्षिता ! मग शरासन पांडवानें । ओढूनिया हुतवहार्पितखांडवानें ।
तो भीष्मदेह खचिला शरतांडवानें । ज्याच्या क्रिये सकळ पद्मभवांड वाने॥ ८ ॥

गांगेय कोपा चढला कसा रे । ज्या मानिती हाचि कृतांत सारे ।
गर्जोनिया सिंहरवें जयातें । पाहे जणों मारिल आजि यातें ॥ ९ ॥

'त्वां काय कर्म करिजे लघुलेंकरानें' । बोलूनिया मग धनू धरिलें करानें ।
तें व्यापिलें सकळ सैन्य महाशरांनीं । भीष्में, जसा पतित होय हुताश रानीं

तो स्तोम येतां बहु सायकांचा । झालाचि पार्थव्यवसाय कांचा ।
कांचावला वीर पुढें धसेना । झाली नृपा ! सर्व भयांध सेना ॥ ११ ॥
पुष्पवर्ण नटला पळसाचा । पार्थ सावध नसे पळ साचा ।
पाहिलें जंव निदान तयाचें । तों दिसे वदन आनत याचें ॥ १२ ॥

प्रतोद मग ठेविला उतरला रथाधःस्थळीं ।
म्हणे, प्रबळ भीष्म हा, जय घडे न या दुर्बळीं ।
करीं कमळनेत्र तो प्रथित चक्र तें स्वीकरी ।
प्रमोद यमनंदना बहु तसा यशस्वी करी ॥ १३ ॥

असा येतां देखे रथ-निकट तो श्यामल हरी ।
नृपा ! गांगेयाच्या हृदयिं भरल्या प्रेमलहरी ।
शरातें चापातें त्यजुनि वदला गद्गदरवें ।
"जगन्नाथें केलें मज सकळ लोकांत बरवें ॥ १४ ॥

ये रथावरि त्वरें यदुराया । खड्ग देइन विकोश कराया ।
तोडिं मस्तक पडो चरणीं या । धन्य होइन सदाचरणीं या ॥ १५ ॥
श्रीमाधवावांचुनि आन देवा । भजें तरी हो! मज आण देवा ।
तुझीच कीं वाहतसें हरी रे । मिथ्या तरी हे झडो वैखरी रे ॥ १६ ॥

मारावें मजला असेंच असलें चित्तीं तुझ्या केशवा ।
तैं मातें मग कोण रक्षिल पहा विश्वेश नाकेश वा ।
हा मुख्यार्थ जनार्दना! मज गमे भक्तप्रतिज्ञा खरी ।
कीजे, सर्वजनांत होइल मृषा हे आपुली वैखरी" ॥ १७ ॥

हें भीष्मवाक्य परिसोनि जगन्निवासें, । केलें विलोकन मृदुस्मित पीतवासें ।
वेगें फिरोनि चढला मग तो रथातें । पार्थाचिया पुरविणार मनोरथातें ॥१८॥

---

## ९ नीतिपर श्लोक.

प्रयत्नें वाळूचे कण रगडितां तेलहि घडे ।
तृषार्ताची तृष्णा मृगजळजळें जाण विघडे ।
सशाचेंही लाधे विपिन फिरतां शृंगहि जरी ।
परंतु क्षुद्राचें हृदय धरवेना क्षणभरी ॥ १ ॥

दुबळिकेंत पसा यव इच्छितो । प्रभुपणीं धरणी तृण मानितो ।
म्हणुनिया कृपणत्व उदारता । घडतसे समयोचित तत्वतां ॥ २ ॥
एकत्र केशव, वसे अपरत्र वैरी, । अन्यत्र पर्वत शतक्रतुभीत भारी ।
कीं वाडवाग्नि इतरत्र असे उदार । पाहें कसें पण सरित्पतितें शरीर ॥ ३ ॥

अंकित जे विधिचे सुर सर्वहि, त्यांस उगा प्रणिपात करावा ।
प्राक्तनकर्म तसें फल दे, तरी तो विधि थोर किमर्थ म्हणावा ।
कर्मबळें कळतील फळें, तरि कर्मिच भाव कसा न धरावा ।
दुर्बळ ते सुर, दुर्बळ तो विधि, काय तयांस्तव अर्थ घडावा ॥ ४ ॥
क्षीरानें दिधले स्वकीय गुणहि नीरास आत्माश्रयें ।
त्या क्षीरास हुताशनें श्रमवितां तें तोय मेलें स्वयें ।

झाला ताप विशिष्ट, अग्निवदनीं तें दुग्ध जेव्हां पडे।
तेव्हां धांवुनि तोय शीतल करी मित्रत्व हें चोखडें ॥ ५ ॥

अदृष्ट झालें प्रतिकूळ जेव्हां। वारील तें पद्मविहार तेव्हां।
जे क्षीरनीरादिविवेक, ना, ना,। त्या हंसकीर्तीस हरूं शकेना ॥ ६ ॥

श्रीखंडाच्याच काष्ठेंकरुनि शिजवितो पेंड वैदूर्यपात्रीं।
किंवा तो अर्कमूलास्तव कनकहलें नांगरीतो धरित्री।
केळी तोडूनि टाकी त्वरित चहुंकडे पेरीतो कोद्रवातें।
जो या येऊनि लोकीं सुकृत न करितां आचरे दुष्कृतातें ॥ ७ ॥

अमूल्य रत्नीं सुर ते न धाले। हालाहला देखुनिया न भ्याले।
सुधेविणें, यास्तव जे समर्थ। न निश्चितार्थाविण ते कृतार्थ ॥ ८ ॥

शनिबुधकुजदेवाचार्यशुक्रादिकांतें।
असमबल म्हणोनी राहु टाकी तयांतें।
दुधडहि जरि झाला ग्रासितो सूर्यचंद्रां।
म्हणवुनि पुरुषार्थी तो न सोडी स्वमुद्रा ॥ ९ ॥

जयांचें असे पुण्य कीं सावकाश। विशेषें जनीं शोभती ते कवीश।
जयांचा यशोदेह आकल्प राहे। जरामृत्युवार्ता जयाला न साहे ॥१०॥

पद्में प्रफुल्ल करितो सविता स्वयें हा।
रात्रीं विकास कुमुदांप्रति चंद्र दे हा।
अप्रार्थितां जलद दे जल या जनाला।
मुक्तार्थ कीं परहितोत्सव सज्जनाला ॥ ११ ॥

त्याला वन्हि जलापरी, जलधि हा कीं ओहळाचे परी।
मेरू स्वल्पशिलेपरी, मृगपती तोही कुरंगापरी।
कीं तो सर्प फुलापरी, विषजलें पीयूषवृष्टीपरी।
होतें सर्वहि यापरी, वसतसे सच्छील ज्याचे शिरीं ॥ १२ ॥

शूरेंचि अथवा शूरें, हें भूमंडल सर्वथा।
पादाक्रांत करावें कीं, इतरांची असो कथा ॥ १३ ॥

वाहे महीतें स्वशिरीं फणी तो । तयासि पाठीवरि कूर्म वाहतो ।
समुद्र घे त्यासहि मांडियेवरी । थोराचि हे थोरवि जाण यापरी ॥१४॥
सिंहाचा जो बाल, तोही चपेटा । मारी त्याला जो करी मत्त मोठा ।
तेजस्वी जे वृत्ति ऐसीच त्यांची । तेथें नाहीं चाड कांहीं वयाची ॥ १५ ॥

---

## १० वैराग्यपर श्लोक.

अभिज्ञांस तों ग्रासिलें मत्सरानें । धनाढ्य प्रभू व्यापिले दुर्मदानें ।
शिरीं थोर अज्ञान मूर्खांस ओझें । जिरालें निजांगींच पांडित्य माझें ॥१॥

आशा थोर नदी, मनोरथ तिचें पानीय, वीची तृषा ।
स्त्रीपुत्राद्यनुराग हीं जलचरें, जे पूर्ण कूलंकषा ।
संसारभ्रमभोंवरा गरगरी, चिंताच जीचीं तटें ।
तीतें जे तरले मुनीश, न कधीं ते पावती संकटें ॥ २ ॥

न जाणतां टोळ पडे हुताशीं । नेणोनिया मीन गिळी गळाशी ।
अभिज्ञ आम्ही विषयासि जेव्हां । सांडूंच ना मोह बलिष्ठ तेव्हां ॥ ३ ॥

जेथें एक, अनेक तेथ मिळती स्वाऱ्या, तयांच्या तुटी ।
होतां एक उरे, सर्वेचि मरती, तेंही नुरे शेवटीं ।
फांसे रात्रिदिनाख्य झोलित पहा तो काळ खेळे असें ।
प्राण्यांचीच करूनिया भवगृहीं ते सोंगटी चौरसें ॥ ४ ॥
गतीनें सूर्याच्या पलपलपणें माप भरतें ।
नसे व्यासंगानें दिवसरजनीज्ञान पुरतें ।
जगीं पाहे दुःखें विविध, नुपजे त्रासहि जरा ।
कशी या लोकांला बहुत चढली मोहमदिरा ॥ ५ ॥

गगनीं रजनीस शशी विलसे । दिवसा रवि त्या स्थलिं नांदतसे ।
उदयास्त अशांस न हे चुकती । स्थिर मानितसे जन हा कुमती ॥ ६ ॥
गेले जिला भोगुनि भूप सारे । त्या भूमिलाभें तुज गर्व कां रे ।
हेंही असो, एक धरूनि खेडें । कां मातले हे बहुसाल वेडे ॥ ७ ॥

झाला असाही सुकृती, जयाचें। कपाळ तें भूषण शंकराचें।
लोकीं मला कीं प्रणिपात केला। म्हणूनि कां गर्व नराधमाला ॥ ८ ॥
संतुष्ट लोकांस करावयासी। कां रे! मना तूं तरि खिन्न होसी।
प्रसन्न चिंतामणि तूंचि जेव्हां। होसी, तुला वाण नसेचि तेव्हां ॥ ९ ॥
स्वर्गापासुनि शर्वमस्तकतटीं, तेथूनिया भूधरीं।
ग्रावाग्राहुनि भूतलीं उतरली ते स्वर्णदी सत्वरीं।
गेली तेथुनि अर्णवाप्रति मदें, ते वंद्यही कष्टली।
जे कां दुर्मद त्यां अधःपतनता आहे बरी निर्मिली ॥ १० ॥
कल्पांताग्निबळें सुमेरु गिरि जो होतो तसाही चुना।
होती सागर शुष्क ते जलचरें ज्यांची न संभावना।
पृथ्वी जे धरिली महागिरिवरीं तेही बुडे अंतरीं।
वार्ता काय कलेवरीं? चपल जें मत्तेभकर्णापरी ॥ ११ ॥

---

# मोरोपंत.

## १ नाममाहात्म्य.

आर्या.

भागवतांच्या सुहृदा! नामा! तूं हरिसि सर्व पापदर।
यास्तव सदया! वरदा! दीनें म्यां पसरिला तुला पदर ॥ १ ॥
दैवें तुजशीं सत्सहवासांत नवीच ओळखी पडली।
तूझ्या मधुरतरगुणीं अतिचंचल चित्तवृत्ति ही जडली ॥ २ ॥
नारदवाल्मीकिशुकव्यासादि सखे तुजे तुला भजती।
मित्र तुजें म्हणवाया, कैंची दीनासि योग्यता मज ती ॥ ३ ॥
सर्वत्र स्नेह तुझा सम, समयीं संकटीं पुढें होसी।
परमपदीं बैसविसी रंकहि, देउनि सुलग्न तूं जोशी ॥ ४ ॥
नामा! सामात्य प्रभु गेला स्वपदांतरासि ज्या काळीं।

दे अधिकार तुज निजप्रतिनिधिला कीं, सुखें प्रजा पाळीं ॥ ५ ॥
नामा! जामाता तूं करिसी निजदास आत्मजा मुक्ती ।
देसि, म्हणूनचि पुष्कळ गौरविसी; सूचली भली युक्ती ॥ ६ ॥
तृष्णानदींत अधना तारिसि तूं नामराज नावाडी ।
तोचि उदार, सदन्नें जो क्षुधिता पामरा जना वाडी ॥ ७ ॥
नामा! बा! माहेरा न्याया आलासि काय तूं मूळ ।
न सुचेचि कामधाम, प्रकट स्वांतासि लाविलें खूळ ॥ ८ ॥
प्रभुपदिं भवसिंधूद्धृत मुक्तांची नित्य एक लाखोली ।
वाहसि जाणसि कुशला! भवाब्धिची तूंचि एकला खोली ॥ ९ ॥
कलिकाळीं मंत्रांचें तेज प्रतिवासर क्षया जाय ।
तेज चढे तुज नामा! बहु माने काळ हा तुला काय ॥ १० ॥
यद्रसनाग्रीं नाचसि तूं होउनि सुप्रसन्न नटसा रे ।
नाचों लागति त्याचे भवपाशविमुक्त पितर चट सारे ॥ ११ ॥

---

## २ धर्मसंग्रह.

### आर्या.

वत्सा! शाश्वत होय श्रुतितज्ज्ञपुराणकथित जो धर्म ।
तो सेव्य उभयलोकीं, प्राणी तेणेंचि पावतो शर्म ॥ १ ॥
भज सन्मार्गातें तूं, देवज्ञांची करूं नको गर्हा ।
स्वप्नींहि देवहेलन न करावें, रीति हे तुला अर्हा ॥ २ ॥
बा! कोप, लोभ, शठता, असदाग्रह, पिशुनता, कुटिल भाव ।
उद्वेग, दंभ, यत्नें सोडीं; जोडीं महाजनीं ठाव ॥ ३ ॥
सुखसंपन्नीं मैत्री, नित्य दया दुःखितीं जनींहि करीं ।
संतोष पुण्यवंतीं; बा! औदासीन्य, दुर्मती न धरीं ॥ ४ ॥
अतिपूर्वातिक्रोध श्रमनिद्राहारभाषणक्रीडा ।
हे षट्पदार्थ वर्जीं, होइल यांतें न वर्जितां पीडा ॥ ५ ॥

विद्योत्साह, श्रद्धा, स्मृति, पुण्य, ख्याति, धैर्य हे आधीं ।
अनघा! मन घालुनिया अतिपूर्वक षट्पदार्थ तूं साधीं ॥ ६ ॥
सक्रोध हो अरिजनीं, स्वपरिजनीं हो दयार्द्र तूं बापा ।
सकृप सलोभहि चित्तीं हो, स्वजनाच्या हरावया तापा ॥ ७ ॥
हो द्वेषी पाखंडीं, साधुजनीं हो सराग तूं, बा! गा ।
दुर्मत्रीं केवल जड, पिशुनोक्तीं बधिर हो महाभागा ॥ ८ ॥
नास्तिक, धूर्त, पतित, शठ, षंढ, कितव, चपल, खल, जड, क्रूर,
निज-कल्याणाकारितां वत्सा! सोडूनि यांसि दे दूर ॥ ९ ॥
न करीं निजप्रशंसा, विज्ञातेंगित परा नको होवूं ।
पुत्रीं, धनीं, कुटुंबीं, बा! केवल चित्त तूं नको गोवूं ॥ १० ॥
जननी, जनक, सती स्त्री, गुरु, सज्जन, यांचिया वचा साधो ।
विश्वास सदाहि धरीं, न अविश्वासें व्यथा तुला बाधो ॥ ११ ॥
सावध सदा असावें संसारीं स्वहितकृत्य लक्षावें ।
पुरुषार्थांचें साधन बा! धनसें हें शरीर रक्षावें ॥ १२ ॥
वत्सा! भृत्याचाही तूं निजहृदयीं धरीं न विश्वास ।
समज मनीं 'गुरुकथितन्यायें वश मी करीन विश्वास' ॥ १३ ॥
निर्दोष जे तयांची चित्तांत कधीं धरूं नको शंका ।
प्राणहि वेंचुनि रक्षीं वृद्धा, बाळा, सुदुर्बळा, रंका ॥ १४ ॥
वधयोग्यहि अरि येतां शरण, तयातें वधूं नको जाण ।
शरणागत जो त्याचे बा! रक्षावेचि सर्वथा प्राण ॥ १५ ॥
यत्नें कीर्तिच जोडीं, बा! होय पदार्थ हाचि बहु धन्य ।
राजे, पंडित, यांचें भूषण नाहींच कीर्तिहुनि अन्य ॥ १६ ॥
सत्कीर्तिप्रभवा श्री, पुण्यहि सत्कीर्तिचेंचि बा! तोक ।
ज्योत्स्नेनें चंद्र जसा शोभे सत्कीर्तिनेंचि हा लोक ॥ १७ ॥
आयुष्य, कीर्ति, यश, बल, पुण्य, द्रव्य, प्रजोन्नति प्राज्य ।
जेणें, तें कर्म करीं. धर्मन्यायेंचि चालतें राज्य ॥ १८ ॥

बव्हर्थ, जनमनोहर, स्वल्पाक्षर, मधुर, सत्य बोलावें ।
ज्या सद्वाक्यश्रवणें बुधश्रोत्यांचेंचि शिरहि डोलावें ॥ १९ ॥
संतांचे अतिहितकर उपदेश, तशाचि पुण्यधर्मकथा ।
यांतें विमुख न हो तूं; वत्सा सोडूं नकोचि भव्यपथा ॥ २० ॥

---

## ३ सन्मनोरथराजि.

आर्या.

सत्संगतीं असावा प्रेमा, ग्रीष्मीं जसा असे व्यजनीं ।
रम्यहि अभक्त हो मज, मधुपा चंपक तसा, असेव्य जनीं ॥ १ ॥
संसारदुःख विसरवु सत्पद्धति मतिस, जेविं काय घडी ।
वरमायेसि विवाहीं विसरवि चवरी गुलाल पायघडी ॥ २ ॥
निजदेहगेहभान प्रभुभक्तांच्या कधींहि मेळांत ।
मज कीर्तनीं नसावें, जैसें शिरतां मुलांस खेळांत ॥ ३ ॥
जैसें अंधें वृद्धें नसतां गतिहेतु हस्तकीं यष्टी ।
तैसें व्हावें सज्जनसंगतिवांचुनि उदंड म्यां कष्टी ॥ ४ ॥
रंगावें सद्वचनें मतिनें, चूर्णें जसेंचि हळदीनें ।
भजन न सोडावें म्यां, जेविं कधीं कर्षकें न हळ दीनें ॥ ५ ॥

---

## ४ सत्संगमहिमा.

आर्या.

सत्संग अतिश्रेष्ठ, श्रेयस्कर, म्हणुनि सुज्ञ या गाती ।
यातें भजतां सिद्धिप्राप्ति असे जी, न योगयागा ती ॥ १ ॥
लीलेनें देतो जें सत्संग नता, न दे पद पिता तें ।
जरि राज्य दिलें, केलें न च पुत्राचें बरें तदपि तातें ॥ २ ॥
सत्संगति करिताहे लीलालेशेंकरूनि जेविं हित ।
न तसें माता जाणे संसारामाजि मात्र जें विहित ॥ ३ ॥

सत्संग म्हणे, 'सेवा मज, पावायासि कंजनाभा गा ।
अक्षय धन दाखविता मी च, न साधूनि अंजना भागा' ॥ ४ ॥
सत्संगचि हित, इतरीं दिसतो प्रेमा परंतु पातळ तो ।
जोंवरि कार्या येतो जन, त्यातें तोंवरीच आतळतो ॥ ५ ॥
सत्संगाची देती तशि इतराची कधीं न तोख दया ।
दुःसह चिरकालामय भव, हा सत्संग होय ओखद या ॥ ६ ॥
सत्संगतिप्रसादें बहु भगवद्भक्तिच्या भरीं भरले ।
सरले दोष; सकल जन, न तरावे जे कधींहि, ते तरले ॥ ७ ॥
प्रणतीं प्रसन्नपण जें सत्संगाचें, धरूनि शिखिता, तें ।
भस्मचि करितें, सहसा, सकळाही चित्रगुप्तलिखितातें ॥ ८ ॥
अत्यद्भुता मधुरता जीची विश्वांत भरुनिया उरली ।
सत्संगति मन हरि ती श्रीव्रजपतिसूनुची जशी मुरली ॥ ९ ॥
जीं हरिहर-प्रसादीं कल्याणें वसति, साधुसंगीं तीं ।
अघ शमतें, सुख गमतें, मन रमतें, जेविं दिव्य संगीतीं ॥ १० ॥
सत्संगमींच, नाना दुःखार्त तथापि, चित्त रंगतसे ।
जलनिधितरंग वातें, सत्संगें उठति चित्तरंग, तसे ॥ ११ ॥
स्पर्शमणि सुवर्ण करी, दे स्पर्शमणित्व तो न लोहातें ।
हा साधुसंग करितो साधु असाधुसि, हरूनि मोहातें ॥ १२ ॥

---

## ५ कविस्तव.

आर्या.

ज्ञानेशा! भगवंता! भगवज्जनवल्लभा! महासदया ।
कलियुगवर्ती जन जो, देशी, स्मरणेंचि, मुक्तिचें पद या ॥ १ ॥
श्रीमद्भगवद्गीताव्याख्या केली जनासि ताराया ।
सारा या सद्ग्रंथा सेविति, संसारताप साराया ॥ २ ॥
विष्णुयशाचें घाली, द्याया अमृता त्रपा, दुकान तुका ।
जरि याशिं न देवाशीं, श्रीरामाशींहि पादुका न तुका ॥ ३ ॥

धूता पळांत पुण्यें, जरि म्हणती 'काय' शक्र 'तुकया! धू'।
वाटे याची माता जेविं करी, तेविं न क्रतु कयाधू ॥ ४ ॥
द्विज 'सावधान' ऐसें सर्वत्र विवाहमंगलीं म्हणती ।
तें एक रामदासें आयकिलें; त्या असो सदा प्रणती ॥ ५ ॥
कामजयें, रघुवीरप्रेमें, हनुमदवतार हा सत्य ।
भवरोग हरुनि येणें लाजविले देववैद्य, नासत्य ॥ ६ ॥
श्रीभागवतवरानें केलें यश शुद्ध एकनाथानें ।
येणें प्रमुदित झाला साधु, जसा बाळ सेवितां थानें ॥ ७ ॥
भूतदया संसारीं एकोपंतास निरुपमा घडली ।
जडली आंगासीच क्षांति सदा; शांति तों गळां पडली ॥ ८ ॥
श्रीनारदमुनिचें जें सुमहद्व्रत, तेंचि नामदेवाचें ।
याणें प्रसिद्ध केलें विठ्ठल हें भव्य नाम देवाचें ॥ ९ ॥
श्रीपतिभक्तोत्तम जो, गावा तद्रूप वामनस्वामी ।
ज्या होउनि लुब्ध, म्हणे, 'त्यजिन श्रीकृष्णनाम, न स्वा मी'
श्रीमद्रामपदाब्जीं अलि तुळसीदास हा सदा गावा ।
मागावा वर, 'हरिजनभक्त भवपथीं कधीं न भागावा' ॥ ११ ॥
देव जगन्नाथ म्हणे, 'पावाल मला रमानिवासा रे ।
जन हो! माधवदासा गा, साधुयशीं रमा, निवा सारे' ॥ १२ ॥

---

## ६ केकावलि.

### श्लोक.

व्रजावन करावया वसविलें नखाग्रीं धरा ।
सलील तइं मंदराख्यहि नग स्वपृष्ठीं धरा ।
वराहतनु घेउनी, उचलिली रदाग्रें धरा ।
सुदुर्धर तुम्हां कसा पतित हा? न कां उद्धरा ॥ १ ॥
नतावनधृतव्रत! ज्वलन तूंचि बाधावनीं ।
पदप्रणतसंकटीं प्रजव तूंचि बा! धावनीं ।

दया प्रकट दाखवी कवण सांग त्या वारणीं ।
सतीव्यसनवारणीं ? जयजयार्थ त्या वा रणीं ॥ २ ॥

न पावसि, म्हणोनि मी म्हणतसें तुला आळशी ।
बरी न असदुक्ति हे, रविसखोत्थिता आळशी ।
असंख्य जन तर्पिले, क्षुधित एकला जेमनीं ।
चुकेल, तरि त्यासि दे, परि वदान्य लाजे मनीं ॥ ३ ॥

'अगा! प्रणतवत्सला!' म्हणति त्या जनां पावलां ।
म्हणोनि तुमच्याच मी स्मरतसें सदा पावलां ।
'करूं बरि कृपा, हरूं व्यसन, दीन हा तापला'।
असें मनि धरा, खरा भरंवसा मला आपला ॥ ४ ॥

पटुत्व सकलेंद्रियीं, मनुजता, सुवंशीं जनी ।
द्विजत्वहि दिलें भलें, बहु अलभ्य जें कीं जनीं ।
यशःश्रवणकीर्तनीं रुचि दिली; तरी हा 'वरा'।
म्हणे 'अधिक द्याच कीं' अखिल याचकीं हावरा ॥ ५ ॥

कराल पुरती दया, तरि असो दिलें पावलें ।
परंतु हरि! एकदां त्वरित दाखवा पावलें ।
प्रसाद करणें मनीं जरि नसेल; हें आवरा ।
जया बहु तयास द्या, मज कशास ? मी हावरा ॥ ६ ॥

'दिलें फिरुनि घेतलें,' अशि अकीर्ति लोकीं न हो ।
सुनिर्मल तुझीं पदें कधिं तरी विलोकीन, हो ।
निजप्रियजनाकडे तरिहि दे हवाला; जशी ।
पडेल समजाविशी, तशि करोत; कां लाजशी ॥ ७ ॥

अहा! निपट धृष्ट मी; प्रभुवरासि 'कां लाजसी'।
म्हणें, तुज नसो तशी विकृति, भाविकांला जशी ।
परंतु अपराध हा गुरु, म्हणोनि शिक्षा करीं ।
असेंचि धरिली नयच्युतदमार्थ दीक्षा करीं ॥ ८ ॥

तुझ्या जिरविले बहु प्रणतमंतु पोटें, पण ।
त्यजी मदपराध, हें मजकडेचि खोटेपण ।
दवाग्नि जठरीं अतिक्षुधित, त्यास हें अन्न द्या ।
वितृष्ण करिती श्रितां तुमचिया दयासन्नद्या ॥ ९ ॥
न होय कवणाहि, तें तुमचियाचि लीलालसें ।
पदें चरित दाविजे त्रिजगदब्जकीलालसें ।
मदुद्धरण मात्र कां जड तुम्हां दिसे? वारिती ।
स्वकव्यसन मर्त्यही, न करितीच सेवा रिती ॥ १० ॥

---

## ७ एक बाल्यप्रसंग.

श्रीकृष्ण व सुदाम हे सांदीपनीच्या घरीं बाळपणीं विद्याभ्यासाकरितां होते. तेथें घडलेल्या एका प्रसंगाचें मौजेचें वर्णन पुढील उताऱ्यांत आहे. सुदाम हा दरिद्री होता. पुढें बायकोच्या सांगण्यावरून तो कांहीं धन मागण्याकरितां श्रीकृष्णाकडे गेला. तेथें गेल्यावर जी हकीगत झाली, ती सर्व त्यानें परत आल्यावर आपल्या बायकोला सांगितली. त्या हकीगतींतलाच हा प्रसंग आहे:—

### श्लोक.

विद्याभ्यासार्थ होतों निजगुरुसदनीं तेधवां एकदां जें ।
झालें वृत्त प्रिये! तें कथुनि यदुवरें मोहिलें चित्त माझें ।
तें मीही तूज आतां जलरुहनयने! सांगतों ऐक जाये ।
प्रेमानें वर्णितां हें घडि घडि हरिच्या नीर नेत्रांबुजां ये ॥ १ ॥
बंधो! तें नित्य केव्हां तरि कुतुक तुझ्या आठवे कीं मनाला ।
आणाया इंधनाला स्वगुरुयुवतिनें धाडिलें जैं वनाला ।
कालावांचून आला जलधर, सुटला वात, अंधार झाला ।
भ्याला आत्मा करालाहिकुटिलतरलांला सशब्दां विजांला ॥ २ ॥
भास्वान् मावळला, पयोद वळला, स्थूलांबुवाहोत्पल-।
व्रातांहीं बहु पीडलों स्थिर वनीं दीलें न राहों पल ।

वर्षें कांकडलों, जळांत पडलों, झाला क्षणें दिग्भ्रम।
सारे बाळ, कराल काळ; शिरला चित्तीं महा संभ्रम ॥ ३ ॥
तो निम्नोन्नतभूविभाग न कळे सर्वत्र झालें वन।
आम्हां काळमुखासमान गमलें सर्वांसही तें वन।
अंधारीं धरुनी परस्पर करीं स्वाध्वभ्रमा पावुनी।
प्रत्यूषावधि हिंडलों, मग परामर्षासि आला मुनी ॥ ४ ॥
झालों होतों श्रमानें विकळ सकळही काननीं वृष्टिवातें।
आचार्यें धावुनीया स्वहृदयिं धरिलें जेविं आत्मोद्भवांतें।
केलें आघ्राण माथां, सकरुण गुरु तो वर्षला प्रेमतोया।
मच्चित्ता आठवे श्रीगुरुचरणदयाप्राप्तसत्कार तो या ॥ ५ ॥
"केले हे क्लेशपात्र प्रियतमहि तुम्हीं अस्मदर्थ स्वकाय।
या कर्माहूनि लोकीं गुरुसि समुचिता दक्षिणा येथ काय।
पावा माझ्या प्रसादें सकलहि सकला शुद्ध संपूर्ण विद्या।
शिष्याच्या हृत्तमाचा प्रशमकर करीं ज्ञाननामा रवि द्या" ॥ ६ ॥
एवं श्रीगुरुनें प्रसाद सदयें केला मला तो स्मरे।
बंधो! देशिकपादपद्मभजनें संसार हा ओसरे।
झालीं यापरि जीं अनेक कुतुकें तीं या मनीं जागती।
भार्ये! देव असा उदंड वदला लोकेश माझा गती ॥ ७ ॥
भार्ये! ही कथिली कथा निजमुखें जेव्हां जगन्नायकें।
तेव्हां उत्तर मीं दिलें हरिस जें तें तूं बरें आयकें।
'लोकेशा! जनसंग्रहार्थ गुरुच्या गेहीं तुझें राहणें।
अस्मद्भाग्यहि थोर कीं श्रुतिनुता! लीला तुझ्या पाहणें ॥ ८ ॥
ज्याचा वेदमय स्वदेह, कुशलाधार, त्रिलोकीविता।
जो वर्णाश्रमधर्मकल्पक, कवि, श्रुत्यध्वसंस्थापिता।
विश्वाचा गुरु, तो स्वयें गुरुकुळीं विद्यार्थिभावें वसे।
हें तों लोकविडंबन; प्रभुवरा अन्यार्थ येथें नसे' ॥ ९ ॥

---

## ८ रामप्रत्यागमन.

### श्लोक.

तातादेशेंकरुनि विपिनीं राघवें वास केला ।
तेथें चौर्यें दशमुख हरी मेदिनीकन्यकेला ।
सुग्रीवाख्य प्लवगपतिशीं सख्य साधूनि, बाळी ।
त्याचा भ्राता वधुनि विशिखें, दाविली त्या दिवाळी ॥ १ ॥
पश्चात् राम दशाननासि ससुतामात्यासि युद्धीं वधी ।
दे लंकेसि बिभीषणाप्रति धरा सिंध्वर्कसोमावधी ।
स्वाहेशास्यविशुद्धमैथिलसुतासंयुक्त रम्याकृती ।
साकेतासि सुपुष्पकीं मग सुखें बैसोनि आला कृती ॥ २ ॥
जे सुग्रीवबिभीषणांगदमरुत्पुत्रादि आले, सुखें ।
सेना-संयुत जानकीपतिगुणस्तोमासि गाती मुखें ।
श्रीरामागमनप्रहृष्ट सकलायोध्या पुढें धांवली ।
पानीयासि जशी तृषार्त सुरभी तैशी क्षणें पावली ॥ ३ ॥
गेल्यापासुनिया चतुर्दश समा कष्टीचि झाला वनीं ।
सीतालक्ष्मणयुक्त राघव, असें भावूनिया तो मनीं ।
सक्ष्मादेव, कृपापयोधर, तदा त्याचा पुरोधा, मुनी ।
आशीर्वादमिषें सुधेसि, भगवान् वर्षे पुढें जाउनी ॥ ४ ॥
कैकेयीसुत, वल्कलाजिनजटाधारी, प्रधानासवें ।
सामोरा रघुनायकाप्रति पुढें गेला प्रभूतोत्सवें ।
जाला सन्नत राघवेंद्रचरणीं, रामें समालिंगिला ।
तत्प्रेमाश्रुकणें भिजे, रघुवरें जेव्हां शिरीं हुंगिला ॥ ५ ॥
जाला तो नगरीं प्रविष्ट सकळक्ष्मानाथचूडामणी ।
लोकांच्या हृदयांबुजीं बहु दिसां आनंदही त्या क्षणीं ।
कौशल्या घननादशत्रुजननी, कांतारवासप्रदा ।
कैकेयीहि, रघूत्तमें नमुनिया केली प्रमोदास्पदा ॥ ६ ॥

कौशल्या, मलिना, कृशा, स्वतनयाश्लेषें तदा हर्षली ।
आनंदाश्रुकरूनि, राघवशिरीं हुंगूनियां वर्षली ।
पूर्वींच्यापरि विघ्न होइल, असें मानूनिया क्षिप्र ती ।
कोणातेंहि न पूसतां करि जणों राज्याभिषेकाप्रती ॥ ७ ॥

'हा अच्छेद्य, अभेद्य नंदन तुझा अक्लेश, वत्से!' असें ।
मातें संकथिती वसिष्ठमुख हे भूदेव, मिथ्या कसें ।
जालासि प्रखरेषुभिन्नतनु तूं, बोलोनि ऐसें, करें ।
स्पर्शे, लक्ष्मण राम हीं स्वहृदयीं आलिंगुनी लेकरें ॥ ८ ॥

श्वश्रूतें क्षितिजा नमी, तंव तिहीं आलंगिली आदरें ।
कौशल्या मग ते वदे, सुचुबुकीं स्पर्शोनि तीतें करें ।
'रामाशीं चिरकाळ सर्वसुखसंपूर्णा स्वपत्या रहा ।
पातिव्रत्यबळें तुझ्याचि तरला दुःखाब्धिला वत्स हा ॥ ९ ॥

वत्से ! तूं रघुवंशभूषणमणी, स्तुत्या सतींच्या गणीं ।
चारित्र्यासि तुझ्या सुरेंद्ररमणी गाती सुखें स्वांगणीं ।
त्वत्कोपेंचि दशास्य दुर्मति कथाशेष त्रिलोकांत या ।
झाला, कोण असा असे त्रिभुवनीं मारावयाला तया' ॥ १० ॥

कौशल्या यापरी ते प्रमुदितहृदया बोलिली मैथिलीला ।
वर्णी हर्षेकरूनी स्फुरदधरमुखें रामसौमित्रिलीला ।
केला राज्याभिषेक क्षितिसुरतिलकें श्रीवसिष्ठें स्वतोषें ।
विप्रांचे संघ तेव्हां परम शुभदिनीं गर्जती मंत्रघोषें ॥ ११ ॥

राज्यातें अज तो करीत असतां जाले दरिद्री धनी ।
रोगी रोगविहीन, बालिश रत ज्ञानाचिया साधनीं ।
गाई त्या घटदोहनी, बहुरसा सस्यावृता मेदिनी ।
यूपस्तंभसमन्विताहि सरयू लोकत्रयाह्लादिनी ॥ १२ ॥

दिव्यास्वादुफलाढ्य भूरुह, लता संशोभती पुष्पिता ।
आत्मापत्यमृतिप्रति क्षितितळीं पाहे न मातापिता ।

वंध्या लब्धबहुप्रजा, सकलही वर्ण स्वधर्मीं रत ।
श्रीरामाख्यसुधेसि कर्णचषकें पीती सुखें संतत ॥ १३ ॥
पापातें न वसावया स्थळ दिसे, कोण श्रमाला पुसे ।
नाहीं आश्रय, यास्तव क्षितितळीं चिंता सचिंता वसे ।
विघ्नातें बहु विघ्न होति, रुसली भीति त्रिलोकीं बरी ।
साकेतीं रघुनाथ सानुजसुहृद् राज्यासि जेव्हां करी ॥ १४ ॥

---

## ९ कैकेयीची निर्भर्त्सना.

आपल्या मुलाला म्हणजे भरताला अयोध्येचें राज्य मिळावें, म्हणून कैकेयीनें रामाला वनाला पाठविण्याची व्यवस्था केली. रामाच्या वियोग-दुःखानें दशरथ मरण पावला. पण भरताला राज्य मिळालें, या आनंदांत तिला वैधव्याचें कांहीं वाटलें नाहीं. पुढें भरत आपल्या मामाकडून परत आला. त्याला आपल्यामागें घडलेली सगळी हकीगत कळली, व आईच्या दुष्टकारस्थानानें त्याच्या आंगाचा नुसता संताप झाला. मग तो जें बोलला तें हें:—

आर्या

हें जननीचें चरित श्रवण करुनिया, सखेद फार रडे ।
दंडाहत भुजग तसा कोपें मातेकडे तदा मुरडे ॥ १ ॥
"प्रिय वधिला पापिष्टे! धाडुनि विपिनासि सद्गुणकरंडा ।
केली अकीर्ति, आपण झालिस पापाशये, स्वयें रंडा ॥ २ ॥
मारावें तुज पापे! पारि म्हणतो रामराय माय तुला ।
यास्तव उपाय नाहीं; गरळाची तुजचि योग्य काय तुला ॥ ३ ॥
यमकार्यकारिणी तूं कृत्या, मोहूनि यास विश्वास ।
पत्नी होउनि गिळिला राजा, माझा पिता, सविश्वास ॥ ४ ॥
ह्री श्री दया जयाच्या ठायीं जो स्तुत्य या जनामाजीं ।
त्याला वनासि धाडुनि केली तूं काय कामना माजी ॥ ५ ॥

तूं राक्षसीपरीसहि अधमा, जे निजकुटुंब खातीस।
मीही पाप तुझा सुत;" हें बोले होय पारखा तीस ॥ ६ ॥

---

आदिपर्वांतर्गत

## १० धेनुहरणप्रयत्न.

पार्थ म्हणे, 'तो कोण ब्रह्मर्षि असे? मनोरमहि म्यां तें।
तद्यश नसे परिसलें; सांग सख्या तूं तदीय महिम्यातें' ॥ १ ॥
गंधर्व म्हणे, "होता कुशिकतनुज गाधि कान्यकुब्जपती।
तत्सुत विश्वामित्र प्रभु, यत्सेवेसि नृप सदा जपती ॥ २ ॥
सबळसचिव तो भूपति मृगया कारितां वनीं बहु श्रमला।
दैवें वसिष्ठमुनिचें पुण्याश्रमपद विलोकितां रमला ॥ ३ ॥
स्वपदनत गाधिजातें सत्कारुनि मुनि म्हणे 'अगा! राया।
जावें न क्षुधितें त्वां, येउनिया आमुच्या अगारा या' ॥ ४ ॥
वाल्मीकिच्या जन जसा तृप्तिसि पावे कुळासकट कवनीं।
मुनिच्या उटजीं तैसा तो गाधिज भूपही सकटक वनीं ॥ ५ ॥
नृपति म्हणे, 'कोठुनि हें आलें साहित्य जेवणा रानीं।
अस्मद्गृहींहि न कधीं वरिली हे तृप्ति जेवणारांनीं ॥ ६ ॥
जें न नृप-प्रासादें तें मुनिच्या भुक्ति-सुख दिलें उटजें।
हें मोठें नवल; अहो! लाजविला पारिजात कीं कुटजें ॥ ७ ॥
वल्कलरुद्राक्षधर ब्राह्मण अकृतान्ययत्न हा रानीं।
बळ पूजिलें कसें हो! बहुमुल्य दुकूलरत्नहारांनीं' ॥ ८ ॥
करितां शोध कळे कीं उटजीं सुर-धेनु-नंदिनी आहे।
पाहे तीस नृप म्हणे मग मुनिला 'गाय मागतों, द्या हे ॥ ९ ॥
अर्बुद गायी देतों, अथवा देतों स्वराज्य भोगाया।
दे गाय काय विनिमय हा भवदर्थोंन? मान्य हो गा! या' ॥१०॥
मुनिवर म्हणे, 'नृपा! हें वचन तुझें मन्मनासि कंपा दे।
या धेनुबळें माझा हा आश्रमधर्म सांग संपादे ॥ ११ ॥

कोण ज्ञाता राज्यस्वीकार करील आधि ज्यामाजीं ।
मागों नको, न देया, हेया हे धेनु गाधिजा! माजी ' ॥ १२ ॥
विश्वामित्र म्हणे, ' मी क्षत्रिय, आधार जाण तेजाचा ।
आज्ञा-मानस-भंग न करिती भद्रेच्छु जाणते ज्याचा ॥ १३ ॥
स्वाध्याय तुझें बळ, तूं ब्राह्मण, कैचें असह्य तेज तुला ।
पिप्पलजत्व सम असो; दहनीं तेजस्विता न ते जतुला ॥ १४ ॥
मानधन प्रभु मी, जें वदलों कर्तव्य तें करीन खरें ।
ऐसा कोण प्राणी, ज्यातें न करील वश हरी नखरें ' ॥ १५ ॥
भगवान् वदे, ' बळी तूं, तुझिया चतुरंग सैन्य सांगातें ।
तुज कर्तव्य असे जें, सिद्ध न करिसी अभीष्ट कां गा! तें ' ॥ १६ ॥
कौशिक अनुगांसि म्हणे, ' सोडा हो ! धेनुला, चला, हाका ।
हा काय रत्नभोक्ता? मारू अनुताप पावुनी हाका ' ॥ १७ ॥
दंडें ताडुनि नेतां, फोडी ती धेनु फार हंबरडे ।
तेव्हां आश्रमवासी द्विज-मृग-खग-देवता-कदंब रडे ॥ १८ ॥
नेतां बळेंचि धांवत येउनि ती मुनिपुढें उभी राहे ।
आणूनि लोचनीं जळ, बहुदीनत्वें मुखाकडे पाहे ॥ १९ ॥
धेनु म्हणे, ' स्वामी! त्वां पालन केलें, करी न बाप तसें ।
कां मज उपेक्षिलें हो! मी खळदंडें उदंड तापतसें ' ॥ २० ॥
साधु म्हणे, ' मज हृदयीं शत, तुज बाहेर हे कशा लागे ।
मी ब्राह्मण क्षमावान्, माते! रडतीस तूं कशाला गे ॥ २१ ॥
क्षत्रियतेज असें हें, जें तुजला पीडितें कशापातें ।
मत्तेजक्षांति मला म्हणते ' हां हां! न ओक शापातें ' ॥ २२ ॥
मन्मति-दरींत न शिरे कोप-मतंगज, विवेक-हरि जागे ।
म्यां न त्यजितां नेतो भूप बळें, तुज रुचेल तरि जा गे ' ॥ २३ ॥
गाय म्हणे, ' भगवंता! नसतां आज्ञा तुझी, न मद्धरणीं ।
काळहि बळी; किती हा? न तृणबळें होय वन्हि बद्ध रणीं ' ॥ २४ ॥

विप्र म्हणे, 'नेला कीं दृढबद्ध करूनि वत्स दाव्यानें ।
स्वबळें नृपें मदाश्रम, देह जसा व्यापिला सदा व्यानें ॥ २५ ॥
शक्य असेल तरि रहा,' ऐसें मुनि बोलतांचि ती क्षोभे ।
ग्रीष्मगमध्यान्हार्कप्रतिम तिचा देह तेधवां शोभे ॥ २६ ॥
धेनुमिषें त्या मुनिची सुतपस्यासिद्धि कोपली वाटे ।
फाटे गाधिजबळतम त्या चपळेच्या धरूनिया वाटे ॥ २७ ॥
अंगापासुनि केले प्रकट तिनें म्लेंच्छ, यवन, शबर, शक।
बळ उडविलें तिहीं खगपतिपक्षांहीं जसें सहज मशक ॥ २८ ॥
जेविं दिगंताप्रति ने तिमिरा तूळा रविप्रभा वात्या ।
सेना तसी नृपबळा, निस्तुळ म्हणती कवि प्रभावा त्या ॥ २९ ॥
मागें पाहों न दिलें, तीं बारा कोस पळविलीं कटकें ।
यश हारविलें तेथें किति शस्त्रें, हार, कुंडलें कटकें" ॥ ३० ॥

---

वनपर्वांतर्गत

## ११ सेतुबंधावर उत्प्रेक्षा.

रामानें सीतेची मुक्तता करण्याकारितां लंकेवर स्वारी केली. त्या वेळीं रामेश्वर येथें त्याला सेतु बांधण्याची व्यवस्था करावी लागली. त्यावर कवीनें या सुंदर उत्प्रेक्षा केल्या आहेत.

शतयोजन आयत दशयोजन विस्तीर्ण सेतु शंकेतें ।
दे, गेला बुडवाया कोपाकुल भूमिबाहु लंकेतें ॥ १ ॥
किंवा तो कपिकटकोत्तरसिंधूद्गत बुभुक्षु कालाही ।
दूर पसरला खाया रात्रिचरां क्षुद्र बेडकांलाही ॥ २ ॥
सेतु न तो यत्पतिनें स्वसुता नेली, जशी वृकें एणी ।
त्या लंकेची श्रीभूदेवीनें ओढिली असे वेणी ॥ ३ ॥
रामजयश्रीलग्नीं लंका घाली सुनील पाटावें ।
सेनावऱ्हाडणीला पायघडी कां असें न वाटावें ॥ ४ ॥

बहुधा तुच्छ जलधितृण चाटायाचा धरूनिया वीट ।
गेला प्रभुप्रतापासितपथ रक्षोटवीकडे नीट ॥ ५ ॥
कीं पतित पति त्यागुनि विश्वशरण्याकडे रडत वाटे ।
आली जी लंकाश्री तीचा तो सांजनाश्रु पथ वाटे ॥ ६ ॥
कीं चिरलें स्वापयशें शोकानळदग्ध सागरोरचि तें ।
सूचविले तर्क असे त्या सेतुवरें महासुधीराचितें ॥ ७ ॥

---

उद्योगपर्वांतर्गत

## १२ गांधारीचा दुर्योधनास बोध.

पांडवांना राज्यार्ध देऊन साम कर, असें धृतराष्ट्र, भीष्म, द्रोण, विदुर यांनीं दुर्योधनास सांगितलें; पण तो कांहीं ऐकेना. तेव्हां धृतराष्ट्राच्या सूचनेवरून गांधारीनें आपल्या मुलाला अगदीं निर्भीडपणें जो खऱ्या हिताचा बोध केला, तो असा:—

आर्या.

गांधारी त्यासि म्हणे, "वत्सा! बहु कष्टतो दुरभिमानी ।
कां त्यजिसि गुरूक्ति? इला आत्माधिक बहुगुणें सुरभि मानी ॥ १ ॥
अन्यायकृष्णवर्त्मा न स्पर्शो कीर्तिकापुरा, तनया।
ज्या लोभा भजसी तूं भजले नाहींत बा! पुरातन या ॥ २ ॥
कामें, कोपें, लोभें, नागविले अमित, यांस जे भुलले ।
यांच्या कुदृष्टिपातें तेजस्वी पुरुषहीरही उलले ॥ ३ ॥
न उगाचि मूकसा तूं चित्तांत धरूनि दंभ दर्प रहा।
बा! दुरभिमान न बरा, देइल धनपतिकरींहि खर्पर हा॥ ४ ॥
अहित कथील तरि कसा गुरु? बाप कसा? तसीच आइ कसी ।
नाइकसी गुरुवचन, क्षुद्रवचन बहु जपोनि आइकसी ॥ ५ ॥
सत्यप्रेमें स्वामी न म्हणविती हे दयाभ्र मामाजी ।
'मी राजा' ऐसें जें काय म्हणसि खेद या भ्रमामाजीं ॥ ६ ॥

राज्यार्ध पांडवां दे, तूं घे राज्यार्ध, बहु तुला बा ! हें ।
साम करीं, यश रुसलें, मुरडुनि तुज पाहतें, मुला ! बाहें ॥ ७ ॥
निष्कंटक राज्य करिसि, हा महिमा सत्य पांडवांचा रे ।
सत्सख्य करूनि यशें धवळ करा सत्यपांड, वांचा रे ॥ ८ ॥
भीष्मद्रोणाद्यार्य प्राणांतें सोडितील, न तयांतें ।
सामर्थ्य असोनि अधिक, बहु ते आहेत साधु नत यांतें ॥ ९ ॥
क्षुद्र शकुनिदुःशासनकर्ण, यश क्षुद्रसंगरहितास ।
कोणा होइल केला भूतबळें रुद्रसंगर हितास ॥ १० ॥
सर्वसुहृत् श्रीकृष्ण प्रभु, याची कास धरुनि सर्व तरे ।
तूं किति? तरले याच्या नामें बहु सागरांत पर्वत रे ॥ ११ ॥
तुज पांडवजय दुर्घट; नारळ हारिजेल काय खर्वतरें ।
कृष्णोक्तें सख्य करीं, याचि उपायें अनिष्ट सर्व तरे ॥ १२ ॥
ऐसें मातृवचनही लंघुनि गेला उठोनि पुनरपि तो ।
जो भव्य पावणारा सद्गुरुसद्वाक्सुधेसि सुनर पितो ॥ १३ ॥

---

उद्योगपर्वांतर्गत

## १३ कुंतीकर्णसंवाद.

कर्ण हा वास्तविक कुंतीचा पुत्र, पण कुंतीनें त्याचा उपजतांच त्याग केला. पुढें तो अधिरथ नांवाच्या सारथ्याच्या हातीं लागला. व त्याच्या बायकोनें—राधेनें—त्यास वाढविलें. कौरव व पांडव यांचें युद्ध होणार, हें निश्चित झाल्यानंतर त्याला खरी हकीकत सांगून पांडवपक्षा-कडे आणावें, अशा हेतूनें त्याची कुंतीनें एकांतीं गांठ घेतली. त्या वेळीं दोघांचा झालेला संवाद पुढील उताऱ्यांत आहे.

**आर्या.**

**विदुरानुमतें कुंती गंगातीरीं सुताकडे गेली ।**
**नकळत तदुत्तरीयच्छायेंत उगीच ती सती ठेली ॥ १ ॥**

कर्णाचा नियम असा ब्रह्मजप करीत निश्चळ रहावें ।
तापेल पृष्ठ तोंवरि रविचें मंडळ निरंतर पहावें ॥ २ ॥
नियमांतीं कुंतीतें पाहूनि म्हणे धरूनि राग मनीं ।
'राधेय आधिरथि मी तुज नमितों, काय कार्य आगमनीं' ॥ ३ ॥
कुंती कर्णासि म्हणे, "वत्सा कौंतेय तूं, न राधेय ।
'राधे!' यथेष्ट म्हण, परि कर्णा! कर्णासि फार बाधे 'य' ॥ ४ ॥
मुग्धत्वें त्यजुनि तुला चुकल्यें, आतां स्वबंधु रक्षावे ।
साधो! धर्मज्ञें त्वां अनुज स्वतनुजसमान लक्षावे ॥ ५ ॥
ज्येष्ठ श्रेष्ठ प्रेष्ठ प्रभु तूं, देतिल तुला पद भ्राते ।
'जी जी' म्हणतिल, चरणीं वाहातिल, धना यशा अदभ्रा ते ॥ ६ ॥
सेवावें शेळीचें कीं रसिकें धेनुचें रसवराज्य ।
त्वां सर्व अनुभवावें भ्रात्यांसह हें यशःप्रसव राज्य ॥ ७ ॥
सोडुनि सूतसुयोधनपक्षातें झडझडोनि बा! निघ रे ।
विघरो दायादांचें बळ मन, ढेंकुळ जसें जळीं विघरे ॥ ८ ॥
तूं आत्मासा, पंचप्राण तसे बंधु सत्य, बापा! हें ।
नांदा एकत्र, नको द्वेष करूं, मजकडेचि बा! पाहें ॥ ९ ॥
बा कर्णा! तूं अर्जुन रामजनार्दनसमान साजाल ।
हंस तसे साधूंच्या सोडूनि तुम्ही न मानसा जाल ॥ १० ॥
जेविं महाध्वरवेदीमाजिं ससुर सत्यनायक विराजे ।
तेविं विराज स्वपदीं भ्रात्यांसह, वर्णितील कवि राजे" ॥ ११ ॥
कर्ण म्हणे "सन्माता तोकीं सुख व्हावया असु खरचिती ।
किंवा, नेत्रें झांकुनि, व्हाया सुख आपणा, असुख रचिती ॥ १२ ॥
माजा घात पुरवला तुज, त्यांचामात्र घात पुरवेना ।
काय असें अघ? विटलें कां त्वन्मन मज, जसें स्वपुर वेना ॥१३॥
न म्हणेल काय माता, 'व्हावा लोकांत आत्मज न नीच' ।
रक्षील, धर्म रक्षुनि, जी ती भलतीहि आत्मजननीच ॥ १४ ॥

अरिहि न करिल असें त्वां केलें, कां नख न लाविलें जननीं ।
जन नीच मज न म्हणते, परि काय करील नियतिला जननी ॥१५॥
कृष्णें जसी यशोदा त्यजिली, तसि न त्यजीन राधा मी ।
ती यातना न नरकीं होय, कृतघ्ना न जी नरा धामीं ॥ १६ ॥
वसु जेविं वासवाच्या, माझ्या सानुज सुयोधन मनातें ।
रंजवितो, मज करिती सर्व तदाश्रित-सुयोध नमनातें ॥ १७ ॥
अर्जुनवधप्रतिज्ञा केली ती कसि दहांत सोडावी ।
तोडावी कुरुपतिची प्रीति कसी म्यां? अकीर्ति जोडावी ॥ १८ ॥
म्हणतील प्रकट सकळ लोक मज त्वन्मतानुगा 'भ्याला'।
यावें कर्पूराच्या काय मषीगर्भसाम्य गाभ्याला ॥ १९ ॥
मारीन अर्जुनासचि समरीं, धर्मादिकां न चवघां मी ।
करिच्या मर्दीं अलिस जी बहुतींहि मिळेल काय चव घामीं ॥ २० ॥
म्हणतों मीच नतजननमरण हरी, परमसुख करी नवधा ।
यद्भक्ति, तत्सख्याच्या प्रभु कवण म्हणेल 'मी करीन वधा' ॥२१॥
जा, भागलीस, कल्पद्रुमसंश्रितकाम कां न पुरतील ।
स्वस्थ रहा, पांच तुझे सुत सार्जुन कीं सकर्ण उरतील" ॥ २२ ॥
कुंती म्हणे, 'अभयवर आत्मा, आम्ही जडें असों देहें ।
बहु तुजपुढें न वदवे, यश जोडीं, स्मरण बा! असों दे हें'॥ २३ ॥
आलिंगुनि कर्णातें भिजवुनिया अश्रुनीं पृथा परते ।
चित्तीं म्हणे, 'सखे जे होती, फिरतांचि विधि, वृथा पर ते' ॥२४॥

---

उद्योगपर्वांतर्गत

## १४ भीष्मपरशुरामसंवाद.

अंबा, अंबिका व अंबालिका या काशिराजाच्या तीन मुली भीष्मानें आपल्या भावाकरितां जिंकून आणिल्या. पण पुढें त्याला असें कळलें कीं, अंबेनें शाल्वराजाला मनानें वरलेलें आहे. तेव्हां भीष्मानें तिला शाल्वाकडे जाण्याची परवानगी दिली. दुसऱ्यानें जिंकलेली असल्या-

मुळें शाल्वही मग तिला वरीना. अशा रीतीनें तिचा जन्म फुकट जातो, असें पाहून परशुराम हा—अंबेचा आजा त्याचा मित्र असल्यामुळें—तिचा तूं स्वीकार कर, असें आपल्या शिष्याला म्हणजे भीष्माला सांगण्यास आला. तेव्हां त्या दोघांत झालेला संवाद पुढें दिला आहे. ही हकीगत भीष्मच दुर्योधनाला सांगत आहे.

आर्या.

येऊनि कुरुक्षेत्रीं राहे, सांगोनि पाठवी, राजा।
धावोनि भेटलों मी वेद धनुर्वेद पाठ वीरा ज्या ॥ १ ॥
मत्कृत पूजन घेउनि राम म्हणे, ' रे ! सुरापगांगभवा।
भक्त्यर्पित बहु, नाहीं तरि काय असे दुराप गांग भवा ॥ २ ॥
गरुडें सुधा, तशी त्वां हे अंबा रण करूनि जरि हरिली।
तरि हरिलीनमतिजनें संसृतिरुचि तेविं केविं परिहरिली ' ॥ ३ ॥
वदलों, " सत्य, भ्रात्याकरितां हरिली बळें, पर स्वामी।
' वरिला शाल्व ' म्हणे हे, घेऊं जाणुनि कसें परस्वा मी " ॥ ४ ॥
राम म्हणे, ' शाल्व न घे, मानी हरि गज परें दिला न वरी।
त्वां जिंकिली यदर्थे त्वद्भ्राता तो करू इला नवरी ' ॥ ५ ॥
मी वदलों, ' जें दुष्कर सुयशस्कर सांग काज रामा ! तें।
होइल अकीर्ति, देतां कां हा उपदेशकाजरा मातें ' ॥ ६ ॥
राम म्हणे, ' त्वद्गुरु मी, माझें सुख-पुण्य-कीर्ति-जनक वच।
गुरुवचनासचि म्हणती सर्व भले पुण्यकीर्ति जन कवच ' ॥ ७ ॥
मी बोलिलों, ' असें तों न घडेल कधीं; दयानदा ! पावें।
गुरुनें, ज्यासि अधर्माचरण न माने, तया न दापावें ' ॥ ८ ॥
राम म्हणे, " होय सुखी निजगुरुचें वचन शिष्यजन करिता।
नातरि गुरुकुंभभवक्षोभें छात्रामृतांशुजनक रिता ॥ ९ ॥
हे सर्वमता साक्षाद्गुर्गासी सर्वकामदा, ज्ञात्या।
लंघील खळ महिषसा जो, न करिल भस्म कां मदाज्ञा त्या ॥ १० ॥

झाले पशुचि न वाहुनि शृंगा पुच्छा वळी मुठा राजे ।
तैसे ते न क्षितिवरि आढळले न वळले कुठारा जे ॥ ११ ॥
मज गुरुपुढें 'असें तों न घडेल कधीं' असें कसें वदसी ।
असतां समर्थ अघटितघटनापटु मत्कुठार हा सदसी ॥ १२ ॥
खचशील कौरवा! तूं, कीं बहु चढला तुझा मद सिगेला ।
लंघावया पहासी? गांवाला काय रे! मदसि गेला॥ १३ ॥
वधिले क्षितितलवर्ती क्षत्रिय म्यां एकवीसदां सारे ।
माझा प्रताप गातां रुद्रश्रम दे कवीस दासा! रे!" ॥ १४ ॥
ऐसें भलतेंचि वदे वर्णावा मुख्य जो गुरु गुरूंनीं ।
पाहे राम मजकडे, जेविं हरिकडे हरी गुरुगुरूनी ॥ १५ ॥
वदलों, "धर्मन्यायें हा देह तपोवनांत राबावा ।
त्यजुनि दुराभिमान, धरुनि शांतिसि, तारुनि जनां तरा, बावा॥१६ ॥
ठाव्या आहेत मला, सांगा गोष्टी यथेष्ट अन्या या ।
तरि भय भलत्यापासुनि होइल, जरि मी करीन अन्याया ॥ १७ ॥
वधिले क्षत्रिय तेव्हां नव्हता हा भीष्म शांतनव समज ।
देवासि मागते ते झाले मरणीं करूनि नवस, मज ॥ १८ ॥
गेलें गुरुत्व तुमचें, कां हो! म्हणतां वधीन अनघातें ।
येइल पदरांत कसें यश धर्मन्यायनिष्टजनघातें ॥ १९ ॥
सच्छिष्याला विद्या गुरु झांकायासि काय हो! सिकवी ।
पांडित्य पहा माझें, पाहोनि मला म्हणाल 'होसि कवी' " ॥ २० ॥
हांसुनि राम म्हणे, 'रे! हितकर गुरुवचन कां न आइकसी ।
साहेल तुझी तुझिया दुःसहशोकानलासि आइ कसी ॥ २१ ॥
भीष्मा! मज सिंह गणीं, वेड्या! तूं आपणासि कलभ गणीं ।
न रविपुढें मिरवेसें चंद्रींहि, कसें असेल बल भगणीं ॥ २२ ॥
देशिल सत्यवतीतें शोक बहुत, रडविशील गंगेतें ।
समज बरें मददूषित जें जें तेज क्षणांत भंगे तें ॥ २३ ॥

हो सिद्ध, ये; हरीनें व्यसु आला तो करेणु केला, हो ।
हूं! गंगेला शोकद, तोखद हें तोक रेणुकेला हो ' ॥ २४ ॥
सिंधूंत नग जसा कपि तैसा पाहोनि गर्वनग रामीं ।
वंदुनि ' येतों ' ऐसें बोलुनि आलों फिरोनि नगरा मी ॥ २५ ॥
सत्यवतीतें सांगुनि नमुनि तदाशीःप्रसाद घेऊन ।
हा गुरुचें दर्शन घे, हेमंतीं जेविं अधन घे ऊन ॥ २६ ॥
आम्हां गुरुशिष्यांचा अत्यंताद्भुत पहावया समर ।
आले बहु सुरराजब्रह्मर्षिसमेत सर्वही अमर ॥ २७ ॥

---

भीष्मपर्वांतर्गत

## १५ भीष्मकर्णसंवाद.

भीष्म व कर्ण यांचें कधीं पटत नसे. पावलोपावलीं त्यांचा खटका उडे. भीष्म जिथें तिथे कर्णाचा अगदीं पाणउतारा करी. युद्धाला आरंभ होण्यापूर्वी दोघांचें इतकें निकराचें वाग्युद्ध झालें कीं, भीष्म जोंपर्यंत समरांगणीं आहे, तोंपर्यंत मी रणभूमीवर पाऊलही टाकणार नाहीं, अशी कर्णानें प्रतिज्ञा केली. भीष्म शरपंजरीं पडला, तेव्हां कर्ण त्याला भेटण्यास गेला. त्या वेळीं दोघांत झालेला संवाद येथें दिला आहे.

आर्या.

त्याउपरि किंचिदागतभय कर्ण हळूचि जवळ ये, राहे ।
पाहुनि मनीं म्हणे, ' शर कवणा करितिल न कवळ येरा हे ' ॥ १ ॥
तो शरतल्पगत प्रभु गमला गुह शरवणीं जसा पडला ।
रडला कर्ण महात्मा, शोकासि कधींच जो न सांपडला ॥ २ ॥
कर्ण म्हणे, ' अजि देवव्रत ! निजलां काय हो ! विशिखशयनीं ।
तो हा, तुमच्या खुपतो कण होउनि सर्वकाळ जो नयनीं ' ॥ ३ ॥
नेत्रें उघडुनि, रक्षक दवडुनि, एकान्त करुनि, हातातें ।
कंठीं घालुनि, केला पुत्रादर लोभ धरुनि, हा तातें ॥ ४ ॥

पुत्रास जसा प्रेमें अनिमिष चंद्राहिपरिस बा पाहे।
एक भुज गळां घालुनि भीष्म वदे, "बोल परिस बापा! हे ॥ ५ ॥
ये ये मजसीं स्पर्धा करिता तूं विप्रतीप मोटा कीं।
आलासि, धन्य होसिल, म्यां त्यजिला द्वेष, तूंहि तो टाकीं ॥ ६ ॥
जरि काय मजकडे तूं आजि न येतास, समय चुकतास।
कर्णा! कल्याणाला केवळ कविमत असोनि मुकतास ॥ ७ ॥
न तुझ्या ठायीं माझा द्वेष, खरें हें मनांत आणावें।
वदलों सभेंत निष्ठुर तें तेजोवधनिमित्त जाणावें ॥ ८ ॥
कारितात निमित्तास्तव लोक तिरस्कार जेविं अनयांचा।
कारिसि अधिक्षेप तसा नसतांहि निमित्त पांडुतनयांचा ॥ ९ ॥
संस्कारधर्मलोपें दुष्टजनसमागमें उडे शुद्धी।
मग गुणवंतांचीही सदधिक्षेपीं प्रवर्तती बुद्धी ॥ १० ॥
हितरतगुरुमन, पाहुनि गतसद्वृत्ता मुलास, कळकळतें।
गुरुकोप भाव्यशिवपरिहारार्थचि, हें तुला सकळ कळतें ॥ ११ ॥
धरणीवरि समरीं अरिजनदुःसह मज तुझें सुधनु ठावें।
संध्यार्थही म्हणति तुज सोडुनि निर्लोभही बुध लुठावें ॥ १२ ॥
ब्रह्मण्यतागुणें तुज कर्णा! श्रीकृष्ण नित्य मानवतो।
शौर्यगुणें जिष्णुहि, मग काय इतर मागधादि मानव तो ॥ १३ ॥
बा! तूंचि एक दाता, झाले, होतील अन्य बहु दाते।
परिसुनि तव यश, जोडुनि कर, म्हणतिल तुजचि 'धन्य' बहुदा ते
अस्त्रबळीं शस्त्रबळीं संधानीं लाघवीं वृषाकपिसा।
एकांग वीर तूं परबळसिंधुविलंघनीं वृषा! कपिसा ॥ १५ ॥
काशिपुराप्रति जाउनि एकें त्वां शस्त्रवर्ष सोडून।
मोडून शत्रु, कन्यारत्न दिलें कुरुपतीस जोडून ॥ १६ ॥
दिग्विजयाची केली सत्या त्वां वीरकुंजरा! संधा।
आलें गुणें उणेपण रणरंगीं तुजपुढें जरासंधा ॥ १७ ॥

सर्वमनुष्याधिक तूं तेजोबळराशि दिविषदर्भकसा ।
होइल तृणांत तृणसम यज्ञविहित तज्ञमहित दर्भ कसा ॥ १८ ॥
आम्हीं कोप त्यजिला, दैव बहु प्रबळ, पुरुषबळ अल्प ।
नाहीं तरि आम्हांला हें व्हावें प्राप्त काय शरतल्प ॥ १९ ॥
मत्प्रिय इच्छिसि जरि तरि पार्थांसीं, नमुनि त्या अजा, मिळ रे ।
करिल दया, या नारायणनामें तारिला अजामिळ, रे ॥ २० ॥
हा कलह मदंत असो, तूं काळमुखीं न हें कटक टाकीं ।
बा ! शतकोटि अवीरा म्हणतिल, 'बत ! हंत ! हा ! कटकटा !' कीं ”
कर्ण म्हणे, 'सत्य तुझें भाषण हें भरतनायका ! सारें ।
म्यां तुज अमृताब्धिपुढें मिरवावें स्वयश काय कासारें ॥ २२ ॥
जाणें, राधेय नव्हें, कौंतेयचि मी असें, असें नातें ।
कुंतीमनीं असावें जें पुत्रप्रेम बा ! असेना तें ॥ २३ ॥
सांगा, त्याग उचित कीं माझा कुंतीस उचित अत्याग ।
मज उपजतांचि मळवत्त्यजिलें याहूनि काय अत्याग ॥ २४ ॥
टाकूं कैसि प्रभुजी ! प्राशुनिया सर्व थान, राधा मी ।
स्थिति होय कृतघ्नत्वें नरकांच्या सर्वथा नरा धामीं ॥ २५ ॥
भोगुनि ऐश्वर्य कसें समयीं दुर्योधनासि सोडावें ।
मोडावें म्यां स्वकृतज्ञत्व, कृतघ्नत्व केविं जोडावें ॥ २६ ॥
जैसा धनंजयाचा परमदृढव्रत सहाय यदुप कृती ।
तैसा कुरुपतिचा मी कीं बहु राज्यार्पणादि यदुपकृती ॥ २७ ॥
दुर्योधनार्थ यापरि सधनतनयदार सोडिला काय ।
आनृण्य न जोडावें तरि आम्हीं अर्थ जोडिला काय ॥ २८ ॥
व्हावें शस्त्रेंचि रणीं वीरांचें गलित, न वपु रोगानें ।
सकळां मर्त्यजनांतें सुख द्यावें नित्य नव पुरोगानें ॥ २९ ॥
क्षत्रियशरीर जें जें पात्र सुशस्त्रा न आमयातें हो ।
हा पक्क विचार; तुम्ही म्हणतां कां व्यर्थ आप्त यातें हो ॥ ३० ॥

दुर्योधनाश्रयें ग्यां कोपविले पार्थयोध याकरितां ।
हा समरांत मरों द्या क्षत्रियजन, काय बोध या करितां ॥ ३१ ॥

बा ! सर्वत्रक्षयसूचक उत्पात बहुत होतात ।
सकळ मरोत रणीं, सुत किंवा शोकांत न हुत हो तात ॥ ३२ ॥

अच्युत-पांडव सकळां मर्त्यांस अजेय हेंहि या कळतें ।
परि योग्यवीरसमरक्रीडोत्सुकचित्त काय आकळतें ॥ ३३ ॥

जिंकिल चवघांस सुखें हा कर्ण, असाध्य पांचवा यास ।
सारथि होउनि जपतो जगदीश्वर त्यास वांचवायास ॥ ३४ ॥

शक्रासहि प्रतापें मदिषूंचा दापिता महानिकर ।
त्यावरि कीं तदिषूंचा मजवरि करु बा ! पितामहा ! निकर ॥ ३५ ॥

बहु कटु तुम्हांसि वदलों, कीं नुरवी शांति परमनीं चपळ ।
प्रभुजी ! क्षमा न करितां तरि हा नुरताचि परम नीच पळ ॥ ३६ ॥

युष्मदनुमोदनानें धरिल मदुत्साहशक्ति पुष्कलता ।
दग्धलता अमृतघनें फळती, न फळेल काय शुष्कलता ॥ ३७ ॥

माझें दुरुक्त तुमच्या चित्तीं नाहींच राहिलें कांहीं ।
परि चुकतां विनवावें ताता करुणाकराहि लेंकांहीं ' ॥ ३८ ॥

भीष्म म्हणे, ' कर्णा ! हे मति हो तुज सर्वकामदा ज्ञात्या ।
आपण अनुसरलों ज्या कर्मा होइल न कां मदाज्ञा त्या ॥ ३९ ॥

जा, सद्‌वृत्त न सांडुनि युद्ध करीं त्यजुनि गर्वभयशोक ।
हो कठिन, प्राप्त तुला होतील क्षत्रधर्मजित लोक ॥ ४० ॥

प्रशमीं प्रयत्न केला परि माझेंही न चाललें कांहीं ।
हे काढिली नवी धृतराष्ट्राच्या हीन चालि लेंकांहीं ॥ ४१ ॥

जा, परि पळ पाहूं दे वदन, करीं पूर्ण काम हा, भागें ।
ठाक पुढेंचि; धरावी इतुकी त्वां भीड कां महाभागें ' ॥ ४२ ॥

या भीष्मप्रभुवचनें आवरला रविसुतासि न गहिंवर ।
प्रेमभराचि विकळ करी धीरा, न तसा पडोनि नगहि वर ॥ ४३ ॥

वंदुनि आज्ञा घेतां, आणी कर्णासि हुंडका नातें ।
सुच्छात्रासि सुगुरुचें जैसें लागोनि तुंड कानातें ॥ ४४ ॥
निघतां प्रदक्षिणा त्या परमोदारा करूनि तो रडला ।
रामघन वनीं त्यजितां जेवि बहु भरतमयूर ओरडला ॥ ४५ ॥

---

कर्णपर्वांतर्गत

## १६ हंसकाकीयाख्यान.

मद्र देशाचा राजा शल्य हा युद्धांत पांडवांना मदत करण्याकरितां ससैन्य येत असतां दुर्योधनानें त्याला युक्तीनें फसवून आपल्या बाजूला आणलें. शल्य हा सारथ्यकर्मांत फार निपुण होता. पुढें अर्जुनवधाची प्रतिज्ञा करून कर्ण जेव्हां युद्धाला निघाला, तेव्हां दुर्योधनाच्या आग्रहाच्या विनंतीवरून त्यानें कर्णाचें सारथ्य पतकरलें; पण मी जें बोलेन त्याचा राग कर्णानें धरूं नये, अशी अट त्यानें घातली. ती कर्णानें मान्य केली. पुढें तो जेव्हां फारच टोंचून बोलून त्याचा तेजोभंग करूं लागला, तेव्हां कर्ण त्याला मारण्यास तयार झाला; तेव्हां न भितां शल्यानें कर्णाला हंस व कावळा यांची एक बोधपर गोष्ट सांगितली. तीच या आख्यानांत दिली आहे.

पूर्वीं सागरतीरीं साधुनृपाच्या पुरांत एक धनी ।
सन्मान्य वैश्य होता, नांदे ज्याच्या स्वधर्मनीति मनीं ॥ १ ॥
त्या धनिका वैश्याचे होते बहु पुत्र-पौत्र गुणवंत ।
त्यांतें आशीर्वादें गौरविती सर्वदा सदय संत ॥ २ ॥
त्या वैश्यकुमारांचें भक्षी उच्छिष्ट एक काक सदा ।
बाळक उदारमति ते न वदति वाणी कदापि साध्वसदा ॥ ३ ॥
देती वैश्यकुमारक मांसौदन सेवया वडे मांडे ।
मधु घृत पायस वायस खाय सदा, पक्षिपांसवें भांडे ॥ ४ ॥

सागरतीरीं तेथें आले दैवें कदाचित मराळ ।
जे मुक्ताफळ-भोजन करिती, बिसतंतु भक्षुनि फराळ ॥ ५ ॥
पाहुनि हंसांतें ते बाळ स्वोच्छिष्टपिंडपुष्टातें ।
म्हणति, 'तूंचि विहंगा! सर्वखगश्रेष्ठ' त्या सुदुष्टातें ॥ ६ ॥
करिति प्रतारणा असि काकाची अल्पबुद्धि ते बाळ ।
तों तों फुगे, कुगेहद्वारीं मूत्रेंहि जेविं जंबाळ ॥ ७ ॥
गर्वें मूर्खपणें तो मानी बाळोक्त सर्व साचार ।
अधिकचि माजे स्तवनें, न विचार करी मलीमसाचार ॥ ८ ॥
गेला उडोनि गगनीं मग नीच सगर्व काक तो त्यांत ।
साधूंत खळ जसा कीं, काचमणी परमशुद्ध मोत्यांत ॥ ९ ॥
जाणे त्या हंसांत श्रेष्ठ जया त्यासि तो म्हणे काक ।
'दोघे उडों, तुझें बळ पाहों दे, मत्समीप ये ठाक' ॥ १० ॥
ऐसें वायस वदतां हांसति ते हंस त्या खगापसदा ।
कीं, शुद्धासीं मत्सर मूर्ख करी, ज्यांत ताप-पाप सदा ॥ ११ ॥
म्हणती हंस तयातें, 'गर्वभरें कारिसि वायसा! चार ।
आम्ही मानसवासी, सर्व खगांचेहि राय साचार ॥ १२ ॥
आम्ही सुदूरपाती हंस खगांमाजिं पूज्य खगनीचा ।
क्षीराधितीरविहारी, जलकेलि करूं नदींत गगनींच्या ॥ १३ ॥
करिसी बरोबरी तूं हंसाची काय? वायसापसदा ।
करितो घात तुझा मद; मारीलचि जो गृहांत साप सदा ॥ १४ ॥
रे बळिपुष्टा! दुष्टा! कैसा हंसांसमेत उडशील ।
साहस करितां सहसा स्पष्ट व्यसनार्णवांत बुडशील' ॥ १५ ॥
वायस बहु हंसांच्या हितवचनाची करूनि कुत्सा, हें ।
वदता झाला त्यांसीं पुनरपि तो गर्वराशि उत्साहें ॥ १६ ॥
'शतपात जाणतों मी, उडेन एकैक पात शतगांवें ।
मजसीं उडतां अन्या खगमांचें पक्षवीर्य न तगावें ॥ १७ ॥

उड्डीन एक, दुसरें अवडीन, तिजें प्रडीन, संडीन ।
इत्यादि पात शत मी दावूनि विपक्षगर्व खंडीन ॥ १८ ॥
गति शत दावीन तुम्हां, तेव्हां माझें कळेल बळ साचें ।
निवडे निकटचि; वर्णें दूर समचि पद्म पुष्प पळसाचें ॥ १९ ॥
गगनीं तुम्हांत एका भलत्यासीं मी उडेन हो! खगती ।
सांगावी जी माने; किंवा म्यां दाविजे शत स्वगती ' ॥ २० ॥
हांसोनि एक हंस ध्वांक्षासि म्हणे, ' तुझ्या गती शतशा ।
आम्ही हंस समस्तहि एकचि गति जाणतों, दुजा न तशा ॥ २१ ॥
जाणें एका गतिला, त्याचि गतीनें उडेन आकाशीं ।
माने तीनें उड तूं.' बोले ऐसें मराळ काकाशीं ॥ २२ ॥
तों बहु हांसति जे कीं आले होते मिळोनि तज्ज्ञाती ।
शतविधगतिहुनि अधिका, परि तुच्छा भासली अतज्ञां ती ॥ २३ ॥
' शतपातपंडिताशीं या अस्मन्मित्रबंधुकाकाशीं ।
हा एकपातमात्रज्ञाता कैसा उडेल आकाशीं ॥ २४ ॥
एका पातांतचि या हंसाला हा स्वबंधु हारवितो ' ।
ऐसें हांसति वायसखद्योत, परी करि क्षमा रवि तो ॥ २५ ॥
हंस उडे तों त्याशीं स्पर्धेनें कावळा उडे व्योमीं ।
शतपात पातंकालय दावी, सांगों प्रकार किति तो मी ॥ २६ ॥
उड्डीनप्रमुखें जीं होतीं शतसंख्य ठाउकीं पतितें ।
तीं सारीं दाखविलीं हंसप्रवरापुढेंचि त्या पतितें ॥ २७ ॥
स्वज्ञातिश्रेष्ठाचें गतितांडव पाहतांचि काकांनीं ।
हर्षभरें नभ भरिलें ' का का का का ' अशा स्वहाकांनीं ॥ २८ ॥
अप्रिय बोलति पुष्कळ, हांसति बहु हेळसोनि हंसातें ।
अवमानिती, अमंगळ खळ ते खगकुळशिरोवतंसातें ॥ २९ ॥
मृदुपातें हंस उडे, काकाहुनि हीनशक्तिसा भासे ।
ऐसें मुहुर्तभरि तो दावी, तों काकमंडळी हांसे ॥ ३० ॥

हंसांसि काक म्हणती, 'हां! हारविलाचि कीं भवज्ञाती।'
आयाकिली दूरुनि त्या सर्वमरालोत्तमें अवज्ञा ती ॥ ३१ ॥
मग पश्चिमदिग्देशीं शीघ्र शिरे, हंस काकही मळधी।
जिकडे होता करुणा! गंभीर अपार, खालता, जळधी ॥ ३२ ॥
मागें धावे वायस, हंस पुढें, सोडिला जसा तीर।
स्पर्धेंत काक नेणे कीं केवळ दूर राहिलें तीर ॥ ३३ ॥
पक्षांचें बळ सरलें, गर्व मनींचा मनांतचि जिराला।
घे धाक काक, सागर सर्वत्र दिसे, निराश्रय, विराला ॥ ३४ ॥
न दिसे अग नग, मग तग गगनीं खग नीच काय काढील।
चित्तीं म्हणे, 'समय हा मज काळाच्या मुखांत वाढील' ॥ ३५ ॥
जाऊनि दूर आला किंवा नाहीं असें, फिरे, पाहे।
राहे, न करि उपेक्षा, हंस खळाचीहि काळजी वाहे ॥ ३६ ॥
आला हंसापाशीं प्रतिक्षणक्षीणशक्ति करटपती।
आतां पडेल ऐसें जाणुनि ज्या खावया मकर टपती ॥ ३७ ॥
अवलोकिला मरालें अत्यंतासन्नपतन पामर तो।
मग आणिलें मनीं कीं, 'यावरि म्यां न करितां कृपा, मरतो ॥ ३८ ॥
रक्षावाचि, उपेक्षा व्यसनीं अरिचीहि न करिती संत।
पाहों नयेचि आंगीं बळ असतां दीनजंतुचा अंत' ॥ ३९ ॥
ऐसें सत्पुरुषव्रत आठविलें, मग म्हणे मराळ, 'अगा।
बहुगतिचतुरा! पतितें शत कथिलीं त्वां स्वयेंचि, काकखगा ॥४०॥
परि जें निजगुह्यपतित आम्हांसि न सांगसीच कां गा! तें।
झालें सख्य परस्पर, दूर उडालों नभांत सांगातें ॥ ४१ ॥
तुंडाग्रें पक्षयुगें शिवसी काका! क्षणक्षण जळाला।
या गतिचें नाम कथीं, दे टाकुनि सर्व संशय-मळाला ॥ ४२ ॥
वद काय नाम काका! या पाताचें? शतीं असे हा कीं।
त्याहूनि वेगळाचि स्पष्ट कथीं, मौन एकदा टाकीं ॥ ४३ ॥

ये ये झडकरि, हा मी हंस तुझी वाट पाहतों करटा ।
या लक्षयोजनांबुधिपरतीरीं आमुचा असे घरटा' ॥ ४४ ॥
नेत्रीं नाकीं कानीं क्षारोदक, पक्ष जाहले ओले ।
केवळ विव्हळ दुर्बळ तो खळ आर्तस्वरें असें बोले ॥ ४५ ॥
"का का शब्द करूनि भ्रमती, त्यांच्या कुळांत मी झालों ।
प्राणोपायन घेउनि तो आतां शरण मी तुला आलों ॥ ४६ ॥
ने मज सागरतीरीं हंसा! दे प्राणदान दीनातें ।
उडतां व्याकुळ झालों, भ्यालों या दुस्तरा नदीनातें" ॥ ४७ ॥
ऐसें वदतां पडला सिंधुजळीं काक धाक पावोनी ।
त्याच्यासमीप गेला सदयजनोत्तंस हंस धावोनी ॥ ४८ ॥
हंस म्हणे, "रे काका! सांगत होतासि 'पात शत जाणें' ।
आत्मश्लाघा ज्यांत, स्मर तें ज्ञातिप्रमोदकर गाणें ॥ ४९ ॥
मजहूनि अधिक तूं कीं! इतुक्यांतचि भागलासि? सांग मला ।
शतपातपंडिता! तुज हा श्रम अल्पा पथींच कां गमला ॥ ५० ॥
कीं पर्व अपूर्व असे, जें परमोदार द्यावया सुख गा ।
म्हणवुनि मज्जन करिसी? वद, झाले कर्ण हे पिपासु खगा" ॥५१॥
काक म्हणे, 'मी भक्षुनि उच्छिष्टें फार मातलों बा! गा ।
कीं आपणासि मानीं गरुडचि हंसोत्तमा! महाभागा ॥ ५२ ॥
म्यां काक अन्य खगही पुष्कळ अवमानिले अदभ्र मदें ।
ऐकविलीं बा! तुजही दुर्वाक्यें सज्जनश्रुतिश्रमदें ॥ ५३ ॥
केली तुजशीं स्पर्धा, तत्फळ हें व्यसन पावलों सद्य ।
शरणागतासि रक्षीं, हो कीर्ति तुझी जनांत अनवद्या ॥ ५४ ॥
हो बेट, भेट, हंसा! अससी तूं दक्ष रक्षणीं आंगें ।
पाळिति संत व्यसनीं दीन मुकें बधिर आंधळें पांगें ॥ ५५ ॥
सदया! निजदेशाप्रति जरि मज नेसील तरि विभो! मग मी ।
शलभींहि नम्र होइन, बा! सांगों काय मदधिकीं खगमीं' ॥ ५६ ॥

ऐसें वदे, रडे बहु, खाय गटकळ्या जळांत, करि का का ।
धावे मराळ, चरणीं कवळुनि काढी क्षणांत वारि काका ॥ ५७ ॥
वाहे त्या दीनातें पृष्ठीं तो ब्रह्मवाहनहि हंस ।
घेउनि गेला सागरतीरातें सर्वसज्जनवतंस ॥ ५८ ॥
हंस यथागत गेला दाउनि माहात्म्य साधुसंगाचें ।
स्थापुनि पूर्वस्थानीं, आश्वासन करुनि त्या विहंगाचें ॥ ५९ ॥
काक मराळद्वेषें होतां बळसर्वगर्वहानि, वळे ।
कर्णा! असा असाधु, त्यजुनि श्रमदा दुराग्रहा, निवळे ॥ ६० ॥
जैसे ते वैश्यात्मज उच्छिष्टें करिति पुष्ट बलिपुष्टा ।
तैसेचि धार्तराष्ट्र स्वोच्छिष्टें पोषिताति तुज दुष्टा ॥ ६१ ॥
स्वसमातें अधिकातें अवमानी दुष्ट काक तूंहि तसा ।
तो बहुमत वैश्यसुतां, धृतराष्ट्राच्या सुतासि तूं हितसा ॥ ६२ ॥
भीष्म द्रोण द्रौणि कृप नृप होते सहाय तुज सारे ।
उत्तरगोग्रहणीं, त्वां न निवटिला तो धनंजय कसा रे ॥ ६३ ॥
पार्थें भ्राता वधितां कुरुवीरांदेखतां पळालासी ।
त्याहि महाद्वैतवनीं गंधर्वभयें कसा गळालासी ॥ ६४ ॥
गंधर्व चित्रसेनप्रमुख रणीं जिंकिलेचि सितवाहें ।
बद्ध सदार सुयोधन सोडविला; विसरलासि कितवा! हें ॥ ६५ ॥
सकळां भूतांहूनि ब्राह्मणसा, पार्थ तुजहुनी अधिक ।
तो सिंधु, तूं सरोवर; सामर्थ्य तुझें प्रसिद्ध सावधिक ॥ ६६ ॥
आतांचि सूतपुत्रा! येईल प्रत्ययासि वाचाळा ।
वेडावेलचि रसना. न करी सिंहापुढें शिवा चाळा ॥ ६७ ॥
व्यसनीं वायस वांचे जैसा जातां मराळपा शरण ।
जा तूंही; न तव गळां घालु यमाचा कराल पाश रण ॥ ६८ ॥
तव दर्प, सर्पसम शर हाणोनि उरीं, हरील जिष्णु रणीं ।
तें उमजशील; न उरे व्याघ्ररवें वीर्यलेशही उरणीं ॥ ६९ ॥

मराठी
३७ ब, नारायण

लोकप्रसिद्ध सन्मत तेजस्वी कृष्ण चंद्रसूर्य तसे।
खद्योत प्राकृत तूं; ते त्वत्तेजांत लोपतील कसे ॥ ७० ॥
नरसिंह केशवार्जुन; जरि मिळतिल तुजसमान कोटि ससे।
त्यांचा नसे पराभव; गरुडासि सदर्प सर्प काय डसे ॥ ७१ ॥
ऐसें जाणोनि वृषा! आटोपीं परम चंचळा जिभली।
कर्णा! सावध सावध सावध! रे! गति नसेचि आजि भली" ७२

---

कर्णपर्वांतर्गत

## १७ अर्जुनप्रबोध.

कौरवपांडवांचें युद्ध चालू असतां पराभवामुळें खिन्न होऊन एकदां धर्म शिबिरांत बसला होता. तेव्हां भीमाच्या आग्रहावरून अर्जुन व श्रीकृष्ण हे युद्ध सोडून त्याच्या भेटीस आले. अर्जुन प्रतिज्ञेप्रमाणें कर्णाला मारून आला, असें समजून धर्मानें प्रथम त्याचें अभिनंदन केलें; पण कर्ण अद्याप आहे, हें समजतांच त्यानें अर्जुनाची निर्भर्त्सना केली. "तुझ्यानें पराक्रम होत नाहीं, तर आपलें गांडीव धनुष्य दुसऱ्याला देऊन टाक," असेंही तो म्हणाला. असे शब्द जो उच्चारील त्याला तत्काल मारण्याची अर्जुनाची प्रतिज्ञा होती. तीप्रमाणें धर्माला मारण्याकरितां त्यानें तरवार उपसली. त्या वेळीं श्रीकृष्णानें त्याला जो व्यावहारिक बोध केला, तो खालील उताऱ्यांत आहे.

आर्या.

ऐसीं वचनें वमला धर्म, पयोनिधि जसीं विषें असितें।
तेव्हां त्यासि वधाया क्षुब्धमना श्वेतवाह घे असितें ॥ १ ॥
झाला क्रुद्ध धनंजय, 'मारीन' म्हणे मनीं, न लेश वदे।
तें समजे स्वाश्रितजनतारक, भलतें घडों न, केशव, दे ॥ २ ॥
कृष्ण म्हणे, 'पार्था हें काय? करीं घेतला कशास असी।
योद्धव्य मी न पाहें; दिसती तव दृष्टि कां नवीच असी ॥ ३ ॥

ज्यांवरि असि उचलावा, जे तापाचे महाउरग दाते ।
भीमाची समरसखी त्यांचे फोडित असे उर गदा ते ॥ ४ ॥
बहु दूर युद्धचत्वर, तेथें ते धार्तराष्ट्र बा ! पाहें ।
आलासि नृप पहाया; हा राजा; शिबिर होय बापा ! हें ॥ ५ ॥
कुशली विलोकिला नृप, हर्षाचा समय, यांत हें काय ।
नसतां वध्य, कशाला असि ? हा आम्हांपुढें असे राय ॥ ६ ॥
श्वेताश्वा ! तूं कोणावरि करणार प्रहार ? काशाला ।
नग्न करिसि असिला ? वद, उपसावा खड्ग शत्रुनाशाला ॥ ७ ॥
भ्रमलासि काय वेड्या ? गुरुसुत केंव्हांचि पळविला बा ! तां ।
शिबिरा आर्य पहाया आला आहेसि पांडवा ! आतां ' ॥ ८ ॥
अर्जुन म्हणे, " मुकुंदा ! न भ्रमलों, सावधानचित्त असें ।
असिधारणप्रयोजन पुससी, तरि तें असे मनांत असें ॥ ९ ॥
जो ' गांडीवशरासन दे अन्याकारणें ' म्हणेल मला ।
मारावाचि, असो तो प्रिय, अप्रिय, सुज्ञ, मूर्ख, दुष्ट, भला ॥ १० ॥
माझें गुप्त व्रत हें गांडीवप्राप्तिपासुनी आहे ।
राजा तसेंचि वदला; सत्यच्युतिला न दास हा साहे ॥ ११ ॥
यास्तव मी धर्मशिरच्छेद करीन, स्वसत्य रक्षीन ।
संरक्षितां प्रतिज्ञा दुर्गतिदुष्कीर्तिला न लक्षीन ॥ १२ ॥
म्हणती बुध, ' प्रतिज्ञावचन करावेंचि जतन. नर कां तें ।
स्वहित न करितिल ? जावें कां हो ! पावोनि पतन नरकांतें ' ॥ १३ ॥
मज तों संमत ऐसें; तुज कैसें यांत वाटतें विहित ।
धर्मज्ञा ! तूंचि करीं, अंधा दावूनि वाट, तेविं हित " ॥ १४ ॥
' शिव ! शिव ! हर ! हर ! ' ऐसें बोलोनि प्रभु म्हणे तयासि " कवी ।
नाहीं उपासिले त्वां, धर्माचें तत्त्व यद्दया सिकवी ॥ १५ ॥
हें आतांचि समजलें तुज वृद्धोपासना नसे घडली ।
तरिच तव विचारनयनहीना मति या भ्रमावटीं पडली ॥ १६ ॥

धर्मज्ञ पुरुष न असें करिल, जसें करिसि जाल्मलीला हे ।
न लघु सुगुण; न गुरु अगुण; तुळसीची सरि न शाल्मली लाहे ॥१७॥
'सत्यचि धर्म' म्हणसि; तत्त्यागीं भीसीहि तूं; परंतु भला ।
पंडित न गमसि जरि बहु पांडित्यहि करिसि; दिससि बाळ मला ॥१८॥
धर्मविनिश्चय नेणे, जो करि भलतेंचि, अधम तो वेड्या ।
अविवेकें दृढ बांधिति, तुटति विवेकें दृढ क्रिया-बेड्या ॥ १९ ॥
सत्यानृततत्त्वाचे जे ज्ञाते तेचि सर्व-धर्मज्ञ ।
निजनिश्चय कथिति जया होय जनीं तोचि कर्ममर्मज्ञ ॥ २० ॥
कार्याकार्यांचा तो निश्चय पार्था! असे महागूढ।
नेणसि. असाचि मोहे जन कार्याकार्यनिश्चयीं मूढ ॥ २१ ॥
गुरुला शरण न जातां, अध्ययनश्रम न भोगितां, शास्त्र।
कैंचें? कार्याकार्यज्ञाना शास्त्राविना नव्हे पात्र ॥ २२ ॥
तें शास्त्र तुज न ठावें, रक्षाया इच्छितोसि धर्मातें।
कर्मातें करिसि अशा जेणें होतोसि पद अधर्मातें॥ २३ ॥
प्राणिवध अधर्म असें न कळे तुज धार्मिका कसें? न तरे।
येणें जन. गुरुधर्म प्राण्यवधचि, हेंचि आमुचें मत रे ॥ २४ ॥
अनृतहि वचन वदावें, परि कोणासहि कधींहि न वधावें ।
सरस अहिंसा, न सुधा; एकहि सेवुनि तिचाचि लव धावें ॥ २५ ॥
ऐसें असतां भ्राता, तोहि स्वज्येष्ठ, त्यांतही राजा ।
तत्रापि धर्मकोविद, बहु मानी ज्यासि शांतनव आजा॥ २६ ॥
पांडुसमातें त्यातें धर्मज्ञा! मारितोसि पामरसा।
रोदन करील येणें विसरविला आठवूनि राम रसा ॥ २७ ॥
जो युद्धपराङ्मुख, जो शत्रु नव्हे, जो कृतांजळी, भ्याला ।
पळतो, प्रमत्त, शरणागतही जो, न वधिती भले त्याला॥ २८ ॥
तें सर्वहि कीं या तव गुरुच्या ठायीं पहा, पहा नीट।
वीट न ये पापाचा; मारूं म्हणसी, असा कसा धीट ॥ २९ ॥

ऐसें व्रत जें केलें तें बाळपणेंचि न प्रबुद्धपणें ।
शुद्ध पणें लोकद्वय जिंकिति धीर, न अशा अशुद्ध पणें ॥ ३० ॥
धर्माची गति सूक्ष्मा, केवळ तूं स्थूळदृष्टि मुग्धा ! तें ।
व्रत रक्ष्य ! वध्य हा गुरु ! फुंकिसि तक्र त्यजूनि दुग्धातें ॥ ३१ ॥
मी येथें नसतों तरि, गुरुला वधितासि कीं, अहा देवा ।
न बुडों दिला स्वदास व्यसनीं त्वांचि प्रभो ! महादेवा ॥ ३२ ॥
धर्मरहस्य तुला मी देतों; हो भवगद प्रशांत; नवें ।
न, प्राचीन, रसायनसें जें द्यावें स्वयेंचि शांतनवें ॥ ३३ ॥
कीं धर्मज्ञप्रवरें धर्में, कीं पंडितोत्तमें विदुरें ।
तुज पढवावीं तत्त्वें धर्माचीं मोहभूमिभृद्भिदुरें ॥ ३४ ॥
तुज अथवा त्या आत्याबाईनें कळवळोनि जेविं हित ।
सांगावें, भावें त्या कथितों ऐकावयासि जें विहित ॥ ३५ ॥
जो सत्याचा वक्ता साधुचि तो, यांत संशयचि नाहीं ।
बहु पूज्य सत्यवादी त्रिजगीं उपमान त्या नसे कांहीं ॥ ३६ ॥
परि जें कीं सत्य असे केवळ दुर्ज्ञेय दीर्घबाहो ! तें ।
कोठें सत्यचि परमाधर्म फळाकारणेंचि बा ! होतें ॥ ३७ ॥
वदतां सत्य अधर्मचि घडतो, वदतां असत्य धर्म घडे ।
आजन्म सत्यवादी त्याहि सुपुरुषा असा प्रसंग पडे ॥ ३८ ॥
नित्य अशुचि अनृत तरी, समयविशेषीं सुधीसि तें होय ।
धर्मार्थ सेव्य, जैसें पर्वीच क्षारसिंधुचें तोय ॥ ३९ ॥
जोडे धर्म बरा तरि अनृतहि बोलोनि धर्म जोडावा ।
जोडे अधर्म सत्यें तरि सत्याचाहि संग सोडावा ॥ ४० ॥
सत्यानृततत्त्वज्ञचि धर्मज्ञ; तदन्य मूढ फारचि तो ।
धर्मरहस्य न जाणे, कर्मभर शिरीं कशास बा ! रचितो ॥ ४१ ॥
जातीनें अधम असो, घातकहि असो, असो महाघोर ।
जो काय कृतप्रज्ञ प्राज्ञमतें पुरुष तो जगीं थोर ॥ ४२ ॥

धर्माची अतिसूक्ष्मा गति, सू क्ष्माकुक्षिमाजिं तसि आहे ।
लाहे गुरुप्रसादज्ञानांजन जो सुदृष्टि तो पाहे ॥ ४३ ॥
म्हणुनि उपासावे जे शांत सदय तत्त्वबोधचंचु कवी ।
तेचि ज्ञानप्रसवीं क्षम; सर्पातें न सर्पकंचुक वी ॥ ४४ ॥
न विचारितां तराया जो घालील स्वयेंचि नर कास ।
तो धर्मरतहि, तत्त्व न कळतां जाईल उग्र नरकास ॥ ४५ ॥
सद्धर्मबोध विनता सच्छिष्या, सिद्धरस जसा कथिला ।
कीं लोहा स्पर्शमणी, होय जसा तो गुरुत्तमें कथिला ॥ ४६ ॥
धर्मी अधर्महि असे, धर्म अधर्मींहि; म्हणुनि सत्तर्क ।
श्रुति अनुमानहि पार्था! धर्महृदयपद्मबोधकर अर्क ॥ ४७ ॥
जीवांचा प्रभव जया कर्मे तें कर्म धर्म बा ! समज ।
तो धर्म जी अहिंसा; हेंचि कळे तत्त्व केशवास मज ॥ ४८ ॥
जे हिंसक उग्र, तयां धर्म अहिंसाचि मुख्य कथिलाहे ।
कोणीहि असो प्राणी, पुष्कळ कल्याण याचि पथिं लाहे ॥ ४९ ॥
करितो धारण यास्तव 'धर्म' म्हणावें, प्रजांसि जो धरितो ।
धारणसंयुक्त असा धर्म स्वोपासकांसि उद्धरितो ॥ ५० ॥
'धर्माच्या संदेहीं निर्णायक वेदशब्दही नाहीं ।
तेवींच लौकिकींही युक्ति पहातां असेचि ना कांहीं ॥ ५१ ॥
तेथें काय करावें ?' म्हणसी तरि ऐक सांगतों मित्रा ।
धर्माची बहु सूक्ष्मा गति आहे आणखी महाचित्रा ॥ ५२ ॥
व्रत घेउनि कर्म विहित न करी तो स्वीकृतव्रतफळाला ।
पावेनाचि कधींही; दांभिक फटकाळ केवळ जळाला ॥ ५३ ॥
मरणीं, विवाहकाळीं, ज्ञातिवधीं, मर्मभेदनावसरीं ।
ज्ञात्या मृषोक्ति तारी; न बुडवि वरुणासि भग्ननाव सरीं ॥ ५४ ॥
जो रानीं चोरांनीं धरिला तेणें घडावया मुक्ति ।
लेश विचार न करितां बोलाव्या तेथ शत मृषा उक्ति ॥ ५५ ॥

असतां शक्य न द्यावें धन चोराला, मृषाहि बोलावें ।
राहे धन, पुण्य घडे अनृतें, तरि कां सुखें न डोलावें ॥ ५६ ॥
अनृतें वांचत असतां अनृत न बोलेल, वित्त चोरासी ।
देईल त्यासि तें धन शापील; पहा पुसोनि थोरांसी ॥ ५७ ॥
तस्माद्धर्मार्थ अनृत वदतां सत्यव्रता नसे हानी ।
ऐसाचि विचार मनीं धरिला सद्धर्म-सद्रसेहांनीं ॥ ५८ ॥
हें धर्माचें लक्षण, न अतिक्रमितांचि धर्ममर्यादे ।
कथिलें म्यां सुहृदें तुज; यासि स्थल हृदय मित्रवर्या ! दे ॥ ५९ ॥
तत्त्व यथामति कथिलें धर्माचें म्यां तुला अतापार्थ ।
कीं मज वाटे, पावो कीर्ति सुधर्मज्ञसंमता पार्थ ॥ ६० ॥
हें सर्व ऐकिलें कीं ? इकडे मज मातुलात्मजासि पहा ।
बोल विशंक स्वमुखें, जरि तुज वाटेल वध्यसा नृप हा " ॥ ६१ ॥

---

कर्णपर्वांतर्गत

## १८ कर्णाचे दांत कर्णाच्या घशांत !

कर्णार्जुनांचें युद्ध सुरू असतां कर्णाच्या रथाचें चाक पृथ्वीनें गिळलें. तेव्हां जरा दम धर, मी चाक वर काढतों आणि पुन्हा तुझ्याशीं लढतों; शत्रु विपत्तींत असतां त्यावर शस्त्र चालविणें हा धर्म नव्हे, असें कर्ण अर्जुनास म्हणाला. त्यावर कृष्णानें जें उपहासात्मक पण वर्मी भाषण केलें तें या उताऱ्यांत आहे.

कृष्ण म्हणे, " राधेया ! भला बरा स्मरसि आजि धर्मातें ।
नीच व्यसनीं बुडतां निंदिति देवासि, न स्वकर्मातें ॥ १ ॥
जेव्हां तूं दुर्योधन, दुःशासन, शकुनि एकमति झालां ।
कैसे कपटद्यूतीं चित्तींहि न धर्म लंघितां भ्यालां ॥ २ ॥
जेव्हां सभेसि नेली पांचाळी, मानिलें मनीं शर्म ।
तेव्हां गेला होता कोठें राधासुता ! तुझा धर्म ॥ ३ ॥

राज्य न देसी, करवुनि वनवासाज्ञातवासही, जेव्हां ।
गेला होता कोठें धर्म तुझा सूतनंदना! तेव्हां ॥ ४ ॥
केले दग्ध जतुगृहीं त्वां पांडव वारणावतीं जेव्हां ।
गेला होता कोठें धर्म तुझा सूतनंदना! तेव्हां ॥ ५ ॥
चारुनि विषान्न भीमा सर्पे डसविले नृपें; असें खोटें ।
कर्म करवितां, कर्णा! होता तव धर्म तेधवां कोठें ॥ ६ ॥
फेडी वस्त्र सतीचें जेव्हां उघडें करावया आंग ।
गेला होता कोठें धर्म तुझा तेधवां वृषा! सांग ॥ ७ ॥
'शाश्वत नरकीं पडले पति पहिले षंढतिल, वरीं अन्या' ।
बोलुनि असें सभेंत द्रुपदाची गांजिली तुवां कन्या ॥ ८ ॥
खरदुर्वाक्यशरशतें भेदित होतासि जेधवां मर्म ।
तेव्हां गेला होता कोठें राधासुता! तुझा धर्म ॥ ९ ॥
अभिमन्यु बाळ बहुतीं वधितां त्वां वारिलें न तें कर्म ।
तेव्हां गेला होता कोठें राधासुता! तुझा धर्म ॥ १० ॥
पूर्वीं धर्म न रुचला, त्यजिला निपटूनि तो जसा कुचला ।
आतांचि बरा सुचला? धर्मगृहा सर्व व्हा परासु, चला ॥ ११ ॥
नळ होय धर्मराजा, कलहोत्सुक पुष्करहि तुम्ही सर्व ।
बळ होतें सत्याचें, खळ हो! तुमचा न चालिला गर्व ॥ १२ ॥
मागेंचि तुम्ही भजतां धर्माला तरि तुम्हांसि वांचविता ।
आतां मरा; न वांचे दीप्तगृहीं जो न तोय सांचविता ॥ १३ ॥
मागेंचि धर्म कारितां, जरि देतां राज्य, धर्म वांचविता ।
न जगे तो दुर्भिक्षव्यसनापूर्वीं न धान्य सांचविता ॥ १४ ॥
आतां रक्षील कसा धर्म, तुम्हीं वित्तमद्यमत्तांनीं ।
जो लोटिला दहादां स्वहितहि मानूनि अहित, लत्तांनीं ॥ १५ ॥
रक्षावा धर्म असा करिसी उपदेश, तरि असे मान्य ।
रक्षितसों धर्मातें, आम्हांला धर्म ठाउका नान्य ॥ १६ ॥

हा धर्म मूर्तधर्म प्रभु, यातें भजतसों; असा मान्य ।
लोकांत कोण दुसरा? सामान्य नव्हेचि हा असामान्य" ॥ १७ ॥
आश्रितजनाभिमानी प्रभु बोले जेधवां असें रागें ।
निश्वास वृषें लज्जावनतमुखें सोडिला जसा नागें ॥ १८ ॥

---

गदापर्वांतर्गत

## १९ सुंभ जळालें तरी पीळ राहतोच!

शेवटीं भीमानें गदायुद्धांत दुर्योधनाला आघात करून पाडलें. तो मूर्च्छित झाला; तेव्हां त्याला लाथ मारून भीमानें हवें तसें तोंडसुख घेतलें. पांडवपक्षाचे इतर लोकही त्याला वाक्प्रहार करूं लागले. त्या वेळीं मेलेल्यावर धोपाटे घालण्यांत अर्थ नाहीं, एकदांची पीडा गेली, चला आतां, असें कृष्ण म्हणाला. यावर दुर्योधन व कृष्ण यांचा झालेला संवाद पुढें दिला आहे:—

केशव म्हणे, 'सुभट हो! मृतमारण हें तुम्हां नव्हे युक्त ।
मेला तैंच, गुरूंचें जेव्हां याणें विलंघिलें उक्त ॥ १ ॥
मित्र नव्हे, शत्रु नव्हे, आतां बोलोनि काय या खोडा ।
सोडा मृतपापकथा, शीघ्र चला, दिवस राहिला थोडा ॥ २ ॥
मेला दुर्जन, झालें बहु बरवें, सर्व वारली पीडा ।
खळ साधुपदा भोगित होता, बक जेविं हंसखगनीडा' ॥ ३ ॥
या स्वाधिक्षेपें तो नृप उठला धरुनिया मनीं राग ।
आगस्करघातार्थी पुच्छच्छेदार्तधी जसा नाग ॥ ४ ॥
तनु विकळा पारि उठवी टेंकुनि भुज आणि तो टिरी तीतें ।
न गणीच वेदना, त्या स्तविना कां वीरकोटि रीतीतें ॥ ५ ॥
कोपें कृष्णासि म्हणे, "आइक रे कंसदासदायादा ।
निर्लज्जा! कपटा तव हृदया तसि गांठि जसि नदा यादा ॥ ६ ॥

या फाल्गुनासि सांगुनि कपट, हळुच खूण दाखवुनि भीमा ।
त्वां मोडविल्या माझ्या मांड्या, त्वत्कैतवा नसे सीमा ॥ ७ ॥
कपटोपायें मारुनि ऋजुसंगर बहु सहस्र कवि राजे ।
लज्जा, दया नसे तुज; सुभटांत त्वत्पटुत्व न विराजे ॥ ८ ॥
जो धर्मयुद्धदुर्जय वरुणा, धनदा, द्युपा, यमा, रविला ।
त्वां स्त्रीपूर्व शिखंडी करुनि पुढें आपगेय मारविला ॥ ९ ॥
शिकवुनि धर्मा 'अश्वत्थामा मेला' असें अलीक रणीं ।
गुरुघातार्थ वदविलें त्वां स्पष्ट; तुझी नव्हे बरी करणी ॥ १० ॥
प्रियसुतशोकीं बुडवुनि करवुनि समरांत आयुधन्यास ।
त्वां मरणोन्मुख केलें, असतां सामर्थ्य आयु धन्यास ॥ ११ ॥
द्रुपदसुत प्रायगतब्राह्मणशिर तुजसमक्ष जो कापी ।
ब्राह्मण्य कसा रे! तूं? कैसा तो त्वां न वारिला पापी ॥ १२ ॥
कर्णें स्वकवचकुंडलधनदानें शक्ति संग्रहीं केली ।
जी अर्जुनीं पडावी ती त्वां तुच्छीं घटोत्कचीं नेली ॥ १३ ॥
भूरिश्रवा महात्मा त्याचा त्वां दक्ष बाहु तोडविला ।
शिर खंडितां न सात्यकिपासुनि तो प्रायगतहि सोडविला ॥ १४ ॥
तैसाचि अश्वसेनव्याळशर छद्म करुनि चुकवीला ।
मारविलें त्वां चक्रव्यसनीं कर्णा अशाहि सुकवीला ॥ १५ ॥
भीष्मासीं कर्णासीं गुरुसीं मजसीं न कपट करितास ।
हरितास क्षितिसि न तूं, वाढविसि कुटिलपणेंचि चरितास ॥ १६ ॥
आम्हां-असे बुडविले त्वां बहु निजधर्मनिरत कपटानें ।
झांकिल कसें अनार्या! स्ववदन यदु सुरसभेंत न पटानें" ॥ १७ ॥
देव म्हणे, "गांधारे! मेलासि सपुत्रबंधु तूं दुरितें ।
सच्छलकर्म, सुदारुण वज्र तसें, बहु दृढासही चुरितें ॥ १८ ॥
भीष्म द्रोण सुदुर्जय, पारि मेले हे तुझ्याचि पापानें ।
ज्यां प्रबळां जोडावे हात जयंताचियाहि बापानें ॥ १९ ॥

होता सुरासुरनरोरगदुर्जय कर्णही जसा रुद्र ।
व्यसनीं पडोनि मेला; कीं, तवशीलानुवर्तक क्षुद्र ॥ २० ॥
म्यां विनविलें परोपरि पारि भाग खळा! न देववे, नाकीं ।
तुजहुनि भला शतगुणें वदले शक्रादि देव वेना कीं ॥ २१ ॥
कविजन हित-महित म्हणुनि बहु न मनुनि याग देशिकां गातो ।
तद्‌तिक्रम केला त्वां, कोपविल न या गदेसि कां गा! तो ॥ २२ ॥
त्वां भीमासि विष दिलें, तुज योग्य न काय पतन गरदा हें ।
मेळविलें अघ पांडवदाहें बहु जेविं शतनगरदाहें ॥ २३ ॥
दुःशासन केश धरुनि कृष्णेसि जधीं सुयोधना! कर्षी ।
म्यां तेव्हांचि वधुनि तुज हृष्ट करावे सुयोध नाकर्षी ॥ २४ ॥
कितव शकुनि करुनि पुढें धर्मात्मा धर्मराज नागविला ।
जागविला चिंतेनें, तेरा वर्षें सदैव भागविला ॥ २५ ॥
कृष्णा जयद्रथानें हारिली, जसि रावणें अनादि सती ।
जी साक्षाज्जगदंबा शुद्धा अप्राकृता जना दिसती ॥ २६ ॥
बहुतांनीं विरथ करुनि वधिला अभिमन्यु एकला बाळ ।
तें अघ करिल तुझी, जसि वृद्धाची निर्धनत्व, आबाळ ॥ २७ ॥
'केला घात अधर्मं,' असि मजवरि घालितोसि कां आळ ।
व्याळसम पोपिला जो तो त्वद्‌धर्मचि खळा! तुझा काळ ॥ २८ ॥
वृद्ध न उपासिले, गुरुशुक्रांचे ऐकिले न उपदेश ।
तृष्णांध मूढ लोभी खळ तूं होसील केविं सुपदेश" ॥ २९ ॥
राजा म्हणे, "विसरलों मी, सांगा करुनि पाठ वेदा, न ।
पात्रीं न दिलें ऐसें एकहि मजला न आठवे दान ॥ ३० ॥
अखिळाहि भोगिली म्यां पृथ्वी, परमस्तकीं दिला पाय ।
स्वंततर कवण मजहुनि? आतां कर्तव्य राहिलें काय ॥ ३१ ॥
अभिमुख शस्त्राघातें समरमखामाजिं वेंचिला काय ।
स्वंततर कवण मजहुनि! आतां कर्तव्य राहिलें काय ॥ ३२ ॥

मद्भोग मदैश्वर्य प्रेक्षुनि वदले समस्त अरि 'हाय'।
स्वंततर कवण मजहुनि? आतां कर्तव्य राहिलें काय ॥ ३३ ॥
सत्कारील सुरांचा ससुहृत्सुतसोदरा मला राय।
स्वंततर कवण मजहुनि? आतां कर्तव्य राहिलें काय ॥ ३४ ॥
ज्या वीरसू तयांला झाली मान्या जगत्रयीं माय।
स्वंततर कवण मजहुनि? आतां कर्तव्य राहिलें काय ॥ ३५ ॥
प्रविहतसंकल्प तुम्ही झालां, सर्वहि बुडाल शोकांत।
सकळ सहायांसह मी प्रमुदित होईन वीरलोकांत" ॥ ३६ ॥

---

# कृष्णशास्त्री चिपळूणकर.

## १ अन्योक्तिकलाप.

### कोकिलान्योक्ति.

वसंतसमयीं फुले, परिमळें दिशा व्यापि जो।
जयास अवलोकुनी सुरतरूहि चित्तीं थिजो।
तया सतत सेविती विहग आम्रवृक्षा किती।
परी पिकचि एकला मधुर वाणि लाधे कृती ॥ १ ॥

### चातकान्योक्ति.

नवीं पद्मं जेथें विकसुनि सुगंधा विखरती।
तळीं ऐशीं तोयें सतत भरलीं फार असती।
तरी पर्जन्याचे जलकणचि कां चातक पितो।
गमे मातें मानी शिर नमविण्या लाज धरितो ॥ २ ॥

### शुकान्योक्ति.

फळें मधुर खावया असति, नित्य मेवे तसे।
हिरेजडित सुंदरीं कनकपंजरींही वसे।

अहर्निश तथापि तो शुक मनांत दुःखें झुरे ।
स्वतंत्र वनवृत्तिच्या घडिघडी सुखातें स्मरे ॥ ३ ॥

बकान्योक्ति.

उभा राहे एके चरणिं धरणीतें धरुनिया ।
तपश्चर्या वाटे करित जणुं डोळे मिटुनिया ।
बका! ऐशा ढोंगें तव अमति मासेच ठकती ।
परि ज्ञाते तूझें कपट लवलाहीं उमजती ॥ ४ ॥

सिंहान्योक्ति.

भृंगे गुंजारवातें करिति शिरिं असे मत्त हत्तीहि जीतें ।
डोळां देखोनि होते पळत भयभरें सोडुनीया धृतीतें ।
जेथें मुक्ताफळांचा खच बहु पडला, त्या गुहेमाजिं आतां ।
सिंहाच्या, क्षुद्र कोल्हे कलकल करिती मृत्युनें त्यास नेतां ॥ ५ ॥

चंदनान्योक्ति.

आहे एक सुगंधमात्र जवळी, तों त्यास राखावया ।
ऐसे घोर भुजंग पाळिशि, जना जे धांवती खावया ।
येती गोड फळें फुलेंहि बरवीं दैवें तुला, चंदना ।
त्यांच्या बा! करितास काय न कळे संरक्षणा योजना ॥ ६ ॥

केतकीविषयीं अन्योक्ति.

दलां सर्वां कांटे असति, मधुचा लेशहि नसे ।
उडोनी नेत्रांतें रज बहुत पीडा करितसे ।
तुझ्या पुष्पीं ऐसे अवगुण असोनी भ्रमर हा ।
कसा एक्या गंधें भुलुनि पडला केतकि! पहा ॥ ७ ॥

आंब्याविषयीं अन्योक्ति.

ज्याचे पल्लव मंगलप्रद, शिणा छाया जयाची हरी ।
गंधें युक्त फुलें, फळेंहि असती ज्याचीं सुधेच्यापरी ।
वाटे जो रमणीय भूषण वनश्रीचे मुखींचें, भला ।
आम्रा त्या पिक सेवितां समसमा संयोग कीं जाहला ॥ ८ ॥

### बाभळीविषयीं अन्योक्ति.

कांटयांनीं भरलें शरीर अवघें, छाया नसे दाटही ।
नाहीं वास फुलांस, भूक न निवे ज्याच्या फळें अल्पही ।
नाहीं एकहि पांथ येत जवळी तूझ्या, असो गोष्ट ही ।
अन्यांचीं न फळें मिळोत म्हणुनी होशी तयांतें वही ॥ ९ ॥

### सूर्यान्योक्ति.

देखूनी उदया तुझ्या द्विजकुळें गाती अती हर्षुनी ।
शार्दूलादिक सर्व दुष्ट दडती गिर्यंतरीं जाउनी ।
देशी ताप परी जसा वरिवरी येशी नभीं, भास्करा ।
अत्युच्चीं पदिं थोरही बिघडतो, हा बोल आहे खरा ॥ १० ॥
होता जोंवरि अंबरीं तपत तो चंडांशु तेजें निजें ।
झाला निष्प्रभ तारकाधिपतिही, बोला कशाला दुजें ।
राहूच्या वदनीं अजी गवसतां तो भानु दैवें अहा ।
कैसे क्षुद्रहि काजवे चमकती त्याच्यापुढें हे पहा ॥ ११ ॥
कोकां, शोकास त्यांच्या शमवुनि, दयितासंगमें हर्षवी जो ।
कारागारें करांहीं उघडुनि कमलें, भृंगही सोडवी जो ।
जेणें अंधार सारा पळवुनि हरिलें सृष्टिच्या दृष्टिदोषा ।
त्या मित्राचा बघूनी उदय कवण तो चित्तिं मानी न तोषा ॥ १२

### हंसान्योक्ति.

पानांमाजीं तरूच्या लपुनि बस कुठे राजहंसा! कसाही ।
जाती वर्षर्तुचे हे दिवस तंववरी सर्व कष्टांस साहीं ।
येऊनी शारदश्री, पुनरपि फुलतां पद्मवृंदें, तयांचा ।
भोक्ता नाहीं कुणीही तुजविण दुसरा, जाण हा नेम साचा ॥ १३ ॥
ज्याच्या तीरीं समंतान्मधुरफलभरें वांकले वृक्ष भारी ।
ज्यामाजीं पद्मखंडें फुलुनि, विखरती गंध चित्तापहारी ।
त्या जेणें मानसातें त्यजुनि वरियलें पंकिला पल्वलातें ।
त्या हंसाच्या, बकांनीं जरि पद दिधलें मस्तकीं, योग्य त्या तें॥ १४॥

पुष्पांहीं पल्लवांहीं विविध तरुवरां सर्वदा भूषवी जो ।
नाना धान्यें फळें हीं पिकवुनि सुखवी प्राणिमात्रा सदा जो ।
हर्षे पाहूनि ज्यातें जग, धरिशि मनीं त्रास त्या अंबुदाचा ।
हंसा ! वर्णें जरी तूं धवल, तरि गुणें कृष्ण आहेस साचा ॥ १५॥

---

## २ कैलास.

### साक्या.

कस्तूरीमृग बैसुनि जेथें शिला सुगंधित होती।
कर्पूराच्या राशीपरि जीं हिम वर्षुनि दिसताती ॥ १ ॥
हिमगिरिच्या त्या शिखरांवरि तुज बघुनि घेत विश्रांती।
लोकां होइल सपंकशृंगत्र्यंबकवृषभभ्रांती ॥ २ ॥
सुटूनि वायू देवदारुतरु घांसुनि परस्परांतें ।
पेटुनि वणवा चमरीपुच्छें जाळुनि गिरिराजांतें ॥ ३ ॥
पीडा देतां सत्वर वर्षें जळ त्यांतें शमवाया ।
सज्जन संचय करिती केवळ दुःखितदुःख हराया ॥ ४ ॥
शिलातलावरि असतिल तेथें उठलीं पदें शिवाचीं ।
भक्तिपुरःसर पूजा करिती मुनिजन नित्य जयांची ॥ ५ ॥
ज्यांच्या दर्शनमात्रें भावुक जन जाळुनि पापांतें।
मरणानंतर सुखें पावती स्थिर सायुज्यपदातें ॥ ६ ॥
वंदुनि त्यांतें प्रदक्षिणाही करुनी अनन्यभावें ।
सुकृत यापरी जोडुनि पुढती मार्गा त्वां लागावें ॥ ७ ॥
मिळुनि गिरीवरि किन्नरनारी त्रिपुरविजय गातांना ।
सुटूनि वायू वेळूंतुनिही मधुर स्वर निघतांना ॥ ८ ॥
गुहांत तव गर्जना घुमोनी मृदंगकार्य करील।
गिरिशयशाचें गायन तरि मग यथासांग होईल ॥ ९ ॥

---

# भास्कर दामोदर पाळंदे.

## १ ईशस्तवन.

पृथ्वी.

प्रभो, प्रणतवत्सला! बहुत पातकी दीन मी।
निराश्रित अजाणता तुज सदैव चित्तीं नमीं।
चुकें तर पदोपदीं, पण न भीं, नसें घाबरा।
क्षमाच करिशिल तूं, भरंवसा मला हा बरा॥ १॥
अगाध महिमा तुझा बुधहि गावया नेणती।
यथामति वदावया मजचि लाज ती कोणती।
पिईन परमेश्वरा विमलकीर्तिगानामृता।
भिईन न कदापि मी, मग पुढें जित्या वा मृता॥ २॥
सुखास्तवच आमच्या अति अपूर्व केली धरा।
कमी किमपिही नसे जिजमधें, यशःश्रीधरा।
प्रशस्त पडली, सुखा विपुल देत आम्हांस ती।
धरून हृदयीं जशी प्रियकरां स्वबालां सती॥ ३॥
तिच्यांत अति सुंदर प्रभु! मणी बहू शोभती।
सुवर्णरजतादि ते सकळ धातुही लाभती।
असोत पण ते, सदा उदक-अन्न ती देतसे।
अपार उपकार हा, नच तिचा, तुझा होतसे॥ ४॥
असंख्य दिसती नभीं रुचिर गोल जे प्रत्यहीं।
तुझें यश कथावया उदित दैवतें सत्य हीं।
दिलीस गति ज्यांस जी सतत तीच संभाळिती।
सुबोध करण्यास त्यां, स्वनियमां न जे पाळिती॥ ५॥
तुझी कृति दिसावया रवि तमास उच्छेदितो।
स्वकीय किरणामृतें सकळ विश्व आल्हादितो।

अशेष तरु, जीव, यां भयद शीत तें नाशितो।
तुझ्या प्रभु ! कृपेमुळें सतत त्यांस तो पोषितो ॥ ६ ॥
शशी विमलकांति जो गगनमंडला भूषितो ।
अदृश्य असतां रवी, पथिक यांस संतोषितो।
पहा प्रतिदिनीं कसा क्षयविवर्धना भोगतो।
प्रभो ! तुजविना नसे किमपि, नित्य हें सांगतो ॥ ७ ॥
समुद्र, सरिता, गिरी, तरु, जिवांस तूं निर्मिलें।
विचित्र रचना तुझी, बुधहि वर्णितां शर्मिले।
अनादि सकलज्ञ जो मुदित नित्य त्या मी नमीं ।
असो प्रभु ! दयार्णवीं पतित एक हा मीन मी ॥ ८ ॥

---

# परशुरामतात्या गोडबोले.

## १ वर्षावर्णन.

वसंततिलका.

हा मेघ आर्द्रमहिषोदरतुल्य काळा।
शंखाकृती धरि करांत बलाक-माळा।
विद्युत्प्रभा वसन पीत कसोनि हातें।
वाटे दुजा हरिच आक्रमितो नभातें ॥ १ ॥

ओंवी.

मेघोदरांतूनि जलाच्या धारा, भूमीवरी पडती झरारा।
जैशा शुद्ध रजताच्या तारा, विद्युत्प्रकाशें झळकती ॥ २ ॥

शार्दूलविक्रीडित.

कांहीं हंस-मयूर-काक-बकसे वेगें उडों पाहती।
कांहीं कांसव-मीच-नक्र-सुसरी पाण्यामध्यें पोहती।

कांहीं पर्वत-वृक्ष-तुंग-शिखर-प्रासादसे दीसती ।
वातें हालावितां नभीं घन असे नानाऽकृती शोभती ॥ ३ ॥
भासे कौरवराष्ट्रतुल्य नभ हें जें अंधकारा धरी ।
हर्षानें बहु गर्जना करि शिखी दुर्योधनाचे परी ।
द्यूतीं निर्जित धर्मसा पिक वनीं आला असे संप्रती ।
गेले स्त्रीसह हंसपांडव तसे अज्ञातवासाप्रती ॥ ४ ॥

वसंततिलका.

होऊनि शैलशिखरावरि लंबमान ।
हे गर्जतात घन दुंदुभिच्या समान ।
ऐकोनि शब्द उडती शिखि पक्षपातें ।
कीं वीजती मणिमयव्यजनें नभातें ॥ ५ ॥

शार्दूलविक्रीडित.

धाराजर्जर दर्दुर प्रसरती, पंकीं उड्या घालिती ।
झाले मोर विमुक्तकंठ, फुललीं झाडें पहा डोलती ।
साधूला खळमंडळी, तशिच ही चंद्रास मेघावळी ।
झांकी, ती कुलटेसमान चपला राहे न एके स्थळीं ॥ ६ ॥

आर्या.

पवनचि जवन तुरग ज्या, जलमयधाराचि शस्त्रधारा ज्या ।
ज्या स्तनित दुंदुभिध्वनि शोभे विद्युत्पताक ज्या राजा ॥ ७ ॥
तो मेघराज नेतो हरुनि नभीं करसमूह चंद्राचा ।
राजा जसा स्वनगरा नेतो करभार अबल शत्रूचा ॥ ८ ॥

शार्दूलविक्रीडित.

मेघीं आर्द्रतमालपत्रमलिनीं आकाश आच्छादिलें ।
बाणीं हस्तिस तेविं वारुळ-शता धाराशतें भेदिलें ।
शोभे वीज घनावरीहि, दिवटी प्रासादमाथां जशी ।
चंद्राची हरिली प्रभा जळधरें स्त्री दुबळीची तशी ॥ ९ ॥

साक्या.

ज्यांच्या पाठीवर बांधियले विद्युल्लेखादोर ।
धावुनि धाराधर हे खालीं धारा सोडिति थोर ॥ १० ॥
जाणों हे गज शक्राज्ञेनें रजताच्या दोरांनीं ।
ओढुनि नेती या पृथ्वीला वर अपुल्या जोरांनीं ॥ ११ ॥

शिखारिणी.

विजेच्या चापल्यें क्षुभित घन नीलाभ वळले ।
महावातें अभ्यंतरिं उदधि जैसे खवळले ।
तिहीं गंधोद्दामा हरित-तृणसस्यांकुरवती ।
असे केली धारा-शर-शत-विदीर्णा वसुमती ॥ १२ ॥

शार्दूलविक्रीडित.

मोरांनीं बहु आदरें करुनि जो ये, ये, असा बाहिला ।
वेगें जाउनि जो बलाकततिनें सोत्कंठ आलिंगिला ।
हंसांनीं निजपंकजें त्यजुनिया त्रासोनि जो पाहिला ।
तो हा मेघ दिशांस झांकित नभीं नीलांबरें राहिला ॥ १३ ॥

आर्या.

उतरे चढेहि वर्षे गर्जे पाडी घनांधकारातें ।
प्राप्त-नवश्री-पुरुषापरि मेघ धरी अनेक रूपांतें ॥ १४ ॥

उपजाति.

विद्युल्लतांनीं जळतेंच काय । धाराजळांनीं गळतेंच काय ।
बलाहकांनीं हंसतेंच काय । वायुभ्रमें निःश्वसतेंच काय ॥ १५ ॥

इंद्रवज्रा.

मेघोदरा भेदुनिया निघाल्या । पंकांतुनी जेविं मृणालि आल्या ।
धाराच चंद्रव्यसनें हजारा। सोडीतसे हें दिव अश्रुधारा ॥ १६ ॥

आर्या.

सज्जनचित्तसुनिर्मळ विजयशरसमान कर्कशाकारा ।
चंडानिलसंचोदित जलधर हे वर्षतात जलधारा ॥ १७ ॥

सोडिति जलद जलाचे बिंदू बलरामवस्त्रसमकाय ।
इंद्राच्या कोशांतिल घेउनि मुक्ताच टाकिती काय ॥ १८ ॥

अनुष्टुप्.

तमालपिष्टनीलांनीं, मेघांनीं नभ लिंपिलें ।
संसक्तशीतसुरभि, वातांनीं उपजीविलें ॥ १९ ॥

ओंवी.

विद्युज्जिव्हा लांबवूनी, जलधर-हनुवटी खालवूनी ।
इंद्रचाप-भुज उभारोनी, जांभई देतें अंतरीक्ष ॥ २० ॥

उपजाति.

ताडावरी कर्कश शब्द होतो । जळीं स्थळीं केवळ मंद हो तो ।
जशा विण्याच्या झडतात तारा । तालानुसारें पडतात धारा ॥२१॥

---

## २ दारिद्र्यप्रभाव.

शार्दूलविक्रीडित.

ज्या माझ्या सदनांगणांत विमल द्वारप्रवेशीं बली ।
होते सारस, हंस भक्षित सदा, तैशीच हे देहली ।
तेथें सांप्रत हीं पहा उगवलीं झाडें तृणें दीसती ।
त्यांमध्यें पडतां बली झटुनिया मुंग्या-किडे भक्षिती ॥ १ ॥

उपजाति.

भोगून दुःखें सुख शोभतें जनीं । घनांधकारांत दिवा जसा वनीं ।
सुखापुढें होय दरिद्रता नरा । असोनि देहीं मृततुल्य तो खरा ॥२॥

वसंततिलका.

माझें मलाच घर तापद फार झालें ।
क्षीणार्थ जाणुनि जनीं गृह वर्ज्य केलें ।
गेला सुकोनि मद कालवशेंचि ज्याचा ।
जातात भृंग कट सोडुनि त्या गजाचा ॥ ३ ॥
नाहीं खरें विभवनाशजदुःख मातें ।
दैवानुसार मिळतें धन आणि जातें ।

हें दुःख फार मज नष्टधनास, सारे।
झालेचि मित्रपण सोडुनि पाठिमोरे ॥ ४ ॥

शार्दूलविक्रीडित.

चिंतेचें घर हेंच, वैर दुसरें लोकांत होतें सदा।
निंदा मित्रजनांत, कारण निजद्वेषास हें सर्वदा।
जाया बुद्धि वनास देइ सहसा, जाया सदा लाजवी।
शोकाग्नी हृदयस्थ हा परि तनू जाळी न, संतापवी ॥ ५ ॥
निर्द्रव्या पुरुषा न बंधुजनही साह्यास संतोषती।
त्याचे जे प्रिय मित्र तेहि फिरती, आपत्तिही वाढती।
जातें सत्त्व लयास, शीलविधुची कांति क्षया पावती।
जें केलें जन पाप-कर्म इतरीं तें त्याकडे लाविती ॥ ६ ॥
त्याची संगत कोणिही न करिती, त्या मान कोठें नसे।
जातां धो धनिच्या घरा सुवचनें त्याला न कोणी पुसे।
थोरांपासुनि दूरदूर फिरतो लाजून दुर्वस्त्रक।
वाटे निर्धनता मला खचित हें साव्हें महापातक ॥ ७ ॥

उपजाति.

दारिद्र्य मित्रा! वससी शरीरीं। माझ्याच तूं मानुनि सौख्य भारी।
परंतु वाटे मज दुःख मोठें। मेल्यास मी जाशिल सांग कोठें ॥८॥

इंद्रवंशा.

जेव्हांहि भाग्यक्षय दुर्दशा नरा। येते अशी काळकृता सुदुर्धरा।
घेतात मित्रेंहि अमित्रता तदा। कंटाळती लोकही रक्त जे सदा ॥९॥

शार्दूलविक्रीडित.

वेगातें करितो तुरंग गमनीं चालावयाला अती।
त्याचीं तीं परि पावलें नच तशीं शक्तिक्षयें चालती।
तैशा पूरुषचित्तवृत्ति चपला चोहोंकडे धांवती।
खिन्ना होउनि त्या पुन्हा परतुनी चित्ताप्रती पावती ॥ १० ॥

# विष्णु मोरेश्वर महाजनी.

## १ मातृविलाप.

पृथ्वी.

कुठे विचरतो वनीं सुत मदीय? सांगा कुणी।
कुणास तरि मी पुसूं? मज दिसेल कीं तो गुणी।
सुता फिरुनि ये घरा, धन तुझें नको तें मला।
न वृत्त कळलें तुझें—कुशल कीं, गदें पीडिला॥ १॥
अनिष्ट घडलें जरी, विधिकृपा उरे तीच ना।
तरीहि कळवा मला,—बुध! तुम्हां करीं याचना।
अहर्निश मनीं झुरें, हृदय काळजी जाळितें।
अकीर्ति बरवी नव्हे,—मरण गोड तें वाटतें॥ २॥
नसे परिसलें मुळीं तनयवृत्त वर्षें सहा।
असे मजसि एकला—मम दशा किती दुःसहा।
धरीं हृदयिं आस कीं—'सुत पुन्हा घरीं येइल।
निराश जरि जाहलें, मन फिरोनि तें गोंविल'॥ ३॥
जरीहि फसल्यें अहा! फिरफिरूनि आशाभ्रमें।
तरीहि धरित्यें पुन्हा—मृगजलार्थि वायां भ्रमें।
सुता! असासि तूं जरी, नयन एकदां नीववीं।
असेन अपराधिनी, परि कृपा करीं, जीववीं॥ ४॥
गुणी गुणिगणीं असे; युवजनीं सुरम्याकृति।
सुशील, कुलभूषण, प्रचुरधैर्य, शिष्टाकृति।
प्रसन्नमन, सत्त्वधी, अविमलीं कुलीं जन्मला।
नसे किमपि तें उणें; जरठयष्टि तो हो मला॥ ५॥
रडे शिशु जई तई जननिला कसें वाटतें।
कळे न इतरांसि तें,—मन तिचें कसें क्षोभतें।

प्रहार अति तीक्ष्ण, तें रुदितशस्त्र मर्मी करी ।
पुन्हा प्रणय जोडितो मन विदीर्ण झालें जरी ॥ ६ ॥

'मला त्यजुनिया सुता! कवण देश तो सेविला ।
असा छळिसि कासया? वद न काय मी वत्सला' ।
अहा! तुजसि दूषिलें बहुपरी अशा उक्तिंहीं ।
म्हणूनि जळत्यें मनीं–तनुसि न्हाणित्यें अश्रुंहीं ॥ ७ ॥

महापदिं चढूनिया विभव लोपलाही जरी ।
अकिंचनहि तूं जरी तरि न बा विषादा धरीं ।
न मातृगृहिं यावया प्रियकरा! भयातें वरीं ।
नको! धन नको मला! विभव-हौस झाली पुरी ॥ ८ ॥

किती विहग धन्य ते! उडति पक्षयोगें नभीं ।
सुखें विचरती वरी, दचकवी तयांतें न भी ।
क्षणांत निजनीड ते अवतरूनिया गांठती ।
धरेसि खिळलों अम्ही! तव पडे कशी गांठ ती ॥ ९ ॥

नये मज उडों नभीं तुजसमीप येऊं जरी ।
प्रभूप्रति करद्वया जुळुनिया विनंती करीं ।
'कुठेहि असला जरी तनय तूं तया रक्षणें ।
तुला न करुणा, तरी शरण कोण तूझ्याविणें' ॥ १० ॥

असेल मम सूदिला तनय काय कीं बंधनीं ।
मृगेंद्रजठरीं न कीं कवळ जाहला तो वनीं ।
पयोदधिगुहा न कीं निजसुहृत्सत्वें सेविल्या ।
अशा विविध संशयीं दिवस, यामिनी लोटिल्या ॥ ११ ॥

न नीज नयनांस ये जरिहि त्यास पाहूं म्हणें- ।
उपाय न सुचे मला–विफल साच माझें जिणें ।
मनीं उठति कल्पना बहुविधा, भयें कांपतें ।
घनां अगनगां पुसें, निरविती न चिंतेस ते ॥ १२ ॥

जनास करुणा नसे, जगहि शून्य भासे मला ।
कुणी न मज सांगती मम कुठे असे तान्हुला ।
जनीं अपरिहार्य तें विभजतां नये दुःख जें ।
प्रभो पुरविं आस ही, शरण ये तुला मी भजें ॥ १३ ॥

---

# गणेशशास्त्री लेले.

## १ दक्षिणमहासागर.

शार्दूलविक्रीडित.

सांगातें जनकात्मजेस अपुल्या घेवोनिया सत्वरीं ।
जाई व्योमपथें विमानिं बसुनी श्रीरामनामा हरी ।
तैं रत्नाकर पारशून्य सहसा पाहोनिया खालता ।
एकांतीं दयितेस तो गुणनिधी झाला असें बोलता ॥ १ ॥

" हा पाहें मम सेतुनें जलनिधी झाला द्विधा मैथिली ।
लाटा या मलयावधी उसळती तैशाच फेनावली ।
तारांचे गण जेथ शोभति शरत्कालीं बहू निर्मळ ।
त्या छायापथ जेविं भेदि गगना, तैसा दिसे सोज्वळ ॥ २ ॥

पूर्वीं जें सगर क्रतूस करिता झाला, तईं सुंदरी ।
अश्वाला कपिल स्वयें हरुनि तो पाताळिं ने सत्वरीं ।
तच्छोधार्थ, वसुंधरा खणिलि तत्पुत्रीं खनित्रीं महा ।
केला वर्धित पूर्वजीं मम असा सिंधु प्रिये! हा पहा ॥ ३ ॥

याचें घेउनि अंबु, वृष्टि करिती अंशू रवीचे जनीं ।
होती चंद्रमुखी ! अमोलिक असे पोटांत याच्या मणी ।
अंभोभक्षक वाडवाग्निहि जलीं यानेंच गे पोशिला ।
लोकानंदन चंद्रमाहि सखये! यापासुनी जन्मला ॥ ४ ॥

विष्णूची स्थिति भिन्न भिन्न असते तेवींच याची असे।
जेवीं व्यापक विष्णु तेविं दयिते ! दिग्व्यापि हाही दिसे।
यासाठीं निजरूप अंबुनिधिचें विस्तीर्णताही खरी।
विष्णूचे परि जानकी ! न समजे कोणासही भूवरी ॥ ५ ॥

ज्याच्या नाभिसरोरुहीं बसुनिया ब्रह्मा स्तुतीतें करी।
शक्तीनें सकलां जगांस उदरीं जो आवरोनी धरी।
शेषाच्या शयनावरी निज-सुखें श्रीपुंडरीकाक्ष गे।
कल्पांतीं जलधींत या निजुनिया तो योगनिद्रेस घे ॥ ६ ॥

पक्षच्छेद करोनिया सुरवरें हारीस ज्यां आणिलें।
ते अब्धींत शतावधी गिरि सुखें येवोनिया राहिले।
शत्रूंनीं अतिपीडित क्षितिपती ते जेविं धर्मान्विता।
मध्यस्था नृपतीस आश्रिति, तसें हेंही दिसे पाहतां ॥ ७ ॥

साधी उद्वहनाक्रिया कृतयुगीं कोलावतारी हरी।
तेव्हां ह्या जलधींतुनी वसुमती ती शीघ्र येई वरी।
कल्पांतीं उसळे बळें जळ बहू याचेंचि तें भ्वानना।
झालें कीं मुखवस्त्र तें क्षणभरी, वाटे असें गे मना ॥ ८ ॥

लांबी शंभर योजनें बघ, शिरीं राहे जयाच्या बिल।
ज्याचें नांव तिमी अशा जलचरीं हा अंबुधी संकुल।
हे मासे नदिच्या मुखीं जमलिया सप्राणि तोया पिती।
डोळ्यांला मिटुनी, बिळांतुनि वरी पाणी त्वरें झोंकिती ॥ ९ ॥

मातंगाकृति नक्र या जलनिधीमध्यें उड्या मारिती।
तेणें फेनगिरी फुटोनि तुकडे होवोनि नानारिती।
तेही उंच उडोनि कर्णयुगुला नक्राचिया लागती।
पाहातां नयनीं जना क्षणभरी हे चामरें भासती ॥ १० ॥

येती सर्प वरी बिळांमधुनि हे वेलानिला प्यावया।
या लाटाच असा जनां ग्रह मुळीं होतो बघूनी ययां।

सूर्याच्या किरणव्रजें चमकती जेव्हां फणांचे मणी ।
तेव्हां निश्चय होय कीं, पसरले आहेत येथें फणी ॥ ११ ॥
आकाशांतिल मेघ सिंधुसलिला प्यायास ओणावला ।
पाण्याच्या भ्रमणामुळें गरगरां तेथें फिरों लागला ।
त्याला पाहुनिया मनांत वनिते! येतें असें संप्रती ।
कीं हा मंदर-शैल या घुसळितो सिंधूप्रती मागुती ॥ १२ ॥
हे वैदेहि! दुरून सिंधु दिसतो हा लोहचक्राकृती ।
त्या भोंतील तमालवृक्षनिकरीं कृष्णा विराजे क्षिती ।
येथोनि बहु दूर यास्तव दिसे ती फार सूक्ष्मा तशी ।
चाकांच्या भंवतील काळि दिसते रेखा मळाची जशी ॥ १३ ॥
शुक्ती भंगुनि सैकतीं विखुरल्या मुक्तावळी शोभती ।
जेथें नारळि पोफळीहि लवल्या भारें फळांच्या अती ।
ऐशा सिंधुतटीं विमान-गतिनें अत्यल्पकालें पहा ।
आलों आपण इंदुसुंदरमुखी! आश्चर्य वाटे महा ॥ १४ ॥

---

# गोविंद वासुदेव कानिटकर.

## १ संमोहलहरी.

पृथ्वी.

'मला शरण ये नरा! अखिल धर्म ते त्यागुनी ।
तुझी सकल पातकांमधुनि मुक्तता होउनी ।
मिळेल पद शाश्वत ध्रुवचि शांतिही पावशी' ।
स्वदुक्ति सकलां जनीं विदित पंडुपुत्रा अशी ॥ १ ॥
न दर्प मनिंचा गळे, नच जळे तसा लोभही ।
न मत्सर मला त्यजी, धरि मना बिळा कीं अही ।
न रोष तिळ आवरे, हलवि फार जो शांतिला ।
प्रवात तरुला जसा पृथिविकंप वा भूमिला ॥ २ ॥

निराश मजला तरी न करिं, मागतों मागणें ।
मनोभ्रम-विनाशनें करिं कृतार्थ माझें जिणें ।
प्रभो! पसरुनी तुला पदर याचितों त्वत्कृपा ।
नसे तुजसि द्यावया कठिण दान हें विश्वपा ॥ ३ ॥

कळून, न कळून बा ! घडति पातकें हातुनी ।
भयंकर असे किती तरि विचार येती मनीं ।
क्षमा करुनि लेंकरा, वद 'मदीय हा लाडका' ।
करील जननी जसे, जन दुजा करी लाड का ॥ ४ ॥

तुझी करिति भक्ति जे सुख सदैव ते सेविती ।
तयांवरि कृपा तुझी भिउनि जे तुला वागती ।
तुझ्या भजनिं लागला कुपथ तो न सेवी कदा ।
तुझे परम भक्त बा ! करिति बोध ऐसा सदा ॥ ५ ॥

अभाग्य नर मी, मला पद तुझें दिसेना कसें ।
कृपेविण तुझ्या तुझें विशदरूप कैसें दिसे ।
स्वरूप तव वर्णिती नयन दिव्य देशी जयां ।
कशी दिधलि अंधता मज अभाग्यदासास या ॥ ६ ॥

तुझ्याच पदपंकजीं सकल आस माझी वसे ।
तयीं सतत मन्मनोभ्रमर वास इच्छीतसे ।
प्रसाद तव हो म्हणें, करिं वितृष्ण माझ्या मना ।
तुझ्याविण करी दुजा सफल कोण ही कामना ॥ ७ ॥

अघाचल-अजामिळप्रभृति ज्या तुवां तारिले ।
तयांहुनिहि पातकी अधिक मी असें वाटलें ।
असें जरि न, सांग बा! मजसि हेतु देवा! खरा ।
मिळे न मज कां तरी तव कृपाजलाचा झरा ॥ ८ ॥

अनुग्रह करीं त्वरें मजवरी जगच्चालका ।
दया करुनि दिव्य दे त्वरित दृष्टि या बालका ।

न सांग बुडवील कीं जल भवाब्धिचें घातकी ।
मिळे तव कृपातरी तरिच हा तरे पातकी ॥ ९ ॥
दया करुनि सोडवीं मजसि या विमोहांतुनी ।
वनीं फसलि गायशी त्वरित काढ गर्तेतुनी ।
नितांत शिणलों, करीं नच विलंब तारावया ।
विमोह-कुहरीं बुडे, करिसि वेळ कां यावया ॥ १० ॥
भ्रमात्मक भुजंग हा विभव, फार मारी उडी ।
तुझ्याविण न मांत्रिक प्रबळ अन्य तो गारुडी ।
अहर्निश अशांतता मज पिशाचिका पीडिते ।
अगा! कुशल मांत्रिका! पळविं सर्व माझीं भुतें ॥ ११ ॥
खराचि तुज पातकी जडचि भक्त हा लाभला ।
विमोह-रिपुनें असे तुडविला सदा जो भला ।
निवारिं मम संकटें प्रभुवरा! धरोनि करा ।
मनस्तिमिरकर्दमामधुनि काढिं या लेंकरा ॥ १२ ॥
तुझ्यासम नसेचि या भ्रमगदास धन्वंतरी ।
नसेल दुसरा असा भ्रमगदार्त माझ्यापरी ।
महौषधि कृपाच ती तव मिळो, करीं प्रार्थना- ।
मनो-गद-विनाशना! पुरविं सत्वरीं कामना ॥ १३ ॥

---

## मोरो गणेश लोंढे.

### १ तारुण्यांतील उमेदी.

श्लोक.

( मालिनी. )

चल झडकर जाऊं कीर्तिशैलीं चढून ।
सतत नियम ज्याचा काय त्याला कठीण ।

चिरसमय रहावें आपलें नांव लोकीं ।
सकल बुधजनांतें हें मनीं आवडे कीं ॥ १ ॥
जनपदहित साधी मेळवी जो जयाला ।
स्वजनहित करूनी त्या सुकार्यीं निमाला ।
जनपदहितकर्ता नांव हें त्यास लाधे ।
सकल जन तयाला नित्य गातात मोदें ॥ २ ॥
लवकर उतरूनी ज्ञानसिंधूंत यत्नें ।
निवडुक वर काढूं सर्व चातुर्यरत्नें ।
सविभव मिळवूं या ज्ञानरूपी निधानें ।
अधिक अवनिमाजीं जीं हिऱ्याहून मानें ॥ ३ ॥
गमन करुं पुढें या पाय मागें न घेऊं ।
सुमति करिं धरूनी सत्पथांतून जाऊं ।
निजगुण निजकीर्ती वाढवूं नित्य नित्य ।
सुगुणचि सुख लोकीं कीर्ति सौंदर्य सत्य ॥ ४ ॥
वचन वदुं मुखानें आचरूं तेविं हातें ।
करुन वर कृतीला मार्ग दावूं दुजांतें ।
सुमन गुतवुनी हें आपलें सत्कृतींत ।
जनपद बनवूं हा स्वर्ग यत्नें खचीत ॥ ५ ॥

---

# विठ्ठल भगवंत लेंभे.

## १ मातेचें प्रेम.

शार्दूलविक्रीडित.

आहे पैल समुद्र, तत्तल तुवां बा! काय रे पाहिलें ।
किंवा तत्सिकताकणां निजबळें आहेस का मोजिलें ।
पाहें अंबर हें वरी गणियली उंची तयाची तरी ।
नाहीं ? धिक्! गणिशी अगाध जननीप्रेमा कसा यावरी ॥ १ ॥

आकाशीं प्रभुचा निदेश वरुनी राज्यीं तयाच्या फिरे ।
त्या सूर्यासह दोन शब्द वदुनी आलास तूं काय रे ।
स्वर्गीं इंद्रसभेंत तूं बघितलीं कार्यें सुरांचीं तरी ।
नाहीं ? धिक् ! मग जाणशील जननीप्रेमा कसा यावरी ॥ २ ॥

पाहें तत्पर ते खपोनि जमवी रात्रंदिनीं जी मधा ।
ऐशी ती मधुमक्षिका त्रिभुवनीं मान्या असे सर्वदा ।
तीचे ते श्रम सर्वही बुधवरा! आहेत ती-कारणें ।
मातेचे श्रम निष्कलंक अपुल्या बाळार्थंची ! जाणणें ॥ ३ ॥

जाई तूं फिरण्या कुठेहि जगतीं, भूगर्भदेशीं जळीं ।
जाई उत्तरदक्षिणध्रुवपथें, वा तारकामंडळीं ।
नौकेमाजिं बसोनिया जळनिधी ओलांडुनी जाय रे ।
प्रेमें वत्सल चित्त तें जननिचें संगें तुझ्या बा ! फिरे ॥ ४ ॥

प्रेमाचें अतिदिव्य कोमल असें वारें बघूं पाहसी ।
बुद्धीचे अतिशुद्ध, सत्य, अवघे सिद्धांत तूं मागसी ।
तूतें शुद्ध, अगाध, वत्सल असें बा पाहिजे चित्र रे ।
पाहें प्रेमळ दृष्टि ती जननिची, ब्रह्मांड जेथें भरे ॥ ५ ॥

ऐशी प्रेमळ दिव्यदृष्टि जग हें निर्माण झालें जधीं ।
तेव्हांपासुनि नीतितें शिकवुनी विद्वान् करी धीरधी ।
संता यापरि दुस्तरा भवजलीं नौकाचि ती जाहली ।
धन्या इच्छितकामदा त्रिभुवनीं ही कामधेनू भली ॥ ६ ॥

वायूच्या पटलीं, धरातळवटीं, नीलांबरीं सारिखें ।
शोभे ईश्वरवैभव ! क्षण सुधी जे पाहती कौतुकें ।
ऐसें अद्भुत तेज दे, करि कृपा ईशापरी जी भली ।
धन्या प्रेमळ दृष्टि ती त्रिभुवनीं, धन्याचि ते माउली ॥ ७ ॥

## २ सत्त्वपरीक्षा.

पूर्वी शिबि या नांवाचा पुण्यशील राजा होऊन गेला. तो एकदां यज्ञ करीत असतां इंद्र व अग्नि हे दोघे त्याचें सत्त्व पाहण्याकरितां त्या यज्ञ-मंडपीं आले. अग्नीनें कपोताचें व इंद्रानें श्येनाचें ( ससाणा ) रूप घेतलें होतें. श्येन हा आपल्याला खाण्याच्या हेतूनें आपल्यामागें लागला आहे, अशा मिषानें कपोतानें चटकन येऊन शिबीच्या मांडीचा आश्रय केला. पाठीमागून श्येन आला व राजाजवळ आपलें भक्ष्य ( कपोत ) मागूं लागला. आश्रिताचें रक्षण करण्याकरितां शिबि तें देण्यास तयार होईना. नंतर दोघांत बराच संवाद झाला; त्यांतील शेवटचा हृदयंगम तेवढा भाग या उताऱ्यांत दिला आहे:--

आर्या.

बोले राय, 'श्येना ! घे तूं शिबिच्या समृद्ध राज्यातें ।
अथवा अन्य मनोरथ पुरविन वांच्छिसि खगेश्वरा! ज्यातें ॥ १ ॥
जेणें हा शरणार्थी द्यावा लागे तुला न, सांग मला ।
ऐसा उपाय आतां सुविचारें तूं विहंगमा ! विमला' ॥ २ ॥
बोले श्येन, 'तुझें रे ! प्रेम कपोतावरी जरी राया ।
रक्षीं यासि दयाळा अर्पुनिया आपुल्या शरीरा या ॥ ३ ॥
देईं कपोतभारचि निजतनुचें मांस आजि काढोनी ।
सर्वस्वनाश नच हो बोलाचालींत वाद वाढोनी' ॥ ४ ॥
बोले राय, 'अहाहा ! मान्य तुझी ही खगेश्वरा आज्ञा ।
देतों कपोतभारचि मांस तुला तोलुनी नयप्राज्ञा' ॥ ५ ॥
मग एक पारड्यांत स्वाश्रित खगतनु नृपाळ तो घाली ।
निजतनुमांस दुजांतहि,परि तें येईं न पारडें खालीं ॥ ६ ॥
जड तो कपोत झाला वरिवरि जरि मांस राय तो टाकी ।
ये न बरोबर कांटा, श्येन वदे 'ये पलासि तोटा कीं' ॥ ७ ॥
मग राय पारड्यांतचि बैसे परि राहिलेंच तें वरतें ।
घाबरला नृप, तेव्हां बोले 'मम हाय! हाय! यश हरतें ॥ ८ ॥

तनुंतुनि भळभळ वाहे रक्त न त्याची मला जरा परवा ।
परि यश राहो, याचा न सुचे मजला विचार जो बरवा ॥ ९ ॥
रे! धांव धांव माझ्या दुस्तर या संकटीं जगत्पाला ।
तुजवांचुनि यश माझें रक्षिल रे! कोण हरुनि तापाला ॥ १० ॥
ह्या अल्प कपोताची तनु न तुळे माझिया शरीराशीं ।
तेव्हां हें कपट कळे, पुरविन परि आजि मी करारासीं ॥ ११ ॥
जरि सत्य भक्ति माझी प्रभुचरणीं, आज पारडें खालीं ।
येवो मांसाचें, मज लाविल का देव पाहया खालीं ॥ १२ ॥
माझा धर्म खरा जरि असेल तरि हा टळोनि हाकाटा ।
येवो आजि धटाचा पुण्यबळानें बरोबरी कांटा ' ॥ १३ ॥
संकल्प करुनि ऐसा लागे तुलसीदला शिवायाला ।
वारी तो श्येन तया गद्गदवचनें सुधीर रायाला ॥ १४ ॥
बोले श्येन, ' नृपाळा ! भक्तिबळें जिंकिलेंस तूं मजला ।
आतां पुरे पुरे हें साहस तव पुण्य हें असो तुजला ॥ १५ ॥
भक्तिबळें तुळशिल तूं ब्रह्मांडहि भूपते ! सकळ कळलें ।
प्रेमभरें हें माझें प्राणसख्या! हृदय आजि कळकळलें ॥ १६ ॥
रे ! हा कपोत अग्नि, श्येनहि देवेंद्र हाचि बा राया ।
जिज्ञासेनें आम्ही आलों होतोंचि सत्त्व हाराया ॥ १७ ॥
राया ! प्रसन्न झालों पाहुनि परि धैर्य आजि हें अगळें ।
आम्हीच काय तुजला धन्य म्हणो विश्व आजि हें सगळें ॥ १८ ॥
रविशशि जोंवरि तोंवरि कीर्ति तुझी उज्वळा जनीं राहो ।
तूं वंद्य त्रिजगांतहि पुण्यबळें नित्य दानवीरा हो ॥ १९ ॥
तव कीर्तिदुंदुभीचा जावो ध्वनि गर्जुनी दिगंताला ।
साधन मंजुगिरेनें गाया हो हें चरित्र संतांला ' ॥ २० ॥
ऐसें वदोनि देउनि रुचिराशी इंद्र नाकलोकाला ।
गेला, स्वधर्म पाळुनि देई आनंद राय लोकांला ॥ २१ ॥

# विद्याधर वामन भिडे.

## १ सुखदुःखांचा अनुभव.

श्लोक,

( रथोद्धता )

मेघडंबरविमुक्त अंबर । नीलवर्ण दिसतें मनोहर ।
त्यांत गान खगकंठनिःसृत । चालतां कुतुक होइ विस्तृत ॥ १ ॥
वायुही सुरभि, मंद शीतल । वाहतां सुखद होइ भूतल ।
तेथ दृष्टिपथिं वृक्ष भोंवतां । आणितात अधिकांश रम्यता ॥ २ ॥
धन्य तो अनुभवील जो नर । स्थान हें, समय हा निरंतर ।
किंतु त्यांस सुखवी परिस्थिती । जे शुचित्व शमहेतु पाळिती ॥ ३ ॥
ही परिस्थिति फुकी तया नरा । ठाउकी न शुचिता यदंतरा ।
कार्यंकारण जुळून यापरी । आणितात सुखदुःख भूवरी ॥ ४ ॥
शुद्धिची सुखद ही महार्घता । वैभवास बहुधा न संगता ।
शुद्धमार्ग तुमचें धरो मन । हें न हो मम अरण्यरोदन ॥ ५ ॥

---

# गंगाधर रामचंद्र मोगरे.

## १ जीवितसार.

आर्या.

वाहे सर्व जगाची जगदीश्वर काळजी; तया शरण।
भावें जाय पडेना, वाण कशाचीहि त्यास आमरण ॥ १ ॥
यास्तव तुज म्हणतों कीं आठवुनी त्या दयाघना भावें ।
सर्वां कर्मारंभीं आधीं त्याचेंच साह्य मागावें ॥ २ ॥
घ ागावें धर्मानें; मालवितां धर्मदीपकज्योती
दुर्गम मार्ग समस्तहि संसारीं ह्या तमोमयीं होती ॥ ३ ॥

जे वर्ततात धर्मैं, कर्मैं करितात ईश्वरा स्मरुनी।
अवतार ईश्वराचे ते नर; इतरांसि तारिती तरुनी ॥ ४ ॥
देव नको, धर्म नको, ज्यांस नको शास्त्र, वा सदाचार।
डोळस असूनिही ते जन्मांधाहूनि अंध साचार ॥ ५ ॥
न कळे तयांस निजहित, परहित करणार काय पामर ते।
ऐकावे न तयांचे पाखंडी बोल धर्मकार्यरतें ॥ ६ ॥
बाप जगाचा ईश्वर आपण आहोंत लेंकरें त्याचीं ।
समजावया नको हें पदवी वेदान्तशास्त्रवेत्याची ॥ ७ ॥
आहे सर्वां ठायीं देहाची एक पाहतां ठेव ।
देई दशेंद्रियांची सर्वांसहि जोड सारखी देव ॥ ८ ॥
बनले असती ज्यांचे देह न परमाणु भिन्न ते असती ।
व्यापार इंद्रियांचे होतां सर्वत्र सारखे दिसती ॥ ९ ॥
बसले विकार चित्तां सर्वांच्याही धरोनिया साही ।
इहपरलोकसुखावर सर्वांची दृष्टि सारखी राही ॥ १० ॥
परमात्म्याचा अंशहि आत्मा सर्वांत सारखा बसला ।
संबंध काय दुसरा ह्यापेक्षां अधिक पाहिजे असला ॥ ११ ॥
यास्तव मनुष्य जो जो भेटे तो आपला सखा करुनी ।
सगळी प्रेमानंदें टाकावी हे वसुंधरा भरुनी ॥ १२ ॥
ज्यांच्या चित्ता संतत ही बंधुप्रेमभावना वसली ।
टाळी ब्रह्मानंदीं त्या पुरुषाची खरोखरी बसली ॥ १३ ॥
आपण लोकांसाठीं लोकहि म्हणुनीच आपणासाठीं।
विसरूं नये कधीं हें कीं ह्या प्रभुनेंच घातल्या गांठी ॥ १४ ॥
प्रेमें प्रेम बळावे, द्वेषानें अधिक वाढतो द्वेष ।
प्रेमें उदया आले, द्वेषानें ओस पाडिले देश ॥ १५ ॥
निजबुद्धिसंपदेचा घेती देती न भोग ते कृपण।
जन्मुनि मनुष्यलोकीं त्यांच्या अंगीं नसे मनुष्यपण ॥ १६ ॥

धरिली तरी धरावी वृत्ति अशी ही जनावरांनींच ।
साजे न ही मनुष्यां, हितकर वा ही न भावना नीच ॥ १७ ॥
जळतां शेजाऱ्याचें घर जो ओती न त्यावरी पाणी ।
तो मूर्ख तेंच संकट ओढुनिया आपणावरी आणी ॥ १८ ॥
यास्तव परोपकारीं निजहित समजोनि देह झिजवावा ।
लोकीं जों न अनावर दुःखानल होय तोंच विझवावा ॥ १९ ॥
देहाचा, वित्ताचा, बुद्धीचाही असा सदुपयोग ।
जो नर करितो त्याला नलगे साधावया दुजा योग ॥ २० ॥
कष्टें संपादावें, आनंदानें बसोनिया खावें ।
राखुनि ठेवुनि कांहीं सत्पात्रीं देववेल तें द्यावें ॥ २१ ॥
व्यर्थ न जाऊं द्यावा उद्योगावांचुनी कधीं काळ ।
कीं, उद्योग करी जो लक्ष्मी त्यालाचि घालिते माळ ॥ २२ ॥
घडला न सत्समागम, पडली ज्याच्या सदुक्ति न श्रवणीं ।
न पडे प्रकाश सहसा ज्ञानाचा त्याचिया मनोभवनीं ॥ २३ ॥
ज्ञानप्रकाश नसतां सगळ्या विद्या कला वृथा जाती ।
जवळी असुनि सुखाचीं दिसती न फळें न लागती हातीं ॥ २४ ॥
आगर सद्विद्येचें सुविचाराचेंहि संत सागर ते ।
सुमतिसतीहि निरंतर त्यांच्या ठायींच सानुराग रते ॥ २५ ॥
दुर्वासना तयांच्या दर्शनमात्रेंचि दूर पळतात ।
त्यांच्या कृपाकटाक्षें अज्ञानाचेहि बंध गळतात ॥ २६ ॥
तेचि खरे मित्र जगीं, नसती त्यांसारखे दुजे आप्त ।
लोभ न धरितां देती लाभ अलभ्यंहि करोनिया प्राप्त ॥ २७ ॥
यास्तव बुधजनदर्शन होतां लववूनि आदरें माना ।
बोधामृतें भरावें भव्येच्छूनीं तयांचिया कानां ॥ २८ ॥
वदतां सत्य कधींही न धरावी लाज भीड वा भीती ।
सर्वहि धर्म जगांतिल एकमतें सांगतात ही नीती ॥ २९ ॥

सौभाग्य मतिसतीचें सत्य, गुणांचें शुचिप्रभावरण ।
सत्य मुखाचें मंडन, वाणीचेंही मनोरमाभरण ॥ ३० ॥
सत्य मनुष्यपणाचें चीज, यशाचेंहि बीज सत्याचि रे ।
जीवन जीवदशेचें, जीवात्म्याचेंहि तेज तेंचि खरें ॥ ३१ ॥
सत्य सुखाचें साधन, सत्यें पुरुषार्थ साधती चारी ।
सत्याविना निरर्थक होती दानें व्रतें तपें सारीं ॥ ३२ ॥
दुर्व्यसनें द्रव्याची होय यशाचीहि आपुल्या होळी ।
इहपरलोकसुखाची मग कां व्हावी न राखरांगोळी ॥ ३३ ॥
दुर्व्यसनानें मेले तितके मेले न शस्त्रधारांनीं ।
दुष्काळांनीं अथवा ज्वरातिसारादिकां विकारांनीं ॥ ३४ ॥
आहारीं व्यवहारीं मर्यादेवांचुनी नसे गोडी ।
पावे तोच खरें सुख, न कधीं नियमितपणासि जो सोडी ॥ ३५ ॥
योग नको, याग नको, तीर्थ नको वा त्रिदंडसंन्यास ।
एक विवेक पुरे, त्या आवरती वासना, न अन्यास ॥ ३६ ॥
वास उपाधिभयानें केला जाऊनि काननीं जेणें ।
पंडितमान्य असो तो, हारविलें परि मनुष्यपण तेणें ॥ ३७ ॥
तोचि मनुष्य खरा जो बसवुनिया इंद्रियांवरी पगडा ।
सारी प्रपंच, करुनी धैर्यानें संकटांसवें झगडा ॥ ३८ ॥
हो वा न हो यशस्वी, होय तयाचाचि सुफल संसार ।
जननी धन्य तयाची तोच कुलाचा खरा अलंकार ॥ ३९ ॥

## महादेव हरि मोडक.

### १ अद्भुत किमयागार.

श्लोक.

( शार्दूलविक्रीडित. )

उद्यानीं नवमल्लिका दलभरें झांकोनि गेली जरी ।
नाहीं येत सुगंध अल्पहि तयां मर्दूनि पाहों तरी ।

होतां तत्कलिका विकस्वर परी आमोद कोंदे वनीं ।
देवा ! ही किमया तुझ्याविण दुजा कोणास साधे जनीं ॥ १ ॥

नाना वन्य वनस्पती तृणविधा ओल्या सुक्याही तशा ।
खाती गोमहिषी, अजादिक वनीं तोंडास येती जशा ।
साऱ्या एकचि पावती परि पुढें त्या दुग्धरूपा स्तनीं ।
देवा ! ही किमया तुझ्याविण दुजा कोणास साधे जनीं ॥ २ ॥

नेत्रीं पुत्तलिका मसूरदलशी अत्यल्प जी नांदते ।
वर्णूं शक्ति तिची अचाट किति मी ब्रह्मांडही ग्रासिते ।
जातां सूचिमधून वारण, कमी आश्चर्य तें याहुनी ।
देवा ! ही किमया तुझ्याविण दुजा कोणास साधे जनीं ॥ ३ ॥

वायू चंचल सर्वदा, स्थिर न हो तो कोंडिल्यावांचुनी ।
लाभे अल्पहि रंध्र, जाय निघुनी, हें पाहियेलें जनीं ।
द्वारें हीं उघडीं सदा नव, तरी जाई न देहांतुनी ।
देवा ! ही किमया तुझ्याविण दुजा कोणास साधे जनीं ॥ ४ ॥

कोणी कीटक तुच्छ तुच्छ वसतो अल्पायु सिंधूदरीं ।
तो निर्मी स्वमुखें प्रवाललतिका जी गण्य रत्नांतरीं ।
हो मुक्ताफल शुक्तिकीटकरसें जें अग्र्य सद्भूषणीं ।
देवा ! ही किमया तुझ्याविण दुजा कोणास साधे जनीं ॥ ५ ॥

स्पर्शीं शीतल, सौख्यदायक, जरी विद्युत् स्वगर्भीं धरी ।
तेजें लोभवि लोचनें, मृदुपणा ज्याच्या न कोठें सरी ।
तें कौशेयहि तंतुरूप निपजे पर्णाशनापासुनी ।
देवा ! ही किमया तुझ्याविण दुजा कोणास साधे जनीं ॥ ६ ॥

टाकी जाळुनि वाटतें खरकरें चंडांशु सारी मही ।
झाले क्लांत समस्त सत्त्व, न पिण्या पाणी मिळे अल्पही ।
त्या काळीं फुटुनी लता-तरु सुमें जाती फळें दाटुनी ।
देवा ! ही किमया तुझ्याविण दुजा कोणास साधे जनीं ॥ ७ ॥

सिंधूचें जल खारटें, कडु असो गर्तेतलें घाणलें ।
होवो पंकिल थिल्लरांतिल, असो कूपस्थ शेवाळलें ।
सारें होउनि गोड निर्मल करीं भूमीस ये खांतुनी ।
देवा! ही किमया तुझ्याविण दुजा कोणास साधे जनीं ॥ ८ ॥

ये बीजांतुनि वृक्ष, सिद्ध जरि हें कंदांतुनीही किती ।
शाखेपासुनि अन्य, कोणि लतिकापर्णांहुनी वाढती ।
स्थाणूपासुनि अन्य, अन्य रुजती अंशांकुरापासुनी ।
देवा! ही किमया तुझ्याविण दुजा कोणास साधे जनीं ॥ ९ ॥

कोठें ती वटधानिका अणुसमा, कोठें महावृक्ष तो ।
तुंबी क्षुद्रलता कुठें, फल तिचें कोठें, पहा भेद तो ।
कोठें पिप्पल तो विशाल, परि तीं क्षुद्रें फलें त्याहुनी ।
देवा! ही किमया तुझ्याविण दुजा कोणास साधे जनीं ॥ १० ॥

आधीं कोमल, लाल पाटल, पुढें हारीत त्यानंतर ।
मागोनि गहिरें, सुपक्व पिवळें, अंतीं पुरें पांडुर ।
ऐसें एकचि पर्ण षड्विध धरी रंगांस्रि पाहों वनीं ।
देवा! ही किमया तुझ्याविण दुजा कोणास साधे जनीं ॥ ११ ॥

पर्णीं तूवरता, सुमीं मधुरता, वृंतीं क्वचित् तिक्तता ।
गर्भीं अमृतता, त्वचेसि कटुता, कोशांत काषायता ।
आम्रीं षड्विध ही रुचि प्रकटते एक्याच त्या जीवनीं ।
देवा! ही किमया तुझ्याविण दुजा कोणास साधे जनीं ॥ १२ ॥

भूमी हो उदकीं स्थिरा, परि जला आधार ही मेदिनी ।
'अग्नेराप' म्हणे श्रुती, परि उठे मेघांत सौदामिनी ।
वायूपासुनि अग्निही, गति परी बाष्पास अग्नींतुनी ।
देवा! ही किमया तुझ्याविण दुजा कोणास साधे जनीं ॥ १३ ॥

पृथ्वी ही उदकीं विरे, अनिल हा शोषूनि टाकी जला ।
वायू चेतवि मालवीत अनला, आकाश घे वायुला ।

नांदे पंचक हें विरोधि शरिरीं अन्योन्यसंमिश्रणीं ।
देवा ! ही किमया तुझ्याविण दुजा कोणास साधे जनीं ॥ १४ ॥
घेवोनी घट त्यांत गोमय नवें घालोनि माजीं दधी ।
जातां वासर अल्प वृश्चिक नवा निर्माण हो त्यामधीं ।
होई चेतन-कार्य अद्भुत कसें हेतू-जडापासुनी ।
देवा ! कौतुक हें तुझेंच तुजला साधे न अन्या जनीं ॥ १५ ॥
कार्या कारण हें सजातिय जरी सिद्धांतिलें पंडितीं ।
होती चेतन विंचु त्या जड घटीं आचार्य हें लेखिती ।
देहीं तद्विपरीत केश नख हे सच्चेतनापासुनी ।
देवा ! ही किमया तुझ्याविण दुजा कोणास साधे जनीं ॥ १६ ॥
जागृत्-स्वप्न-सुषुप्ति तीन, चवथी तुर्या, पुढें उन्मनी ।
ऐशा ह्या स्थिति पांच भिन्न असती प्रत्यक्ष योगी जनीं ।
सर्वां एकचि साक्षिरूप फिरतो हा जीव पांचांतुनी ।
देवा ! ही किमया तुझ्याविण दुजा कोणास साधे जनीं ॥ १७ ॥
वक्ता एक, अनेक श्रोतृगण, ते एके स्थळीं बैसती ।
येई एकचि शब्द वक्तृवदनीं सारे पृथक् ऐकती ।
होई एकचि नैकरूप रव तो एकत्व ना टाकुनी ।
देवा ! ही किमया तुझ्याविण दुजा कोणास साधे जनीं ॥ १८ ॥
ऐसा राहसि या चराचर जगा व्यापूनिया एकला ।
मूढां गूढ न हें कळोनि कलहो मोठा जगीं माजला ।
कोणी बोलति भिन्न जीवशिव हे अंशांशि ऐसें कुणी ।
देवा ! कौतुक हें तुझेंच तुजला अन्या न ठावें जनीं ॥ १९ ॥
एकांतीं बसुनी विचार करुनी शोधूनिया पाहतां ।
देवा ! अद्भुत सृष्टि ही तव, तनू होवोनि रोमांचिता ।
आश्चर्यें जड अल्पकाल बसतां, उद्गार आले मुखीं ।
ते श्लोकी हरिपुत्र, सज्जन तयां ऐकोनि होवो सुखी ॥ २० ॥

# नारायण वामन टिळक.

## १ नाममहिमा.

श्लोक.

(पृथ्वी.)

प्रभो! मधुर नाम हें तव किती तरी भावुका।
नसे रस असा दुजा जगिं तयाप्रती ठावुका।
व्रणांस बुजवी, हरी भयविपत्ति, दुःखा हरी।
प्रभो! पतनसज्ज जें मन तयास तें सांवरी॥ १॥
प्रभो! क्षुधित जे तयां मधुर नाम दिव्यान्नसें।
श्रमें गलित जाहल्या सुखद तें विसांवा जसें।
अगा प्रिय सख्या! प्रभो! मम गुरो! अगा जीवना।
तुझा स्तव करीन मी सतत मद्धना! मन्मना॥ २॥
मदीय मतिचे वृथा सकल यत्न हे वाटती।
विचार मम थोरही तुजपुढें प्रभो! हे किती।
तुझी स्तुति कुठून रे मज अशा जडा साधती।
तथापि मज बोलवी तव पदारविंदीं रती॥ ३॥
प्रभो! श्वसन एकदा, स्तुति तुझी पुन्हा एकदा।
असा क्रम धरीन मी, मज नको दुजी संपदा।
तुझ्यासम सखा कसा कधिं कुणा कुठे सांपडे।
सदा तव कृपालुता कथिन ह्यापुढें त्यापुढें॥ ४॥
प्रभो! जगत मर्त्य हें त्यजुन, मर्त्य देहाप्रती।
त्यजून तुझियाकडे वरिल अंतिं आत्मा गती।
तयास समयीं तया मधुर गान तें आठवो।
निगूढ तव नामिं जें, पुढतिं तेंच तो चालवो॥ ५॥

## २ मोहाची दुस्तरता.

साक्या.

ज्ञाना! ज्ञाना! अरे विवेका! किती दावितां प्रौढी ।
न चले तुमचें कांहीं जेव्हां स्वभाव मनुजा ओढी ॥ १ ॥
उपनिषदांची धेनू दोही गोपाळांचा राजा ।
पिई दुग्ध तें पार्थ म्हणे कीं, मोहा आतां जा जा ॥ २ ॥
निजपुत्राचें पतन परी त्या रडवी हरिशिष्याला ।
आत्मबोध तो सर्व निमाला, क्षोभ मनाचा झाला ॥ ३ ॥
वशिष्ट योगी; शिष्य तयाचा रामचंद्र विख्यात ।
सीताविरहें वृक्षलतांना आलिंगी रानांत ॥ ४ ॥
ज्ञानस्तंभा भेदुन आला स्वभाव आप्तवियोगीं ।
करुणरसाची नदी वाहवी कुणीहि बुडण्याजोगी ॥ ५ ॥
थोर थोर वीरांस आपुले करून घेउन लोकीं ।
निवृत्ती ही प्रवृत्तीशीं झुंजे नित्य विलोकीं ॥ ६ ॥
किती काळ हें युद्ध चाललें, पराभूत किति झाली ।
तरी निवृत्ती अजून झुंजे, नाहीं लवही घाली ॥ ७ ॥
सांगे हा इतिहास कवीला, थोर असो वेदान्त ।
तरी तयाला कधीं न करवे प्रेमोद्भवखेदान्त ॥ ८ ॥
कां खेदाचा अंत करावा? खेदकर्दमीं बीज ।
प्रीतिलतेचें रुजे, नवें मी हें न सांगतों आज ॥ ९ ॥
फुलें तिचीं हीं रम्य आसवें कां हो नष्ट करावीं ।
ज्ञान कसें तें ज्यानें असली अरसिक वृत्ति वरावी ॥ १० ॥
विलाप व्हावा, अश्रू व्हावे, संसृति अवघी व्हावी ।
अंधाराची व्याप्ति व्हावी, ज्योत्स्ना सुंदर व्हावी ॥ ११ ॥
ह्यापरि गर्जे स्वभाव, त्याचा प्रतिध्वनी होताहे ।
ज्ञानपर्वतीं, असा जगाचा सदैव अनुभव राहे ॥ १२ ॥

---

## ३ स्वदेशप्रेम.

श्लोक.

( मंदारमाला. )

सृष्टी तुला वाहुनी धन्य माते, अशी रूपसंपन्न तूं निस्तुला ।
तूं कामधेनू, खरी कल्पवल्ली, सदा लोभला लोक सारा तुला ।
त्या वैभवाला तुझ्या पाहुनीया, मला स्फूर्ति नृत्यार्थ होई जरी ।
सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी ! तसें पाहिलें मीं न कोठें तरी ॥ १ ॥
माते ! महात्मे तुझे, तत्त्ववेत्ते तुझे शूर योद्धे तुझे, सत्कवी ।
श्रेणी तयांची सदा माझिया गे ! मना आपुल्या पूजनीं वांकवी ।
यांचीं यशें ज्या नव्या सद्गुणांना मला अर्पिती ध्येय ते गे जरी ।
सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी ! तसें पाहिलें मीं न कोठें तरी ॥ २ ॥
तूझ्या महोदार सारस्वताच्या महासागरींचा जरी मीन मी ।
झालों, तरी ये ! तृषा मन्मनाची कधींही कधींही न होणें कमी ।
माते ! गुरुस्थान अंतीं जगाचें तुझें, यांत शंका न कांहीं जरी ।
सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी ! तसें पाहिलें मीं न कोठें तरी ॥ ३ ॥
वारा तुझ्या स्पर्शनें शुद्ध झाला, मला लाधला भाग्य हें केवढें ।
मातें स्वयें देशि जें अन्नपाणी सुधा बापुडी कायशी त्यापुढें ।
तूं बाळगीशी मला स्कंधिं अंकीं, सुखाची खरी हीच सीमा जरी ।
सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी ! तसें पाहिलें मीं न कोठें तरी ॥ ४ ॥

---

## ४ वृक्षान्योक्ति.

श्लोक.

( शिखरिणी. )

फुलें आलीं नामी, मधुतर रसें पूर्ण भरलीं ।
सुवासें सौंदर्यें अनुपम जगामाजिं ठरलीं ।

अली आले, झाले मुदित रसपानें, तरुवरा।
नरां संतर्पीलें, परहितपरां तूं गुरु खरा ॥ १ ॥
फळें आलीं, आली विविधविहगाली तुजकडे।
क्षुधा तीची गेली, वदलि तुज आशीर्वच गडे।
कुणी काठी हाणी, कुणी दगड टाकी तुजवरी।
तरी सर्वां देशी स्वधन; मति मोठी तव खरी ॥ २ ॥
फळें गेलीं; आतां सहुन सगळा आतप शिरीं।
विसांवा श्रांताला निरविसि जरी निष्फळ तरी।
फळें, पानें, पुष्पें सकल तव तें वैभव सरे।
तरी तूझें वृक्षा! परहित सरेना, परि उरे ॥ ३ ॥
निजांगाचीं खांडें भयकर कुठारें कराविशी।
परासाठीं साधो! ज्वलदनलकुंडांत पडशी।
अहा! वृक्षा! लक्षावधि जनसमूहीं न दुसरा।
महात्मा हा ऐसा सतत इतरा अर्पित नरा ॥ ४ ॥

---

## ५ माझीं फुलें काय झालीं?

श्लोक.

(शार्दूलविक्रीडित.)

माझा मान, मदीय कीर्ति, मम हा संसार, हें जीवित।
विद्या, विक्रम, सर्व शर्म, जगतीं ज्यांच्याच हस्तंगत।
त्यांच्या पूज्य पदारविंदयुगलीं भूदैवतांच्या मम।
माझीं मीं निवडून अर्पिलिं फुलें अत्यंत चित्तंगम ॥ १ ॥
खालीं जीं उरलीं तयांतुन भलीं वेंचून मीं घेतलीं।
गात्रें हार तुरे करून अपुलीं सानंद शृंगारिलीं।
झालीं सर्व फुलें, उगाच उरला जो गाळ हो खालतीं।
त्यानें मीं समजाविले न गणती ते भीकमागे किती ॥ २ ॥

झालीं कांहिं विशीर्ण, कीं हरवलीं चोरीस गेलीं किती ।
कांहीं मूर्खपणें दिलीं अरसिकां साक्षाद्विनाशांप्रती ।
कांहीं मत्सररौरवांत पडलीं, तद्रूपता पावलीं ।
देवा ! त्वच्चरणांस वाहुं कुठलीं ? झालीं, फुलें संपलीं ॥ ३ ॥
झालों वृद्ध, अतां कसा फिरूं कुठे, आणूं फुलें कोठुनी ।
अर्पाया तुज ईश्वरा! विसरलों पापी तुला यौवनीं ।
घे ! घे ! एक मनःप्रसून उरलें ह्या देहपात्रासह ।
वाटो हें तुज वत्सला ! प्रभुवरा ! अत्यंत सौख्यावह ॥ ४ ॥

---

## ६ काय क्रौर्य हें !

### श्लोक.

(पृथ्वी.)

क्षणोक्षणिं पडे, उठे, परि बळें उडे बापडी ।
चुके पथहि, येउनी स्तिमित दृष्टिला झांपडी ।
किती घळघळां गळे रुधिर कोमलांगांतुनी ।
तशीच निजकोटरा परत पातली पक्षिणी ॥ १ ॥
म्हणे निजशिशूंप्रती ‘ अधिक बोलवेना मला ।
तुम्हांस अजि अंतिंचा कवळ एक मीं आणिला ।
करा मधुर हा ! चला ! भरविलें तुम्हां एकदा ।
करो जतन ह्यापुढें प्रभु पिता अनाथां सदा ॥ २ ॥
अहा ! मधुर गाउनी रमविलें सकाळीं जनां ।
कृतघ्न मज मारितील नच ही मनीं कल्पना ।
तुम्हांस्तव मुखीं सुखें धरुन घास झाडावरी ।
क्षणैक बसल्यें न तों शिरत बाण माझ्या उरीं ॥ ३ ॥
निघून नरजातिला रमविण्यांत गेलें वय ।
म्हणून वधिलें मला ! किति दया ! कसा हा नय ।

उदार बहु शूर हा नर खरोखरीं जाहला ।
वधून मज पांखरा निरपराध कीं दुबला ॥ ४ ॥
म्हणाल भुलली जगा, विसरली प्रियां लेंकरां ।
म्हणून अति संकटें उडत पातल्यें मी घरा ।
नसे लवहि उष्णता, नच कुशींत माझ्या शिरा ।
स्मरा मजबरोबरी परि दयाघना ईश्वरा' ॥ ५ ॥
असो; रुधिर वाहुनी नच भिजो सुशय्या तरी ।
म्हणून तरुच्या तलीं निजलि ती द्विजा भूवरी ।
जिवंत बहु बोलकें किति सुरम्य तें उत्पल ।
नरें धरुन नाशिलें, खचित धन्य बुद्धिबल ॥ ६ ॥

(वसंततिलका.)

मातींत ते पसरिले अतिरम्य पंख ।
केलें वरी उदर पांडुर निष्कलंक ।
चंचू तशीच उघडी पद लांबवीले ।
निष्प्राण देह पडला, श्रमही निमाले ॥ ७ ॥

---

# कृष्णाजी केशव दामले.

(केशवसुत)

## १ रांगोळी घालतांना पाहून.

### श्लोक

(शार्दूलविक्रीडित.)

होतें अंगण गोमयें सकलही संमार्जिलें सुंदर ।
बालार्कें अपुली प्रभा वितरली नेत्रोत्सवा त्यावर ।
तीची जी भगिनी अशी शुभमुखी दारीं अहा! पातली ।
रांगोळी मग त्या स्थळीं निजकरें घालावया लागली ॥ १ ॥

आधीं ते लिहिले तिनें रविशशी, नक्षत्रमाला तदा ।
मध्यें स्वस्तिक रेखिलें, मग तिनें आलेखिलें गोष्पदां ।
पद्में, बिल्वदलें, फुलें, तुळसही, चक्रादिकें आयुधें ।
देवांचीं लिहिलीं; न तें वगळिलें जें चिन्ह लोकीं सुधें ॥ २ ॥

होती मंजुल गीत गात वदनीं अस्पष्ट कांहीं तरी ।
गेला दाटुनि शांत तो रस अहा! तेणें मदभ्यंतरीं ।
तीर्थें, देव, सती, मुनी, नरपती, देवी तशा पावना ।
अंतर्दृष्टिपुढूनिया सरकल्या, संतोष झाला मना ॥ ३ ॥

चित्रें मीं अवलोकिलीं रुचिर जीं, काव्यें तशीं चांगलीं ।
त्यांहींदेखिल न स्मरेच इतुकी मद्वृत्ति आनंदली ।
लीलेनें स्वकरें परंतु चतुरे! तूं काढिल्या आकृती ।
त्या या पाहुनि रंगली अतिशयें आहे मदीया मती ॥ ४ ॥

रांगोळींत तुझ्या विशेष गुण जो आर्ये! मला वाटतो ।
स्पष्टत्वें इतुक्या अशक्य मिळणें काव्यांत चित्रांत तो ।
स्वभूसंग असा तयांत इतुक्या अल्पावकाशीं नसे ।
कोणीं दाखविला अजून, सुभगे! जो साधिला तूं असे ॥ ५ ॥

आदित्यादिक आकृती सुचविती दिव्यत्व तें उज्ज्वल ।
तैसें स्वस्तिक सूचवी सफलता धर्मार्थकामांतिल ।
पावित्र्याप्रत गोष्पदें तुळसही, शोभेस हीं सारसें ।
पुष्पें प्रीतिस, चक्र हें सुचवितें द्वारीं हरी या असे ॥ ६ ॥

तत्त्वें मंगल सर्वही विहरती स्वर्गीं तुझ्या या, अये ।
आर्ये! तूं उपचारिकाच गमसी देवी तयांची स्वयें ।
नातें स्नेह निदान ओळख जरी येथें मला आणिती ।
होतों मी तर पाद सेवुनि तुझे रम्य स्थळीं या कृती ॥ ७ ॥

चित्तीं कल्मष ज्याचिया वसतसे ऐशा जनालागुनी ।
या चिन्हांतुनि हा निषेध निघतो आहे, गमे मन्मनीं ।

'जा मार्गें अपुल्या, न दृष्टि कर या द्वाराकडे वांकडी।
पापेच्छूवारि हें सुदर्शन पहा आणील कीं सांकडीं ॥ ८ ॥
आहे निर्मल काय अंतर तुझें ? मांगल्य कीं जाणसी।
लोभक्षोभजयें उदात्त हृदयीं व्हायास कां इच्छिसी।
ये येथें तर, या शुभाकृति मनीं घे साच अभ्यासुनी'।
आर्ये! स्वागत हें निघे सरल या त्वल्लेखनापासुनी ॥ ९ ॥
साध्याही विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे।
नित्याच्या अवलोकनें जन परी होतीं पहा आंधळे।
रांगोळी बघुनी इतःपर तरी होणें तयीं शाहणे।
कोठें स्वर्गसमक्षता प्रगटते हें नेहमीं पाहणें ॥ १० ॥

---

## २ कचाप्रत देवयानी.

देवदानवांत नेहमीं युद्धें होत, तेव्हां दैत्यांचे गुरु शुक्राचार्य हे संजीवनी मंत्रानें आपल्या पक्षाकडील मेलेले वीर पुन्हा जिवंत करीत. देवांचे गुरु बृहस्पति यांना ती विद्या येत नव्हती. यामुळें देवांचा पक्ष लंगडा पडे. म्हणून बृहस्पतीचा मुलगा कच याला देवांनीं शुक्राचार्यांकडे संजीवनी विद्या शिकून येण्याकरितां पाठाविलें. तो गेला व मोठ्या कष्टानें त्याला ती विद्या लाभली. कृतकार्य झाल्यामुळें मग तो परत स्वर्गीं जाण्यास निघाला. तेव्हां शुक्राचार्यांची मुलगी देवयानी हिनें त्याला आपल्याशीं लग्न करण्याबद्दल विनाविलें. गुरुकन्येशीं लग्न करणें हा अधर्म असल्यामुळें कचानें ती गोष्ट नाकारिली. यामुळें देवयानीनें रागावून त्याला शाप दिला. कचानेंही उलट तिला शाप दिला. नंतर तो स्वर्गीं निघून गेला. देवयानीचें कचावर अत्यंत प्रेम असल्यामुळें, तो गेल्यानंतर तिला फारच दुःख झालें. त्या दुःखभरांत मागील आठवणी काढून ती कचाला उद्देशून बोलत आहे, असें या उताऱ्यांत दाखविलें आहे.

## आर्या.

लोटून दुःखपंकीं हा ! हा ! मज दीन घेनुलागून ।
प्रियसत्तमा कचा ! मज गेलास कसा सरोष टाकून ॥ १ ॥
भक्त स्वदेवतेचें प्रिय करितो, त्याहुनी विशेष गुणें ।
माझें प्रिय तूं पूर्वीं आचरिलें, पाडिलें न अल्प उणें ॥ २ ॥
तेणेंच द्विजराजा आसक्त कुमुद्वती स्वयें झालें ।
नेणें मग कैंचें हें प्राक्तन निर्घृण असें फळा आलें ॥ ३ ॥
झालासि कसा निष्ठुर एकाएकीं कचेश्वरा आर्या ।
प्रेमें बद्ध करुनि मज, भावी मग खंडिली कशी भार्या ॥ ४ ॥
विदित न तुज काय मदनुराग तुझ्यावरि कितीक होता तें ।
तुज तीनदां मदर्थेचि विहतातें जिवविलें अहा ! तातें ॥ ५ ॥
तो तूंच काय शेखीं, दुःखद उलटा असा जहालास ।
हालाहलहि न देइल ज्या दे हा शोक तीव्र हालास ॥ ६ ॥
आम्हीं परस्परां जरि निजजीवांहून अधिक आळविलें ।
अन्योन्यशप्त झालों,–हतदैवें विष सुधेंत कालविलें ॥ ७ ॥
अन्योन्यशप्त होतां, सजव निघालासि तूं निजस्थाना ।
रुष्टत्वें खिन्न वदन वळवुनि न बघें त्वदीय प्रस्थाना ॥ ८ ॥
कांहीं अवकाशानें दृष्टी गेली समोर तों नाहीं ।
तव रम्याकृति कोठें ! गमल्या मज शून्यशा दिशा दाही ॥ ९ ॥
तंव पश्चात्तापभरें नयनांतुनि टपटपां टिपें स्रवलीं ।
तंव मूर्तिच्या अहह ! ही अन्तिमदर्शनसुखास आंचवली ॥ १० ॥
काया कुरवंडावी ही ज्या जितमन्मथा ! तुझ्यावरुनी ।
डोळे भरूनि त्या तुज कोठें पाहूं अभागि मी फिरुनी ॥ ११ ॥
तुज शेवटीं विवादें बहु मी परुषोत्तरें अहह ! वदल्यें ।
आतां तीं परतुनि मम हृदयाला टोंचिती जशीं शल्यें ॥ १२ ॥
अश्रुक्लिन्नें नयनें सत्वर जर हीं अशींच मिटतील ।
तर तें बरेंचि होइल, तव विरहक्लेश सर्व फिटतील ॥ १३ ॥

घालून निराशेचें अंडें, आशा अहा ! उडुनि गेली ।
झाडून पंख त्यांवरि होतीं जीं ईप्सितें गिरविलेलीं ॥ १४ ॥
जें गुणनिधान दुर्मिळ किंबहुना देवकन्यकांनाही ।
तें माझें मी म्हणतां, विधिनें लाभूं दिलें मला नाहीं ॥ १५ ॥
सुरगुरुच्या सुतरत्ना ! तुजलागीं वरुनि धन्य मीं व्हावें ।
आणि मनीं धरिलें कीं, येथें मीं सुरपुरींहि मिरवावें ॥ १६ ॥
नन्दनवनांत कल्प-व्रतती-कुंजीं तुझ्यासवें गोष्टी ।
रसभरित आदराच्या; होती ही आस मानसीं मोठी ॥ १७ ॥
मन्दाकिनींत आपण जलकेलि करुनि, सुरद्रुमांखालीं।
सेवित सुधा बसावें, हाय! मनीषा निरर्थ ही झाली ॥ १८ ॥
मत्कृत-सारी-दुर्ग-भ्रंश-भयें चालिलासि हळु मागें ।
एक-नकोंर ध्वसिलें, मम आशाहर्म्य केविं तूं सांगें ॥ १९ ॥
येथें सदनीं किंवा पुष्पवनीं बहुत वस्तु आहेती ।
स्मारक तव, दिसतां त्या धृतिला होतात माझिया हेती ॥ २० ॥
यजनाचीं उपकरणें जीं ताताकारणें तुवां हातें।
द्यावीं तीं कां मजला मागे तो, होतसे असें मातें ॥ २१ ॥
चढुनि द्रुमीं फुलें तूं खुडिलीं परडी मदीय भरण्यास।
पुष्पित ते बघुनि म्हणें, व्यर्थ सुमें येति कां बरें यांस ॥ २२ ॥
लावियला दारीं तूं अशोक तो असुनि शोक देतो कीं ।
तो रक्त तूं विरक्त, द्वैध असें अधिक पाडितें शोकीं ॥ २३ ॥
भिंतींवरि रंगविलीं चित्रें चतुरें तुवां पुरा रुचिरें।
तीं बघतां तुजविषयीं उत्कण्ठा मन्मनांत शीघ्र शिरे ॥ २४ ॥
मग मी होउनि विव्हल, जाउनि एकीकडे कचा! रडत्यें ।
कढत्यें विरहाग्नीनें, अधोमुखी भूवरी विकल पडत्यें ॥ २५ ॥
असुरीं तुज वधितां मीं मागें केला रडून आकांत।
त्या वेळींही नाहीं झाल्यें इतुकी निमग्न शोकांत ॥ २६ ॥

त्या वेळीं पितयानें निजमंत्रें बाहतांचि आलास ।
मन्नेत्र पुसुनि मजला प्रेमें आश्वासिता जहालास ॥ २७ ॥
आतां मी भूमीवरि, दुःख करित लोळतां तुझ्याकरितां ।
येशी न कां? वद कशी हाय! तुझी आटली दयासरिता ॥ २८ ॥
यावा तुला कळवळा कंटक खुपतां मदीय चरणास ।
मग खेंचिलें उरीं मम, तूं केविं 'नकार' या प्रहरणास ॥ २९ ॥
अणुमात्र खेद होतां मजला झटलासि त्याचिया हरणीं ।
शोकीं कशी ढकलिली मग ही, दावानलीं जशी हरिणी ॥ ३० ॥
शोका! तुजला वरित्यें, मजला तूं प्रिय कचेंचि दिधलासी ।
मायेच्या पोटीं तूं दुर्विधिपासून जो उपजलासी ॥ ३१ ॥
शोक, हताशा, दुःखें, आतां मज हींच होत गणगोत ।
तूं त्यागितां कचा मज, सुखहेतु मुळीं समोरहि नकोत ॥ ३२ ॥
अथवा मी लावावे बोल तुला कां म्हणून बहुसाल ।
खिन्न मनीं आणावें दीन जनें भग्न आपलें भाल ॥ ३३ ॥
मम जनकाच्या उदरीं वास तुला घडुनिया नवें नातें ।
भ्रात्याचें जें जडलें तुझें मशीं, तूज मोडवेना तें ॥ ३४ ॥
धर्मज्ञ द्विज मज तूं बंधुसम, तुझ्यावरी मनीं काम ।
अजुनि धरुनि मी भकत्यें, हें उचित न खचित सज्जनीं काम ॥ ३५ ॥
परि वेड मला लावी अनुदिन बहु काल चिंतिला हेत ।
हृदयांत मुळें त्याचीं गेलेलीं फार खोल आहेत ॥ ३६ ॥
करित्यें विवेक बहु, परि ठसली तव मूर्ति आंत जी कांत ।
भ्रान्त मला ती करिते, कांपविते सर्व मन्मनःप्रांत ॥ ३७ ॥
अक्षांची माळ तुझी घेउनिया, तेविं तव मृगाजिन तें ।
बसुनि वनीं तप वाटे साधावें, त्यजुनि येथल्या जनतें ॥ ३८ ॥
तूं मी वसलों येथें, एकत्र म्हणून येथ ठरवेना ।
परि तातस्नेहें मज पाउल येथून दूर करवेना ॥ ३९ ॥

'तुज कोणीहि न ऋषिसुत वरिल' असा शाप तूं दिला मातें।
परि ऋषिसुत वा नृपसुत कोणी नलगे मला वरायातें॥ ४० ॥
रत्नाला मुकल्यावरि कोण गणिल लाभ कांच सांपडणें।
भग्न हृदय मम झालें, संसारसुखीं नको मला पडणें॥ ४१ ॥
मग आणखी विधीनें न कळे लिहिलें असे शिरीं काय।
होऊ होणार तसें, पुनरपि न म्हणेन मी मुखें 'हाय'॥ ४२ ॥
कटु वदल्यें शाप दिला, जा हें, पूर्व स्मरून, विसरून।
करुणासिंधो! बंधो! विनवितसें हेंचि पदर पसरून॥ ४३ ॥
'बंधो!' हें संबोधन तुज देतां खेद मन्मना वाटे।
आकळितांही शोका, जल चाले अहह! लोचनां वाटे॥ ४४ ॥

---

## काशिनाथ हरि मोडक.

(माधवानुज)

### १ दीप-विसर्जन.

श्लोक.

( भुजंगप्रयात. )

करीं आरती घेउनी आर्यबाला। त्वरें पातल्या नर्मदेच्या तटाला।
करूनी तयांनीं सरित्पूजनाला। प्रवाहीं दिली सोडुनी दीपमाला॥ १ ॥
अहा! काय शोभा वदूं त्या क्षणाची। तृषा शांत झाली मदीयेक्षणांची।
तदा अस्तगामी जरी अंशुमाली। मला वाटलें यामिनी काय झाली॥ २ ॥
सरित्पात्र तें स्वच्छ तैसें विशाल। तदा भासलें कीं दुजें अंतराल।
तती त्यावरी शोभली दीपिकांची। उदेली जणों पांक्ति कीं तारकांची॥ ३ ॥
जशी अंतरिक्षीं फिरे चंद्रकोर। प्रवाहीं करी रम्य नौका विहार।
नभीं स्वैर संचारती मेघखंड। जलीं खेळती वीचि तैशा उदंड॥ ४ ॥
अशी दिव्य शोभा पहातां पहातां। मनीं शांत झालों, लया जाय चिंता।
क्षणीं सूचली कल्पना एक चित्ता। असे सर्व सृष्टीस जी मूलभूता॥ ५ ॥

दिले सोडुनी दीप जैं बालिकांनीं । दिला सारखा वेग सर्वां तयांनीं।
तयांची स्थिती तत्क्षणीं भिन्न झाली । वरी दृश्य कोणी, कुणी जाय खालीं ॥६॥
कुणी गुंतुनी राहिले भोंवऱ्यांत। जलौघासवें जाय कोणी वहात।
तयांतील कांहीं तटा अन्य गेले। पुढें जाउनी अल्प मार्गेचि आले॥ ७ ॥
जसे दीप तैसे असंख्यात जीव। प्रभू निर्मितो थोर ज्याचा प्रभाव।
तयां सोडुनी देत कालप्रवाहीं। वहाती तदोघासवें सर्व देही॥ ८ ॥
कुणी रंक होई, कुणी होय राजा । दुजा देखणा हो, तिजा हीनतेजा।
कुणी मूर्ख होई, कुणी हो शहाणा। कुणी धैर्यशाली, कुणी भ्याड जाणा॥ ९ ॥
तसें कां करावें? असें मी करीन। वृथा वल्गना मानवाच्या अजाण।
स्थितीचा असे किंकर प्राणिमात्र। स्थिती त्या करी पात्र किंवा अपात्र ॥ १० ॥
जरी राहिलें नर्मदातीर दूर। जरी आज बाला न दृष्टीसमोर।
स्मरोनी तरी दीपसर्गप्रसंग। भरे हर्षयोगें क्षणीं अंतरंग ॥ ११ ॥

---

## २ मूर्तिकार.

### दिंड्या.

दृष्टि फेंकित आपुली सभोंवार । फिरत असतां स्वच्छंद मूर्तिकार ।
शिला दिसली मार्गांत भव्य त्याला। बघुनि तीतें थांबला मुग्ध झाला॥ १ ॥
मूर्ति होती प्रच्छन्न शिलेमाजीं । मूर्तिकारा मात्र ती दिसे आजी ।
दिव्यदृष्टी कविचित्रमूर्तिकार । सहज येतें त्यां कळुनि वस्तुसार ॥ २ ॥
कशी आणूं मूर्ति ती व्यक्ततेला । विचारीं या तो कुशल मग्न झाला ।
पुरें जाणुनि तद्रूप कल्पनेनें । करी सुस्थिर तें शांत चिंतनानें ॥ ३ ॥
करीं एक्या टांकीस वरुनि वेगें । शिलेवर तो आघात करूं लागे ।
स्वकर्तव्यीं संलग्नचित्त होत । इतर सारें विसरला वस्तुजात ॥ ४ ॥
करायाचें ज्या असे महत्कार्य । वचन त्यानें हें सदा शिरोधार्य ।
जरी उत्तम वाटतें कार्य व्हावें । स्वकार्यातें सर्वस्व तयें द्यावें ॥ ५ ॥
शिलेवर जे हळुहळू होत घाव । दिसूं लागे सत्वरीं तत्प्रभाव ।
रूप पूर्वीचें जाउनी लयाला । शिला लागे साकार दिसायाला ॥ ६ ॥

दूर सारे जैं मलिन मेघ होती । रम्य तारे चमकती नभःप्रांतीं ।
शिलाशकलें त्यापरी निघुनि गेलीं। सुभग सत्वर बाहेर मूर्ति आली ॥ ७ ॥
मूर्तिकारें काढिली शिलेंतूनी । मूर्ति सुंदर संपन्न अवयवांनीं ।
तीस पाहुनि कृतकृत्य मनीं झाला । हर्षरंगीं नाचला, गृहा गेला ॥ ८ ॥
सफल होती सद्यत्न मानवाचे । हृदय त्याचें तैं हर्षभरें नाचे ।
शीण सत्वर सर्वही लया जाई ॥ कार्य करण्या सामर्थ्य नवें येई ॥ ९ ॥
त्याच ठायीं मग एक भक्त आला । मूर्ति पाहुनि चित्तांत फार धाला ।
रम्य मंदिर बांधूनि एक तेथें । मूर्ति नेउनि ठेविली तयें हातें ॥ १० ॥
शिला पूर्वीं जी एक रूपहीन । तीस देऊं लागले लोक मान ।
विजन होती जी भूमि एककालीं । तीच पुण्यक्षेत्रभू पुढें झाली ॥ ११ ॥
क्षुद्र दगडा देवत्व द्यावयाचें । असे मनुजा ! सामर्थ्य तुझें साचें ।
कसा दीनाहुनि दीन असा होसी । मूर्तिकाराचा कां न धडा घेसी ॥ १२ ॥
तुझ्या मार्गीं जे दगड आड येती । घाव त्यांवर आपुल्या घाल हातीं ।
काढ त्यांतुनि रमणीय दिव्य मूर्ति । करिल मग ती तव सर्व कामपूर्ति ॥ १३ ॥

---

# बाळकृष्ण अनंत भिडे.

## १ ईशस्तुति.

श्लोक.

( पृथ्वी. )

जणुं प्रळय-वायुची मिरवुनी अजी थोरवी ।
सुटे प्रबळ दक्षिणानिळ सहेल सों सों रवीं ।
प्रचंड करि गर्जना जळनिधी, भया हेतु जी ।
अतर्क्य-बळ तूं प्रभो ! सकळ हीं स्वरूपें तुझीं ॥ १ ॥
भयप्रद पयोद हे अति गभीरधीर-स्वन ।
नभीं विचरती, क्षितीं विखरिती तमातें घन ।

परि प्रभुवरा! जनावन-परा! करी त्वद्दया ।
अशाहि समयांत या त्रिजगदन्न-बीजोदया ॥ २ ॥
विपन्न जनता लवे, धृति-महा-गिरी खालवे ।
श्रमांत मन कालवे, प्रखर तेजही मालवे ।
परी तव कृपा-लवें तरु विशुष्कही पालवे ।
सुधा-गुण हलाहलीं त्वदितरा कुणा घालवे ॥ ३ ॥
कला-कुसरि लोपली, गुण-विशालता झोंपली ।
रमा अदय कोपली, चतुरताहि आटोपली ।
जनांस तारि जागृती, क्षितिपतींस दे सन्मती ।
सुशिक्षण मिळो प्रभो! बहुगुणी जयें जन्मती ॥ ४ ॥
मतैक्य न दिसे कुठे, नवनवे किती पक्ष ते ।
ऋजुत्व जन-वर्तन-स्थितिंत या कसें रक्षतें ।
म्हणून सुगुणप्रभो! हृदय संभ्रमें गांगरे ।
चिदंश वितरीं तरी, पथ बरा खरा सांग रे ॥ ५ ॥
कितीक जन भासती घन रसाल शुद्धांतर ।
गभीर-रव गर्जती, चपळ-धी स्फुरे भास्वर ।
परि भ्रमवि तो तयां स्वहित-वात कीं घातकी ।
तयां स्थिर करीं प्रभो! भरत-भूमि होऊ सुखी ॥ ६ ॥
निबद्ध जन रूढिच्या असति नाग-पाशाकरीं ।
समाज-हित-साधनीं स्थिति अशी निराशा करी ।
तरी गरुड-वाहना! विकळ-मोचना! धांव गा ।
अशा स्थितिंत तूं सगा; तुजविणें न दीना लगा ॥ ७ ॥
मनीं धरुनि हौस हें तव लहानसें लेंकरूं ।
धजे कशिबशीच सप्रणय काव्य-सेवा करूं ।
मिळेल यश, भो प्रभो! मज; असोनि अज्ञान मी ।
जरी तुज चिदुद्भवा! करुणपूर्ण-सुज्ञा नमीं ॥ ८ ॥

---

## २ गर्व व काळ.

श्लोक.

( शार्दूलविक्रीडित. )

बुद्धि, द्रव्य, कुल, प्रताप, पदवी, प्रौढी वृथा सर्वदा।
येतां तो प्रतिकूळ काळ, ढळवी अभ्रंकषां पर्वतां ।
ऐश्वर्यद्रविणोपभोग अवघे आहेत हे बुद्बुद।
मृत्यूचा अगदीं समीप निवसे नक्तंदिनीं जासुद ॥ १ ॥
पाहे मृत्यु न रंक, राव, अथवा दारिद्र्य वा वैभव ।
येतां काळ तया निवारिल असा कोणी नसे मानव।
मृत्यूची अनिवार्य चाल जगतीं, ती कोणता आडवी।
तो दण्डध्वजचामरादि निमिषें धूळीमधें पाडवी ॥ २ ॥
कोणी धीर गभीर वीर अपणा युद्धांत नांवाजवी।
खड्गातें परजोनि जो अरिमुखीं दंतावळी वाजवी।
त्याचेंही परि चंडदंडयुग तें निस्त्राण होतें लुलें।
काळाचीं थरकांपकारक यदा तीं वाजती पाउलें ॥ ३ ॥
संमानें जन आदरून तुमची गाती स्तुती संप्रती।
सत्कृत्यास्तव भूषवून तुमच्या माळा गळां घालती।
ही कोमे परि माळ काळवश हो! आहोंत सारे जण ।
कर्तव्यास करा, परी मिरविणें हें व्यर्थ मोठेपण ॥ ४ ॥
ज्यांची सत्कृति, शौर्य, दान, सुमति प्रख्यात होती जनीं।
त्यांची विस्मृति आज हाय! पडली लोकां, स्मरा हें मनीं।
कालोपद्रुत विश्व सर्व, मग हीं गर्व, प्रसिद्धी, यश।
कोठें होत निरूढ? मूढ मनुजा! होई न आशावश ॥ ५ ॥

आईनें केलेलें

## ३ मुलाचें कौतुक.

(तोटकवृत्त.)

छबडें मम सर्व असे धन हें, हृदया मृदु नाजुक बंधन हें।
जरि नाजुक बंध फुलासम हा, तरि दे हृदयास बलास महा ॥ १ ॥
जरि जीव लहान सखे! गमतो, सदनाश्रय होय मनोरम तो।
शिशुमूर्ति लघू, परि हीजवरी, झुलतोंचि अम्ही भ्रमरभ्रमरी ॥ २ ॥
चिमणा विखरी सुख हा भंवतें, मज भूकतहान न जाणवते।
मम वृत्ति समस्त इथे रमती, विसरे दुसरें तइं भान मती ॥ ३ ॥
ऋजु नासिक, वर्तुळ तोंडवळा, नयनांतिल निस्तुळ दीप्तिकळा।
मुख मुग्धमनोरमता मिरवी; तिकडीलचि हा वळणा गिरवी ॥ ४ ॥
कमलोपम लोचन, वर्ण भला, शुचि भाळ विशाळ, भुजा सरला।
तिकडील शिशूपणचेंच गडे! जणुं रूप नवें नजरेस पडे ॥ ५ ॥
किति देह मऊपण भासवता, जणुं रेशिमचेंडुच हा सवता।
मृदु चंचळ जावळ भुर्भुरतें, बघुनी स्वमनीं चमरी झुरते ॥ ६ ॥
शुचिगौरशिरश्चलनावसरीं, लघु पिंपळपान लखाक करी।
भंवती कच कोमल चांचरती, जणुं त्याजसवें झगडा करिती ॥ ७ ॥
धरि भाळ, कपोलहि, कृष्ण टिळा; कनकाद्रिशिरीं जणुं नीळशिळा।
रमतां चिमणा मृदुहासरसीं, विकसे नव पद्म सुधासरसीं ॥ ८ ॥
नयनीं चमके किति चापळ! ते, जणुं मीन जळीं गमती पळते।
मधुरास्फुट तन्मुख जें वदतें, मज होय अनंतसुखास्पद तें ॥ ९ ॥
दुडु रांगत हा भ्रमण्याचि कला, नुकता चपलांग असे शिकला।
सहसा निसटून, हंसून, पळे, मज घाबरवी बरवी, न वळे ॥ १० ॥
कधिं आणुनि डौल, करां चरणां, जणुं टाकित, मेजित तालगणा।
वळवून मुखा परि पाठिवरी, वनकेसरिची परिपाठि वरी ॥ ११ ॥
गुडघे, कर, मस्तक, केश, गळा, भरुनी निजदेह रजीं सगळा।
मम अंकतळीं घुसुनी निकरीं, वसना मळवी, मन फुल्ल करी ॥ १२ ॥

किति धूळ मुखावरतीं उधळी! अमृतांशु लपे जळभृत्पटलीं ।
अथवा उदयीं रविमंडळ तें, कवळून धुकें स्वकरीं मळतें ॥ १३ ॥
बघतां बघतां नयना चकवी; ठकतो बघतां शिशुनांच कवी ।
हुडकीं जरि मी, गवसे न, मग, कटिकिंकिणिनाद करी उमग ॥ १४ ॥
उदयीं घुसळीं नवनीत, तरी, पुढतीं बसला रविदोर धरी ।
जणुं देवकिचा सुत अष्टम हा, हरि संहरितो मम कष्ट महा ॥ १५ ॥
जलपात्र बघून तयावरतीं, जडते बहु बालविनोदरती ।
जलताडनचालित अंबुकणें, नटवी तनुला जणुं मुक्तगणें ॥ १६ ॥
जलबिंदु जयाभंवतीं खुलती, मुख तें बघुनी नयनें भुलती ।
भरतें हृदयाब्धिस येत महा, दिसतां उडुवेष्टित चंद्रम हा ॥ १७ ॥
कधिं दीपशिखेवर झेंप करी, अलिसा नलिनीकलिकेउपरी ।
करितांच निवारण मी पळतो; दुखवी, सुखवी, मजला छळ तो ॥ १८ ॥
क्षण एक सुखीं स्वमुखीं स्तन घे, मग मद्वदना क्षण एक बघे ।
अरुणोष्ठ पुढें स्फुरतां, हंसतां, अरुणाब्ज दिसे जणुं उल्लसतां ॥ १९ ॥
रदनांकुर भूषविती वदना, गमतें मणिमांदुसतुल्य मना ।
बघतां न पुरे मनिंची उकळी, रुचि अद्भुत येइ पळानुपळीं ॥ २० ॥
इतुक्यांत कपोलतलावरतीं, स्तनजातपयःकण पाझरतीं ।
जणुं विष्णुपदी जलबिंदु खरी, कदलीकनकाभदलीं विखरी ॥ २१ ॥
करितां स्तनपानहि एक करीं, कवळून गळ्यांतिल एकसरी ।
मृदुलांकुरसन्निभ अंगुलि त्या, मज हांसविती गुदुल्या करित्या ॥ २२ ॥
हंसतां, करितां चिमणा सलगी, पडते सुकपोलतलीं खळगी ।
जणुं चंद्रम पूर्णकला वरतो, हरिणांक विराजतसे वर तो ॥ २३ ॥
असतां सदनीं तिकडे, सखये! छबड्यास महोत्सव सन्मुख ये ।
लडिवाळपणें उसळे, खिदळे, करि अंगलटीस गुलाम बळें ॥ २४ ॥
तिकडे बिलगे, मग हा मजला, बिलगे, पळण्यास पुन्हा सजला ।
कलहंससुदंपतिमध्यग हें, जणुं हेलवतें दलदब्ज महें ॥ २५ ॥

प्रतिवारहि दृष्टिस काढितसें, तरि चित्त सये! भय पावतसे।
प्रभु यास सुखांत सदा वसवो, शुचि उन्नत हा कृतिला प्रसवो ॥ २६ ॥

---

## ४ दुर्योधनास अर्जुनाचा जबाब.

पांडवांनीं बरीच पड खाऊन दुर्योधनास कळविलें कीं, 'जरी तूं आम्हांला पांच गांव दिले, तरी आम्ही संतोषानें राहूं.' परंतु दुर्योधनानें तसें न करितां उलट प्रतिज्ञा केली कीं, 'सुईच्या अग्राएवढीही जमीन पांडवांस मिळणार नाहीं!' व कृष्ण आणि पांडव यांत बिघाड पाडण्याचा प्रयत्न करून पांडवांस भिवविण्याकरितां संजयाबरोबर एक अत्यंत उद्धट निरोप पाठवून त्यांस युद्धाचें आव्हान केलें. यावर अर्जुनानें जो बाणेदार जबाब दिला, तो पुढील आर्यांत गुंफिला आहे.

आर्या.

आधींच तप्त होता क्लेशें गांडीवधर अगाध मनीं।
तत्क्रोधाग्निज्वलनीं रिपुवाणी त्यांत होय ती धमनी ॥ १ ॥
करुनी नयन असे कीं हीनद्युति रक्त-कंज यापारिस।
अर्जुन गर्जुन बोले 'नयनिपुण गुणाढ्य संजया! परिस ॥ २ ॥
असतां सन्निध तो, जो वांछी मज सूत कर्ण झगडाया।
हाणीं मम वाक्टंका अंधसुता जडकठोर दगडा या ॥ ३ ॥
गोपाळ-पांडवांचा योग, करूनी उपाय, तोडावा।
म्हणुनी दुर्योधन हा गुप्तपणें विविध मांडितो डावा ॥ ४ ॥
यानें ये मज, जैसें रवितेजोविरहचिंतनें हास्य।
हिणवाया मंद परा यततो मळवून आपुलें आस्य ॥ ५ ॥
परिमळ-सुम, कीं गोडी-मधुरस, कीं तेज-दीपकज्योती।
कीं भक्त-देव, सांगें कोण्या यत्नें विभक्त हीं होती ॥ ६ ॥
कपटप्रयोग करितो, मर्मच्छिद बोल बोलतो कितव।
ते परि केशव-पांडव यांत न करितील संजया! फितव ॥ ७ ॥

आम्हांसि विभांडाया जे जमवी भक्तयोध नर समरीं ।
त्यांसह हा मूढ गणो मद्बाणीं व्यक्त-योधन-रस मरी ॥ ८ ॥
जरि अंधपुत्र अर्पिल न न्यायें भू अजातरिपुराया ।
खणिली गर्ता त्यानें आत्मा सकुळ स्वतां तारि पुराया ॥ ९ ॥
अजमीढकुलज धर्मा देतां भू, यन्मती उलट पडती ।
त्याच्या पूर्व अघांची पुरती होणार आजुनी झडती ॥ १० ॥
जे न खवळले, सतिच्या जैं हिसडी अघखानिखळ निरयांतें ।
ते हे पांडव नाहीं; उलथूं शठ आज निखळ निरया ते ॥ ११ ॥
कपटानें आकळिले, छळिले, खिळिले मृगेश चापांत ।
तेच स्वतंत्र होतां, चुकती करितां न शत्रुचा पात ॥ १२ ॥
रे संजया! स्ववदनें मूढें प्रज्वळुनि खादिरांगारा ।
आंगा 'राखो' म्हणुनी लिपतां, तो होय शीत का गारा ॥ १३ ॥
युयुधान, भीम, मी यम, पांचाळ, रमेश जो गजा तारी ।
या नरहरींसह यदा समरीं ठाकेल हा अजातारी ॥ १४ ॥
तेव्हां ओढवलें बा! पूर्व दुरित घोर धार्तराष्ट्रांचें ।
धूळिंत निजतिल पशुसम, हे दुष्ट पती क्षतार्त राष्ट्राचे ॥ १५ ॥
जीं जीं पूर्वीं केलीं तीं तीं दुरितें समस्त फळतिल कीं ।
'पेराल तेंच उगवे' हें तत्व दिसेल लिखित खळतिलकीं ॥ १६ ॥
सामें झालें असतें तुष्ट हतबळां नरांसम ग्रामीं ।
परि दुर्योधनयुद्धें गणितों लब्धा धरा समग्रा मी ॥ १७ ॥
हांकून वनीं धर्मा जो निजवी शुष्कपल्लवावरतीं ।
गृध्र रणीं टोंचुन तो दुर्योधन मलिनगल्ल वावरती ॥ १८ ॥
ह्रीज्ञानतपोनिग्रहधृतिधर्मौदार्ययुक्त पंच कसे ।
हे पांडुपुत्र केलों, कुर्वधमें हद्दपार वंचकसे ॥ १९ ॥
होता कपटी रिपुच्या मोहक वचनांत भरंवसा याचा ।
म्हणुनी अकपट धर्मा ये समय वनांत भर वसायाचा ॥ २० ॥

परि हा धर्म न पूर्वील गाजत हा आजकाळ राजवर ।
पुरतें उसनें फेडिल, जें ज्यांचें सोसिलेंचि आजवर ।। २१ ।।
धर्माचा विमल यदा हृदयीं कोपाग्नि कोंडला वायां ।
उसळेल, तदा कौरव लागेल धुळीस तोंड लावाया ।। २२ ।।
धर्माचा क्रोधदहन उबविल जैं भीष्मग्रीष्मतरणीतें ।
करणीतें आठवुनी रडतिल, पडतिल कुरू हत रणीं ते ।। २३ ।।
भीम क्रोधविषातें वमतां तळपेल जैं गदापाणी ।
अंतकधामा बघते कुरु नयना आणितिल तदा पाणी ।। २४ ।।
भीमकरीं कठिण गदा इंद्राशनि-शनिगति-स्वसा राहे ।
जैं गिरिकूटोपम गज रज करुनी दाविल स्वसारा हे ।। २५ ।।
जैं वाहेल कुसुंबी अरिकुंभीमांसकर्दमा सरिता ।
तैंच क्षतहत कुरुंचा रणमद होणार हा रिता सरिता ।। २६ ।।
परशुधर तरूंस वनीं, किंवा करिवर सरांत नलिनांतें ।
भीम तसा खंडिल खल-बल-शीर्षांतें रणांत मलिनांतें ।। २७ ।।
खलबल भीमक्रोधा शुष्क तृण जसें महोग्र वणव्याला ।
पश्चात्तप्त न होतो मूषक गांठूनिया कवण व्याला ।। २८ ।।
अनयें बुडतां खळधी जळधींत तरे न भग्ननौफलकें ।
रणवातें पडतिल हे आपज्ज्वालेंत तूलसे हलके ।। २९ ।।
सहदेवनकुल यांशीं लढतां येतिल कुरूंस नव नाकीं ।
नव नाकीं यश आम्ही मिरवूं, खळ निरवुं मृत्युभुवना कीं ।। ३० ।।
श्रीकृष्णाचा भाचा मत्सुत बाणें करील आंधारी ।
अश्रुस्नपिता, मलिना कलिनाशें विव्हळेल गांधारी ।। ३१ ।।
धृष्टद्युम्नविराटद्रुपद असे वीरवर असामान्य ।
आम्हां सहाय असतां, कौरव कां म्हणति रण असा मान्य ।। ३२ ।।
छेदुनि कुसंगशस्त्रें आधार विचारसारबंधाचा ।
रणसं[illegible] वसविता पद साजे सार्थ पुत्र अंधाचा ।। ३३ ।।

समरोद्भट सात्यकिला, वज्रधनुष्पाणि-वृष्णिकुलतिलका ।
बघुनी न कौरवांचे नामांकित वीरहीर उलतिल का ॥ ३४ ॥
त्रिजगन्मोहन झाडी जो दैत्यांच्या सलील दृढ माजा ।
राजा विश्वगणाचा, मधुसूदन सांवळा सखा माजा ॥ ३५ ॥
शिशुपालकंसहंता जो उखळी सकळखळबळाहंता ।
विश्वभवस्थित्यंता करिता, ज्या भजकसक्ति अत्यंता ॥ ३६ ॥
स्वभजकरक्षण-लक्षण-दक्ष जरी तो धरी न हातेरा ।
हातें राखी सुष्टा, दुष्टा करुनी दवांत पातेरा ॥ ३७ ॥
कंदर्पकोटिसुंदर, कुंदरदन, वदन सदन तेजाचें ।
तें जाचे रविसोमा संतत, अकलंक भासतें ज्याचें ॥ ३८ ॥
तो लक्ष्मीपति ज्यावर शोभे वाग्दोर आकळोन करें ।
ज्यानें बळजळधीला ढवळावें चपळगति जसें मकरें ॥ ३९ ॥
शशिबिंबाचा सोलिव गाभा, कीं धवल शैल कैलास ।
कीं शंकरहास्य, तसे हय ज्याचे विलसतात सविलास ॥ ४० ॥
बघतां दृष्टि न ठरते भ्रमतां जो चपळ दामिनीभानें ।
ज्या जाणावें केवळ चक्रकृतगभीरधीरनादानें ॥ ४१ ॥
ऐशा विजयरथाच्या नीडीं मांडून अचळसें ठाण ।
या गांडीवें खरतर सरसर सोडीन दाहकर बाण ॥ ४२ ॥
गर-धर-वर-से परहर शर पुरविति, हीन जे क्षयें, भाते ।
सण सण सण सण सुटतां करितिल विच्छिन्न नरहयेभांतें ॥ ४३ ॥
हृदयीं घुसतां नेटें विशिख, जसे वारुळांत कालाही ।
काय कुरुकथा तेथें ? चळ चळ येईल कांप कालाही ॥ ४४ ॥
जा, सांग आंधळ्याला, ‘आवर सुत, तद्विनाश ठाके वा ।
साधूंपुढें न दे या मिरवूं पुण्याविना शठा केवा’॥ ४५ ॥
लोभाला लोभ, तसा क्षोभाला क्षोभ देतसों आम्ही ।
सामीं सुख न जयाला, त्याला भेटों सुखेंचि संग्रामीं ॥ ४६ ॥

जो कल्पवृक्षमूळीं बसुनी इच्छिल चढावया शूळीं ।
तो आत्मसौख्यतूळीं अग्नी ओतुन करील रांगूळी ॥ ४७ ॥
ये, ये, अंधसुता! ये, होमाया आत्म नवनवति भाऊ ।
अंधा, गांधारीला सुतशोकाचा बरा भरिंव खाऊ ॥ ४८ ॥
भीष्मद्रोणामरतरु विटवुनि, ज्या हंत! सभ्रम भ्रमरें ।
समरविषम-विषकुसुमीं या केली झेंप, तो न काय मरे ॥ ४९ ॥

---

## ५ भीम व युधिष्ठिर.

पांडव वनवासाचें दुःख भोगीत असतां एके दिवशीं द्रौपदी धर्मराजास बोलतां बोलतां म्हणाली, ज्या दुष्टांनीं माझा अन्यायानें इतका छळ केला, आपलें सर्व वैभव कपटानें हिरावून घेतलें, व आपल्या शूर बंधूंसह व भार्येसह आपल्याला वनवासाचें दुःख भोगायला लावलें, त्यांची खोड मोडावी असें आपल्या मनामध्यें अगदींच कसें येत नाहीं? क्षत्रियाला असलें हें वर्तन शोभतें का? या तिच्या भाषणानंतर धर्म सत्याचे, प्रतिज्ञेचे, क्षमेचे गोडवे गाऊं लागून द्रौपदीची समजूत करूं लागला. तेणेंकरून द्रौपदीची समजूत तर झाली नाहींच, पण भीमालामात्र अनावर राग आला. नंतर धर्मराजाला उद्देशून त्यानें जें भाषण केलें, तें या उताऱ्यांत आहे.

श्लोक.

(स्रग्धरा.)

ती वाणी द्रौपदीची परिसुनि हितदा अर्थगंभीर साची ।
वीची भीमांतरांत प्रबळ उसळली त्या द्वितीया रसाची ।
त्याचे क्रोधानलानें नयन दहुनिया जाहले लाल गोल ।
धर्मा तो भीमकर्मा सुनयमय असे बोलला बोल खोल ॥ १ ॥
"स्नेहानें वीरपत्नी द्विषदपकृतिनें दाहुनी अंतरीं ती ।
तूतें जी बोलली ती हितकर नृपते! होय अत्यंत रीति ।

वाटे ऐशी सदुक्ती ललितपदमया दुर्वचा गीष्पतीला।
पावेना विस्मयाला सहृदय जगतीं ऐकुनी कोण तीला ॥ २ ॥

जो गा होय प्रसंगीं उचित, विषमही सेविणें त्या नयातें।
जैसें तीर्थीं सुभक्तें विषममलिनही इष्टदोदाशयातें।
राजा! लोकीं मला तो जन परि दिसतो दुर्लभ श्रेष्ठ-सत्त्व।
जो स्नेहें कृत्यमार्ग प्रकट करुनिया दाखवी निःस्पृहत्व॥ ३ ॥

जे पूर्णक्षीणवीर्य, प्रथम कडुपणें त्यांस देतात जाच।
अंतीं धर्मा! क्षितींद्रा! मधुर वितरिती जीं परि सौख्य साच।
ऐशा दिव्यौषधांच्यासम मज गमती द्रौपदीचे सुबोल।
जे थोडे मोजकेची असुनि, गुणगणा दाखवीती अमोल ॥ ४ ॥

ही वाणी रत्नखाणी रुचिरगुणमया अर्थभांडार, राया।
तूतें आतां रुचो ही, उचित न हिजला शंकणें स्वीकराया।
ज्ञानाढ्य प्राज्ञ पाही वचन-गुण सदा; आदरें त्यास घेतो।
वक्ता कोणी असोही शिशुजन अथवा स्त्री; न त्यासी बघे तो॥ ५ ॥

साऱ्या विद्या चतुष्का कवळुनि विषयीं शोभली जी अनेकीं।
प्रौढा, तीक्ष्णा, प्रगल्भा, विमल, नरपते! जाहली जी विवेकी।
ती आतां त्वन्मती कां, हतबळविकळा होतसे लोकनाथ।
जैशी चापल्यपूर्णा अवचित करिणी आडली कर्दमांत॥ ६ ॥

शत्रूंनीं दुष्टबुद्धी कपट करुनिया धाडिलें तूज रानीं।
राणी-बंधूंसवेंची; किति विधुर-दशा! काय ही मानहानी।
राया! पूर्वीं सुरांनीं प्रमुदित मतिनें गाइलें जें अमोप।
त्याचा कां या प्रसंगीं अवचित घडला पौरुषाचा विलोप॥ ७ ॥

शत्रूंचा थोर होतो उदय; मग कशा आपणा जीवनाशा।
तेजोभंगाहुनी बा! नरवर वारितो शाहणा जीव-नाशा।
देणारा होय वीर्यक्षय अमित जरी संपदे, तोख राया।
तो दे वीरा न एक क्षणहि, नित परी कंप देतो खरा या॥ ८ ॥

शत्रूंची थोर युक्ति प्रबळ निजफळा लाभणारी अशंक।
देणारी आपलीही परि नियतपणें दुर्यशाचा कलंक।
ऐसें जेव्हां विचारा करुनि सुकृतिला वाटतें, तैं अपाय।
सोसोनी स्वस्थ राही, विपरित दिसतां योजितो तो उपाय॥ ९॥

वर्धिष्णु प्रौढशक्ति प्रकट निरखुनी शत्रुची भासुरा जे।
निर्वीर्य स्वस्थचित्तें बसति हतमती काय ते सासु राजे।
'झाली लक्ष्मी अशा या विकळबळ नृपा रक्तचित्ता वराकी'।
ऐशा लोकापवादा भिउनि जणुं तया श्री त्यजी क्षमावरा कीं॥ १०॥

कष्टावस्थेस गेला, सकळ विकळ जो जाहला क्षीणकाय।
दावाया आत्मतेजःप्रकृति नृप परी योजुनीया उपाय।
जो लोकीं पूर्ण पावे पुनरपि उदया, त्या प्रणामा करीती।
जैसे चंद्रा बिजेच्या सविनय अवघे; ही असे लोकरीती॥ ११॥

स्वप्राणा-तुल्य मानी, प्रिय निज यश जो, वीर्य-धी स्वाभिमानी।
उच्चस्थानीं चढाया सतत जगतिं जो इच्छितो निश्चयांनीं।
त्याला लोकांत नीच स्थितिंतुनि उठण्या साधण्या आत्मकार्या।
नाहीं रे! पौरुषातें त्यजुनि इतर तो योग्य आधार आर्या॥ १२॥

(शार्दूलविक्रीडित.)

ज्याचें पौरुष नष्टलें, त्वरित त्या जाचे जगीं आपदा।
जो आपन्न तयास आयु पुढिलें सोडूनि जातें सदा।
आसन्नक्षय जो सदैव, लघुता येते तयाचे घरीं।
सेवी ज्यास जगीं न मान, न तया देवी नृपश्री वरी॥ १३॥

(भुजंगप्रयात.)

अनुद्योगिता आड ये उन्नतीला। नृपाळा! मनीं ठाव देई न तीला।
समृद्धीस सद्विक्रमें वीर साधी। पहा, ते रहाते न कांहीं विषादीं॥१४॥

प्रतिज्ञावधीची न योग्य प्रतीक्षा। जयें घेतली दुष्ट-कापट्य-दीक्षा।
कसा सांग तो भोगुनी दीर्घकाळ। नृपश्रीस सोडील शत्रू? नृपाळ॥१५॥

स्वयें अर्पिल्या हाय ! दुर्योधनानें। तुला, सांग, शोभा कशी यो धनानें।
अशा रीतिनें ये स्थिती भूभुजाची। तरी थोरवी काय अस्मद्भुजांची ॥ १६ ॥
स्वयें सिंह उन्मत्त मारी करींना। सदा जीविका त्यांवरी तो करी ना।
स्वतेजेंच मानी जनां वांकवीतो। न वांछी कदा अन्यदाना कवी तो ॥ १७ ॥
न पर्वा करी अंतरीं जो असूंची। 'यश स्थास्नु' मानी म्हणे जो, 'असूची'।
तयाच्या स्वयें ये अयत्नेंच हातीं। नृपश्रीहि विद्युद्विलासास्थिरा ती ॥ १८ ॥
पदें मर्दिती सर्वही भस्म-राशी। न मर्दी कुणी अग्निशीं घस्मराशीं।
पराभूत होतां असुत्याग युक्त। न होतो कधीं थोर तेजोवियुक्त ॥ १९ ॥
हरी ऐकुनी मेघनादा गुहेंत। बळें गर्जतो ठेवुनी काय हेत।
खरे स्वाभिमानी न अन्यप्रभाव। सहाती कधीं, हाच त्यांचा स्वभाव २०
प्रमादोद्भव-ध्यांत-नाश-क्रमास। धरोनी, करीं व्यक्त तूं विक्रमास।
अनुत्साहता ही तुझी ये न आड। अरीचा तरी लागता काय पाड ॥२१॥
जगत्ख्यात दिक्कुंजरा-तुल्य चार। महेंद्रापरी तेज ज्यांचें अपार।
तुझे बंधु युद्धांत ऐसे नृपा! हे। लढूं लागतां कोणता शत्रु साहे ॥ २२ ॥
तुझ्या जो मनीं चंड रोषाग्नि आतां। रिपूंनीं असे चेतवीला नृ-नाथा।
तयाला मिळो नष्ट-सौभाग्य-कांति-। द्विषत्स्त्रीजनाश्रूदकेंमात्र शांति ॥२३॥

---

# गणेश जनार्दन आगाशे.

## १ बाष्परथ.

### श्लोक.

( द्रुतविलंबित. )

बसुनि बाष्परथीं पथ लंघितां। मज गमे बहु लोचनधन्यता।
रुचिर वस्तु पदोपदिं दृक्पथीं। पडति, लोभविती, झणिं लोपती ॥ १ ॥
रथजवें स्थिर वस्तु न राहते। सकलही चलसें जणुं भासतें।
परिसरीं द्रुम पर्वत धांवती। किति वदूं अनुपम्य चमत्कृती ॥ २ ॥

चरति धेनु अनेक नगावरी । दिसति सान जणूं ठिपक्यापरी ।
द्रुमहि संकुचिताकृति भासती । दिसति निर्झर रौप्यपटाकृती ॥ ३ ॥
पथिं सभोंवतिं जीं चरती गुरें । रथरवें भिउनी अति भेसुरें ।
नयन फाडिति, कान उभारिती ।चहुं खुरांवरि भेंकड धांवती ॥ ४ ॥
असति सन्निध धाकुटिं खेटकें । जमति भोंवतिं त्यांतिल अर्भकें ।
बहु न्यहाळुनि दाविति अंगुली । मति तदीय कुतूहलिं रंगली ॥ ५ ॥
कधिं नदीवरि सेतु विलंघितो । स्तनितसा रव भैरव दावितो ।
कधिं चढे बहु कष्टत पर्वतीं । बहुल दावि निसर्गचमत्कृती ॥ ६ ॥
गहन पादतलीं दिसते दरी । चटुल जींतुनि वाहतसे झरी ।
निबिड पादप आतप वारिती । सुखविती, शरणार्थिस रक्षिती ॥ ७ ॥
सलिलसंघ कड्यावरुनी पडे । पडुनि भूमितलीं गगनीं उडे ।
उडति उंच तुषार सभोंवतीं । दलित मौक्तिकभासचि दाविती ॥ ८ ॥
सलिल वाहत जाउनि खालतीं । विशद तें मिळतें तटिनीप्रती ।
जमुनिया अथवा गिरिच्या पदीं । नव सरोवर तें बनतें कधीं ॥ ९ ॥
सलिलसंचय सान समुद्रसा । विमल भासतसे जणुं आरसा ।
दिसतसे प्रतिबिंबित त्या जलीं । सकल ती रमणीय वनस्थली ॥ १० ॥
गवययूथ करी तरुच्या तलीं । रंवथ मध्यदिनीं अतिशीतलीं ।
पसरल्या उदकीं महिषी किती । रविकरा प्रखरा न जुमानिती ॥ ११ ॥
लगुडखंड करीं, कटिच्या तटीं । वसनखंड, शिरावर चिंधुटी ।
मलिन कंबल वाम भुजावरी । दिसति गोपतनू बहु साजिरी ॥ १२ ॥
रवि नभस्तलमध्य यदा क्रमी । प्रखर उष्णकरां तयिं तो वमी ।
मृगजलभ्रम त्या समयीं घडे । बघुनि ज्या पळती मृग-छावडे ॥ १३ ॥
जयिं समुद्रतटान्तिक पावतो । रथ, तदा बहु विस्मय वाटतो ।
झळकतें जल रूप्यरसापरी । उठति तुंग तरंग तयावरी ॥ १४ ॥
गलितपल्लव वृक्ष उभारिती । विटप शुष्क विलोल भुजाकृती ।
दिसति आचरण्या तप दुश्चर । जणुं उभे ऋषि उग्र दिगंबर ॥ १५ ॥

निकट ये विरतिस्थल जेथवां । रथ धरी गति मंथर तेथवां ।
श्रवण-कर्कश फोडितसे स्वना । करि जनासि निजागमसूचना ॥ १६ ॥
जमति बाष्परथागम-निर्गमीं । जन जसे पडती बहु संभ्रमीं ।
स्थिति तशी जननीं मरणीं दिसे । मनुज बाष्परथासम कीं असे ॥ १७ ॥
मिळति बाष्परथागमिं माणसें । करिति धांदल, लाविति कीं पिसें ।
मनुज जन्म धरी इह जेथवां । स्थिति तशीच घरोघर तेथवां ॥ १८ ॥
स्थिति घडे रथ-निर्गमनीं जशी । मरणकालिं दिसे मजला तशी ।
उचलितां मृत देह भयाणसें । गृह, तसें विरतिस्थलही दिसे ॥ १९ ॥
पथिं रथागमनिर्गम चिन्हही । न दिसतें, विसरे मनुजा मही ।
उभयही क्षणभंगुर सर्वथा । असुनि गर्जविती धरणी वृथा ॥ २० ॥
किंतिक आजवरी नर जन्मले । किति पथावरुनी रथ धांवले ।
मनिं अनेक तरंग असे किती । उमटतां भ्रमली भ्रमली मती ॥ २१ ॥

---

# लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.

## १ जन्मसाफल्य.

श्लोक.

( वसंततिलका. )

सुस्नेह जे मजवरी करितात नित्य ।
ज्यांचें असे विमल वर्तन शुद्ध सत्य ।
आनृण्य जोडिन तयां सुखवूनि जेव्हां ।
मज्जन्म हा सफल होइल जाण तेव्हां ॥ १ ॥
ज्याचें कृपासुखद छत्र जगावरी हें ।
यत्प्रेमपूर जगतावरि सर्व वाहे ।
त्या दीनवत्सल विभूस भजेन जेव्हां ।
मज्जन्म हा सफल होइल जाण तेव्हां ॥ २ ॥

ज्यांनीं परार्थ बहु कष्टविलें स्वदेहा ।
नाहीं कधींहि गणिलें सुखवित्तगेहा ।
त्यांच्यासमान जनकार्य करीन जेव्हां ।
मज्जन्म हा सफल होइल जाण तेव्हां ॥ ३ ॥

जे शूर, वीर, कवि, साधु, विचारवंत ।
जे राष्ट्रनायक, धुरंधर, जे महंत ।
त्यांच्या स्मरेन कृति पुण्य उदार जेव्हां ।
मज्जन्म हा सफल होइल जाण तेव्हां ॥ ४ ॥

ज्यांनीं स्वदेशयश भूवरि गाजवीलें ।
ज्यांनीं स्वदेशइतिहासहि साजवीले ।
त्यांचे चारित्रगुण गाइन नित्य जेव्हां ।
मज्जन्म हा सफल होइल जाण तेव्हां ॥ ५ ॥

ज्यांच्या मनीं दिसति मूर्तिहि पूर्वजांच्या ।
सद्वंद्य पुण्य कृति रम्य अपूर्व ज्यांच्या ।
त्यांचा मनीं सदुपदेश ठसेल जेव्हां ।
मज्जन्म हा सफल होइल जाण तेव्हां ॥ ६ ॥

“ शीलार्थ संतत झटा, न धनार्जनार्थ ।
यज्ञार्थ अर्थ मिळवा, न सुखार्जनार्थ ”
हें संतवाक्य मनिं पूर्ण भरेल जेव्हां ।
मज्जन्म हा सफल होइल जाण तेव्हां ॥ ७ ॥

आपद्गत स्वजन पाहवती न डोळां ।
तत्क्लेश ते बघुनि होतहि जीव गोळा ।
तद्दुःख दूर करण्यास झटेन जेव्हां ।
मज्जन्म हा सफल होइल जाण तेव्हां ॥ ८ ॥

## २ व्यवहारबोध.

फटका.

ऐक गड्या! संसारीं राहुनि उपदेशा या विसरूं नको।
सत्य सुखाचा लाभचि होइल, व्यवहारीं कधिं फसूं नको ॥ ध्रु० ॥
गुप्त आपुले विचार नाना भलत्या सलत्या सांगुं नको।
स्वमनस्थैर्या सोडुं नको, कधिं कर्तव्यासी चुकूं नको।
पूर्ण कसाला लाविल्याविना, मित्र कुणाला म्हणूं नको।
खरा मित्र तो प्राण बहिश्चर तुझा, खूण ही सोडुं नको।
'मित्ररत्न' ही दुर्लभ संज्ञा बाजाऱ्याला देउं नको।
'शिताभोंवतीं भुतें'–तशांस्तव उगा द्रव्य तूं उधळुं नको।
सहसा कष्टप्रद कलहाचा स्पर्श आपणा लावुं नको।
कलहीं वैऱ्या नरम होइ तों, जरब लावितां विरमुं नको।
संकटकाळीं डगूं नको।
सवदा करितां चकूं नको।
पराधीनता धरूं नको।
वेड्यापरि तूं बकूं नको।
संथपणानें भल्याबुऱ्याचें ऐकल्याविना राहुं नको ॥ ऐक ० ॥ १ ॥
वटवट निंदा ऐक मुकाट्या, उणें झटपटा बोलुं नको।
हमरीतुमरी सदा नको परि तेज आपुलें दवडुं नको।
घाम येइ तों काम करूनी दाम जोडण्या लाजुं नको।
काटकसरिनें न्यायोपार्जित वित्त वेंचितां विरूं नको।
लांडिलबाडी त्याग सर्वथा, नष्ट कृपणता धरूं नको।
ऐपत पाहुनि वेष करावा नट्टापट्टा मुळीं नको।
सर्वस्वाचा नाश करी, त्या ब्रह्मस्वाला[1] शिवूं नको।
मूळ कुळाचें खंडुनि पाडी विपट[2] निपट हें! नको नको।

---

१ कर्ज. २ ऋण हें कुळाचा समूळ नाश करून दोघांत निपट म्ह० खास निपट ( वैर ) पाडतें.

आत्महत्यारा बनूं नको ।
पाखंडामधिं शिरूं नको ।
परार्थ झिजतां दमूं नको ।
सत्यापासुनि चळूं नको ।
रामचंद्रसुत लक्ष्मण बोले रामप्रभुतें सोडुं नको ॥ ऐक० ॥ २ ॥

## ३ सद्वर्तन.

आर्या.

आधीं आधिव्याधिप्रशमनपटु सत्यधर्म रक्षावा ।
धर्मेंचि श्रीहरिला वळवाया कायही उपेक्षावा ॥ १ ॥
मग सत्कीर्तिरवानें सोडावें विश्व नित्य दुमदुमुनी ।
सत्याचारविचारें रमवावे सत्त्वशील थोर मुनी ॥ २ ॥
रमुनी रमवी धर्मीं सत्कर्मीं रामरायपदपद्मीं ।
प्रेमें राहे त्याच्या कमला अमला उभी सदा सद्मीं ॥ ३ ॥
परमार्थ साधणें हें साध्य, परी ठेव साधनीं लक्ष ।
इहपर साधाया हो तूं संसारांतही सदा दक्ष ॥ ४ ॥
जेणें कुटुंबपोषण अब्रूनें तेविंही यशानें हो ।
इतुकें धन संपादीं धर्मानें नीतिनें सुखानें हो ॥ ५ ॥
'पैका नामर्दाचा, यश इज्जत मर्द जो असे त्याची' ।
हा साधुबोध चिंतुनि जोडावी शुद्ध कीर्ति बा! साची ॥ ६ ॥
वपुवेषवित्तविद्यावैभव लोकांत पावती मान ।
परि धन्य तोचि यद्गुणगणगणनें विश्व डोलवी मान ॥ ७ ॥
वर्णाश्रमधर्म तुवां मानावे जेविं पितर सादर ते ।
चित्त सदा कुलजाचें मंगलहितधर्मरक्षणींच रते ॥ ८ ॥
ज्या ज्या वेळीं उठती ऊर्मी बा हृदयसागरावरतीं ।
तेव्हां तेव्हां सावध राहुनि बुध थोर त्यांसि आवरती ॥ ९ ॥

---

१ ब्रह्मेंद्रस्वामींचा बाजिरावास उपदेश.

सावध राहुनि आला तरि काढावाचि राग निपटून ।
न दिसों द्यावा, ऐसें न करी जो त्यासि मानिति पटू न ॥ १० ॥
अविवेकांकित होउनि बरळे भलतेंचि चाट वाचाट ।
सुज्ञ म्हणति कीं मद्यप्राशी वा उथळ मूर्ख हा भाट ॥ ११ ॥
पंत म्हणति ' सुज्ञमतें आहे वादांत सर्वथा तोटा ' ।
तें सत्याचि म्हणुनि बुधें न पडावें त्यांत, आग्रहचि खोटा ॥ १२ ॥
' मी तूं ' ' तूं मी ' करितां देहाहंकार वाढतो भारी ।
शब्देंचि शब्द वाढे, चित्त तुटे हरुनि मित्रता सारी ॥ १३ ॥
बकबक बोलुनि साधे कोणाला कोणता कसा अर्थ ।
सार ज्ञानाचें हें सर्व मनोनिग्रहाविणें व्यर्थ ॥ १४ ॥
मंत्र करीं एकांतीं, लोकांतीं सुप्रसन्न बाहेर ।
गंभीर चित्त ठेवुनि लोकव्यवहार फार बा हेर ॥ १५ ॥

---

# श्रीपाद नारायण मुजुमदार.

## १ मार्गातील सरोवर.

### श्लोक.

( वसंततिलका. )

अंभोधरें करुनि संतत वारिवृष्टि । जीवांस सर्व दिधली बहु तुष्टिपुष्टि ।
थोरांस येइ जंव भाग्यदशा अपार । दीनोपकारकरणीं रत होति फार ॥१॥
ओढे, तडाग, तटिनी बहु वारि-दानें । संपूर्ण हीं भरियलीं नववारिदानें ।
दावीति तीं सकलही निजवैभवातें । मार्गस्थिता परि सरा प्रिय तूंच मातें ॥२॥
ओढे अशाश्वतविभूतिमदें प्रमत्त । हे दाविती अविनयाचरणा प्रभूत ।
भीतिप्रदा परम घोर रवा करूनी । दिक्प्रांत टाकिति समस्तहि हे भरूनी ॥३॥

---

१ लाडिवाळ.

कासार! तूं असासि शांत तसें गभीर। लोकोपकारकरणार्थ सदा तयार ।
संपत्तिगर्व तिळमात्रहि नाहिं तूतें । थोरांस ऐहिकविभूति तृणासमा ते ।।४।।
तापाकुला क्रमुनिया बहु मार्ग पाहीं । सेवीतसे तुजाशिं पांथपरंपरा ही ।
प्राशूनिया तव सुधेपरि गोड वारी । कल्याण इच्छिति तुझें बहुत प्रकारीं ।।५।।
त्वन्नीर लोकहृदयां बहुतोष देई । नेत्रोत्सवा विरचि पुष्पविकासभा ही ।
घ्राणेंद्रियां सुखवि मारुत गंधयुक्त । लोकानुरंजनिं निरंतर तूं प्रसक्त ।। ६ ।।
रात्रौ निशपतिकर प्रतिबिंबुनी हीं। स्वच्छोदकें दिसति चित्रविचित्र पाहीं।
ताराशशिग्रहसुशोभित भूप्रदेशीं । आकाशभाग पडले गमतें मनाशीं ।।७।।
आहे अशाश्वत समस्तहि हे विभूती । हें तत्त्व ठेवुनि सदोदित आत्मचित्तीं।
लोकोपकारिं जल वेंचिसि तूं समस्त। धिक्! अज्ञ मंदमति वारिधि हा प्रमत्त ८
ग्रीष्मार्कचंडकरिं होइन शुष्क जेव्हां। कोठें अहा! पथिकसंतति जाय तेव्हां।
ऐशा विचारिं तव होत कृशा तनू ही। तूं धन्यजीवित, तुझ्यासम कोणि नाहीं ९
ग्रीष्मार्क वैभव समग्र तुझें हरील। शोषून वारि परिशुष्क तुला करील।
उत्साहहीन नच होई तदा मनांत । सोडी न थोर धृतितें विपदाभिभूत ।।१०।।
तूं वेंचिसी सकळ वारि परोपकारीं । चंडार्क तें निजकरीं हारि दुर्विचारी ।
दुर्वृत्त दुष्टमति उद्धतवृत्ति भूप । देई अकारण सदा सुजनांस ताप ।। ११ ।।
जाईल टाकुनि तुला खगसंतती ही । टाकीति याचक धनी विगतार्थ पाहीं ।
पीडा तुला बहुत देतिल हे पशू रे। आपद्गता सुपुरुषा खल पीडिती रे ।।१२।।
जे प्राशुनी तव जला सुख पावती ते। दुर्गंधियुक्त करतील सदैव तूतें ।
सोशी अपाकृति समस्तहि सद्विचारीं। दुष्टापकार न गणीच परोपकारी ।।१३।।
जे त्वन्मना गमति जीवितनिर्विशेष। मत्स्यादि ते मरुनि होशिल पंकशेष ।
होतांच दुर्गत महाश्रयभूत राय। होती गतासु सकलाश्रित निःसहाय ।।१४।।
क्षीणार्थ देउनि जनां धन जो विशेष । तो शोभतो धनिक सद्गुणमात्रशेष ।
तैसा सरा! गमसि तूं जगिं वंदनीय। होई कलाक्षयिं निशापति दर्शनीय ।।१५।।
'संपत्तिचा भरंवसा तिळमात्र नाहीं। सत्कारणीं व्यय तिचा करिं सर्वदाही।
प्राणव्ययेंहि करणेंच परोपकार'। हें तत्त्व तूं शिकवितोस जनांस थोर ।।१६।।

होशी जगीं परमवंद्य खरोखरी तूं। संतप्त-पांथजन-संघ-सुखैकहेतु।
लोकार्थ तूं झिजविशी सदया! तनूतें। मी मानितों मनिं खरोखर साधु तूतें १७
मेघें सदा उदकवृष्टि करून फार। द्यावें तुला सतत वैभव हें अपार।
सत्कारणीं व्यय करून सदा तयाचा। तूं धन्यवाद मिळवीं सकलां जनांचा १८

---

## २ चंद्रावतीचें प्रोत्साहन.

जोधपुरचा प्रख्यात राजा जसवंतसिंह याची पत्नी चंद्रावती ही सद्‌गुणी व शूर होती. तिजसारखी पतिव्रता व दृढनिश्चयी स्त्री त्या वेळीं सर्व भरतखंडांत दुसरी नव्हती. बापाला पदच्युत करून व भावांचा वध करून राज्यपद मिळवावें, या दुष्ट हेतूनें महत्त्वाकांक्षी औरंगजेब सैन्यासह दिल्लीकडे चाल करून येत आहे, हें ऐकून चंद्रावतीला फारच राग आला. व त्याचा नाश करण्यास तिनें जसवंतसिंहास सैन्यासह पाठवून दिलें. जसवंतसिंह लढाईला जातांना तिनें जें प्रोत्साहनपर भाषण केलें, तें पुढील उताऱ्यांत दिलें आहे.

आर्या.

सजला राज्यासाठीं माराया हाय! दुष्ट, तातातें।
धरिजेल सुतेच्छा मनिं पाहुनि ही काय दुष्टता तातें ॥ १ ॥
इच्छी नीचाधम जो कपटानें सोदरांस माराया।
त्यास वधुनिया पसरा धैर्यद्युति भास्करासमा राया ॥ २ ॥
केली ज्या नरपतिंनीं धवल यशें श्वेतमान वसुधा ही।
ज्यांच्या कीर्तिसुधेला न तुळे परमोत्तमा नव सुधाही ॥ ३ ॥
गमले या लोकीं जे नवसेतुपरी विपन्नदीनातें।
अंतकसम दुष्टां जे, सुखहेतु परी विपन्न-दीनांतें ॥ ४ ॥
त्या भूपश्रेष्ठांच्या सद्वंशीं पावलां पहा जनन।
कृति आचरा तयांसम निंदो युष्मत्प्रताप हा जन न ॥ ५ ॥

पळवावी रिपुसेना फोडुनिया हाक तापजनक रणीं ।
विस्मित होवो पाहुनि अपुली तो दुष्ट पापजन करणी ।। ६ ।।
छिन्न करावा समरीं खड्गें औरंग-यवन-काय महा ।
भासावें त्या दुष्टा आला युद्धास जवन का यम हा ।। ७ ।।
समरकुशलता त्याला दावावी प्रियकरा! अगाध रणीं ।
छेदुनि मग शिर त्याचें रक्तपरम ही करा अगा! धरणी ।। ८ ।।
अतुल पराक्रम अपुला पाहुनि मग शत्रु समर करितिल का ।
का जिंकितील समरीं मिळुनी जंबूक अमरकरितिलका ।। ९ ।।
निवटावें समरीं तत्पक्षीयां भूपराज! यवनांतें ।
पळवावें समरांतुनि करुनि तयाचा पराजय वनातें ।। १० ।।
आदरि नयनीति सदा दुर्जन नरपाल पाहिं जे कुटिला ।
तो अधम राज्यलोभी हा! हा! तत्काळ पाहिजे कुटिला ।। ११ ।।
नाथा! कथिलें खचितचि गमतो नयनाभिराम समर मला ।
पाहीन आपणां मी केव्हां समरांत रामसम रमलां ।। १२ ।।
अभय रणीं विचरावें, पदहि न मागें जनाधिप! सरावें ।
निर्मल यश सर्व जगीं, हरुनीया निजजनाधि, पसरावें ।। १३ ।।

---

## ३ चंद्रावतीचा विलाप.

जसवंतसिंहाचा रणांत पराभव होऊन तो परत येत आहे, असें जेव्हां चंद्रावतीनें ऐकिलें, तेव्हां तिनें आपल्या सखीजवळ जे दुःखाचे पण त्वेषपूर्ण उद्गार काढले, ते या उताऱ्यांत दिले आहेत.

आर्या.

धवलयशःकीर्तीनें केली वसुधाहि सिततरा ज्यांनीं ।
यत्पदपंकजरेणू सेवावा जपुनि सतत राजांनीं ।। १ ।।
अतुल पराक्रम दावुनि हरिती जे सत्वरी परमदासी ।
ज्यांची अनन्यभावा विजयश्री ती खरी परम दासी ।। २ ।।

असती आनंदानें सिद्ध सदा जे सदास मरणातें ।
गणिती नित्य मनीं जे सुखदायक नृपपदासम रणातें ॥ ३ ॥
लढतां लढतां यावा मृत्यु रणीं ज्यांस कामना हीच ।
निर्मल यश राखावें याविण ज्यां अन्य काम नाहींच ॥ ४ ॥
त्यांचा वंशज नृप हा लावि कुला सज्जनांत डागातें ।
सत्कीर्तिनदी टाकुनि गेला गे! मज्जना तडागातें ॥ ५ ॥
भूपवरांहिं भरावी सर्व धरा ही यशःपरिमलांहीं ।
कृति पाहुनि ही गमते लज्जा मी निर्बला परि मलाही ॥ ६ ॥
देई पाठ रणातें सोडुनि नृपतीस उचित वर शील ।
रणभीरुता बघुनि हीं खेद सखे! तूंहि खचित वरशील ॥ ७ ॥
आतां यास न उरला सखि! मानधनांत मानलव, वाया ।
झालें जीवित, आम्हां लागेल जनांत मान लववाया ॥ ८ ॥
जरि हा समरीं मारुनि बंधुघ्ना त्या अपत्रपा मरता ।
तरि नच वरिता सत्यचि सखये! मग इहपरत्र पामरता ॥ ९ ॥
झाली या वंशाची स्मृतिशेषा हाय! हाय! शोभा ते ।
निजपूर्वजसंपादित घालवि नृपराय हा यशोभा ते ॥ १० ॥
समरास पाठ देई नच कधिंही वीरमंडन भयानें ।
हा! हा! सखये! भरलें दुष्कीर्तीनें अखंड नभ यानें ॥ ११ ॥
दिधलें वडिलांनीं हें सिंहासन रत्नखचित जें त्यातें ।
हा! हा! आतां सखि! तें लाभेल अयत्न खचित जेत्यातें ॥ १२ ॥
स्मरुनी परापकृति ही मन त्याचें स्वल्पही न का काचे ।
हंसकुलीं जन्मुनिया कर्म करी अल्प हीन काकाचें ॥ १३ ॥
आतां जयशालि यवन निजचरणीं तुडवितील वामांतें ।
वधितील अदयतेनें, अघपंकीं बुडवितील वा मातें ॥ १४ ॥
हरितील राज्यलक्ष्मी कोण करिल सांग सुमति! अवन तिचें ।
हा! हा! आले आतां सखये! मज दिवस गमति अवनतिचे ॥ १५ ॥

समरांतून पळावें जरि सोडुनि सर्व दम नरमणीनें ।
तरि काय करावें गे! उद्धतरिपुगर्वदमन रमणीनें ॥ १६ ॥
जो नृप भीति वरुनिया शत्रुजनाचा करील न वध रणीं ।
हा! हा! काय तयाला भटप्रणयिनी वरील नव धरणी ॥ १७ ॥
भीरुत्व बघुनि त्याचें, दोष तयाला न देउ परिजन का ।
म्हणतील काय आतां दुर्यश कळतांच हें उपरि·जनका ॥ १८ ॥
आतां ऊठ झडकरीं सखि! दुर्गद्वार लावि, लपवाया- ।
कृष्णवदन येतिल ते; हा! हा! नच कोमला विलप वायां ॥ १९ ॥
भीरुत्व धरुनि मनिं जो रक्षी समरांगणांत न रमेला ।
धिक्! धिक्! बाई! त्याला, तो समजें मी मनांत नर मेला ॥ २० ॥
केला दृढ निश्चय हा, आतां न बघेन रायवदनातें ।
उरलें आतां त्याशीं बाई! मम हाय! काय वद नातें ॥ २१ ॥
कृष्णवदन झालेलें पुनरपि बघतील वदन ज्या यांचें ।
धिक्कार असो त्यांना, मजला त्या नाम वद न जायांचें ॥ २२ ॥
जेव्हां ग्रासि रिपु तया, ज्यापरि असुर प्रभावहा रविला ।
तेव्हांच होय विधवा, जेव्हां त्यानें प्रभाव हारविला ॥ २३ ॥
घाला गे! मत्कंठीं माला ज्या सुखभरांत या रचितां ।
अर्पिन तनु अग्नीतें, आतां सत्वर करा तयार चित्ता ॥ २४ ॥

---

## ४ वीरमती द्रौपदी.

### आर्या.

अज्ञातवास सरतां पांडव आले फिरून सदनातें ।
भीमार्जुन निज मानसिं असती सोत्कंठ शत्रुकदनातें ॥ १ ॥
"राज्यापहार करुनी वसति सुखें जे निशंक दायाद ।
ज्यांच्या अपराधांची वदनें नच मोजवे कदा याद ॥ २ ॥
संहारुनि ते समरीं बांधव अत्यंत दुष्ट पापरत ।
मिळवावी निजशौर्यें हारविलेली स्वसंपदा परत ॥ ३ ॥

केली अपकृति संतत कपटानें राज्यविभव-हरणानें ।
फेडावी ती वेगें समरामध्यें निजप्रहरणानें ॥ ४ ॥

वदले अवाच्य वचनें बोलाया जे घरांतहि न शकले ।
त्यांच्या खल जिव्हेचीं रणीं करावीं सहस्रधा शकलें " ॥ ५ ॥

इच्छा वीरोचित ही धारिति मनिं भीमविजय वीरमती ।
ज्यांच्या सद्यशकथनीं आनंदानें सदा कवी रमती ॥ ६ ॥

धर्मात्मा धर्मतनय साक्षात् लोकीं क्षमानभस्तरणी ।
नच इच्छी साधुहृदय माराया आत्मजन समस्त रणीं ॥ ७ ॥

म्हणुनी साम कराया विनवी वेगें रमावरा चतुरा ।
पंडित-सभा-स्थलीं जो शोभे मस्तकिं जसा खराच तुरा ॥ ८ ॥

'आपत्कालीं आतां तारीं मज तूंच यदुकुलाभरणा ।
होइल सर्व कुलक्षय अहह! नसे करुनि अल्प लाभ रणा ' ॥ ९ ॥

यदुवंशमंडन निघे मग परिमित सेवकांसहित जाया ।
अवलोकी तोंच तया पांडुसुताची महामहित जाया ॥ १० ॥

आली धावुनि वेगें त्याजवळी, मुक्तकेश, साधुमती ।
अपमानशिखिज्वाला तीच्या हृदयांत अनुदिसां धुमती ॥ ११ ॥

पडली स्कंधावरतीं वेणी कालाहिसम सुचिर-मुक्ता ।
निष्प्रभवदना शोभे, मळलेली ज्यापरी रुचिर मुक्ता ॥ १२ ॥

जवन समीरें गगनीं ज्यापरि कादंबिनी तशि खवळली ।
क्रोधोद्दीपन करण्या वीरमती कठिण-वाक्विशिख वळली ॥ १३ ॥

"यदुकुलनृपावतंसा! असशी आधार तूं अशरणातें ।
मी दीन तुझी दासी, नमित्यें विनता त्वदीय चरणातें ॥ १४ ॥

कारुण्यांभोदा! तूं, दीन जनां आप्तबंधुसा गमशी ।
विनवावें दासांनीं तुजवांचुनि बा कुणास? सांग मशीं ॥ १५ ॥

सुहृदर्थसिद्धिपर तूं, नच बघशी सदयनयनिं कां मजशीं ।
हरिणी व्याधशरांनीं कांतारीं पीडिली निकाम जशी ॥ १६ ॥

साम कराया जाशी शत्रूंच्या दुश्चिता अगाराशी।
कां नच बघशी तूं मम दुःखाची निश्चिता अगा! राशी॥ १७॥
कौरवनगरा जाशी करावयाला निशंक सामातें।
तूं मुक्तवेणिकेला यदुवर्या! विसरशी कसा मातें॥ १८॥
कर्षी खल दुःशासन सभेमधें हेच खचित ना केश।
समरपराङ्मुखता ही पांडुसुतां काय उचित? नाकेश॥ १९॥
विसराल संधि करुनी सर्व तुम्ही शत्रुकृत निकारा हो।
ही दुःखित पांचाली काय सदा मुक्तवेणिका राहो॥ २०॥
सजलां केविं कराया कृत्य असें हें स्वमानहानिकर।
आदळला मजवरतीं अशनिनिपातासमान हा निकर॥ २१॥
पंचग्रामासाठीं शुद्ध यशा केविं चिद्घना! विकतां।
आपन्नदींत तारो भूपा! आतां तुझीच नाविकता॥ २२॥
हा! हा! पंचग्रामां मागतसां कां सुदीन याचकसे।
हा! विसरलांत संकटसमयीं तुम्ही सुधी नयाच कसे॥ २३॥
मानापमान टाकुनि राज्यविभव-तुच्छ-कांचनाकारितां।
हस्तांजली रचुनिया भिक्षुपरी हाय! याचना करितां॥ २४॥
मत्स्येश्वरगोग्रहणीं ज्यांनीं अत्यंत शौर्य गाजविलें।
अश्वत्थामाकर्णद्रोणकृपाचार्य यांस लाजविलें॥ २५॥
थोर प्रताप त्यांचा कृष्णा! कां जाहला सकळ वायां।
त्यांची दीन विनंती म्हणुनी जाशी खलास कळवाया॥ २६॥
परिहरणीय असे तो त्यांना, दुर्जन निका, महा नीच।
त्यांच्या शुद्ध यशाची होइल येणें निकाम हानीच॥ २७॥
दीनवचन बोलुनिया धवल यशा कां अपाप हारवितां।
खद्योतत्वा वरिलें सोडुनिया विश्वपा! पहा रविता॥ २८॥
निजवावे निजशौर्यें दुर्जन ते मग्न जे दुराचरणीं।
कां लववितां शिरातें होउनिया लीन त्यांचिया चरणीं॥ २९॥

अगणित-बलाधिपें हें भूपें दीनत्व ना वेरायाचें।
या योगानें कृष्णा ! वरील हीनत्व नांव रायाचें॥ ३० ॥
दुर्दान्त शत्रु दुर्मद यदुपाला! ज्या नृपास नावरती।
इच्छी किमर्थ तारि तो बसावयाला नृपासनावरतीं॥ ३१ ॥
वीर परापकृत सदा सजती समरांगणीं मरायाला।
परि समराची वार्ता न रुचे स्वप्नींहि धर्मरायाला॥ ३२ ॥
सदनीं भीरुत्व धरुनि बसती न वरी तयांसि का मरण।
निजकीर्तिपालना भट मरतांहि करी बळें प्रकाम रण॥ ३३ ॥
अपकृतिपर रिपुशीं जो तदुचित वर्तन सुसत्वरी न वरी।
आदरि तयास लोकीं सोत्कंठा अवदशा खरी नवरी॥ ३४॥
गांठाया खलरिपुला समरीं भय नच जया कदा शिवतें।
वदती संतत सन्मति आदरितें त्यास सर्वदा शिव तें॥ ३५॥
'बैस ममांकावर तूं' यापरि निर्लज्ज बोलला गा जो।
करुनी तदूरुमथना भीमपराक्रम जगीं भला गाजो॥ ३६॥
कारि पापधूलिमध्यें दुःशासन मज्जना खरासम जो।
त्याला चिरुनी समरीं तद्विक्रम सज्जना खरा समजो ॥ ३७॥
समरकथा नच जाणे, जाणे जो शयन मंचकावरतीं।
होवो विच्छिन्नतनू भीमगदा पडुनि वंचकावर ती॥ ३८ ॥
पाहुनि मनीं हरखले कर्षित असतां कुलांगनाकेश।
कीर्तिध्वज उभवावा छिन्न करुनिया खलांग नाकेश॥ ३९ ॥
भार्याधर्षणहि हरी! नच गमतें मानहानिसम याला।
आतां उपाय नुरला, झाल्यें मी या अनाथ समयाला॥ ४० ॥
हारविलें राज्य बळें, ज्यापरि गज उपरि फेंकितो हार।
बसला मुनिसम आतां, हाय ! करिल कोण दुःखपरिहार ॥ ४१॥
कुर्वधमें कर्षियलें जारि लघुदासीसमान रमणीतें।
नच सोडी यदुनाथा! तारि अजुनी या क्षमा नरमणीतें ॥ ४२॥

व्यर्थचि अहा ! प्रसवली यास खचित वीरसू पृथादेवी ।
केविं युधिष्ठिर म्हणुनी रणविमुखा वर्णिलें वृथा देवीं ॥ ४३ ॥
वर्णावी कोठवरी धवलयशःकीर्ति पांडुरायाची ।
रणवार्ता ऐकुनिया वदनच्छवि होय पांडुरा याची ॥ ४४ ॥
जरि आवडे शमव्रत उचित असे जें सदा मुनिजनांतें ।
तरि मग कां जोडावें वीरश्रेष्ठासि सांग निज नातें ॥ ४५ ॥
पंचग्रामचि मागे दीनापरि हा जया सहाय हरि ।
गजगंडस्थलभेत्ता हर्षे जंबुकवधेंच काय हरी ॥ ४६ ॥
जरि मानमहा भूपति साहुनि अपकार शांति आश्रयती ।
तरि मग झाली लोकीं अहह ! खरी मानिता निराश्रय ती ॥ ४७ ॥
राज्य कशाला याला, विभव कशाला तसें शमैकरता ।
संधि करायाला ही खटपट व्यर्थचि कशास हो करतां ॥ ४८ ॥
जेथें मृग संचरती, आनंदें तरुलताहि मर्मरति ।
राहो जाउनि तेथें मुनिसम हा धर्मराज धर्मरति ॥ ४९ ॥
जें दुःख भोगिलें मीं, नाहीं जगतीं तयास हाय ! तुला ।
आहेस सर्वसाक्षी भगवान् ! तूं विदित तें न काय तुला ॥ ५० ॥
द्यूतपरा भूपाला नच समजे काय आपणास हित ।
द्यूतामध्यें घालवि राज्यविभव हाय ! आपणासहित ॥ ५१ ॥
तेव्हां खळ दुःशासन झोंबे माझ्या भयाकुलांगा रे ।
ओढुनि सभेंत नेलें मजला सोडुनि भया कुलांगारें ॥ ५२ ॥
ज्यापरि अनाथ हरिणी कांतारीं वृककरांत सांपडली ।
त्यापरि दुर्धरसंकटिं यदुनाथा ! ही तव स्वसा पडली ॥ ५३ ॥
हिसडे देउनि खल तो पुनःपुन्हा केश चिद्घना ! कर्षी ।
तेव्हां नयनामधुनी गाळिति अविरत नवाश्रु नाकर्षी ॥ ५४
धर्मवृकोदरविजयहि बघति सुखें तो तदा मदवमान ।
धर्मपरायण भीष्मद्रोणहि करिती वरी न लव मान ॥ ५५ ॥

धर्मपरायण न वदे सद्वच कोणी महाधमांमाजीं ।
सुतविक्रम पाहुनिया बहुत हरखले ममांध मामाजी ॥ ५६ ॥
वदुनी अवाच्य वचनें सुज्ञांमध्यें नरापसद नाचे ।
पावे साम्य तदा तें राजसभागृह सुरापसदनाचें ॥ ५७ ॥
यापरि बिटंबिली ही भार्या अत्यंतमानि धर्माची ।
नानाविध चेष्टांनीं केली निःशेष हानि धर्माची ॥ ५८ ॥
मूक सभाजन बसले, स्वस्थ बसे विदुर तो तथापि कसा ।
त्या काकसभेमध्यें गमला तो एक सर्वथा पिकसा ॥ ५९ ॥
'खल दुर्जन हो! जमुनी येथें हें कर्म मांडिलें काय ।
पडतिल येणें सत्वर तुमचे समरांत खंडिले काय ॥ ६० ॥
वांचेलही कदाचित् दीपशिखा शिवुनि कीट पामर तो ।
चित्तेंहि परस्त्रीला शिवतां नर रे अपत्रपा! मरतो' ॥ ६१ ॥
वदति सुधी 'प्राशा हो! प्राशा स्वर्गाधिका नव सुधा ही ।
विदुराच्या जन्मानें झाली ही धन्य कां न वसुधाही' ॥ ६२ ॥
दुर्जनहृदया गमलें विदुरवचन तें जसा कराल पवि ।
अंधसुतावांचुनिया वदन इतर जन दयाकरा! लपवी ॥ ६३ ॥
करण्या स्वनाश, अमुचें यश मळवाया, खलांत दाहांत ।
दुःशासन कुर्वधमें लुगड्याला घातला तदा हात ॥ ६४ ॥
तेव्हां प्रगटुनि सत्वर त्या स्थानीं दुष्टसत्तमामाजीं ।
पुरवुनि असंख्य वस्त्रें राखिलि लज्जा यदूत्तमा! माजी ॥ ६५ ॥
कराशिल वध सर्वांचा तूं विश्वाधार रुष्ट चक्रानें ।
म्हणुनी भीतमनानें आदरिलें मौन दुष्टचक्रानें ॥ ६६ ॥
वनवासगमनसमयीं वदले 'गौगौंः' दुरूनिया मेले ।
पाहीन त्यांस केव्हां भीमगदेनें चुरूनिया मेले ॥ ६७ ॥
राजकुलोत्पन्नाला तापद तो हाय! का न वनवास ।
मीं देखिलें अनुदिनीं असुखा यदुनायका! नवनवास ॥ ६८ ॥

आला काय समय हा भीष्माच्या हाय! नातवांवरतीं ।
सोडुनि राज्यसुखातें दुर्मार्गें काननांत वावरती ॥ ६९ ॥
प्रासादीं ज्यास खुपे शय्या शय्या नवा सुमनखचित ।
केवल धराच त्याला कांतारीं होय ही शयन खचित ॥ ७० ॥
उठवी बंदि जयाला गाउनिया नित्य गीति निकट शिवा ।
कांतारीं अशिवरुतें जागवि हा! हा! तयास विकट शिवा ॥ ७१ ॥
प्रासादीं बहुत सुटे वस्त्रांचा घमघमाट परिमळ कीं ।
धरि वल्कलेंच तनुवरि रानीं हा! हा! सदाहि पारि मळकीं ॥ ७२ ॥
संहारी शत्रुजनां जो करुनीया महारण गदीन ।
रानामध्यें फिरला इतस्ततां तो जसा भणग दीन ॥ ७३ ॥
पूर्वी संपत्कालीं पक्वान्नांची जयास बहुत रुची ।
स्वोदरपोषण करि तो भक्षुनिया विरसही फळें तरुचीं ॥ ७४ ॥
जिंकुनि धनराशी जो दीनजनां नित्य बहल दान करी ।
ज्यापरि मधुकरवृंदा तुष्ट करी सत्य बहलदानकरी ॥ ७५ ॥
जो प्रगटला असे या मूर्त धनुर्वेद सत्य जगतांत ।
श्रमला विजय वनीं तो ज्या पुढतीं वीरही न तगतात ॥ ७६ ॥
वनगजसम हे फिरती वनीं परुषकाय नकुलसहदेव ।
राज्यसुखाला मुकुनी झाला दीनानन कुलसह देव ॥ ७७ ॥
राज्यसुखोचित तव ही भगिनी सोशी घनातपालाही ।
केव्हां केव्हां सदया! भक्षण कारि काननांत पाला ही ॥ ७८ ॥
यापरि खलशत्रुजनीं दिधला जो त्रास नच तयास मिति ।
फेडावा पूर्णपणें तो शौर्यानें करूनिया समिति ॥ ७९ ॥
परि धर्मराज बसला स्वस्थ गृहीं रणकथाहि नायकता ।
पांडुसुतांनीं वरिलें शलभत्व त्यजूनिया विनायकता ॥ ८० ॥
वीरोत्तम भीमार्जुन असती सोत्कंठ रण करायाला ।
आतां कोण तुझ्याविण कथील सुविचार धर्मरायाला ॥ ८१ ॥

संधि करुनिया तुम्हां हरि ! पंचग्राम मात्र मिळणार ।
हें पांडुनृपाळाचें राज्य सुयोधन समस्त गिळणार ॥ ८२ ॥
यदुनाथ ! मानिलेंस प्रियभगिनीसमचि सर्वकाळ जिला ।
तारुनि तीतें संकटिं हरण करीं तूंचि सर्व काळजिला ॥ ८३ ॥
मीं सोशिल्या किती तरि आजवरी आपदा रमाजाने ।
हा मर्मनिकर्तनपर नच सहवे दुःखभार माजानें ॥ ८४ ॥
करुणा दीनजनांची तुजवांचुनिया कुणास यदुपा ! ये ।
आपन्नदींत बुडत्यें, तारीं भगिनीस तूंच सदुपायें ॥ ८५ ॥
नाहीं तव महिम्याला कृष्णा नवघनसमा ! जगांत तुला ।
ब्रह्मानंदें संतत सुरजनमुनिजनसमाज गात तुला ॥ ८६ ॥
तूं निर्मिशी विघटिशी श्रीमदनंत सहजींच विश्वास ।
या घोर विपत्समयीं या दासीला तुजाच विश्वास ॥ ८७ ॥
तेथें जाउनि होइल निःसंशय मानहानि, वळवाया ।
खळ दुष्कर बा लोकीं, व्याप तुझा मात्र हा निवळ वायां ॥ ८८ ॥
तरि उघडुनिया वेगें सुमहःपापान्तक-रविनयनातें ।
दुर्जन रिपुच्या भो कृतसुमहः-पापान्त ! कर विनयनातें ॥ ८९ ॥
अपमानानलदग्धा तनुलतिका म्हणुनि हे वरा ! जवळी ।
आल्यें धावुनि वेगें सत्वर तूं मेघ देवराज बळी ॥ ९० ॥
कां साम प्रिय म्हणुनी नच वदशी अल्प वचनही कृष्णा ।
जा जा संधि कराया बसेल आतां उगिच न ही कृष्णा ॥ ९१ ॥
आहे जन्म दिला मीं दीप्तिमता पंचपुत्रक-रवींतें ।
नष्ट तयांकरवीं हे तिमिरासम खल अमित्र करवीत्यें ॥ ९२ ॥
वीरशिरोमणि मत्सुत नसती जगिं भीरु कौरवांसमही ।
निस्तुल शौर्य विलोकुनि वानिल तत्कीर्तिगौरवास मही ॥ ९३ ॥
आहे विनायकासम तेजस्वी तव समरकुशल भाचा ।
निज शौर्यानें समरीं करील संहार शत्रुशलभांचा ॥ ९४ ॥

खल वधुनी मम दुःखा नच हे प्रेमप्रणाल हरितिल का ।
मद-मलिनगंड-करि-वध अशक्य लोकीं न बालहरितिलका ॥ ९५ ॥
जा जा सत्वर कृष्णा ! धर्मेप्सित तूं खुशाल साम कर ।
मत्तनय मूर्तिमान् पवि वधितिल तो खल विशालसा मकर ” ॥९६॥

---

# विनायक जनार्दन करंदीकर.

( विनायक. )

## १ नदी आणि कवि

श्लोक.

( उपजाति. )

असो कवीचें कुल अप्रसिद्ध । होई कवीच्या कवनें प्रसिद्ध ।
तसा नदीच्या उगम-स्थलाला । नदीमुळें गौरवलाभ झाला ॥ १ ॥
काव्यें कवीचीं जगतांत गावीं । त्यांचें न त्याच्या पारि चोज गांवीं ।
नदी सुदूरस्थ जनां पवित्र । विटाळिती तीर्थ तिचेच पुत्र ॥ २ ॥
बाल्यांत उच्छृंखलवृत्ति दोन्ही । ठावा नसे आडथळा म्हणोनी ।
लागो दरी खोल, उभा पहाड । जातात तीं धांवत धाडधाड ॥ ३ ॥
जाई जसें अंतर होत खोल । गांभीर्य ये, वृत्ति निवे विलोल ।
रेखून मार्ग क्रमितात संथ । करीत कल्याण जगीं अनंत ॥ ४ ॥
अभंग त्यांच्या हृदयीं तरंग । निःसंग ते त्यांत सदैव दंग ।
गाऊन गाणीं भ्रमतात रानीं । ते धन्य ज्यांच्या पडतात कानीं ॥ ५ ॥
स्वजीवनानें उगवून दाणे । नदी जिवां दे चिर जीवदानें ।
तैसें कवीच्या कविताप्रवाहें । जीवांत संजीवन दिव्य लाहे ॥ ६ ॥
राष्ट्रें बुडालीं, नृप थोर गेले । नदी, कवी मात्र अनंत ठेले ।
भागीरथीला खळ लेश नाहीं । अखंड रामायण लोक गाई ॥ ७ ॥

महाकवी थोर नदाप्रमाणें । मी बापडा ओघळ अल्प जाणें ।
थाके न ओढा झुळझूळ वाहे । माझी तशी ही गुणगूण आहे ॥ ८ ॥

---

## २ वीरमती.

जोधपूरचा प्रसिद्ध राणा जसवंतसिंग हा एकदां समरास पाठ दाखवून माघारा फिरला. क्षात्रब्रीदास कलंक लावणारें त्याचें तें कृत्य अर्थात्च त्याच्या मानी स्त्रीस--वीरमतीस--खपलें नाहीं. तिनें त्याबद्दल त्याचा मोठा धिक्कार केला. त्याचें वर्णन या कवितेंत केलें आहे.

आर्या.

पतिरणविन्मुखतेची दुर्वार्ता आयकून वीरमती ।
रागेजे; त्याविषयीं होय तिची तेधवां विषण्ण मती ॥ १ ॥
मान्य न वीरमतीला अयशाचें मळमळीत सौभाग्य ।
येतें वैधव्य यशें तिज गमतें साच उघाडिलें भाग्य ॥ २ ॥
करिती गजर तयाचा, जर नाथ तिचा रणीं लढत मरता ।
परि तापद होय तिला वार्ता जीवंत तो फिरे परता ॥ ३ ॥
समरास पुरुष भ्याला सत्य तयें स्वयश मळाविलें धवल ।
मुख झालें तें काळें दूर बरें; अशुभ मज नको जवळ ॥ ४ ॥
चिंतून मनीं ऐसें शीघ्र तिनें बंद कराविली वेस ।
पाठविला जसवंता दूताकरवीं सखेद संदेश ॥ ५ ॥
"नृपवंश उदेपुरचा सूर्योद्भव गाजते जगीं ख्याती ।
ध्याती तयास सारे तद्यश कवनीं घरोघरीं गाती ॥ ६ ॥
वीर पराक्रमशाली किती उदेले तयांत आजवरी ।
गणती करवे कोणा ? कवण तयांचा रणांत हात धरी ॥ ७ ॥
समरव्रत जागविलें घेऊन शिरें करांत आमरण ।
कर्तव्य वाटलें त्या वीरां कुलकीर्तिरक्षणीं मरण ॥ ८ ॥
गोष्ट असो पुरुषांची, समराचें सहज त्यांजला कृत्य ।
त्यासाठीं त्यां घडिलें, दिधलें तैसेंच त्यांस सामर्थ्य ॥ ९ ॥

पारि तनु कोमल ज्यांची जातिलतेवर जसें हसे सुमन ।
सुमन प्रेमल ज्यांचें लव ताप सहावया असे क्षम न ॥ १० ॥
शौर्य रणीं गाजविलें ऐशा सकुमार सदय अबलांनीं ।
पुरुषां स्फुरण चढविलें स्वकुलाची राखिली जगीं बाणी ॥ ११ ॥
त्या वीरकुलीं वीरोत्पन्ना मी नम्र आपली दासी ।
प्रेमें वीरांबेनें मज वाढविलें धरून हृदयाशीं ॥ १२ ॥
खेळ धनुर्बाणाचे शिकवी मज वीरबंधुची जोडी ।
साहसपराक्रमाची बालपणीं लागली मला गोडी ॥ १३ ॥
वीरपती मिळवावा होता निर्धार हा मनीं केला ।
प्रेमें तुम्हांस वारितां तो पण सिद्धीस वाटलें गेला ॥ १४ ॥
हर ! हर ! पारि मी फसलेंय ढांसळलें सर्व मम मनोराज्य ।
धरिला गुलाबभावें निज हृदयीं कर्णिकार मीं त्याज्य ॥ १५ ॥
वीर म्हणून जयाच्या अंकीं निर्धास्त झोंप मीं घ्यावी ।
वीर नव्हे, पुरुष नव्हे, जो दुर्बल भीरुता रणीं दावी ॥ १६ ॥
अबलाच ती म्हणावी; पुरुषाचा मात्र घेतला साज ।
ओष्ठीं कां मिरवावी मिशी तिची राखवे न जर लाज ॥ १७ ॥
जन्मून वृथा जगतीं धरणीला मात्र जाहलां भार ।
स्वकरीं धरून निष्फल विटाळिली विजयपात्र तलवार ॥ १८ ॥
काय जिणें, जर न घडे करणी, तुकवी जियेस जग मान ।
तो वांचला म्हणावा ज्या देती सानथोर जन मान ॥ १९ ॥
अपमानाचें जीवित ! मरण बरें फार फार त्याहून ।
मान नव्हे, प्राण तुम्ही आलां समरांत आज वाहून ॥ २० ॥
प्राण प्राणास रुचे; दिसतें बाह्यस्वरूप आवडतें ।
जातां प्राण नकोसें होय न का रम्य रूप आवडतें ॥ २१ ॥
विगतप्राणशरीर प्रेतच ! कां आणितां घरा सांगा ।
प्रियकरशवही अशुभच गृहीं; स्मशानींच त्याजला जागा ॥ २२ ॥

नव्हतें तुम्हांस, परि मीं; तुमच्या क्षत्रियव्रतासही वरिलें ।
जगलां तुम्ही, परी मम सौभाग्य तया व्रतासवें सरलें ॥ २३ ॥
झाल्यें विगतधवा मी, सहगमनच योग्य जी सती तिजला ।
त्या दुर्लभ पुण्याची करावया जोड जीव हा सजला ॥ २४ ॥
नेलें शव स्मशानीं जीवंत उठे कधीं कधीं म्हणती ।
गणती पिशाच परि तें, त्याचे जिवलगहि त्यास अवगणती ॥ २५ ॥
विगत-क्षात्रव्रत-तनु तुमची निर्जीव त्यापरी उठली ।
डोळांही न पहावी; तिज मग सहगमनपात्रता कुठली ॥ २६ ॥
पतिशव न मिळे तेव्हां स्वपतीची करविती सती प्रतिमा ।
सेव्य धनुर्बाण मला जी साची क्षत्रियव्रतप्रतिमा " ॥ २७ ॥

---

# गणेशसुत गुणे.

## १ सुदाम व कृष्ण.

सुदाम व कृष्ण हे बाळपणीं एकाच गुरूचे घरीं विद्याभ्यासार्थ होते. त्यामुळें त्या दोघांत विशेष मैत्री होती. सुदाम हा अत्यंत दरिद्री होता. तेव्हां आपल्या पत्नीच्या सांगण्यावरून तो कांहीं धन मागण्याच्या हेतूनें कृष्णाकडे गेला. हाच दोघांच्या भेटीचा प्रसंग पुढील उताऱ्यांत आहे.

श्लोक.

( पृथ्वी. )

नवांबुदसमद्युती, कशित पीतवासा कटीं ।
दिसे रदनपंक्ति ती, स्मितमुखांत शोभे किती ।
सुभव्यललिताकृती सवृषदेव ज्या वंदिती ।
असा प्रभु उठाउठी, प्रकट जाहला श्रीपती ॥ १ ॥

'सरीं नलिन वाढतें, सर न पंकजीं तें कदा'।
असें श्रवणिं ऐकिलें, नयनिं देखिलें सर्वदा।
दयारससरोवरा नयनकंजिं ज्याच्या स्थिती।
असा प्रभु उठाउठी, प्रकट जाहला श्रीपती ॥ २ ॥
धरी प्रभु भुजांमधीं कवळुनी सख्यातें हृदीं।
उचंबळुनि ये तदा प्रभुकृपारसाचा निधी।
द्रवे दगडही अहा! निरखितांचि मित्रा कसा।
द्रवेल न कृपामृदु प्रभु बघूनि दामा तसा ॥ ३ ॥
स्वमित्रशिरिं ढाळितां सलिलबिंदु हर्षोद्गत।
प्रभू गमत विष्णुसा, द्विजहि शंभुसा भासत।
स्रवे सलिल जान्हवी, उपरि-गाचि नेत्रांतुनी।
प्रभुप्रभुचिया, पडे द्विजशिवाचिया मूर्धनीं ॥ ४ ॥
करीं कर धरूनिया निज-गृहांत जाऊनिया।
स्वमंचिं बसवूनिया वदत कृष्णराजा तया।
'कितीक दिन जाहले तुजसि भेटुनी वत्सला।
मनांत गमलें असें विसरलासि मित्रा मला ॥ ५ ॥
असे वहिनि ना सुखी? कुशल ना तुझीं लेंकरें।
यथा-सुख असे स्थिती गुरु-वराचिया ना वरें।
कथीं मजसि सर्वही, अमृत कर्णरंध्रांतरीं।
म्हणीं रिचवुनी करीं सुखित गा सख्या अंतरीं'॥ ६ ॥
'नभीं तपन तापतां तिळ न अंधकारव्यथा।
तशी गुरुदयार्द्रता मम शिरीं सदा जागृता।
कदापि नुरवी कथा मम विपत्तिची सर्वथा।
सदा सुखवि जी नतां, तिळ न वाक्य हें अन्यथा ॥ ७ ॥
तुझी बघुनिया स्थिती मुदित होय ही मन्मती।
तसेंच हृदयाप्रती अमृतबिंदुही न्हाणिती।

सुहृत्सुखचि तोषवी अधिक तेविं आनंदवी ।
सतांस म्हणुनी कवि स्तुतिस त्यांचिया वर्णवी ॥ ८ ॥

स्वतांचि कमलालया रगडिते पदाब्जांस या ।
महत्त्व तव गावया कथन अन्य तें कासया ।
असें असुनिया दयापर विभो! दारिद्रास या ।
स्मरूनि हारिसी भया! स्तविल कोण ना या नया ' ॥ ९ ॥

अशी परिसुनी तदा स्वसुहृदुक्ति शर्मप्रदा ।
अनंत सुख जाहलें कलिमलांतका कामदा ।
सदा कवि-गणीं हृदीं पुजुनि जो मुखें वाणिला ।
असे श्वसित वेद ज्या, वदत तो प्रभू वाणिला ॥ १० ॥

' असे निजकरांहिं जें प्रथमजन्मि संपादिलें ।
तदीय फल या जगीं मिळत ऊन ना आगळें ।
ललाटलिखिताप्रती पुशिलसा बळी कोण गा ।
जरी प्रबळ, वारणें हलविलें कधीं का नगा ॥ ११ ॥

असो, मजसि काय गा! निजगृहाहुनी आणिलें ।
उपायन? सुहृद्वरा अझुनि तूं न तें दाविलें ।
असे विदित या जना तव ममत्व, येशिल कां ।
विरिक्तकर, देखण्या बहुतशा दिनीं हा सखा ' ॥ १२ ॥

हृदीं बुचकळे, अशा परिसुनी वचालागुनी ।
' करूं पृथुक हे पुढें, न करुं कां?' असा तो मनीं ।
विचार करि! जाहलें वदनकैरव म्लान तें ।
विपत्ति-तपनें, मग प्रभुसि आर्थिलें त्या नतें ॥ १३ ॥

' तुझे पद सदा धुती सुरवर स्वमौलीगत— ।
स्वगुद्गतमधुद्रवें करुनिया शिरां आनत ।
अशास वद काय गा! तुजसि अर्पणें निःस्वकें ।
परी सख म्हणूनिया पृथुक अर्पितों हे निके ' ॥ १४ ॥

बघूनि पृथुकां हृदीं बहुत हर्षला श्रीपती ।
तयांस मग भक्षुनी वदत देव दाम्याप्रती ।
'अणूहि दिधलें पुरे मजसि भक्तियुक्तें नतें ।
अभक्त जरि विश्व दे, खचित आवडे या न तें' ॥ १५ ॥

असो, प्रभुवरें गृहीं सुखवुनी सख्यातें तया ।
कितीक दिन ठेविलें, असुख धाडिलें तें लया ।
करूनि गुजगोष्टिंसीं, स्मरुनि बालचेष्टांप्रती ।
परस्परसुखासुखां कथुनि दुःखही हारिती ॥ १६ ॥

अनंतचरितां तिथे निरखितां कळे त्याप्रती ।
असे सुगुणरूपभाक् पुरुष लोकिं हा श्रीपती ।
सुदाम मग तो निघे निज-गृहीं यदा जावया ।
जुळूनि करपंकजां स्तवि तदा प्रभूला तया ॥ १७ ॥

( द्रुतविलंबित. )

'प्रभुवरा, तुझिया पदसारसीं । जन असो रत षट्पदसा रसीं ।
करित जो तुझिया पदवंदना । अशिव तें शिवतें न तया जना ॥ १८ ॥

तव कथाश्रवणीं रति जो नर । धरि, तया लघु हा भवसागर ।
कधिंहि रुष्ट तयावरि या जनीं । न कमला कमलालयवासिनी ॥ १९ ॥

तुजसि हे सख, यादव हे, असें । वदुनिया अवमानियलें असे ।
क्षमुनि तें करिं मुक्त मला प्रभो । जगतिं या गति या न दुजी विभो २०

मजसि मुक्ति पुरे, नलगे धन । गणिति ज्या कवि पातकभाजन ।
असति निर्धन पुत्र विभो! घरीं । भविं, तरी वितरी धन त्यांवरी ॥ २१ ॥

श्रवणिं कीर्ति वसो अघहारिणी । नयनिं मूर्ति तशी सुखकारिणी ।
चरणिं दे स्थिति, अर्पिशि जी जनीं । कविबुधां विबुधा! मजलागुनी' ॥ २२ ॥

( वसंततिलका. )

ऐकूनिया स्तव असा करुणारसाचा । हेलावला प्रभु पयोधि दया-रसाचा ।
स्पर्शूनिया निजकरें पदिं आनतातें । आशीर्वचासि दिधलें मग विश्वतातें ॥ २३ ॥

'आमृत्यु होशिल सुखी धनधान्ययुक्त। भोगीं सुखांस भविंच्या असुनी असक्त।
या पंचभूतघटिता त्यजितां शरीरा। जाशील मुक्तिस सख्या मग निर्विकारा' २४

( शालिनी. )

ऐसा दामा तो सुखी नित्य झाला। संसारांतीं मुक्तिलागूनि गेला।
गातां ध्यातां कृष्णनाथा जगीं या। भुक्ती मुक्ती लागती सत्य पायां॥२५॥

---

# लक्ष्मण पांडुरंग भोसेकर.

---

## १ मातेची थोरवी.

पुढील उतारा 'मुरली-विलाप' या काव्यांतील आहे. मुरली कृष्णाला फार प्रिय होती, म्हणूनच त्याला 'मुरलीधर' म्हणतात. या काव्यांत कवीनें अशी कल्पना केली आहे कीं, कृष्ण निजधामीं गेल्यावर मुरली त्याच्या शोकानें पोळून गेली व तिनें कृष्णाचा धांवा केला. तेव्हां कृष्णानें तिला असें सांगितलें कीं, यापुढें तूं फुंकणीचें रूप घेऊन लोकांना क्षुधा शांतविण्याला साहाय्य कर; व अशा रीतीनें परोपकारीं देह झिजवून त्याचें सार्थक कर. त्याप्रमाणें ती 'मुरली' कवीकडे आश्रयार्थ आली. त्याच्या घरीं फुंकणी होऊन रहावें, असा तिचा विचार होता. पण कवि होता विधुर; तेव्हां आपले घरीं मातेप्रमाणें तुझें पालन करण्याला कोणी नाहीं, असें त्यानें तिला सांगितलें. हेंच त्याचें उत्तर पुढील उताऱ्यांत आहे.

दिंड्या.

सृष्टि रचितां मातेस विधात्यानें। दोन वस्तू अनुपम्य दिल्या त्यानें।
स्तनीं बाळास्तव दुग्ध देइ तीच्या। मनीं घाली प्रेमाब्धि त्या सतीच्या॥१॥
जाइ पहिलें वा राहि कारणानें। दुजें हृदयीं आजन्म देइ ठाणें।
दुजानें ती होतसे धन्य आई। शक्य होणें नच तिचें ऊतराई॥ २ ॥

एकखांबी घर असे बाइ! माझें। एक चक्रीं गाडिचें सर्व ओझें।
दुजा बाजुस आधार जिचा होई। अशी माता मम गृहीं तुला नाहीं ॥३॥
मुलेंबाळें खेळती, भांडताती। हट्ट करिती, किति तरी त्रास देती।
तरी सर्वां जी सदा क्षमादायी। अशी माता मम गृहीं तुला नाहीं ॥ ४ ॥
मुली मुलगे जन्मती वाढताती। धनें ज्ञानें युक्त वा मूढ होती।
एकरूपचि परि जिचें प्रेम राही। अशी माता मम गृहीं तुला नाहीं ॥ ५ ॥
देशकालस्थिति सरळ विषम येवो। स्नेह सोडि न हृदयिंचा जिच्या ठावो।
जिला न शिवे मानापमान कांहीं। अशी माता मम गृहीं तुला नाहीं ॥६॥
अतिथिबांधव, वा कोणि इष्टमित्र। गृहा येतां मृदु वचनिं आदरीत।
अन्नदानीं उत्साह मनीं देहीं। अशी माता मम गृहीं तुला नाहीं ॥ ७ ॥
यथाशक्ती सामुग्रि जशी साध्य। तशी घेउन रुचियोग्य करी खाद्य।
गृहन्यूनहि झांकून जिनें जाई। अशी माता मम गृहीं तुला नाहीं ॥ ८ ॥
गृहीं होतां आजार कुणा कांहीं। करी शुश्रूषा राबुनी स्वदेहीं।
अन्यदुःखें तडफडे जशी लाही। अशी माता मम गृहीं तुला नाहीं॥ ९ ॥
प्रसंगें जी करि दंड, भरे रागें। बाळ बिलगे तिजलाचि परी वेगें।
दुजें अभयस्थल तया मनिं न येई। अशी माता मम गृहीं तुला नाहीं॥१०॥
बालकायुष्क्रम गमे महागार। पिता त्याचा नेमिला शिल्पगार।
मूळ पाया परि जिच्या करें होई। अशी माता मम गृहीं तुला नाहीं॥११॥

---

# रा. दातार.

## १ बागेंतील फुलपांखरास.

श्लोक.

(पृथ्वी.)

मनोहर किती तुझा मधुर वर्ण हा शोभतो।
सुरेशधनुकांतिला रुचिरताबळें मोहितो।

सतेज नयनांबुजद्वय शिरीं चकाके किती।
तुझी सकल गोजिरी तनुचि गुंगवीते मती ॥ १ ॥

तुला निरखितां दिसे प्रतिपदीं नवें चांगलें।
शरीर तव, काय हेममणिमाणिकीं कोंदलें।
भुले मन विलोकितां क्षण तिथेचि तल्लीन तें।
स्वभावरमणीयता मन बळेंचि आकर्षितें ॥ २ ॥

प्रकाश रविचा पडे, परिमळें भरे वासितें।
अशा उपवनीं तुला बघुनि खेळतां वाटतें।
यदर्थ झटती जगीं सकल जीव हे, सौख्य तें।
विलोलुप पदीं तुझ्या तुजसवें सदा नांदतें ॥ ३ ॥

अहा ! विविध रंग हे कुशल चित्रकारें कुणी।
दिले तुज? कृतार्थ तूं खचित सुंदरा, जन्मुनी।
गुणार्णव जयासि हा नटवि रम्य इच्छावशें।
जगत्पटिं, तया पहा सकल आदरीती कसे ॥ ४ ॥

मनीं कधिं न ठाउकी तुजसि काळजी, बा गड्या।
खुशाल वनिं मारितां नवलतानिकुंजीं उड्या।
न पक्ष तव हे, खरे मिरविसी तयाचे जनीं।
यशोध्वजचि, जो तुला निपजवी जगाचा धनी ॥ ५ ॥

कुठे तनु तुझी ! कुठे अखिल विश्व हें एवढें।
किती तव महत्त्व तें सकल या जगाच्या पुढें।
दयार्णव परी तुला विसरला नसे पांखरा।
भिजे कणहि रेणुचा जळिं, न पारखा सागरा ॥ ६ ॥

पहा, विकसली कशी सुमनराजि ही सुंदर।
हितास्तव तुझ्याचि बा तुजसि बाहते सादर।
इथें विहरसी सुखें, विहर तूं सख्या ! एकला।
मुखें मधुमरंद सेवित फुलांतला चांगला ॥ ७ ॥

परंतु मनिं पांखरा, मम शिरे तुझ्या चिंतनीं।
भय प्रबल जें करी विकल चित्त अन्यक्षणीं।
मृणालवपु हें तुझें परम सुंदर प्राणिया।
कृतांतखरपाश सज्ज असतीच ओढावया॥ ८॥

---

## लक्ष्मण गणेशशास्त्री लेले.

### १ दमयंती.

धर्म वनवासांत असतां एकदा बृहदश्व ऋषि त्याच्या भेटीस आले. त्या वेळीं त्यांनीं धर्मास नलोपाख्यान सांगितलें. त्यांतील दमयंतीचा नलविरह-प्रसंग पुढील कवितेंत वर्णिला आहे. यांत, दमयंती कोठें आपणाशींच बोलत आहे, कोठें नलाला संबोधून विलपत आहे, आणि कोठें नलप्रवृत्त्यर्थ अन्याशीं भाषण करीत आहे.

श्लोक.

(वसंततिलका.)

राजन्! विदर्भतनया विपिनांत आली।
तापे प्रचंडकिरणीं जिथ अंशुमाली।
तन्वी दिसे तनु तिची विरहव्यथांनीं।
शोकार्त होउनि वदे अति दीन वाणी॥ १॥
प्राणेश्वरा! त्यजिसि कां मज एकलीला।
होऊनिया वश तया अदया कलीला।
गेलास हाय! नलराय! कुठे वदान्या।
अन्या न होय भुवनीं मजशी अधन्या॥ २॥
त्वां अश्वमेध करुनी बहु दान केलें।
वैरी तसें यशहि थोर दिगंतिं नेलें।

ऐसें असोनि दयितेविषयीं न वाटे।
चित्तीं दया! तव दयानिधि काय आटे ॥ ३ ॥
जें जें समक्ष वदलासि मला उदारा।
तें तें प्रिया! स्मर; कशी त्यजितोस दारा।
जें काय हंस वदला तुजला मलाही।
आणूनि तें मनिं विचार करूनि पाहीं ॥ ४ ॥
प्राणप्रिया सहृदया! वद शब्द कांहीं।
प्राणप्रियेस तव रक्षक येथ नाहीं ।
मंदस्मिता करुनि हर्षविलेंसि जीतें।
कां आजि मौन धरुनी छाळितोसि तीतें ॥ ५ ॥
ज्याचें पवित्रतम नाम जगास तारी।
औदार्य अर्थिजनसंघविपत्ति वारी।
यद्वीर्य वैरितरुणीनयनांबु हारी।
तो कां विपन्नवनितार्ति न दूर सारी ॥ ६ ॥
राजे दुजे बहु, तथापि तयांत साजे।
तेजें निजें अधिक, इंदुहि ज्यास लाजे।
वाजे जनीं सतत यत्कृतिचा नगारा।
त्याची वनीं विलपते प्रियधर्मदारा ॥ ७ ॥
मी मंदभाग्य चुकल्या हरिणीप्रमाणें।
रानावनांत भटकें बहु दीनवाणें।
आक्रोशही करितसें तुज आठवोनी।
संतापशांति करिं बोलुनि गोड वाणी ॥ ८ ॥
या शैलभूवरि नला! अथवा वनांत।
सिंहादि हिंस्रपशु ज्यांमधिं हिंडतात।
देखेन मी तुजसि निद्रित बैसला वा।
नाहीं तुझ्याविण मला दुसरा विसांवा ॥ ९ ॥

आला, अगा प्रियतमा! मृगराज आला।
वाटे न धीर लवही मम मानसाला।
धांवें, नुपेक्षिं; तुजवांचुनि सांग आतां।
रक्षील कोण अबला इथ ही अनाथा ॥ १० ॥

'नाहीं मला प्रिय दुजें तुजवांचुनीया'।
ऐसें पुनःपुनरपी वदलासि राया।
तें काय होय, रमणा! लटिकेंचि सारें।
सत्यप्रिया! फसवितोसि मला कसा रे ॥ ११ ॥

हें केवढें नवल थोर दिसे अगाई।
टाकूनिया मजसि दूर मृगेंद्र जाई।
हा हाय! हाय! विरहानलताप जाळी।
केवीं टळेल विधिनें लिहिलें कपाळीं ॥ १२ ॥

उत्तुंगसानु हिमगौर गिरी अगाई।
हा येथ; यास पुसत्यें प्रियवृत्त बाई।
याचेवरी करिति मोर सुनृत्यलीला।
वर्षागमीं बघुनि नीलघनावलीला ॥ १३ ॥

प्राणेश्वरास फिरत्यें विपिनीं पहात।
कोठेंहि तो न दिसतो, झुरत्यें मनांत।
शोकें उले हृदय, शून्य दिसे धरा ही।
कोठें नगेंद्र! मम जीवितनाथ राही ॥ १४ ॥

तो पुण्यसंचय, निकेतन सद्गुणांचें।
सौंदर्यसार, गृह तो जयदेवतेचें।
श्रीचें विलाससदन, प्रिय तो नरेंद्र।
वर्णूं शकेल तरि काय तया कवींद्र ॥ १५ ॥

ऐसा अनंतगुण तो नलराज आहे।
प्राणेश जाण मम, तद्विरहा न साहें।

हें दुष्ट जीवित कसें दुरि जात नाहीं।
देहासि सोडुनि पहा! अति यातना हीं॥ १६॥
कोणास जाउनि पुसूं "मम कांतकाय।
त्वां पाहिलास विपिनीं नलराज काय"।
'तूं शोधितेस दमयंति! जया प्रियातें।
तो हा;' असें वचन कोण वदेल मातें॥ १७॥

---

## २ बोधामृत.

### ओंवी.

श्रीरामाची सहधर्मिणी। दशवदनें नेली वनांतुनी। रत्नाकर पडला बंधनीं। दुर्जनसंबंध नसावा॥ १॥ हारिला अंधसुतें अर्थ। तया जिणावया समर्थ। तरी वन सेविती पांडव सपार्थ। सुज्ञें समय पाळावा॥२॥ स्वराज्यमदें नहुषनृपति। कोपविता झाला मुनींप्रति। होवोनि सर्प पडला क्षिति। दर्प नसावा ऐश्वर्यवंता॥ ३॥ मारावया देवकीतनया। उपजली बुद्धि कंसराया। वसुदेव सूक्तींनीं वळवी तया। सामें मूर्खा वश करावें॥ ४॥ बंधो! त्यजीं अविचार मद। ऐसा दशकंठाशी बुद्धिवाद। करितां बंधन पावला धनद। मूढास बोध अनर्थावह॥ ५॥ लंकेश्वर गर्वराशी। झगडा करी कार्तवीर्यासी। क्रीडामृगसम पडला पाशीं। बलिष्ठाशीं विरोध नसावा॥ ६॥ यजनसमयीं शिशुपाळें। हरिशी दुर्भाषणीं निंदिलें। तेणें तया निधन पातलें। महनीयां न निंदावें॥ ७॥ सकलवीरकुलभूषण। श्रीकृष्णाचा बहिश्चर प्राण। नर्तकी होय तो अर्जुन। कालोचित वृत्ति आदरावी॥ ८॥ एककलात्माही निशारमण। शंभुशिरीं पावे मान। तेवीं न अंबरींही कलापूर्ण। महदाश्रयें महत्त्व येतें॥ ९॥ शरतल्पीं गांगेय पहुडला। त्यापासोनि धर्में धर्म परिशिला। तेणें मनींचा संशय फिटला। आप्तोपदेश हितकर॥ १०॥ पृथुक उपहारार्थ घेउनी। श्रीकृष्णा भेटला सुदामा द्विजमणी। गेलें तयाचें दारिद्र्य फिटुनी। संकटीं सन्मित्र सेवावा॥ ११॥ अंबरीष विश्रुत विष्णुदास। त्यावरी अकारण

कोपे दुर्वास । तेणें सुदर्शन भ्रमवी तयास । अस्थानीं क्रोध न दावावा ॥ १२ ॥ हिरण्यकशिपु यदृच्छेनें । संचार करी जिये दिशेनें । तिजला संभाविती निर्जर नमनें । दुर्जन दुरोनि वंदिजे ॥ १३ ॥ द्रुपदसुतेविषयीं काम । धरी अंतरीं कीचक अधम । तयाचा वध करी भीम । परस्त्री-वांच्छा नसावी ॥ १४ ॥ क्षात्रधर्म मनीं आणून । समरीं धनुर्धारी होऊन । झगडला स्वजनाशीं अर्जुन । स्वधर्म कठिणही आचरावा ॥ १५ ॥ बल-दर्पित लंकेश्वर । तृणतुल्य मानी शूर नृपवर । तयासी जिंकिती वानर । सुज्ञें गर्व न धरावा ॥ १६ ॥ वेधिती मातेचे वाक्‌शर । तेणें तप आचरी दुश्चर । परमपद पावला ध्रुवकुमार । व्यवसायात्मिका बुद्धि असावी ॥ १७ ॥ वीर्यविनयादिगुणसंपन्न । कुरूंनीं वधिला सुभद्रानंदन । तरी गतशोक पार्थ करी रण । गताचा शोक न करावा ॥ १८ ॥ युद्धार्थ येतां दशवदन । अर्पूनि तया पुष्पकविमान । धनद करी अलकारक्षण । अल्पदानें बहु रक्षावें ॥ १९ ॥ फार दिवशीं आला भेटी । श्रीकृष्ण परमात्मा जगजेठी । कुंती निवेदी व्यसन मारोनि मिठी । सुहृदा हृद्गत कळवावें ॥ २० ॥ सव्य-साची धनुर्धर अर्जुन । त्यासी जिंकी बभ्रुवाहन । तरी आनंदे तयाचें मन । पुत्रकरीं पराभव भूषण ॥ २१ ॥ गर्भस्थ असुर प्रल्हाद । तया उपदेशी मुनिवर नारद । पावला तेणें परम पद । सदुपदेश अमोघफल ॥ २२ ॥

---

# कृष्णाजी पांडुरंग लिमये.

( राधारमण )

## १ सायंकाळ.

### श्लोक.

( वसंततिलका. )

घेऊनिया निजशिरावरि रश्मिभार ।<br>
उल्लंघितां पथ नभस्तलिंचा अपार ।

आदित्य दिव्यपथिक श्रम फार पावे ।
अस्ताचलीं म्हणुनि संप्रति तो विसांवे ॥ १ ॥
केशावली रविशिरीं किरणस्वरूपा ।
झाली गमे विरल वृद्धदशानुरूपा ।
जातां लया सुदिन कीं दिनराज याचा ।
गेला लया विपुलही करभार साचा ॥ २ ॥
अध्वश्रमें दिनकरा बहु ताप झाला ।
होई न तो सहन कीं बहुधा तयाला ।
अस्ताचलीं म्हणुनि शीतल वात सेवी ।
वस्त्रापरी किरणमंडल दूर ठेवी ॥ ३ ॥
जे राहिले मजसवें उदयप्रसंगीं ।
ते सोडिती किरण कां मजला प्रसंगीं ।
देखूनि दुष्कृति अशी बहु कोप आला ।
त्याकारणें मज गमे रवि लाल झाला ॥ ४ ॥
उत्तुंग शैलशिखरीं कनक-द्रवाचा ।
ओती सदा निजकरें पति पद्मिनीचा ।
वाटे प्रदोषसमयासह संगरास ।
तो अर्पितो रुचिर केशरि वेष त्यांस ॥ ५ ॥
संपूर्ण कुंकुमरसें भरली प्रतीची ।
भासे मना समर-भूमिचिया प्रतीची ।
लीन-प्रभावलय भास्कर लब्धदैन्य ।
शोभे श्रमाकुल जसा भट नष्टसैन्य ॥ ६ ॥
लोकोपकार करण्या निजरश्मिमात्र ।
वेंची; उरे तपन केवळ बिंबमात्र ।
होई विशेष नयना परितोषदाता ।
चित्तीं भरे अधिक निर्धन पूर्ण दाता ॥ ७ ॥
जों जों करी गमन भास्कर पश्चिमेस ।
तों तों मिळे भुवनिंच्या लय चेतनेस ।

मेंदावलें विविध-भूमुखशब्दजाल ।
अंग-प्रभा जगतिची गळली विशाल ॥ ८ ॥

जेव्हां बुडे जलधिच्या जळिं अर्भकाय ।
घेण्या समाश्रय जणूं दिनकालराय ।
दे क्षीण आत्मकर उन्नत शैलभाळीं ।
उच्चांस उच्च सहवास रुचेल काळीं ॥ ९ ॥

ज्या सागरीं सकल-भूतल-तीर्थ-गेह ।
ठेवी तदंतरिं सुखें रवि शुद्ध देह ।
आत्माच सृष्टितनुचा परलोक सेवी ।
कां स्तब्ध शून्य मलिना मग ती न व्हावी ॥ १० ॥

रत्नें दुजीं वसति अंतरिं सागराचे ।
शंका अशी निपजली मनिं निर्जरांचे ।
शोधार्थ ते म्हणुनि पाठविती दिनेश ।
तो हेरसा जणुं करी जलधिप्रवेश ॥ ११ ॥

सायंतनें विकसती कमळें फुलेंही ।
दीपावली मिरविते निजतेज गेहीं ।
झांकी स्वपर्णनयना तरुवर्ग कांहीं ।
मित्रापदा निरखिण्या जणुं शक्त नाहीं ॥ १२ ॥

मार्तंड हा तिलक सुंदर कुंकुमाचा ।
गेला गळूनि घडला क्षय मंगलाचा ।
सायंप्रभा अनुमृता जणुं शोकमग्ना ।
तों जन्म घे रजनि कृष्णमुखी कुलघ्ना १३

---

## २ विजयश्री कां परतली ?

पानिपतचे समरांगणावर पहिल्यानें मराठ्यांनीं जो पराक्रम दाखविला, तो पाहून विजयश्री प्रसन्न होत्साती नेहमींप्रमाणें मराठ्यांना माळ घाल-

ण्याकरितां निघाली; पण तिनें शेवटीं माळ त्यांच्या कांहीं गळ्यांत घातली नाहीं. तिचें मन कां बदललें असावें, याविषयीं कवीनें पुढील उताऱ्यांत सुंदर तर्क केले आहेत.

श्लोक.

( इंद्रवज्रा. )

संतोषली पाहुनि युद्धरीती । माळा जयश्री करिं घेउनी ती ।
आर्यांसि आली वरण्यास रागें । हा! हा! कशी ती परि जाय मार्गे ॥ १ ॥
देखे रणीं भारत-वीर-पत्नी । माझ्या पुढें होतिल या सपत्नी ।
या कारणें कीं खवळोनि रागें । जाई जयश्री परतोनि मार्गे ॥ २ ॥
गर्वें बहू ताठुनि वीर आर्य । गेले, अवज्ञा दिसते अहार्य ।
शंका तिच्या ही मनिं कीं उदेली । वाटे जयश्री परतोनि गेली ॥ ३ ॥
आर्यां अविंधांपरि डामडौल । जुना नसे, तो वसनाच फोल ।
रुचे न हा कीं वरकांति थाट । आर्यांकडे ती फिरवी स्वपाठ ॥ ४ ॥
हे झुंजले सोडुनि पूर्वरीती । मार्गांत आली तिज ही प्रचीती ।
न भ्रष्ट हे योग्य वरावयास । म्हणूनि का ती फिरवी मुखास ॥ ५ ॥
साम्यासि ज्याच्या अभिमन्यु साजे । विश्वास जो बाळ रणीं विराजे ।
तो पाठिराखा मृति लाभतांच । गेली त्वरें ती निघुनीच साच ॥ ६ ॥

---

## एकनाथ पांडुरंग रेंदाळकर.

### १ अन्योक्तिमुक्तांजलि.

भ्रमरान्योक्ति.

श्लोक.

( शार्दूलविक्रीडित. )

मातंगें मदमत्त होउनि तुला या कर्णताळानिळें ।
दर्पानें अवमानुनी मधुकरा! मूढा! दुरी सारिलें ।

जासी धावुनि त्याकडे पुनरपी लज्जा कशी सोडुनी ।
जा पुष्पासव सेवुनी वस सुखें बा रे! दुजा काननीं ॥ १ ॥

वातांदोलितरम्यकोमलदलें संत्रास पावून जे ।
संफुल्लां कमलांहि सोडिति क्षणीं ते भृंग होती दुजे ।
हा कोणी दुसराच भृंग दिसतो सोसून कर्णाहती ।
निर्लज्ज द्विपगंडमंडलमदीं जो क्रीडतो संप्रती ॥ २ ॥

गंधाढ्या नवमालती त्यजुनिया मातंगगंडावरी ।
जाई तेथुनि चंपकीं भ्रमर हा पश्चात् सरोजांतरीं ।
रोधी चंद्र तयास तेथ सहसा हा! मूढ आतां रडे ।
संतोषाविण धावतां जन अहा! आपत्तिमाजीं पडे ॥ ३ ॥

( वसंततिलका. )

संपेल रात्र, उगवेल अहा! तमारी ।
होतां प्रभात कमलें फुलतील सारीं ।
संकल्प कोशगत भृंग करी मनाशीं ।
पद्मास तों उपडुनी गजराज नाशी ॥ ४ ॥

मेघान्योक्ति.

( शार्दूलविक्रीडित. )

या भानुप्रखरांशुतप्त गिरिची पीडा दुरी सारिली ।
दावाग्नी शमवोनि सर्व तरुंचीं दुःखें तुवां वारिलीं ।
अंभोदा! सरिता अनेक भरुनी संतुष्ट केले जन ।
आतां रिक्तचि जाहलास, तुज हें मोठें असे भूषण ॥ ५ ॥

चंद्रान्योक्ति.

( मालिनी. )

धवल करि विकासें चंद्रमा लोक सारे ।
परि न निज कलंका दूरवीतो कसा रे ।
सुविदित सुजनांना होय हें कीं प्रमाण ।
परहितनिरतांची आत्मकार्यीं स्पृहा न ॥ ६ ॥

गजान्योक्ति.

( बसंततिलका. )

गंडस्थळा मधुप मोहुनि सर्व आले ।
त्यांतें मदांध करिनें पारि दूर केलें ।
तद्गंडमंडनचि नष्ट तरी जहालें ।
ते तों पुन्हा मधुप पद्मवनांत गेले ॥ ७ ॥

सिंहान्योक्ति.

( आर्या-गीति. )

सिंहाचा छावाही मदमलिनकरींद्र मस्तकीं धावे ।
थोरांची प्रकृतिच ही, कीं तेथें वय न योग्यता पावे ॥ ८ ॥

आम्रान्योक्ति.

( शार्दूलविक्रीडित. )

गेले भृंग पळून सोडुनि तुला! थांबे न हा! हा! पिक ।
झाले दूर मयूर हाय! गगनीं वेगें उडाले शुक ।
दावाग्नी तुज वेढितां तरुवरा! कामा न आला कुणी ।
येतां संकटकाल कोण पुसतो? हें सत्य भासे मनीं ॥ ९ ॥

( वसंततिलका. )

छाया, फळें मधुर, मंजारि गंधपूर्ण ।
आल्हाद देत भुवना सहकार तूर्ण ।
वेढोनि त्यास झटसी अजि जाळण्यास ।
दावानला, तुजसि नाहिं दयाच खास ॥ १० ॥

जंबूकान्योक्ति.

गंधद्विपेंद्ररुधिरें वन हें भरावें ।
पूर्वीं जिथे युवक केसरिनें फिरावें ।
हा हंत! त्या स्थलिं कसा अजि हा शृगाल ।
स्वच्छन्द लोळुनि धुळी उठवी खुशाल ॥ ११ ॥

धत्तूरान्योक्ति.

( शार्दूलविक्रीडित. )

छाया पल्लविं नाहिं, यत्कुसुमिं वा सौरभ्यही नाढळे ।
किंवा स्वादु फल प्रवासिमनुजा चाखावया ना मिळे ।
रम्या सोडुनी केतकी परि हरें भालीं तुला ठेविलें ।
नामानें कनकद्रुमा! जग दिसे सारें तुवां वंचिलें ॥ १२ ॥

---

## २ नीतिमंडन.

( आर्या-गीति. )

भवनाशन प्रभुस्मृति करिते साधन जगांत अन्य नसे ।
घोर-दवानल-ताप-ध्वंस-कुशल अम्बुवाह एक असे ॥ १ ॥
साधु प्रवीण केवळ आहे सद्गुणसुधारसस्तवनीं ।
अभिनव-रसाल-कलिकास्वाद-कुशल एक कोकिलचि भुवनीं ॥ २ ॥
होतो दोष प्रस्फुट मनुजाचा विशद गुण न होय तसा ।
शरदिंदुचा कलंक स्पष्ट दिसे न प्रसन्नता सहसा ॥ ३ ॥
सदसद्विवेक केवळ सबळ असे व्यसनजाल वाराया ।
चंडांशु क्षम आहे भीषण रजनीतमासि साराया ॥ ४ ॥
सुजनचि यत्नें करिती लोकीं विख्यात सुजनगुणनिवह ।
कुसुमाचें सौरभ्य प्राया पसरी दिगंतिं गन्धवह ॥ ५ ॥
सामान्य मनुज करितो उपकार जसा तसा न थोर करी ।
काय वृथाचि करावा अंबुनिधी ? तृषित-दुःख कूप हरी ॥ ६ ॥
क्लेश न उत्तम धैर्यें गणितो, क्षणही टिके न सामान्य ।
शाणोल्लेखक्षम मणि ! होइल मृत्कण तिथे कसा मान्य ॥ ७ ॥
स्पृहणीय सद्गुणानें होतो मानव न रूपविभवानें ।
रमणीयहि कुसुम करीं धरिलें सौगंध्यहीन तें कोणें ॥ ८ ॥
दुर्जनसंसर्गेंही सज्जन अपुला स्वभाव न त्यजिती ।
काकप्रसंग घडला तरि कोकिल रंजवीत मंजु रुतीं ॥ ९ ॥

कार्यापेक्षी मनुज प्राया अन्यास दावितो प्रेम ।
दुग्धार्थ धेनुला जन कोमल तृण घालितात हा नेम ॥ १० ॥
स्वाभाविक रमणीया वस्तुसि नलगेचि अन्य संस्कार ।
मुक्तेस शाणघर्षण करुनी लाभेल कोणतें सार ॥ ११ ॥
समचि प्रयत्न होती, मिळतें फळ परि असे जसें दैवीं ।
क्षारोदमथन करुनी असुरीं न प्राशिली सुधा, देवीं ॥ १२ ॥
करिती लोक असंभव गुणवर्णन, लाभ काय परि त्यांस ।
' बहु गन्ध कर्णिकारीं ' म्हणतां कोण न करील परिहास ॥ १३ ॥
होतां महाजनांचा अभ्युदय क्षुद्र लोपती सारे ।
पडतां चंडमरीचिप्रकाश नभिं अस्त पावती तारे ॥ १४ ॥
यत्न व्यर्थचि होती, संस्कारोचित जगीं विरल लोक ।
असती कितिक विहंगम, परि तो शुकमात्र बोलतो श्लोक ॥ १५ ॥
उपकाररत महाजन विरल, अमित तापदायि खल असती ।
चिंतारत्नचि दुर्मिळ, अगणित पाषाणशकल पथिं दिसती ॥ १६ ॥
व्यसनीं सज्जन पडला तरिहि गुणोत्कर्ष अधिक तो दावी ।
पसरी निजसौगंध्य श्रीखण्ड जरीहि गावला दावीं ॥ १७ ॥
एकास मित्र वाटे, तोच दुजा शत्रुसा गमे हृदयीं ।
अंभोजवृंद विकसे संकोचे कुमुदवृंद रव्युदयीं ॥ १८ ॥
तज्ज्ञासि गुणपरीक्षा होते, हो तेथ इतर जन अंध ।
व्यर्थचि सुंदर लोचन ! समजे घ्राणासि मालतीगन्ध ॥ १९ ॥
मनुजाचा सहजहि गुण अन्यगुणानें अतीव शोभतसे ।
कांचनभूषण मिळतां निसर्गरमणीय रत्न रम्य दिसे ॥ २० ॥
मध्यम कालविशेषीं, उत्तम उपकार सर्वदा करिती ।
अन्य तरू सुमसमयीं, चंदन गंधें दिशा सदा भरिती ॥ २१ ॥
पसरो कीर्ति कितीही परि केव्हां नष्ट होय तें न कळे ।
शरदिंदुकांति लोपे अवचित जरि तो अकालमेघ वळे ॥ २२ ॥

भोगेच्छा उपभोगें भोगिजनांची न होतसे शमित ।
घृततैलवृष्टि केली अनलज्वाला तरी उठति अमित ॥ २३ ॥
उद्योगावांचुनि जन संपत्फल भोगितील कोठून ।
पीयूषप्राशन सुर करिते झाले समुद्र मंथून ॥ २४ ॥
जन्मस्थानीं आहे काय? मिळवि जनाचि उत्तमाधमता ।
कस्तूरि असे मृगमद, निघे महाविष पयोनिधी मथतां ॥ २५ ॥
श्रेष्ठ कितीहि असो जन, गुणसंगें दोषही असायाचा ।
सिंधुमथानें लाभ सुरां झाला अमृतासवेंचि गरलाचा ॥ २६ ॥
गर्वास्पृष्ट कुणाचें मानस सांगें धनागमीं राही ॥
जलसंचय होतां ध्वनिविकंपिता घनहि कारि दिशा दाही ॥ २७ ॥
सिद्धी समीप असतां दुर्विधिहत मनुज अपयशें मळतो ।
कर्दमनिमग्न हस्ती सलिलार्थ सरित्तटींच तळमळतो ॥ २८ ॥
योजीं शक्ति विचारें न तरि शिरीं कोसळे विपन्निकर ।
उचित पथीं विष हितकर होतें हो तेंच उलट हानिकर ॥ २९ ॥
क्षुद्र अनेक मिळाले तरि न श्रेष्ठाभिभव घडे खास ।
बा जिंकवेल सबल श्येन कसा शत कपोतपोतांस ॥३०॥
नैसर्गिकरम्य गुणहि कालविशेषींच पावतो मान ।
लावण्य मधुर यौवनिं रसिकांचें हरवितें सहज भान ॥ ३१ ॥
गुणवान् असो कुठेही स्वगुणें शोभाचि नित्य तो पावे ।
मोहवि रत्न शिरीं वा कंठिं भुजीं पादपीठिं ठेवावें ॥ ३२ ॥
बा स्थानवैपरीत्यें गुणही होतात दुर्गुणां ऐसे ।
लोचनभूषण अंजन वदनीं दूषणचि होतसे जसें ॥ ३३ ॥
कालविलासें लोकीं कालविला शोक जाय मोदांत ।
उद्यान आज दिसतें स्मशानसें तेंच कीं उद्यां होत ॥ ३४ ॥

---

# दत्तात्रेय अनंत आपटे.

(अनंततनय.)

## १ तूंही भिकारीच!

(आर्या.)

दिल्लीसमीप पूर्वीं निर्जन गहनाटवींत उटजांत ।
होता यतिवर कोणी धर्मात्मा ईशभक्त विख्यात ॥ १ ॥

अनुकूल सर्व होतें शांतीच्या त्या निकेतनामार्जीं ।
खिन्न परी तो चित्तीं न कळे त्या दुःख कोणतें भाजी ॥ २ ॥

हिमकाळशीत वारी तापुनि बहु मंद मंद तो तपन ।
ऊष्ण हराया मारुत वीजी त्या होउनी स्वयें व्यजन ॥ ३ ॥

पळते पुत्र गिरीचे घडविति त्या मधुरशीतजलपान ।
वृक्षलता आनंदें देति तया स्वादु रम्य फलदान ॥ ४ ॥

शय्या मृदुल धरित्री दिग्वसनें रम्य पांघरायाला ।
होतें कुटुंब ऐसें सिद्ध सदा साह्य त्या करायाला ॥ ५ ॥

गर्भश्रीमंती ही निरुपम पाहोनि साधुरायाची ।
मात्सर्यानें व्हावी विचलितही बुद्धि खास धनदाची ॥ ६ ॥

येती बहुजन तेथें संतत त्या संतदर्शनाला हो ।
इच्छूनि कीं घडावा सत्संगाचा पवित्र हा लाहो ॥ ७ ॥

भगवन्नामश्रवणा निष्कामत्वें असंख्य जन येती ।
येती तसेचि कोणी वांच्छा कांहीं धरोनिया चित्तीं ॥ ८ ॥

कोणी आस धनाची, विद्येची, मुक्तिची धरी कोणी ।
कांतेच्छेनें कोणी, छिद्रान्वेषण करावया कोणी ॥ ९ ॥

'अपुल्या करीं घडावा आदरसत्कार आगतांचा या'।
वाटे असें निरंतर साधूच्या परम शांत त्या हृदया ॥ १० ॥

अभ्यागत-सुस्वागत-चिंता ही त्या सदैव जाळितसे।
करितो काय परी तो संग्रहिं त्याच्या कपर्दिकाहि नसे ॥ ११ ॥
शरदीं गगनीं जैसे उठती घन बहु परी लया जाती ।
तेवीं दीनमनोरथ उपजति जैसे तसेचि मावळती ॥ १२ ॥
केला विचार अंतीं त्यानें, 'सकरुण नृपाकडे जावें, ।
सादर शुद्ध मनानें स्वांतींचें शल्य हें निवेदावें ॥ १३ ॥
आला विचार ऐसा नैस्पृह्यें परि तया न मानवला।
झालें दुःख अमितही सहसा जणुं दंश वृश्चिकें केला ॥ १४ ॥
'जा' कथिलें एक मनें, 'नच जाई बा!' सवेंचि दुसऱ्यानें ।
'जा' कथि पुनरपि पहिलें, 'अवमान कशा?' दुजें 'स्वहातानें' ॥ १५ ॥
झालें मनिं तुमुल असें, निर्णय कांहीं परंतु होईना ।
जावें वा नच जावें ? काय करावें ? तयासि समजेना ॥ १६ ॥
भ्रुकुटीस भाल भेटे, पावे दृष्टी सवेंचि संकोच ।
निमिषीं अर्धोन्मीलित, निमिषीं पावे विकास तैशीच ॥ १७ ॥
अंगुष्ठतर्जनींनीं हनु चोळी नेत्र घेउनी मिटुनी ।
दाबुनि चाले क्षणभर चोळी शिर अधर चावुनी रदनीं ॥ १८ ॥
गगनीं सदनीं देहीं क्षणैक दृष्टि स्वकीय फिरवोनी ।
सोडी दीर्घ उसासे स्वस्तिकवत् हृदयीं हस्त ठेवोनी ॥ १९ ॥
जावें उटजांतोनी थांबुनि मध्यें क्षणैक परतावें ।
यावें, गृहीं बसावें, विचार करुनी पुन्हा परत जावें ॥ २० ॥
आंदोलनीं अशा या झाला निश्चय तया महात्म्याचा ।
मानापमान सारा सोडुनि दिल्लीपुरीस जाण्याचा ॥ २१ ॥
जडपदिं उटज त्यजुनी गेला तो साधुराय मानधन।
भेटुनि सम्राटातें आणाया लाभल्यास कांहिं धन ॥ २२ ॥
जातां प्रासादीं तो गेला भूपाळसंनिधानिं मुनी ।
नृप पाहतां तयाला खुणवि बसाया मृगाजिनीं नमुनी ॥ २३ ॥
एकाग्र मानसानें होता भूपाल अर्चनीं निरत ।
देवायतनीं अपुल्या सादर करुणाघनासि आळवित ॥ २४ ॥

'काला! कालातीता! कालक्रीडा! करालकरवदना ।
कमनीया! करुणेशा! कारुण्यास्पदजनीं करीं करुणा ॥ २५ ॥
सम्राडधीश बा तूं पुत्र तुझा वंदितों तुला भावें।
कीं त्वत्कृपाप्रसादें याहुनि मज अधिक वित्त लाभावें ॥ २६ ॥
दे मज ऐश्वर्य विभो! अतुल, करीं बालकामनापूर्ती ।
वाढो कीर्ति दिगंतीं श्रवणिं पडो ही मदीय आर्तोर्ती ' ॥ २७ ॥
परिसुनि सम्राटाचें ईशोपासन निवे त्वरित जाया ।
तो साधु, तों वदे नृप 'आलां भो! कोठुनी अगारा या?' ॥ २८ ॥
अपुला आगमहेतू कथिला त्यानें करोनि मधु हास ।
वदला नृपति तदा त्या 'जातां कां? पुरवितों बसा आस' ॥ २९ ॥
निस्पृह साधु वदे तो 'तूंही बा! मजसमान याचक रे।
जो तूं स्वयें पसरिसी कर, इतरां देशि काय त्याच करें! ॥ ३० ॥
जो तूं स्वयें भिकारी त्या तुजला मागुं मी तरी काय? ।
दात्यांच्या दात्यातें आळवितां श्रेय कीं बहुत होय' ॥ ३१ ॥

---

## २ युधिष्ठिर द्रौपदीसंवाद.

(आर्या.)

एके सायंकाळीं द्रुपदसुता प्रार्थि काय धर्मातें ।
'रिपुची अशी उपेक्षा लांच्छन लावी न का स्वमर्धातें ॥ १ ॥
केली विडंबना मम अरिनें पारिषदिं, वधा सुयोधन तो ।
अन्यें स्वस्त्री छळितां पाही जो होय का सु-योधन तो ॥ २ ॥
विनवी परोपरींनीं निजकांता ती 'सया! दया नच का ।
लाक्षासदनींची भो पतिराय! कराचि याद, या न चका' ॥ ३ ॥
सस्मित धर्म वदे तैं 'चावे श्वा जरि तयासि का प्रमदे ।
चावावें आपणही, वाणी तव ही मला बहु श्रम दे ॥ ४ ॥
अन्यायी नसतांना शिक्षा केली सुता स्वतां तातें ।
होईल का उचित वद, मारी जरि बाल तो स्व-तातातें ॥ ५ ॥

किंवा पति वनितेला मारी व्यर्थचि जरी न अपराधी ।
उक्तचि का जरि मारी ती स्त्री स्वधवा करोनि अपराधी ॥ ६ ॥
नेम जशास तसें हा पाळूं वदतील सर्व, भी मातें ।
वाटे, न चले जग, मग होईल स्थिति अपूर्व भीमा ते ॥ ७॥
शांति, क्षमा, दया हीं सुज्ञांचीं भूषणें जगीं असती ।
दावावा सुपथ धवा स्त्रीनें, शोभे तुला न गी अ-सती ॥ ८ ॥
वसते क्षमा जयाच्या चित्तीं साक्षाद्रमापती वसती ।
करितो तेथें मोदें, थोर खरें भाग्य तें अतीव सती ' ॥ ९ ॥
बोध न तिज हा रुचला बोले ती द्रौपदी तदा त्यातें ।
' दान कुपात्रीं करणें योग्यचि का मज कथा सुदास्यातें ॥ १० ॥
आज्ञापर सच्छिष्या त्यजुनी जो मूर्खछात्र त्या शिकवी ।
विद्या, तो गुरु मूढ न ? कोण जगीं तरि वदेल त्याशि कवी ॥ ११ ॥
दुष्ट कुपात्रा जरि धन दे त्यजुनी सुज्ञशा पिता तनया ।
तुकवील मान कोणी नयज्ञ का या अशाहि तातनया ॥ १२ ॥
राज्योपभोग देउनि हा! हा! हरि दुष्टवृंद संरक्षी ।
वण वण सज्जनगण परि फिरुनी अन्नार्थ मृत्तिका भक्षी ॥ १३ ॥
सोसेल केविं पतिजी ! सज्जनविहगा स्वपक्षपातन हें ।
प्रभुच्या न्यायी राज्यीं सांगा का सत्य पक्षपात न हे ' ॥ १४ ॥
धर्म वदे तैं तिजला, ' सुज्ञे कुविचार हे प्रभूविषयीं ।
चित्तीं कधिं नाणावे, काढिति या उक्ति मात्र जन विषयी ॥ १५ ॥
बुद्धि अपक्का अपुली, हेतु हरीचे म्हणोनि ना कळती ।
हृदयें अज्ञजनांचीं स्वैरगती धांवताति नाकळती ॥ १६ ॥
धर्म क्षमाचि अपुला कांते! तो गे! कदा न सोडावा ।
ईशकृपेनें ऐसा विचार तव तो कधीं नसो डावा ॥ १७ ॥
निजधर्मा पाळावें लाभेच्छा धरुनि कोणतें कर्म ।
न करावें सुजनांहीं; चित्तांतरिं तरिच पाविजे शर्म ॥ १८ ॥

करणें जें कर्म तया धर्मासम लेखुनी मनीं आर्ये ।
देवो फल वा नच हारि, साधावें कर्म तें सदा आर्यें ॥ १९ ॥

---

## ३ माधवतेजस्विता.

प्रस्तुत प्रसंग श्रीमन्माधवकाव्यांतील आहे. राक्षसभुवनचे युद्धांत प्रथम निजामांनीं मात करून खुद्द राघोबादादांस कैद करून नेलें. पेशव्यांचें सैन्य दाही दिशा पळूं लागलें. श्रीमंत माधवराव या वेळीं राघोबादादांच्या नजरकैदेंत असून ते लढाईच्या जागेपासून चारसहा मैलांवर मागें होते. हें दुःखद वर्तमान कळल्यावर ते पुन्हां युद्धास निघाले; तों तिकडून मल्हारराव होळकर परत पळतांना त्यांना भेटले. त्या वेळीं त्या उभयतांत जीं बोलणीं चालणीं झालीं तीं या उताऱ्यांत घेतलीं आहेत.

आर्या.

इकडे; माधव, घडलें सख्य तरी बंधनांत काकांचे ।
होता; कष्टदशाही आली जरि धीर वीर का कांचे ॥ १ ॥
वार्ताऽशुभा कळे जैं होता तो अर्ध योजनावरतीं ।
बोले, "प्रसंग ऐसा कधिं रिपुच्याही न यो जनावरतीं ॥ २ ॥
अघटित घडे कसें हें? वृक काय अजास आवरायाचा ।
हा! हा! प्रभो कसा परि घालवि हा आजि आव रायाचा ॥ ३ ॥
हा! हा! पन्नगशीर्षीं वास कसा पंकखेलकर भेका ।
लाधावा; हतविक्रम सिंह करावाचि हाय करभें का" ॥ ४ ॥
झाला कोप अनावर भासे तो मूर्त भीम भेसुर कीं ।
साक्षात्काल गमे जणुं घेतीलचि पाहतांहि भें सुर कीं ॥ ५ ॥
"काय करूं? केविं करूं? न सुचे या कांहिं घोर समयाला ।
मरणहि बरें परंतु न दुःख दुजें मानहानिसम याला ॥ ६ ॥
नसता बंधस्थित हा जाता प्रभुजी! कधींच लवलाहीं ।
काकास सोडवाया, दुःखें या तो असेल लवलाही ॥ ७ ॥

अपकीर्ति पेशव्यांची, हा! शब्द नकोत, शल्यवत् सलतें ।
राखीं लाज सकरुणा! बाध न ये का त्वदीय वत्सलते ॥ ८ ॥
मरण बरें पतितोचित घोर अशा रौरवाहि साहीन ।
हा! हा! परंतु नाथा! अपमानास्पद जिणें नको, हीन ॥ ९ ॥
हृदय जळे, अंग जळे, भूमि, दिशा, व्योम पेटलें पाहीं ।
शत्रुवधावांचुनि हा दाह न हो शांत अन्य लेपांहीं" ॥ १० ॥
क्रोधावेशें बोले माधव राघवानियोजितां लोकां ।
"कैदीच का असुनि मी? बोला हो! टकमका न आलोकां"॥ ११ ॥
बोले रक्षकगण तैं लीनस्वें बहुत माधवा देवा ।
'स्वामी! आम्ही सेवक जाणों कीं, एक आपली सेवा ॥ १२
बंधक, बंधन, बद्ध, त्रय हें कोणास कोणिं लावावें ।
नेणों, जाणों पति तो यन्मानस निजजनार्थ हेलावे ॥ १३ ॥
द्या आज्ञा, काय करूं, येंचावें एकही न पल वायां ।
एका क्षणांत लावूं या पदिं त्या खल रिपूस लववाया ॥ १४ ॥
आज्ञेचेंच विलंबन ऐसा लत्ताप्रहार करकरुन ।
येऊं रिपूस किंवा आण्वूं बांधून त्यास करकरुन ॥ १५ ॥
काय कथा शत्रूची काळाच्याही कराल वदनांत ।
घेऊं उडी, न शंका, काय भिऊं या लहान कदनांत ॥ १६ ॥
शूर धुरंधर राजा! भ्याडाप्रतिही क्षणांत करवाल ।
उत्सुक युद्धालागीं धरुनी स्वकरीं कराल करवाल ॥ १७ ॥
मग अमुचें काय अहो मृतजननीचें न दूध प्यालों कीं ।
ऐशी मात करूं कीं, घालावी अंगुली मुखीं लोकीं" ॥ १८ ॥
परिसुनि रक्षकवचना द्विगुणित हो हुरुप बालरायाचा ।
बोले तदा "चला या घेऊं सूडचि करा त्वरा याचा" ॥ १९ ॥
माधव निघे मुदा तैं अपुल्या त्या शूर सैनिकांसहित ।
खाऊं गिळूं अरीला करित अहा! त्याच पावलीं त्वरित ॥ २० ॥
तोंचि पथीं त्या भेटे माधव भूपासि राय मल्हारी ।
मूर्तिच पराक्रमाची साक्षान्माणिमल्लमथन मल्हारी ॥ २१ ॥

मल्हार वदे " गिळिला राघवरवि पूर्ण शत्रुकेतूनें ।
धूलिनिमज्जन केलें अपुल्या बाळा ! प्रकीर्तकेतूनें " ॥ २२ ॥
सस्मित पुनरपि बोले, " झालें ना जेंच पाहिजे होतें ।
राज्य पुण्यांत करीं कीं, चाल पुढें बाळ ! पाहिं जें हो तें " ॥ २३ ॥
बोले माधव तेव्हां, " ऐकतसें कीं तुम्हीच भाऊंतें ।
पूर्वीं रणीं बुडविलें काका ! परि सत्य आज भाऊं तें ॥ २४ ॥
धर्म जयाचा त्यांनीं पाळावा उचित कार्य जगताला ।
जावें गमे तरी जा, समरा जातों पिटोचि जग ताला ॥ २५ ॥
एकें धेनुस वधिलें, वधणें हो ! उक्त वत्स काय तिचें ।
एकें छाटी चिरितां फोडावें हो ! अलाबु का यतिचें ॥ २६ ॥
आपापसांत कलहा काका ! हा योग्य साच ना काल ।
जातां धर्में यश कीं, त्यजितां भीरूपुढेंहि वांकाल ॥ २७ ॥
वीरांसह या जातों मशकापरि उडवितोंचि खळबळ तें ।
वागविलें काकांनीं अनयें परि मन तदर्थ खळबळतें ॥ २८ ॥
जेथें नांव कुलाचें बुडतें द्यावें सहाय आपाला ।
काका ! जागृतसा कीं, जागें करणें सुयुक्त सुप्ताला ॥ २९ ॥
अन्यायें अन्यांनीं केलेला हो ! स्वकीय कुलिं नास ।
सुज्ञें काय पहावा ? करणें तैसें अयोग्य कुलिनास " ॥ ३० ॥
तप्ताग्निगोळकासम बालभटोच्चारित प्रतीक वच ।
शिरलें, हृदयीं भिनलें फोडुनिया तद्धृति प्रतीकवच ॥ ३१ ॥
वदला बहु नम्रत्वें मर्मच्छिदशब्द शंभुसा गर तो– ।
गिळुनी, योग्यचि सीमा लंघी नच कोपतांहि सागर तो ॥ ३२ ॥
" नाहीं तैसें बाळा ! नव्हता मन्मानसांत हा हेतु ।
अवगणुनी मत्सेवा दुर्वच बहु ओकलासि हा ! हें तूं ॥ ३३ ॥
चाल रणीं झणिं बाळा ! दाखवितों मदसिचंडतेजातें ।
विजयश्री शत्रूतें बघतों आतां कशीच ते जाते " ॥ ३४ ॥
माधवमल्हार रणा निघती तैं थेट पवनवेगानें ।
न वदूं शके; न करवे आर्यापतिची सरी नवें गानें ॥ ३५ ॥

---

# राम गणेश गडकरी.

(गोविंदाग्रज.)

## १ एखाद्याचें नशीब.

### श्लोक.

(शार्दूलविक्रीडित.)

कांहीं गोड फुलें सदा विहरती स्वर्गांगनांच्या शिरीं ।
कांहीं ठेवितसे कुणी रसिकही स्वच्छंद वक्षावरी ।
कांहीं जाउनि बैसती प्रभुपदीं–पापापदा वारि तें ।
एखादें फुटकें नशीब म्हणुनी प्रेतास शृंगारितें ॥ १ ॥
कोणी पर्वत आपुल्या शिरिं धरी हेमप्रभा शीतला ।
कोणाच्या उदरामधून निघती मोठ्या नद्या निर्मला ।
कोणाला वनदेवता वरितसे मोदांत जी नाहते ।
एखाद्यामधुनी परंतु जळती ज्वाला नदी वाहते ॥ २ ॥
झाडें जोडुनि पत्रयुग्म फुटतें मेघाप्रती याचती ।
स्वच्छंदें जलबिंदु तोंच सगळ्या पानांवरी नाचती ।
सारीं पालवती फुलें विहरती शोभा वरी लोळते ।
एखाद्यावरमात्र वीज पडुनी त्या जाळते पोळते ॥ ३ ॥
चाले खेळ असा जगांत, बहुधा सौख्यांत सारे जरी ।
एखादा पडतो तसाच चुकुनी दुःखार्णवीं यापरी ।
पाही कोण अशा हताश हृदया? जो तो असे आपला ।
देवा! तूं तरी टाकिं अश्रु वरुनी, त्यासाठिं तो तापला ॥ ४ ॥

समाप्त.

# वाचनपाठमाला.

## भाग १ व २.

### संपादक—कृष्णाजी गोविंद किनरे.

थोरले चिपळूणकर, धाकटे चिपळूणकर, प्रि० आगरकर, प्रि० गोळे, लोकहितवादी, डॉ० भांडारकर, रा. ब. महाजनी, रा. ब. ओक, धनुर्धारी, प्रो० भानू, इत्यादि नामांकित व कसलेल्या मराठी लेखकांच्या ग्रंथांतून शालोपयोगी असे वेंचे काढून त्यांचा या दोन पुस्तकांत संग्रह केला आहे. इंग्रजी शाळांत मराठी वाचनपुस्तकें म्हणून वरील इयत्तांत यांचा उपयोग व्हावा, याच हेतूनें हीं मुद्दाम तयार केलीं असून आज महाराष्ट्रांत बहुतेक शाळांतून हींच चालू आहेत. या मालेचे दोन भाग असून पहिला भाग इंग्रजी इयत्ता सहा व सात यांकरितां, व दुसरा भाग इंग्रजी इयत्ता चार व पांच यांकरितां आहे. दोन्ही **भाग सरकारानें शाळांत चालविण्यास मंजूर केले आहेत.**

साधी, सुबोध, चटकदार, जोरदार, मोहक व शुद्ध अशा भाषाशैलीचे नमुने विद्यार्थ्यांच्या नजरेपुढें यावे, व त्यांचें अनुकरण करून त्यांनीं स्वतां उत्तम लेखक बनावें, त्याचप्रमाणे त्यांना विद्येची गोडी लागावी, ज्ञानाची लालसा उत्पन्न व्हावी, अवलोकनाची संवय जडावी, त्यांची सारासारबुद्धि जागृत व्हावी, त्यांना जगाची ओळख पटावी, व्यवहारचातुर्य यावें, त्यांचें शील बनावें, योग्य तो स्वाभिमान अंगीं बाणावा, तात्पर्य पुढें अंगावर येऊन पडणारी संसाराची जबाबदारी उत्तम तऱ्हेनें पार पाडण्याचें सामर्थ्य तरुण पिढीचे अंगीं यावें, अशी दृष्टि प्रत्येक पाठाची निवड करितांना ठेवलेली असल्यामुळें हीं दोन्ही पुस्तकें विद्यार्थ्यांना तर ‘ अमोल ’ आहेतच, पण इतर आबालवृद्ध स्त्रीपुरुषांनींही तीं वाचून मनन करण्यासारखीं आहेत. छपाई सुंदर, टाईप ठळक, बांधणी मोहक पण मजबूत. प्रत्येक भागाचीं पृष्ठें ३२०. प्रत्येक भागास किं० एक रुपया. ट० ख० निराळा.

भट आणि मंडळी,
बुधवार पेठ, पुणें शहर.